# जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव

## // महासभा बैठकीचे कार्यवृत्त //

**सभा क्रं. - ४७** **दि. २१/०३/२०२३**

जळगांव शहर महानगरपालिकेत दि.२१/०३/२०२३ रोजी दुपारी १२.०० वाजता सरदार वल्लभभाई पटेल टॉवर इमारतीमधील दुसऱ्या मजल्यावरील सभागृहात मा.पिठासीन अधिकारी तथा महापौर. सौ.महाजन जयश्री सुनिल यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या महासभेचे कार्यवृत्त.

उपस्थिती नोंदणी रजिष्टरमध्ये स्वाक्षरी करून खालील मा.सभासद सभेस उपस्थित होते.

**मा.सौ.महाजन जयश्री सुनिल, महापौर तथा पिठासिन अधिकारी**

| | | |
|---|---|---|
| पाटील कुलभुषण विरभान, उपमहापौर | चौधरी मनोज सुरेश | सोनवणे अंजनाबाई प्रभाकर |
| जोहरे प्रिया मधुकर | भोईटे लताबाई रणजीत | पाटील रेखा चुडामण |
| नेरकर सरीता अनंत | पाटील चंद्रशेखर शिवाजी | सोनवणे सुरेखा सुदाम |
| पोकळे दिलीप बबनराव | कापसे मयुर चंद्रकांत | ढेकळे सदाशिव गणपत |
| सोनवणे कांचन विकास | कापसे प्रतिभा चंद्रकांत | पाटील राजेंद्र झिपरु |
| दारकुंडे नवनाथ विश्वनाथ | देशमुख प्रतिभा गजानन | महाजन सुनिल सुपडू |
| शिंदे गायत्री उत्तम | पाटील विजय पुंडलिक | काळे रेश्मा कुंदन |
| बाविस्कर किशोर रमेश | सोनवणे सुरेश माणिक | आहुजा मनोज नारायणदास |
| सपकाळे मिना धुडकु | बारी शोभा दिनकर | पाटील मिनाक्षी गोकुळ |
| सपकाळे रंजना भरत | शेख हसीनाबी शरिफ | खडके विश्वनाथ सुरेश |
| कोल्हे प्रविण रामदास | भिल पार्वताबाई दामु | शेख सैईदा युसुफ |
| सनकत चेतन गणेश | पाटील उषा संतोष | पटेल इब्राहिम मुसा |
| सोनवणे मुकुंदा भागवत | कोल्हे सिंधु विजय | सोनवणे विक्रम किसन |
| लढ्ढा नितीन बालमुकुंद | बरडे नितीन मनोहर | भापसे जिजाबाई अण्णासाहेब |
| ॲड.हाडा शुचिता अतुलसिंह | बेंडाळे उज्वला मोहन | **स्विकृत सदस्य** |
| सोनवणे धीरज मुरलीधर | राणे गायत्री इंद्रजित | विशाल राधेशाम त्रिपाठी |
| भोळे सिमा सुरेश | जोशी अनंत हरिश्चंद्र | राजेंद्र नारायण मराठे |
| काळे दिपमाला मनोज | तायडे सुरेखा नितीन | महेश रतन चौधरी |
| सोनवणे अश्विन शांताराम | चव्हाण ज्योती बाळासाहेब | |
| पाटील सचिन भिमराव | मराठे जितेंद्र भगवान | |

सदर सभेस मा.आयुक्त, डॉ.विद्या गायकवाड, नगररचनाकार श्री.अशोक करवंदे, नगरसचिव तथा सहा.आयुक्त, श्री.सुनिल गोराणे, उपायुक्त श्री.गणेश चाटे, उपायुक्त श्री.अभिजीत बाविस्कर, मुख्यलेखाधिकारी श्री.चंद्रकांत वानखेडे, सहा.आयुक्त(आरोग्य विभाग) श्री.उदय पाटील, शहर अभियंता, श्री.चंद्रकांत सोनगिरे तसेच अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

**मा.महापौर :-** नगरसचिव यांनी सभा कामकाजाला सुरुवात करावी.

**नगरसचिव :-** नमस्कार, सर्व सन्मा.सभागृहाचे स्वागत आहे. सर्व सन्मा.सभागृहाला विनंती करतो की, सर्वांनी वंदे मातरमसाठी उभे राहावे.

**सभेस गणपूर्ती असल्याने मा.पिठासिन अधिकारी यांनी सभा सुरू करण्याचे निर्देश दिले.**

**नगरसचिव :-** आजच्या सभेकरीता १) सन्मा.सदस्या चौधरी चेतना किशोर २) चौधरी मंगला संजय ३) सोनार रंजना विजय तसेच सन्मा.सदस्य ४) कोळी दत्तात्रय देवराम ५) काळे अमित पांडुरंग ६) कोल्हे ललित विजय ७) बालाणी भगतराम रावलमल ८) खडके सुनिल वामनराव ९) बागवान रियाज अहमद अब्दुल करीम यांचे रजेचे अर्ज आलेले असुन ते मा. पिठासिन अधिकारी महोदया यांनी मंजूर केलेले आहेत.

**(नगरसचिव यांनी श्रध्दांजलीच्या प्रस्तावांना वाचायला सुरुवात केली.)**

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.१००५ पारित करण्यात आला.**

सभा कामकाजाच्या सुरुवातीस सन्मा.सदस्यांनी खालील प्रमाणे श्रध्दाजंलीचे प्रस्ताव मांडले.

| अ.क्र. | सन्मा.सदस्यांचे नांव | श्रध्दांजलीचे प्रस्ताव |
|---|---|---|
| १. | श्री.ललित विजय कोल्हे | १)मनपा कर्मचारी श्री.दिलीप जानकीराम पाटील यांचे बंधु स्व.प्रकाश जानकीराम पाटील. २) मनपा कर्मचारी श्री.विनायक नन्नवरे यांचे वडील स्व.नारायण झगडू नन्नवरे, ३) शहरातील पोलीस कर्मचारी स्व.सागर दिलीप देहाडे यांचे दुखद: निधनाबद्दल. |
| २. | सौ.सिमा सुरेश भोळे | १)भारताच्या प्रथम महिला राष्ट्रपती श्रीमती प्रतिभाताई पाटील यांचे पती कै.देवीसिंग शेखावत, २) ललित प्रल्हाद पाटील यांचे वडील कै.प्रल्हाद नामदेव पाटील, ३) कुश शिरीष काबरा यांचे वडील कै.शिरीषभाऊ काबरा, ४) अश्विन गांधी यांचे वडील कै.नवनीतलाल नानाभाई गांधी यांचे दुखद: निधनाबद्दल. |

श्रध्दांजली बाबत आलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने उपरोक्त दु:खद घटनेबाबत सभागृहाला अत्यंत दु:ख होत आहे. परमेश्वर इहलोक सोडून गेलेल्या मृतात्म्यास चिरशांती प्रदान करो, त्यांच्या समस्त कुटूंबियांचे दु:खात सभागृह सहभागी असून त्यांचे कुटूंबियांना, मित्र परिवारास दु:ख सहन करण्याची शक्ती प्रदान करो या भावनेसह सभागृहाने दोन मिनीटे शांत उभे राहून दिवगंत आत्म्याना श्रध्दांजली अर्पण केली.

**नगरसचिव :-** सर्व सभागृहाला विनंती करतो की, सर्वांनी दोन मिनीट श्रध्दांजलीसाठी उभे राहायचे आहे.

**(नगरसचिव यांनी अभिनंदनाच्या प्रस्तावांना वाचायला सुरवात केली.)**

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. १००६ पारित करण्यात आला.**

सभा कामकाजाच्या सुरुवातीस सन्मा.सदस्यांनी खालील प्रमाणे अभिनंदनाचे प्रस्ताव मांडले.

| अ.क्र | सन्मा.सदस्यांचे नांव | अभिनंदनाचे प्रस्ताव |
|---|---|---|
| १. | श्री.ललित विजय कोल्हे | महाराष्ट्र राज्यात महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या वाहनात महिलांसाठी प्रवास भाडयात ५०% सूट दिल्याबद्दल महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री मा.ना.श्री.एकनाथरावजी शिंदे व उपमुख्यमंत्री मा.ना.श्री.देवेंद्रजी फडणवीस यांचे हार्दीक अभिनंदन. |
| २. | सौ.सिमा सुरेश भोळे | माजी उपमहापौर श्री.अश्विन शांताराम सोनवणे यांची एसटी कष्टकरी जनसंघाच्या विभागीय अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल हार्दीक अभिनंदन. |
| ३. | सौ.दिपमाला मनोज काळे | जळगांव शहरातील प्रभाग क्र.७ मधिल रहिवासी श्री.संजय मुरलीधर पवार यांची जळगांव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या चेअरमनपदी तसेच श्री.अमोलजी चिमनराव पाटील यांची व्हाईस चेअरमनपदी निवड झाल्याबद्दल हार्दीक अभिनंदन. |
| ४. | श्री.नितीन बालमुकुंद लढ्ढा | सन्मा.सदस्य, श्री.दिलीप बबनराव पोकळे यांची शिवसेना शिंदेगटाकडून गटसमन्वयपदी निवड झालेबद्दल हार्दीक अभिनंदन. |
| ५. | श्री.विशाल राधेश्याम त्रिपाठी | मा.आमदार श्री.सुरेश दामु भोळे यांनी जळगांव शहरातील विकास कामे करणे कामी ८५ कोटी मंजूर करुन आणलेबद्दल हार्दीक अभिनंदन. |

उपरोक्त प्रस्तावाचे अनुषंगाने वरील समाजसेवक यांचे हे सभागृह अभिनंदन करीत असुन त्यांचे उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देत आहोत.

**श्री.नितीन लढ्ढा :-** पोकळे साहेबांना ही मनसेच्या, गोंधळ होते कनफ्युजन होतो. शिवसेनेच्या शिंदे गटाच्या जिल्हा शहर समन्वयक निवड झाल्याबद्दल त्यांचेही मनपुर्वक अभिनंदन करण्यात येत आहे.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** धन्यवाद भाऊ आपण हे सांगितल्या बद्दल.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** परंतु मी आपल्या निदर्शनास आणुन देतो असा योग आपल्याला ही लाभो. सदर पोकळे साहेब हे भारतीय जनता पार्टीचे गटनेते आहेत. परंतु त्यांची निवड शिवसेनेच्या संगठन मध्ये झाली. म्हणुन त्यांचे डबल अभिनंदन. मी ईबाभाईचे आणि नितीनभाऊचे आभार मानतो आणि सांगु ईच्छितो की, मला गुलाबभाऊंनी, गिरीष भाऊंनी ही जबाबदारी दिलेली आहे. संगठक म्हणुन तरी येत्या काळामध्ये ८० ते ९० सदस्य राहतील सभागृहामध्ये नविन ते १० वाढलेले हे सर्व भारतीय जनता पार्टी व शिंदे गटाचे राहतील यासाठी मी पुर्ण प्रयत्न करेल.

(एकाच वेळेला अनेक सन्मा.सदस्य बोलत होते म्हणुन त्यावेळी कोण काय बोलले ते स्पष्ट समजुन येत नाही. )

**श्री.सुरेश सोनवणे :-** महापौरताई,

**श्री.विशाल त्रिपाठी** :- आपल्या जळगांव शहराचे आमदार राजुमामा भोळे, यांनी नुकतेच आपल्या जळगांव शहरासाठी ८५ कोटी निधी मंजुर करुन आणला आहे. त्यांचा ही अभिनंदनाचा ठराव मी या ठिकाणी मांडतो.

**मा.उपमहापौर :-** अभिनंदनाचे प्रस्ताव घेऊ द्या.

**नगरसचिव :-** त्यानंतर शासनाचे काही शासकीय पत्र आलेले आहे. महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र. जमपा/२०२०/प्र.क्र.१८४/नवि-२५ मंत्रालय,मुंबई यांचेकडुन जळगांव शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर नविन पदे निर्माण करण्यास व महानगरपालिकेच्या सुधारीत आकृतीबंधास मान्यता देणेबाबतचा शासन निर्णय प्राप्त झालेला आहे. तर हा पटलावर ठेवण्यात आलेला होता. अधिक माहिती याच्या संदर्भात नगरसचिव कार्यालयात किंवा आस्थापना विभागात मिळु शकेल. तदनंतर राज्यातील सर्व महानगरपालिका, , नगरपरिषदा, नगरपंचायती यांनी स्थापना दिन म्हणुन साजरा करणेबाबत मा.उपसचिव, महाराष्ट्र शासन यांच्याकडुन नगरविकास विभाग शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-२०२२/प्र.क्र.२८२० दि.०१ सप्टेंबर २०२२ चे परिपत्रक प्राप्त झालेले आहे ही माहिती पटलावर सादर करण्यात आलेली आहे.

**मा.महापौर :-** बोला.

**श्री.सुरेश सोनवणे :-** दि.१५/०३/२०२३ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा पुतळा तेथुन हटविण्यात आला. आयुक्त मॅडमांनी पत्र असे दिले आहे काही छानबिन नकरता तो पुतळा हटविण्यात यावा त्या जागेवरती माझे लहानपण गेले आहेत.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** निषेधाचा ठराव मांडा ना.

**श्री.सुरेश सोनवणे :-** सविस्तर माहिती देतो. त्या जागी माझे लहानपण गेले, १९८३ साली, डॉ.बाबासाहेब आंबेडकर महामानव तथा भगवान गौतमबुध्द यांचा तेथे पुतळा बसविण्यात आलेला होता.त्यावेळेस आपले जे शासकीय कर्मचारी होते. ते पण त्या जागी हजर होते. जे नगराध्यक्ष होते त्या वेळेचे ते पण होते. आणि त्यावेळेस डी.डी.आर. ऑफिस मधुन एक पत्र लावण्यात आले होते. ती जागा एका संस्थेला दिली होती. तर पत्र असे लावण्यात आले होते की, या जागेवर कोणाचे आक्षेप आहे का ? तर ते पत्र महापौरताई तेथे १ महिना राहिला त्यावेळेस कोणी आले नाही. त्या पत्राची दखल कोणीही घेतली नाही. त्यानंतर १९९० मध्ये राजारामजी गाडे हे नगरसेवक झाले त्यांनी वेळोवेळी महानगरपालिकेला पत्र व्यवहार केला, पण १९९९ मध्ये तेथुन झोपडपट्टी जी होती ती स्थलांतरीत झाली, त्यावेळेस जी कागदपत्र पुरावे होते. ते अस्तव्यस्थ झाले, कारण बळजबरी ते सामान आहे ना, ट्रॅक्टरमध्ये टाकत होते. ते कागदपत्र हरविले, माझे हे म्हणणे होते आयुक्त मॅडमांना तर माझे एक म्हणणे होते आयुक्त मॅडमांना ज्या वेळेस तुम्ही खुलासा दिला त्यावेळेस ही

महानगरपालिका त्याला दर वर्षी रंग लावण्याचे काम करते. महानगरपालिकेने तेथे संरक्षण भिंत बांधुन दिलेली आहे. आणि १९९९ साली धनंजय जावळेकर साहेब होते, व्ही.बी.सुर्यवंशी साहेब होते. त्यावेळेस ढेकळेदादा हे नगराध्यक्ष होते. त्यावेळेस ही जागा मोजुन मापुन त्या संस्थेला दिली होती. त्यामुळे मॅडमांनी तेथे कोणतीच शाहनिशा न करता, कोणतेच काही न करता त्यांना पत्र देऊन टाकले की, हा पुतळा बेकायदेशीर आहे. तर मी प्रशासनाचा आणि आयुक्त मॅडमांचा निषेध करतो. माझा निषेद नोंदवुन घ्यावा.

**श्री.सुनिल महाजन, विरोधीपक्ष नेते :-** असे पत्र नाही सुरेशभाऊ ते.

**श्री.सुरेश सोनवणे :-** आहे ना पत्र आहे.

**मा.महापौर :-** त्या पत्रात काय दिलेले आहे.

**श्री.सुरेश सोनवणे :-** मी काय म्हणतो, तेथे झोपडपट्टी होती, माझे काय म्हणणे होते. माझे काय म्हणणे होते, आम्ही ४ नगरसेवक होते की नाही, तुम्ही ४ नगरसेवकांना विश्वासात घ्यायचे होते ना.

**श्री.सुनिल महाजन, विरोधीपक्ष नेते :-** तुमचे सर्व म्हणणे बरोबर आहे पण तुम्ही जे सांगत आहे ना की, मॅडमांनी असे पत्र दिले, ते चुकीचे आहे असे मी सांगत आहे. मॅडमांनी काय पत्र दिले आहे ते व्यवस्थीत वाचा तुम्ही.

**श्री.सुरेश सोनवणे :-** मॅडमांनी पत्र दिलेले आहे की, त्या पुतळयाची कोणतीच नोंद नाही. पत्र आहे.

**श्री.सुनिल महाजन, विरोधीपक्ष नेते :-** दप्तरी नोंदुन घ्या.

**श्री.सुरेश सोनवणे :-** हा दप्तरी नोंद नाही. पण दप्तरी नोंद आहे ना. माझ्याकडे पुरावे आहेत सगळे. नोंद आहे ना. हे बघा, ज्या वेळेस महानगरपालिकेची बातमी पेपरात आली, जुनी बुध्द वसाहत मधुन कर्मचाऱ्यांना बदलविले. मग डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि भगवान गौतमबुध्द यांचे पुतळे उचलण्यासाठी हे मदत करत असतील, मग असे लोकं पण हे व्हायला पाहिजे ना. आज सकाळी ४.०० वाजता तो पुतळा उठवण्यात आला, समाजाच्या भावना दुखविण्यात आल्या. आज तेथे १० हजार लोकांची गर्दी होती पण मी त्या भिम सैनिकांचे स्वागत करतो की, कोणताही अनुचित प्रकार घडलेला नाही. त्यांनी शांततेने तेथे पुतळा बसविला,

**श्री.सुनिल महाजन, विरोधीपक्ष नेते :-** या कृतीचे तर निषेधच करायला पाहिजे.

**मा.आयुक्त :-** ए.डी.टी.पी.मधुन फाईल मागवलेली आहे.

**श्री.सुरेश सोनवणे :-** मॅडमांनी समोरच्या मानसाला सांगितले की, दबाव येत होता. मॅडमांनी सांगावे की, दबाव कोणाचा होता मॅडमांना.

**मा.आयुक्त :-** असे काही वाक्य सांगितलेले नाही. संचिका मागवुन माहिती देते. असे चुकीचे आहे ना कोणाचे नांव सांगणे दबाव येतो हे येतो.

**श्री.नितीन लढ्ढा :-** काय झाले आहे, त्या बद्दल वाद नाही. आणि त्या वेळेला मी सुरेशभाऊंकडुनच माहिती घेतली, नेमकी ही घटना कशी घडली. तर सुरेशभाऊंनी आता जी भुमिका सांगितली, तीच भुमिका त्यांनी मला सांगितली होती. सदरहु या कायदा वहीमध्ये मा.आयुक्त महोदया आणि मा.जिल्हाधिकारी महोदय,यांच्याकडील पत्र व्यवहाराच्या अनुषंगाने ही कार्यवाही झालेली आहे. मी त्यावेळेला मा.आयुक्त महोदयांना फोन केला की, मॅडम असे असे काही कानावरती येत आहे. आणि या संदर्भातली नेमकी परिस्थिती काय ? त्यांनी संचिकेच्या संदर्भातली जी संपुर्ण कागदपत्र होते तेच व्हॉटसअपला मला शेअर केली, आणि त्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता, असे कुठेही दिसुन येत नाही की, महानगरपालिकेच्या आयुक्तांनी या कामाच्या संदर्भात परवानगी दिलेली आहे. या संदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयाकडुन महानगरपालिकेला विचारणा झाली होती. भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा पुतळा याला महानगरपालिकेने परवानगी दिलेली आहे का ? त्याच्या संदर्भातले जे उत्तर महानगरपालिकेने दिलेले आहे. प्रति, अप्पर जिल्हाधिकारी, जळगांव दि.२०/१०/२०२२ ला की, महाशय, मौ.जे. जळगांव शहर नगररचना योजना क्र.२ अंतिम भुखंड क्र. ११८/२ मध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा काढणेबाबत पत्र प्राप्त झालेले आहे. आपल्याकडील पत्रात नमुद विषयांचे अनुषंगाने मिळकत पत्रिकेचे व भुखंड योजना प्रोसेसिंग फार्मचे अवलोकन केले असता, सदर मिळकत ही खाजगी स्वरुपाचे असल्याचे

दिसुन येते. तसेच विषयांकित भुखंड या कार्यालयाकडुन पुतळा बसविणे कामी परवानगी दिल्याचे दिसुन येत नाही. म्हणजे त्यांनी फक्त या संदर्भातला उत्तराचे स्पष्टीकरण संबंधीत विभागाला दिले आहे. त्याच्या मध्ये महानगरपालिकेचे पुतळा काढण्याचे संदर्भात कुठलीही कार्यवाही या मध्ये सहभाग आहे असे दिसुन येत नाही.

**श्री.सुरेश सोनवणे :-** बरोबर आहे ना भाऊ. ती जागेच्या संदर्भात आपल पण हे च ठरलेले आहे.पण ज्या वेळेला भावनेचा प्रश्न येतो, डॉ.बाबसाहेब आंबेडकरयांचा विषय येतो,नगरसेवकांना बोलविले पाहिजे होते. तेथे त्यांच समाजाचे लोकांना बोलविले पाहिजे होते. कोण करतो त्या संबंधीत माणसाला बोलवुन.बघा असे असे सांगलेले आहे. मॅडमांनी आधारे घेऊन पत्र दिलेले आहे.असे माझे म्हणणे आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही,नाही, सुरेश भाऊ, तुमचे म्हणणे बरोबर आहे. पण तुम्हाला सांगु का जर त्याच्यामध्ये मॅडम दोषी असले किंवा मी प्रश्न पण केले की, मॅडम सुध्दा त्याच समाजातले आहे. ते असे करतील असे मला वाटत नाही. तरी सुध्दा मी या ठिकाणी खात्री करतो, मी पुन्हा खात्री केली की, कुठेही एकाला असा वादग्रस्त निर्णय घेण्यापुर्वी एक प्रशासकीय अधिकारी १० वेळा विचार करेल. आणि त्याच्यामध्ये जर कधी त्यांची चुक असती, तर निश्चितपणे आपण त्यांनाही दोषी पकडले असते, परंतु या संपुर्ण कागदपत्रांचा अवलोकन केले असता, मॅडमांचा याच्यामध्ये सक्रीय सहभाग आहे असे कुठेच दिसुन येत नाही.

**श्री.सुरेश सोनवणे :-** ठिक आहे मान्य करतो आपण ,

**श्री.नितीन लढ्ढा :-** परंतु जी झालेली कृती आहे त्याला जो कोणी जबाबदार आहे. ती निश्चितपणे गंभिर बाब आहे की, अश्या पध्दतीने कोणी, प्रशासनाला सुपाऱ्या देऊन अश्या पध्दतीचे खाजगी जागेमध्ये अतिक्रमण म्हणा, किंवा पुतळयांना स्थलांतरीत करण्याची भुमिका घ्यायची असेल तर निश्चितपणे ही गंभिर बाब आहे. आणि याला जे कोणी जबाबदार असेतील. त्याच्या संदर्भात जे कोणी प्रशासन असेल, ते जिल्हा प्रशासन असेल, पोलिस प्रशासन असेल, त्यांनी योग्य ती कार्यवाही करायला पाहिजे. अशी या सभागृहात आपण मागणी करु या.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** चौकशी करायला पाहिजे या प्रकरणाची.

**श्री.सुरेश सोनवणे :-** वेळोवेळी त्यांना माहिती मागीतली माहिती पण देत नाही ते. असाच एक प्रश्न आहे २१ वर्षापासुन दिक्षाभुमीचा प्रश्न प्रलंबित आहे. २००२ ला दिक्षाभुमीचे उदघाटन झाले होते. तुम्ही ही होते त्या कामाला, अजुन पर्यंत कागदोपत्री काही नाही. मग लोकांच्या भावनांशी का खेळायचे असे. मी प्रशासनाचा आणि आयुक्त मॅडमांचा निषेध करतो माझा निषेध नोंदवुन घ्यावा.त्यांनी सांगायचे ना, काम आहे त्यांचे सांगायचे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सुरेशभाऊ तुमच्या भावनांशी संपुर्ण सभागृह सहमत आहे. त्या बद्दल कुठलाच वाद नाही. जी घटना घडलेली आहे ती निश्चित गंभिर आहे. तिचा निषेद करावे तितके कमी आहे.आणि याच अनुषंगाने आम्ही या सभागृहाच्या माध्यमातुन जिल्हा प्रशासन किंवा पोलिस प्रशासन यांना विनंती करु या की, झालेल्या प्रकरणाची चौकशी करुन जे कोणी याच्यामध्ये दोषी असतील त्यांच्या संदर्भात कठोरपणे शास्ती करावी अशी सभागृहातर्फे आपण ठरावातर्फे मागणी देऊ या.

**श्री.सुरेश सोनवणे :-** तो जो भुखंड आहे ना, त्याला लागु करावा असे माझे म्हणणे आहे. ओपन स्पेस आहे की नाही.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मला वाटते ती खाजगी मिळकत आहे. त्याचे जर नियोजन विभागाकडुन माहिती घेतली.

**श्री.सुरेश सोनवणे :-** नाही ना, ती खाजगी मिळकतच नाही. जे वारस होते ते वारले, त्यांनी मुख्तयार पत्रावर खरेदी करुन दिलेली आहे. त्याच्यामध्ये लिहलेले आहे की, येथे बाबासाहेबांचा पुतळा आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मला वाटते सुरेशभाऊ, याच्या संदर्भातील,

**श्री.ईब्राहिम पटेल :-** १९९१ पर्यंत तेथे झोपडपट्टी होती. ती झोपडपट्टी अधिकृत रित्या हलविण्यात आली. तेव्हा पासुन तो पुतळा तेथे आहे. आम्ही पण तेथेच होतो.बरोबर आहे, २००५ च्या पुढे कोणीही झोपडपट्टी असो काही

असो तुम्ही हलवु शकत नाही हा महाराष्ट्र शासनाचा कायदा असुन तुम्ही बेकायदेशीरपणे बाबासाहेबांचा पुतळा हलविता आहे. त्यांचे मागचे जे आहे सुत्रधार ते शोधायला पाहिजे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** त्या मिळकतपत्रिकेचा आपण अभ्यास करुन जी काही महानगरपालिकेच्या अखत्यारीतला विषय असेल, त्याच्या संदर्भात महानगरपालिकेकडुन काही तरी धोरण ठरविण्याची बाब जर नियमानुसार असेल, तर निश्चितपणे महानगरपालिका या संपुर्ण विषयामध्ये आपल्याला १००% सहकार्य करेल.

**मा.महापौर** :- मा.सन्मा.सदस्य श्री.सुरेशभाऊ यांनी मांडलेल्या घटनेचा खरंच निषेध आहे कारण याच्यामुळे समाजाच्या भावना दुखवल्या गेल्या आहे. प्रशासनाने याची चौकशी करावी. यात जर कोणी दोषी असेल तर त्यांच्यावर कार्यवाही करावी. विषयपत्रिकेवरील विषयांना सुरुवात करण्यात येत आहे.

**नगरसचिव :- विषय क्र. ०१ :- दि.१५/०२/२०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता संपन्न झालेल्या सर्वसाधारण महासभेचे कार्यवृत्त कायम करणे.**

**सौ.उज्वला बेंडाळे :-** मागच्या सभेमध्ये शब्द दिला होता मॅडमांनी सर्व सन्मा.सदस्यांना, एक महिन्यामध्ये ७ वा वेतन आयोग लागु करणार. पक्का, पक्का, पक्का असे वाक्य आहे. इतिवृत्तामध्ये पण हे वाक्य आहे. मग काय झाले पुढे.

**मा.आयुक्त :-** आस्थापना,

**श्री.चंद्रकांत वानखेडे, उपायुक्त :-** सन्मा.सदस्या यांनी विचारलेले ७ व्या वेतन आयोगाच्या संदर्भामध्ये कर्मचाऱ्यांना जो ७ वा वेतन आयोग लागु करायचा होता त्याच्या संदर्भामध्ये आपण जे काही विशेष लेखापरिक्षण झालेल्या ऑडिटमध्ये जे काही कर्मचाऱ्यांचे नावे आलेले आहे. त्याला निकाली काढण्यासाठी प्रशासन प्रयत्न करत आहे. परंतु मध्यंतरी काळामध्ये आपण ९४८ लोकांना ७ वा वेतन आयोग लावु. त्यांना आपण नियमित वेतनभत्ते अदा करत आहोत. तसेच ९४८ मधले जे सेवानिवृत्त झालेले आहे त्यांना सुध्दा ७ व्या वेतन आयोगाप्रमाणे त्यांना पेन्शन देत आहोत. ७ व्या वेतन आयोगाच्या संदर्भामध्ये आपण ज्यांना लावलेले आहे ७ वा वेतन आयोग त्यांची सुध्दा प्रोव्हीजन आपण बजेट मध्ये पहिला हप्ता देण्याच्या संदर्भात तरतुद आहे. निवृत्तीवेतन झालेल्यांना सुध्दा आपण १ कोटीची तरतुद बजेटमध्ये केलेली आहे. प्रशासनाला जे काही ऑडीटच्या संदर्भात अडचणी येत आहे. त्याचे आम्ही सातत्याने पाठपुरावा करत आहोत. आम्ही थोडे खोलात गेलो,मंत्रालयापर्यंत मी स्वत: गेलो, तेथे आम्ही चर्चा केली, हा ऑडीट असतो, हा टोटली प्रशासकीय मुद्दा आहे. हा जो मुद्दा आहे हा प्रशासनच हाताळत आहे. त्याच्यामुळे ऑडिटमध्ये जे ११८७ कर्मचारी आहे. त्याच्यामध्ये हे कर्मचारी असे आहे की, ३४९ त्यांचे नावासमोर पर्टीक्युलर आक्षेप नाही परंतु कॉमन आक्षेपामध्ये त्या बाबी सर्व येतात. तर प्रशासनाचा हा प्रयत्न आहे. या ३४९ साठी. तर ११८७ जे कर्मचारी आहे. त्याच्या संदर्भामध्ये आम्ही ११८७ लोकांवरती जो काही लेखाआक्षेप आहे. त्याच्यात असे काही आक्षेप जे घेण्यात आलेले आहे. त्याचे जर आपण अवलोकन केले, त्यात सुध्दा काही व्हीप सुध्दा झालेल्या आहेत. आपण जो सविस्तर अहवाल प्रशासन तयार करीत आहे. त्याचे जवळ जवळ त्याचे ही कामकाज पुर्ण झालेले आहे. आणि आपण जो शासनाला अहवाल पाठविला तो कर्मचारी युनियनचे जे पदाधिकारी आहे. त्यांना विश्वासात घेऊन आपण एक ड्राफ्ट तयार केलेला आहे. आपण पर्टीक्युलर सगळी स्टेटमेंट तयार केलेली आहे. त्याच्यामध्ये सर्व आपण मेन्शन केलेले आहे. प्रशासनाकडुन पुढच्या आठवडयामध्ये तो अहवाल शासनाकडे जाणार आहे. ११८७ पुर्ण कर्मचाऱ्यांसाठी त्याच्या संदर्भामध्ये आपल्याला तो अहवाल स्विकृत झाल्या नंतर प्रशासन सर्व कर्मचाऱ्यांना इव्हन जे सेवानिवृत्त झालेले आहे दि.१/१/२०१६ पासुन त्यांना सुध्दा सर्वांना ७ वा वेतन आयोग लागु करुन त्यांना वेळोवेळी महासभेची मान्यता देऊन आपण त्यांना सुध्दा देण्याचे प्रयत्न करणार आहे. सभागृहाची जी मागणी आहे सभागृहाची, त्या ३४९ ला तुम्ही ७ वा वेतन आयोग लावा, प्रशासनाला सुध्दा त्यांचे कामकाज करीत असतांना थोडया मर्यादा येतात. त्याचे उल्लंघन होणार नाही. आणि प्रशासनाचे अधिकारी सुध्दा अडचणीत येणार नाही. हा सुध्दा त्यालाही आम्हाला अभ्यास करावा लागतो आणि

निर्णय घ्यावा लागतो.त्याच्यामुळे प्रशासन त्याच्या बद्दल पाठपुरावा करत आहे. एवढे मी सन्मा.सदस्यांना सांगु ईच्छितो.

**श्री.नितीन लढ्ढा :-** रु.१००/- च्या स्टॅम्पपेपरवर अंडरटेकींग घेऊन.

**श्री.चंद्रकांत वानखेडे, उपायुक्त :-** सर याच्यामध्ये असे आहे. कोणताही जर आयोग बघितले आपण, आता पर्यंत आपण जितके आयोग लागलेले आहे. तर कोणताही आयोग लावल्यानंतर आपण हमी पत्र घेतोच. आता सुध्दा २४८ लोकांना आपण ७ वा वेतन लावला त्यात हमीपत्र असतेच. परंतु हे ऑडिट प्रशासनाकडुन आहे. त्यांना जसे शासनाकडुन आला तर आपण दि.०१/०१/२०१६ पासुनच त्यांना देणार आहोत.त्यांना काही त्या दिवसापासुन आपण लागु करणार नाही.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मी काय म्हणतो, याच्यात बराच वेळ वाया जातो. विलंब होतो आणि त्याच्यामुळे या कर्मचाऱ्यांच्या मनामध्ये अश्वस्तता निर्माण होते. तर ती अश्वस्तता कमी करण्याच्या दृष्टीकोणातुन.

**श्री.चंद्रकांत वानखेडे, उपायुक्त :-** माझी सर्व कर्मचाऱ्यांना सुध्दा विनंती आहे. मनपा प्रशासन आम्ही तुमच्या बाजुनेच आहोत.मी तरी नौकरीला लागल्यापासुन कर्मचाऱ्यांच्या बाजुनेच आहे. जास्तीत जास्त त्यांनी न्याय देण्याचाच प्रयत्न करीत आहे. त्याच्यामुळे त्यांना आज नाही तर उद्या न्याय मिळणारच आहे. प्रशासनामार्फत कार्यवाही सुरु आहे. मला असे वाटते की, आपण जर घाई केली. तर उगाच निर्णय, प्रशासनाला अडचण येऊ नये.असे मी प्रामाणिकपणे सभागृहाच्या निदर्शनात आणुन देतो.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मला कैलास आप्पांचा जम्मु हुन फोन आला की, मी वैष्णवदेवीच्या दर्शनाला आलो आहे. आणि तो विषय तुम्ही तेथे उपस्थित करा.

**श्री.राजेंद्र पाटील :-** मला ही फोन आला.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ते तर योग्य आहे ताईने ते उपस्थित केला, त्या बद्दल त्यांचेही आभार. परंतु कैलास आप्पांना तेथे चिंता होत आहे. तर मला वाटते कर्मचाऱ्यांच्या बाबतीत

**श्री.चंद्रकांत वानखेडे, उपायुक्त :-** चिंता बऱ्याच सदस्यांना आहे. सर्वांना विनंती आहे की, प्रशासनाने अहवाल शासनाकडे पाठविलेला आहे.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** साहेब आपल्यावर विश्वास आहे. आपले काम बघितलेले आहे. लवकरात लवकर करणार ऐवढे विश्वास पण आहे. पण आमचे ही कर्तव्य असते की, पाठपुरावा करुन मागे लागुन करुन घेणे. म्हणुन अधिकाऱ्यांकडे बोलु पण शकतो. मग आपल्याला ही कळतं की काय होणार आहे आणि काय नाही. विषय नसेल तर आपल्याला कळणार पण नाही.

**मा.महापौर :-** या विषयाशी संबंधीत आहे का ?

**श्री.विशाल त्रिपाठी** :- आता ७ व्या वेतन आयोगाचा विषय असल्यामुळे ४-५ दिवसापुर्वी कैलास आप्पाचा, जसा भाऊंना फोन आला, तसेच ५ दिवसापुर्वी आप्पा आणि मी होतो, राजेंद्रभाऊ घुगे होते आम्ही सेवानिवृत्त अधिकारी मॅडमांच्या दालनामध्ये कामानिमित्त गेलो होतो. आणि आपले जे सोनवणी साहेब आहे. शकील शेख आहे. हे कर्मचाऱ्यांच्या लेखापरिक्षणच्या संदर्भातल्या विषयाचा पाठपुरावा करत आहे. आणि आपल्या शहराचे आमदार राजुमामा त्यांनी मंत्रालयात अधिवेशनामध्ये एक प्रश्न मांडला, त्यांचाही मलाही त्या दिवशी फोन आला. आम्ही आयुक्त मॅडमांकडे चर्चा केली. मंत्रालयातुन पत्र आलेले आहे. त्या पत्राचे उत्तर गेल्या ४ दिवसापासुन तयार होत आहे फक्त. माझी ऐवढीच विनंती आहे सभागृहाला अधिवेशन सुरु आहे. आपले आमदार टेबल टु टेबल फाईल फिरवायला तयार आहे कर्मचाऱ्यांसाठी, जर आज रात्रीपर्यंत पत्र तयार करुन पुढच्या आठवडयाची वाट न पहाता उद्याच ते पत्र गेले.तर लवकर हा विषय मार्गी लागेल. ही माझी विंनती आहे आपल्याला. कारण हा बऱ्याच दिवसापासुन हा विषय सुरु आहे.

**श्री.चंद्रकांत वानखेडे, उपायुक्त :-** विशालभाऊ, मामांचे आम्हाला जेव्हापासुन पत्र मिळाले, आम्ही तो ड्राफ्ट तयार केल्यानंतर, संघटना आहे, कर्मचारी आहे, आम्हीही बसुन जवळ जवळ, मला आठवते जवळ जवळ दोन

दिवस आम्ही रात्री ९.३० वाजेपर्यंत होतो. बाविस्कर साहेब होते, चाटे साहेब होते. आणि विशेष म्हणजे, तो ड्राफ्ट जो बनविलेला आहे. अधिक काँक्रीट ड्राफ्ट बनविलेला आहे. मुजुमदार साहेबांनी सुध्दा, आम्ही काही कोर्टाच्या केसेस त्याच्यात टाकलेल्या आहे की, २५ वर्ष कामावर हजर झाल्यानंतर असा आक्षेप घेता येत नाही. किंवा न्यायालयाचा जो निर्णय आहे तो रद्दबातल होतो. त्याच्या अनुषंगाने आम्ही काही न्यायालयाचे संदर्भ टाकुन आपले विधी अधिकारी मुजुमदार साहेब यांना दाखवुन त्यांनी सुध्दा त्याच्यामध्ये सुधारणा करुन जवळ जवळ ते फायनल झालेले आहे. आणि सगळ व्यवस्थीत सुरु आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** माझी एकच विनंती आहे. आज आपला महापालिकेचा वर्धापन दिन आहे. आजच्या दिवशी तो पत्र मॅडमची सही होऊन आजच्या तारखेत जावक लावुन ते गेले पाहिजे. उद्या गेले तरी चालेल. पण आजच्या तारखेत तो फायनल झाला पाहिजे. आजचा दिवस चांगला आहे. महापालिकेचा वर्धापन दिन आहे. आणि आपण एक चांगल्या निर्णयाची सुरुवात आजच्या दिवशी करु. ऐवढी माझी विनंती आहे आपल्याला.

**श्री.चंद्रकांत वानखेडे, उपायुक्त :-** भाऊ आमचे काम झालेले आहे. फक्त जे तक्ते आहे. तेथे थोडी आकडेवारी मिसमॅच होत आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** वानखेडे साहेब, तुम्ही इतके शार्प आहात की, तुम्ही एकदा जर घेऊन बसले तर सगळे आकडे फिरवुन टाकणार.

**श्री.चंद्रकांत वानखेडे, उपायुक्त :-** हो ड्राफ्ट तयार झालेला आहे आपला.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** बस मग आज पत्र गेले पाहिजे आजच्या तारखेत मॅडमांची सही व्हायला पाहिजे.

**श्री.चंद्रकांत वानखेडे, उपायुक्त :-** त्यांनी तक्यात दिलेली आकडेवारी आणि आपण जो सादर करत आहोत ती आकडेवारी ती थोडी मिसमॅच होत आहे त्या तक्त्यांमध्ये. तर ते ही काम चालु आहे आमचे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** तुम्ही एका तासात सगळी आकडेवारी बसवु शकाल इतका विश्वास आम्हाला तुमच्यावरती आहे. माझी विनंती इतकीच आहे की, आजच्या दिवशी चांगला निर्णय झाला पाहिजे. आणि चांगल्या विषयाचे पत्र आयुक्त मॅडमांची सही होऊन गेला पाहिजे. ऐवढीच माझी सभागृहापुढे आपल्याला विनंती आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** आपण मागील सभेचे इतिवृत्त कायम करण्याच्या पहिले. विषय क्र.६.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** मला बोलायचे आहे.

**श्री.सुनिल महाजन, विरोधीपक्ष नेते :-** एक मिनीट विषयाच्या पहिले त्यांना सुचना मांडायची आहे. सादर करणार आहे ते विषय.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** मागील इतिवृत्तामध्ये जो विषय झालेला आहे. जिल्हा अंतर्गत बदलीबाबतचा, मॅडम मला माहिती आहे तुम्ही चांगले चांगले कार्यक्रम घेत आहात. २० व्या वर्धापन दिनानिमित्त सर्व प्रथम शुभेच्छा. आणि जे नविन नविन उपक्रम राबवत आहात आपण.त्याकरीता पण आपले अभिनंदन पण ज्या वेळी गोष्टी अश्या घडत आहे. कारण मागच्या वेळेस पण मी जी.आर. मी वाचुन दाखविला जिल्हा आंतर बदलीचा, तर तो मला जी.आर.वाचुन दाखविण्यात यावा. आणि जी माहिती मागविण्यात आली विभागाकडुन ती अपुर्ण माहिती आहे. हे याच्यासाठी आहे सर्व दप्तर आणलेले आहेत. मी मागणीच्या पहिले पत्र दिले,नगरसेवक म्हणुन मी एक पत्र दिले. तेव्हा दिलेली माहिती, हे बघा पुर्ण बॅग आणलेली आहे मी आज. मला पहिल्यांदा दिली गेली ऐवढी माहिती,पत्र जेव्हा दिले. त्यानंतर ही अपुर्ण माहिती आहे. यामध्ये पुर्ण माहिती नाही. नंतर दिला माहितीचा अधिकार, माहितीचा अधिकार दिला मी दि.२४/०२/२०२३ ला. हे पत्र दिलेले आहे २४ तारखेला,महापौरताई म्हणजे सांगायचे आहे की, कशी दिशाभुल केली जाते आपली. तेव्हा माहिती दिली जाते ऐवढी, ऐवढी माहिती दिली जाते माहितीच्या अधिकारामध्ये.त्यानंतर जेव्हा पहिले पत्र दिलेले होते. त्यात अपुर्ण माहिती दिली गेली. आणि कालच्या दिवशी, जेव्हा मी म्हटले की, मला माहिती पाहिजे.आज महासभा आहे. तेव्हाच त्यांनी सांगितले की, आम्ही घरी येतो म्हणुन, घरी आले ही सगळी माहिती दिली. त्यावेळेला ही माहिती दिली जाते. जेव्हा एकदा पत्र दिले तर अपुर्ण माहिती दिली जाते, ही राहुन गेली चुकीने,चुकी कशी काय होते. जेव्हा पत्र दिले जाते तर

त्याचे उत्तर संपुर्ण मिळाले पाहिजे ना. याचा सविस्तर खुलासा करावा मला काय चुकी झाली आहे. ते तेवढे सांगावे.

**श्री.चंद्रकांत वानखेडे, उपायुक्त :-** सन्मा.सभागृह आपले जे ३ कर्मचारी आहे. चांदेकर, लोंडे आणि आढे, यांनी आंतर जिल्हा बदलीची मागणी केली होती. त्यांनी आपल्या महापालिकेला चांगली सेवा दिलेली आहे. आणि त्यांच्या आईबाबांच्या वैद्यकीय कारणामुळे त्यांनी आंतर जिल्हा बदलीची मागणी केलेली होती. परंतु आंतर जिल्हा बदली बाबत एक शासन निर्णय होता.त्याच्या संदर्भात आपण मागे दोन तिन महिन्यापुर्वी विशेष ठराव सभेत करुन शासनाला पाठविलेला आहे. आणि शासन त्यासाठी सक्षम आहे. त्या शासन निर्णयातील अटीशर्ती शितील करुन.आपण मी ज्या वेळेस उपायुक्त प्रशासन होतो.त्यावेळेस तो ठराव मंजुर झालेला होता. नंतर तो कार्यभार बाविस्कर साहेबांकडे आलेला आहे. तद्नंतर मध्यंतरी काळामध्ये ताईंनी माहिती मागीतलेली होती. मिनव्हाईल आपण शासनाला सुध्दा प्रस्ताव पाठविला पाहिजे होता परंतु ते मार्गदर्शन म्हणुन पत्र प्रशासनाकडे गेला. विशेष बाब म्हणुन ठराव असा असा झालेला आहे असे पाठविले होते परंतु तद्नंतर प्रशासनाने व ताईंनी पाठपुरावा करुन आपण त्या पत्रामध्ये दुरुस्ती केली. ताईंनी पाठपुरावा केल्यामुळे, परत शासनाकडुन देखील पत्र आलेले आहे. आणि त्याच्या अनुषंगाने आपण प्रशासनाने ते पत्र पाठविलेले आहे.ते आता पॉझीटीव्ह आले जे पत्र त्यांनी मला दाखविले. मी स्वत: ते बघितलेले आहे. आणि ते पत्र पॉझिटीव्ह आहे. म्हणुन त्याच्यामध्ये काही अडचण येईल असे वाटत नाही. फक्त माहिती अधिकारी म्हणुन आपले जे लक्ष्मण सपकाळे आहे. त्यांनी जर माहितीच्या अधिकारामध्ये आपण जी माहिती मागविलेली होती. माहितीच्या अधिकारात त्यांनी सर्व माहिती, माहिती अधिकार २००५ अन्वये प्राप्त झाली आहे. परंतु त्यांच्याकडुन काही माहिती सुटुन गेलेली असावी. म्हणुन आपण निदर्शनात आणुन दिले की, मला कागदपत्र अपुर्ण मिळालेले आहे. आणि कागदपत्र त्यांनी आपल्याला दिलेले आहे. तरी देखील याच्यात माहिती किती दिली काय दिली,याच्या संदर्भामध्ये माहिती अधिकारी म्हणुन सपकाळे साहेबांनी त्यांची जी काही अडचण आहे शंका आहे त्याचे समाधान करुन द्यावे. राव साहेब.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** सर मी आपले अभिनंदन करते की, आपण होतात म्हणुन हा प्रस्ताव मार्गी लागला, नाही तर महापौरताई हे २ वर्षापासुनचे प्रकरण आहे. त्याच्यानंतर ३-४ ठराव झाले महासभेत मंजुर झाले. म्हणजे यवतमाळ जिल्ह्यामधील २-२ ठराव त्या लोकांनी आणलेले आहे. तरी त्यांचा प्रस्ताव महासभेपुढे येत नव्हता. वानखेडे साहेबांना मी हे सांगितले आणि त्यांनी सगळे या विषयाचे बघितले, तेव्हा तो महासभेपुढे विषय आलेला आहे.

**श्री.लक्ष्मण सपकाळे, आस्थापना अधिक्षक :-** सन्मा.महापौरताई आणि सन्मा.सभागृह बेंडाळेताईंनी जो मुद्दा मांडला तो अतिशय बरोबर आहे. नजरचुकीने ३ कर्मचाऱ्यांची माहिती आमच्याकडुन राहुन गेली होती, जेव्हा ताईंनी सादा एक अर्ज दिलेला होता.त्यावेळेला ३ कर्मचाऱ्यांची माहिती नजरचुकीने राहुन गेली होती. त्यानंतर संपुर्ण माहिती ताईंना सादर करण्यात आली. आणि त्याबद्दल ताई मी दिलगीरी व्यक्त करतो.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** अपुर्ण माहिती देण्याचे कारण काय ? जर मी माहितीच्या अधिकारात माहिती मागविली नसती असा हा माझा ठाम आरोप आहे. हे जर मी मागविले नसते तर मला पुर्ण माहिती मिळालीच नसती. पहिलेच पुर्ण माहिती द्यायची होती. पण ती दिली नाही. काही कारणास्तव लपविले जात होते. असा माझा स्पष्ट आरोप आहे. अजुन मला नोंद करायची आहे की, ऐवढया दिवस थांबत नाही ताई मंत्रालयात आपले जे प्रस्ताव जाता. या येथे, नगरविकास मंत्र्यांनी आपल्या महापालिकेला पत्र पाठविले आहे की, सगळा खुलासा डिटेल पाठवा. त्याला केराची टोपली दाखवलेली आहे. इकडुन प्रस्तावच गेलेले नाही. जेव्हा मी मंत्रालयात गेली तेथे अक्षरश: हसत होते की, तुमची महापालिका जेव्हा मागणी केली तर ते लवकर पाठवत नाही.कारण काय आहे अडचण काय आहे प्रशासनाला येथे. त्यांना अडचण काय आहे. नगरसचिवांना नाही, नगरविकास मंत्र्यांना

पाठविलेले पत्र आहे. त्याला सुध्दा केराची टोपली दाखविली, सामान्य माणसाला काय विचारणार तुम्ही. मंत्रालयातील नगरसचिवांना ही होत नाही.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आपण प्रशासनाला निर्देश द्यावे की, ताईंची तक्रारीची दखल घेऊन जो कोणी दोषी असेल त्याच्या संदर्भात कार्यवाही करण्यात यावी. १.०० वाजला आहे. अजुन आपला पहिला विषयही सुरु झालेला नाही.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** हे वारंवार होत आहे. वारंवार जर असेच चुका होत गेले तर.असे प्रस्ताव मागचे पणही असतात ना. हे तर आपल्या लक्षात आले म्हणुन ही गाथा काढावी लागली. ही काही मला हाऊस नाही. ते काही माझे नातेवाईक नाही किंवा कोणी नाही. एक माणुसकी म्हणुन मी त्यांची मदत करत आहे तर त्याच्यावर विचित्र पध्दतीने बोलले जात आहे. काल साहेब म्हणतात याच्यावर माझी सही नाही. मी याच्यामध्ये कुठलीच सही केलेली नाही. बाविस्कर साहेबांची सही आहे. ठराव चुकीचा झालेला आहे. डॉकेट वेगळे आहे. ठराव चुकीचा आहे, महासभेमध्ये बोलले वेगळे आहे. म्हणजे नगरसचिवांची चुकी आहे का याच्यामध्ये, नगरसचिवांनी चुक केलेली आहे का लिहण्यामध्ये. हे मला स्पष्ट झाले पाहिजे आज.

**श्री.नितीन लढ्ढा :-** माझे हेच म्हणणे आहे की, आपल्या तक्रारींच्या अनुषंगाने प्रशासनाने योग्य ती दखल घेऊन जे जे कोणी दोषी असतील त्याच्या संदर्भात कार्यवाहीची भुमिका स्विकारावी.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** किती दिवसात कार्यवाही करणार मला सांगा मॅडम. तो पर्यंत विषय पुढे जाणार नाही. ३-४ महासभेपासुन हा विषय येत आहे.

**मा.महापौर :-** सन्मा.ताईंनी जो विषय मांडलेला आहे. त्याची सखोल चौकशी करण्यात यावी. कारण आपल्याला मंत्रालयातुन पत्र येत असतील काही डॉक्युमेंटस आपले मागविले जात असतील तर ते वेळेच्या आधी पोहोचविणे आवश्यक आहे.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** विचारा ना बाविस्कर साहेबांना फोन आला होता की नाही, मी तेथे असतांना तेथुनच फोन केला होता.

**मा.महापौर :-** प्रशासनाने याची सखोल चौकशी करा आणि याच्यामध्ये जो कोणी दोषी असेल त्याच्यावर कार्यवाही करा.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** सोबतच हे एक निर्देश द्या की, नगरसेवकांनी पत्र दिल्यानंतर माहितीच्या अधिकारात देण्याची गरज का पडते. जर नगरसेवकाने पत्र दिले असेल तर त्याला तात्काळ माहिती द्यायला काय अडचण आहे. नगरसेवकाला जर माहितीच्या अधिकार पर्यंत पोहचावे लागत आहे तर ही शर्मेची बाब आहे.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** ही पहा, किमान पावती फाडत नव्हते. याच्यामध्ये पण असे आहे, यांचा गैरसमज असा होता की, रु.१५४४/- ची पावती आहे तर ही पावती फाडली जाणार नाही. म्हणुन माहिती दिली गेली नव्हती.मी तेव्हाच्या तेव्हा पावती केली आहे आणि ऐवढी माहिती घेतली आहे.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** मॅडम हे असे झाले की, नगरसेवकाला किंमत देत नाही. माहितीच्या अधिकारात कार्यवाही होईल या भितीमुळे सगळी माहिती देतात.नगरसेवकाच्या पत्राला असे घेतात आणि केराच्या टोपलीत टाकुन देतात. भरपुर नगरसेवक आहे जे माहितीच्या अधिकाराचा अर्ज देतात.माझी विनंती आहे सभागृहाला प्रशासनाला की, निवेदन द्या सर्वांना की, नगरसेवकांचा कुठलाही अर्ज आला तर तो माहितीच्या अधिकारापेक्षा मोठा आहे या सभागृहाच्या हिशोबाने. तर त्याप्रमाणे त्याला वागणुक मिळावी.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** नगरसचिव बदल करुन लिहतात का याच्या मध्ये मला तुम्हाला ही प्रश्न विचारायचे आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सगळयात मुद्दयाचा विषय हे आहे की, तुम्हाला ज्या काही तक्रारीमध्ये नमुद करायचे असेल ना.तुम्ही लेखी तक्रार दिलेली आहे. प्रशासन त्याच्या संदर्भातली चौकशी करुन जे जे कोणी दोषी असतील ना. त्याच्या संदर्भात प्रशासन कार्यवाही करेल. आपण जर वेगळया चर्चेमध्ये गेलो ना तर हा विषय

एन्डलेस आहे. म्हणजे एका विषयात तुमचे मते-मतांतर काय आहे प्रशासनाच्या लक्षात आले, आणि सभागृहाच्याही लक्षात आलेले आहे. फक्त आपण जर वेळेचा विचार केला तर मला वाटते संयुक्तीक होईल.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** याच्या पुढे असेच होत असेल गोंघळ कारभार जो काही आहे तो आता एक एक भोंगळ समोर येईलच. पण आयुक्त मॅडम तुम्हाला स्पष्ट नम्र विनंती आहे की, कोणालाही पाठीशी घालु नका.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ठिक आहे महापौरताई, घ्या पुढचा विषय.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अध्यक्ष महोदया, सभेच्या पहिले,विषय क्र.६ मागील, तुम्ही ठराव केला आहे की, शिवाजी नगर, हमालवाडा येथील शौचालय निष्कासीत करणेबाबत, या संदर्भात जेव्हा नागरीकांना आमच्या वार्डात माहिती पडली, ते येथे मोर्चे घेऊन आले. हे काय प्रकार आहे. तुम्ही तोडणार आहे का ते शौचालय.

**मा.महापौर :-** नाही.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** तसे तुम्ही आम्हाला त्याबाबत लेखी द्या. आमच्या घरी लोकं डायरेक्ट संडाशीचे डब्बे घेऊन येत आहे. तोडणार आहे का ?

**मा.महापौर :-** आरोग्यधिकारी, उदय पाटील साहेब.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** तोडणार आहे का पहिले त्याचे उत्तर द्या आम्हाला.

**श्री.उदय पाटील, आरोग्यधिकारी :-** सन्मा.सदस्यांनी जो प्रश्न विचारलेला आहे. महानगरपालिकेने जो ठराव पारित केलेला आहे त्यामध्ये स्पष्ट म्हटलेले आहे. ज्या संडाशींच्या तोडण्यामध्ये डिसप्युट असेल. तर असे कुठलेही संडाशी आपण हाती घेणार नाही. असा खुलासा मी आयुक्तांना आणि महापौरांना याच्या आधी केलेला आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** नितीनभाऊ, प्रशासनाने आम्हाला लेखी द्यावे ना त्या संदर्भात. आम्ही नागरीकांना सांगु ना.

**मा.महापौर :-** मागच्या मिटींगला ज्या वेळेला हा विषय झालेला होता, चर्चा झालेली होती त्यावेळेला आपणही हजर होते. आपण त्याच वेळेला विरोध केला असता तर आपण त्याच वेळेला थांबविला असता तो विषय. पण तरी सुध्दा नागरीकांच्या सोई-सुविधा आपल्यासाठी पहिल्यांदा महत्वाच्या त्या अनुषंगाने ज्यावेळेला माझ्याकडे निवेदन आले, तेव्हाच मी आरोग्यधिकारी, उदय पाटील साहेबांना निर्देश दिलेले आहे की, ते पाडण्यात येऊ नये म्हणुन

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** तसे आम्ही प्रशासनाला पत्र दिलेले आहे, तसी प्रशासनाने आम्हाला माहिती द्यावी.

**मा.महापौर :-** काय माहिती हवी आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** त्यांना अशी लेखी हवी आहे की, सदरहु शौचालय पाडण्यात येणार नाही. जेणे करुन नागरीकांना दिलासा होईल.

**मा.महापौर :-** ठिक आहे.

**ॲड.शुचिता हाडा :-** मागच्या सभेमध्ये आयुक्त मॅडमांनी जसे ७ व्या वेतन आयोगाबद्दल भाष्य केले होते तसेच अनुकंपाबद्दलचा सुध्दा केलेले होते की, १५ दिवस ते १ महिन्यामध्ये अनुकंपाचा विषय सुध्दा मार्गी लागण्याची सुरुवात होईल. आजही सभेच्या सुरुवातीला जे अनुकंपाचे उमेदवार आहे तरुण मुले, ते भेटलेले आहेत.त्याचा ही प्रशासनाने खुलासा करावा की, कोणत्या स्टेजला आहे आणि काय होणार आहे.

**मा.आयुक्त :-** मा.महापौर, आपला आकृतीबंध मंजुर झाला परंतु ते रिक्रयुटमेट रूल्स मंजुर झालेले नाही. मी ते इतिवृत्तच वाचत होती. त्याच्या अनुषंगाने एक एक प्रश्न येत होता. तर त्याच्यात ही मी तेच म्हटलेले आहे की, रिक्रयुटमेट रूल्स ८ ते १५ दिवसात सॅन्कशन होतील म्हणुन राजुमामा भोळे ही त्याच्या संदर्भात फॉलोअप घेत आहे. परंतु पुन्हा त्यांनी एक माहिती मागवलेली आहे. प्रत्येक विभागाच्या, पदाची वर्गवारी करुन पाठवा. ती माहिती तातडीने आपण या आठवडयामध्ये देऊ. त्यानंतर आपल्याला पदाचे डिस्ट्रब्युशन कळते, न्यु पदोन्नती किती आणि डायरेक्ट किती. त्यात डायरेक्ट रिक्रयुटमेट फिक्स होते आणि त्याप्रमाणे अनुकंपात टाकता येते.

मागच्या प्रमाणे माझे हेच उत्तर आहे की, जो पर्यंत आपले आर.आर. मंजुर होत नाही. तोपर्यंत आपल्याला बिंदु नियमावलीच्या विषयात जाता येत नाही. दुसरे टॉयलेटचे पण तेच वाक्य होते की, सन्मा.सदस्यांची NOC घेतल्याशिवाय पाडण्याची आपल्याला कार्यवाही करायची नाही. तेच वाक्य इतिवृत्तामध्ये पण आलेले आहे. आणि एकदम सुरुवातीचा जो विषय झाला, माहिती घेऊन सगळयांनी हे केले, कारण ऐकुनच सगळा तो विषय होता.एकदम सुरुवातीला जो विषय झाला तो. प्रशासन नियमानुसार कार्यवाही करतो, कधी कोणावर किंवा कोणाचे ऐकुन किंवा कोणाच्या सदबुध्दीने प्रशासन काम करत नाही. आणि सगळयात महत्वाचे सर्व एच.ओ.डी. ना मी वारंवार आमच्या बैठकांमध्ये सांगते, सन्मा.सदस्य जे पत्र देतात. त्याला दोन ओळीचे का होईना उत्तर देत जा.उत्तर दिले नाही तर आपण काही तरी चुकत आहेत. असे त्यांना वाटत राहते. त्यामुळे सर्वांना समाधानाची वागणुक तर द्यायचीच आहे. त्यांचे दोन ओळीचे का होई ना त्यांना उत्तर दिले पाहिजे. जेणे करुन गैरसमज होणार नाही.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.१ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. १००७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, दि.१५/०२/२०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता संपन्न झालेल्या झालेल्या महासभा कार्यवृत्तामध्ये विषय क्रं.०६ वर झालेल्या चर्चेचे कार्यवृत्तामधील पान नं.४३ मध्ये सन्मा.सदस्या,सौ.गायत्री शिंदे यांचे नावा ऐवजी सौ.गायत्री सोनवणे असे चूकीने टाईप झालेले आहे त्याऐवजी सौ.गायत्री शिंदे अशी दुरुस्ती करुन दि.१५/०२/२०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता संपन्न झालेल्या सर्वसाधारण महासभेचे कार्यवृत्त कायम करणेस मंजूरी देणेत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ५५**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**सौ.गायत्री शिंदे :-** महापौरताई, इतिवृत्त कायम करण्या आधी. इतिवृत्तात माझे नाव गायत्री सोनवणे असे आहे. पाणी पुरवठा विषयी मी तुम्हाला काल पत्र दिलेले होते. आयुक्त मॅडमांना, पाणी पुरवठा विभागाची बोगस पावती या संदर्भात. नळ कनेक्शनचे ज्या बोगस पावत्या दिल्या जात आहे. त्या संदर्भात मी तुम्हाला पत्र दिलेले होते. तर या विषयावर आपण काय कार्यवाही केली.

**मा.आयुक्त :-** नेमाडे साहेब माहिती द्या.

**श्री.संजय नेमाडे, पाणी पुरवठा अभियंता :-** सन्मा.सभागृह, सन्मा. ताईंनी जी पावती दिलेली आहे.ती पावती नसुन चलनाची कॉपी आहे. ते चलन ॲकच्युली नागरीकांना दिले जात नाही. ज्या नागरीकाना चलन दाखविलेले आहे. त्या नागरीकाकडे घरपट्टी बाकी आहे. पाणीपट्टी बाकी आहे. त्या नागरीकाकडे पाणीपट्टी बाकी असल्यामुळे त्यांना अमृतचे नळ कनेक्शन दिलेले नव्हते. ज्या नागरीकानी ही पावती दाखवलेली आहे, ॲकच्युली ती चलनाची कॉपी आहे. ती चलनाची कॉपी असल्यामुळे त्याला नळ कनेक्शन देण्यात आलेले नाही.

**सौ.गायत्री शिंदे :-** रु.१२०००/- त्या नागरीकांकडुन घेतले गेले आणि त्याला रु.५०००/- ची पावती देण्यात आली.

**श्री.संजय नेमाडे, पाणी पुरवठा अभियंता :-** नागरीकाकडे रु.३५०००/- घरपट्टी बाकी आहे. पाणीपट्टी आणि घरपट्टी. हे जे दिलेले चलन आहे. हे खोटे चलन आहे. हे चलन नागरीकाला कधीच दिले जात नाही.

**सौ.गायत्री शिंदे :-** मग खोटे चलन नागरीकाला देणे आपल्याला योग्य वाटले का ?

**श्री.नितीन लढ्ढा :-** तो गंभिर विषय आहे पण,

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** पावत्या डुप्लीकेट छापल्या जात आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** तो फ्रॉड आहे. जो कोणी कर्मचारीने केलेले असेल, तो खुप मोठा म्हणजे अभाव आहे तो. या संदर्भात ताईंनी जे निवेदन दिले.

**श्री.गायत्री शिंदे :-** व्हॉलमनला ही पावती देणे योग्य वाटले का ?

**श्री.नितीन लढ्ढा :-** कोणाकडुन तरी पैसे उकळण्यात आलेले आहे आणि ते पैसे उकळण्याच्या मोबदल्यामध्ये ही पावती देण्यात आलेली आहे. म्हणजे जो काही प्रकार झालेला आहे. कुठेतरी अधिकाऱ्याच्या आणि कर्मचाऱ्याच्या संगतमताने चाललेले आहे.

**श्री.संजय नेमाडे, पाणी पुरवठा अभियंता :-** स्थानिकांनी संबंधीत कर्मचाऱ्याच्या नावानिशी अर्ज दिला पाहिजे. त्याच्यानंतर त्याच्यावर काही कार्यवाही करता येईल. ही जी पावती आहे ना ती बोगस आहे, हा कागदच बोगस आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** भाऊ एक पावती रु.५०००/- आहे आणि एक रु.८०००/- ची आहे असे दोन पावत्या आहे ते.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** तुम्हीच सांगितले आता की, पावती बोगस आहे. तर त्यांच्यावर कार्यवाही करा. चौकशी करा.

**मा.आयुक्त :-** तुम्ही ही जी आणलेली पावती आहे ही चलनाची पावती आहे, नळपट्टीची पावती नाही. जेव्हा मी व्हेरीफाय केले तर ही सही सुध्दा कोणाची आहे आपल्याला माहित नाही. तुम्ही ज्या कर्मचाऱ्याला म्हणत आहात ना पैसे दिले. त्याचे जर नाव कळाले नाही तर आपल्याला चौकशी करता येईल. याच्यावर जी सही आहे ही आयडेन्टीफाय होत नाही. आणि ही चलनाची ऑफिस प्रतची पावती आहे ही. ही नळपट्टीची पावतीच नाही.

**सौ.गायत्री शिंदे :-** हेच चलन त्यांना दिले गेलेले आहे.

**मा.आयुक्त :-** त्या नागरीकाने दिड वर्षापुर्वी पावती फाडलेली आहे. तेव्हाच त्यानी चौकशी करायला पाहिजे होती. आता जरी त्यांनी सांगितले की, कोणत्या कर्मचाऱ्याला दिले. तर इनक्वायरी करता येईल. त्याच्यावर नाव नाही म्हणुन आपल्याला खात्री होत नाही की, पावती कुठली फाडलेली आहे. ही स्वाक्षरी आयडेन्टीफाय होत नाही. हे पण विचारले मी.

**सौ.गायत्री शिंदे :-** माझ्याकडे ऑडिओ रेकॉर्डींग पण आहे.

**मा.आयुक्त :-** आपल्याला कर्मचाऱ्याचे नाव माहित आहे.

**सौ.गायत्री शिंदे :-** हो माहित आहे, राजेंद्र सोनार.

**मा.आयुक्त :-** राजेंद्र सोनार.

**सौ.गायत्री शिंदे :-** हे व्हालमन आहे शिवाजी नगरला.

**मा.आयुक्त :-** व्हालमन आहेत.

**श्री.संजय नेमाडे, पाणी पुरवठा अभियंता :-** व्हालमन आहेत ते. लेखी अर्ज म्हणत आहे, नागरीकाचा लेखी अर्ज पाहिजे.

**मा.आयुक्त :-** याची चौकशी करु मॅडम आपण.

(एकाच वेळेला अनेक सन्मा.सदस्य बोलत होते म्हणुन त्यावेळी कोण काय बोलले ते स्पष्ट समजुन येत नाही. )

**श्री.चेतन सनकत :-** ही बोगसगीरी आहे, महापालिकेला लुटुन खाण्याचे प्रयत्न सुरु आहे. नागरीकांना लुटुन खाण्याचे प्रयत्न सुरु आहे. आणि तुम्ही म्हणतात. नागरीकांनी तक्रार द्यायला पाहिजे. नागरीकच येतात ना नगरसेवकांकडे. बडतर्फ करा त्याला बडतर्फ आणि फौजदारी गुन्हा दाखल करा त्याच्यावर.

**मा.आयुक्त :-** आपण संबंधीतांवर शिस्तभंगाची कार्यवाही करु

**श्री.ईब्राहिम पटेल :-** सख्त कार्यवाही करा मॅडम.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** ज्याच्याकडुन पैसे घेतलेले आहे, त्यांनी तक्रार दिल्यानंतर त्याच्यावर कार्यवाही करण्यात यावी. अधिकाऱ्याची तक्रार दिल्यानंतरही तुम्ही कार्यवाही करत नाही. अधिकारी बनवत आहे की, कर्मचारी अधिकारीवर कार्यवाही करा ना पहिले. दोन वर्षापासुन बोलत आहे. हा प्रकार घडलाच नसता.

(एकाच वेळेला अनेक सन्मा.सदस्य बोलत होते म्हणुन त्यावेळी कोण काय बोलले ते स्पष्ट समजुन येत नाही. )

**श्री.चेतन सनकत :-** दोन प्रकरणे समोर आले असे १०० प्रकरणे असतील.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अमृतच्या कनेक्शनमुळे हे झाले, मग असे किती झाले असतील.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** गंभिर विषय आहे मॅडम हा.

**सौ.गायत्री शिंदे :-** आणि वार्डात असे काही तक्रारी घडत आहे मॅडम, काहींच्या नावावर घरपट्टी नसतांना त्यांना नळ कनेक्शन दिलेले आहे. अमृतचे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अमृतचे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** याची सखोल चौकशी करा.

**मा.महापौर :-** या कार्यवाहीत जो दोषी असेल त्याच्यावर कार्यवाही झालीच पाहिजे.कारण असे की, घरपट्टी नळपट्टी, अमृत कनेक्शनच्या बोगस पावत्या असतील किंवा जास्तीचे पैसे नागरीकांकडुन घेण्यात येतात. कारण वेळोवेळी हे सन्मा.नगरसेवकांनी मांडलेले विषय आहे. याच्यामुळे गांभिर्याने प्रशासनाने याची नोंद घ्यायची आहे आणि सर्व चौकशी करायची आहे.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** खुला भुखंडाचेही सांगा.

**मा.महापौर :-** खुला भुखंड ही.

**श्री.प्रविण कोल्हे :-** मागील महासभेमधील प्रश्न आहे. हॉटेल विलासच्या मागे, रस्त्यावरच्या. अतिक्रमणाविषयी तेथील काही लोक येऊन गेले पण फिरविले जात आहे मॅडम, बांधकामाकडे, टी.पी.कडे, टी.पी.कडुन वापस बांधकामाकडे, एका घराचे चार घर होऊन गेले तेथे. काढा ना त्यांना नोटीस काढा, काय आहे निर्णय घ्या.

**मा.आयुक्त :-** निमखेडीचा विषय आहे हा.

**श्री.प्रविण कोल्हे :-** नाही खेडीचा.

**मा.उपमहापौर :-** याच्यामध्ये सन्मा.सदस्य जे सांगत आहे.सकारण आदेश पण झालेले आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** टी.पी. रोडचा विषय आहे का हा ?

**मा.उपमहापौर :-** हो, टी.पी.रोडचा विषय आहे.

(एकाच वेळेला अनेक सन्मा.सदस्य बोलत होते म्हणुन त्यावेळी कोण काय बोलले ते स्पष्ट समजुन येत नाही. )

**मा.आयुक्त :- मी तेच विचारले त्यांना.**

**मा.उपमहापौर :-** ते संबंधीतांना असे सांगतात की, ती जागा आम्हाला अलॅटमेंट केलेली आहे.

**मा.आयुक्त :-** मी याबद्दल सुचना दिल्या आहेत संबंधीत इंजिनिअरला नोटीस काढा म्हणुन, विषय माझ्या समोर आला होता तेव्हा असा होता की, मागच्या बाजुने घुसलेला नाही, टी.पी.बाजुने घुसलेला आहे. त्यांना टाऊन प्लॅनींगवाले नोटीस देणार. त्याप्रमाणे सुचना आपण दिलेल्या आहे. टी.पी.वालेच तोडतील ते.

**मा.उपमहापौर :-** सकारण आदेश झालेले आहे ना मॅडम त्याचे.

**मा.आयुक्त :-** घरांना नोटीस द्यायची आहे. त्या घरांना नोटीस द्यायची आहे. सांगा ना.

**श्री.अशोक करवंदे, नगररचनाकार :-** रस्त्यावरच्या अतिक्रमणाला नोटीस देण्याचे काही संबंध नाही.

**मा.उपमहापौर :-** नाही बरोबर आहे ना. त्यांचे म्हणणे एकदम योग्य आहे की, रस्त्यावरचे कुठलेही अतिक्रमण असेल तर त्यांना नोटीस देण्याचे काय संबंध आले. रस्त्यावर लोकं घरे बांधत आहे त्यांना नोटीस देण्याचे काय संबंध आलेत.

**मा.आयुक्त :-** त्यांना घर नंबर आहे म्हणुन.

**मा.उपमहापौर :-** नाही नाही चुकीची माहिती आहे मॅडम. त्यांना घर नंबर नाही. ती जी जागा आहे. ॲक्च्युली अलॅट झालेली होती. त्यांना ती जागा दुसरीकडे आहे. चुकीचे आहे ते.

**श्री.सोनगीरे, शहर अभियंता :-** सन्मा.सभागृह ज्या वेळेला तेथील नागरीक आयुक्त मॅडमांना ज्यावेळेस भेटायला आले होते. तेव्हा मी त्याच ठिकाणी होतो. आयुक्त मॅडमांनी सुचना दिल्या आणि दुसऱ्या दिवशी मी प्रत्यक्ष त्या जागेवर जाऊन पाहणी केली. त्या रस्त्यावर जी घरे वाढलेले आहे. त्या ठिकाणावरील रहिवाश्यांना स्वत:चे घर नाही रहायला जागा नाही म्हणुन मी त्या भागातील जे इंजिनिअर आहे श्री.जितेंद्र रंधे यांनी त्या लोकांची नावे लिहले, नोंदी वगैरे केली, आणि ते प्रकरण आम्ही नगररचना विभागाकडे याच्यासाठी पाठविले त्यांना जसे भाऊंनी सांगितले की, माझ्या माहितीप्रमाणे त्यांना नोटीस देणे, सुनावणी घेणे, कारण इतक्या वर्षापासुन ते तेथे रहिवास करत आहे. आणि त्याचे सकारण आदेश पारित झाल्यानंतर अतिक्रमण विभाग, बांधकाम विभाग आणि नगररचना विभाग अशी संयुक्तीक कार्यवाही तेथे झाली पाहिजे. असे माझे म्हणणे आहे. आणि टाऊन प्लॅनींगकडुन नोटीस द्यायला विलंब होत होता. त्यांचे असे म्हणणे होते की, तुम्ही बांधकाम विभागामार्फत नोटीस दिली पाहिजे. पण सुनावणी घेण्याचा अधिकार नगररचना विभागाला आहे. सकारण आदेश पारित करण्याचे अधिकार नगररचना विभागाला आहे. म्हणुन आयुक्त महोदयांनी समक्ष संबंधीत इंजिनिअरला नोटीस बजविण्याचे सांगितलेले आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** हा रस्ता महानगरपालिकेच्या ताब्यात आहे किंवा नाही, पहिले याचा खुलासा करा.

**मा.उपमहापौर :-** महापालिकेच्या ताब्यात नाही तो रस्ता. महापालिकेच्या ताब्यात नाही आहे ना. अतिक्रमण इतके झालेले आहे त्या रस्त्यावरती. तेथील नागरीकांनी या दिड वर्षात किमान ५० अर्ज दिलेले आहे.त्याच्यावर सकारण आदेश झालेले आहे, त्याच्यावर सुनावणी घेण्याची गरज नव्हती. सुनावणी झालेली आहे.म्हणजे जी प्रोसेस फॉलो करण्याची नव्हती ती पण झालेली आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** डी.पी. रोडचा भुसंपादन झालेला आहे की नाही.

**मा.उपमहापौर :-** हो.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** डी.पी.रोड जर महापालिकेच्या ताब्यात असेल तर टाऊन प्लॅनींगची गरज नाही. सरळ सरळ रस्त्याचे मार्कींग करायच आणि अतिक्रमण उचलायचे. नोटीसीचे काय विषय आले याच्यात. उद्या जर सतरा मजलीच्या समोर कोणीही अतिक्रमण लावुन टाकले,

**मा.उपमहापौर :-** रस्ता आपल्याच ताब्यात आहे पण त्या रस्त्याचा आजपर्यंत वापर नव्हता, महापालिकेने लक्षच दिले नाही त्याच्याकडे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** नितीनभाऊंनी तोच मुद्दा मागच्या सभेत मांडला की, सगळे गावाचे डी.पी.रोड मोजा.

**श्री.नितीन लढ्ढा :-** त्याचे हेच कारण आहे.

**मा.उपमहापौर :-** भाऊ मी २०१७ मध्ये पत्र दिलेले आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** डि.पी.रोड जेव्हा महानगरपालिकेच्या ताब्यात असेल तर ही जबाबदारी बांधकाम विभागाची आहे. त्यांना नोटीस देण्याचे काय संबंध आले.

(एकाच वेळेला अनेक सन्मा.सदस्य बोलत होते म्हणुन त्यावेळी कोण काय बोलले ते स्पष्ट समजुन येत नाही. )

**मा.उपमहापौर :-** ते जे चार लोकं आहे त्यांना यापुर्वी शासकीय जागा अलॉटमेंट झालेली होती. ती जागा त्यांना ज्या ठिकाणी अलॉट झाली होती. त्यांनी त्याच्या व्यतिरिकत रस्त्यावरती घरे बांधलेले आहे. ती जागा दुसरीकडे आहे. याची पण शाहनिशा झाली साहेब, त्यांना जागा कुठे अलॉट झालेली आहे याची सुध्दा शाहनिशा मनपा प्रशासनातर्फे झालेली आहे. शाहनिशा झालेली असतांना आपण त्यांना सकारण आदेश काढलेले आहे. जी सुनावणी घेण्याची गरज नव्हती ती सुनावणी पण घेतलेली आहे.सकारण आदेश पण झालेले आहे पण तरी सुध्दा त्याच्यावर कार्यवाही नाही होत आहे. म्हणजे जी प्रोसिजर फॉलो करण्याची गरज नव्हती ती पण फॉलो करुन झालेली आहे.

**मा.आयुक्त :-** सकारण आदेश दिला आहेत का ?

**मा.महापौर :-** सकारण आदेश पण झालेला आहे आणि २ वर्ष झाले त्या विषयाला.

**मा.उपमहापौर :-** भाऊ आता आपण जे मागच्या महासभेमध्ये सांगितले होते मॅडमांना की, आपला जो २४ मिटरचा रस्ता आहे. त्याच्यामध्ये जवळपास सगळया शेतकऱ्यांना टी.डी.आर.दिले गेलेले आहे. त्यांना टी.डी.आर. दिल्यानंतर रस्ता ताब्यात घ्या ना साहेब. ते रस्ते आपण ताब्यात का नाही घेत आहे. गेल्या १० वर्षापासुन जर आपण टी.डी.आर. दिलेले आहे. तर ते रस्ते आपण ताब्यात का घेत नाही. त्याची मोजणी आपण का करत नाही. त्यांचे भुसंपादन झालेले आहे, मोबदला दिला गेलेला आहे. रक्कम स्वरुपात दिला गेलेला आहे, टी.डी.आर.स्वरुपात दिला गेलेला आहे. तरी आज ही ती जागा गेल्या १० वर्षापासुन त्यांच्या ताब्यात आहे. ठिक आहे विकसित करणेसाठी आपल्याकडे फंड नाही मान्य आहे.

**मा.आयुक्त :-** ताब्यात का नाही.

**मा.उपमहापौर :-** ताब्यात का नाही ती.

**श्री.अशोक करवंदे :-** ताब्यात आहे ना ती.

**मा.उपमहापौर :-** ऑनपेपर ती ताब्यात आहे. पण अतिक्रमण होत आहे ना तेथे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** तुम्ही येथे अजुन मॅनपावरची मदत घ्या आणि जळगांव शहराचे संपुर्ण डी.पी रस्ते जे आहे. ज्याच्यावरती अतिक्रमण असतील, ज्याच्यावरती कागदोपत्री ताबे आपल्याकडे आहे पण प्रत्यक्षात ताबे दिलेले नाही. असे जे डी.पी रोड आहे ना ते डिमार्केटेड करुन परिक्षणला घ्या. त्याच्या संदर्भात अजुन काही मॅनपावर लागेल तर त्यांची मदत घ्या तशी.

**मा.उपमहापौर :-** २१४ मधुन २१६ कडे जाणाऱ्या भुसंपादन केलेल्या रस्त्यावरती किमान १०० झोपडे पडलेले आहे आता ते अतिक्रमण काढायला आपल्याला किती त्रास होत आहे भाऊ. किमान आपण त्यांना घरकुले दिले नाही किंवा त्यांना मिळाले नाही तेथे ५०-६०-१०० झोपडे होऊन गेलेले आहे ते दिवसेंदिवस वाढत चालले आहे. आपण जर टी.डी.आर. दिलेले किंवा भुसंपादीत केलेली जागा आपल्या ताब्यात नाही घेतली तर तेथे अतिक्रमण दिवसेंदिवस वाढणारच आहे. तुम्ही म्हणतात ताब्यात आहे कागदोपत्री जरी ताब्यात आहे पण प्रत्यक्ष त्या जागेवर जाऊन पाहिले तर तेथे अतिक्रमण होत आहे ना दिवसेंदिवस.

**श्री.प्रविण कोल्हे :-** साहेब आता कार्यवाही नाही झाली तर ते वाढत आहे ना दिवसेंदिवस.

**मा.उपमहापौर :-** त्याला सुनावणीची गरज नाही.

**मा.आयुक्त :-** ते लवकरात लवकर काढुन घ्या. त्यांना सकारण आदेश नाही दिलेले आहेत असे म्हणत आहे.

**मा.उपमहापौर :-** दिलेले आहे. सकारण आदेश दिले आहे.

**मा.आयुक्त :-** अतिक्रमण अधिक्षक, सकारण आदेश प्राप्त आहेत का ?

**श्री.उमाकांत नष्टे, अतिक्रमण अधिक्षक :-** मा.महापौर, सन्मा.सदस्य, नगररचना विभागाकडुन आपल्याला फक्त खेडीचे पत्र आहे. सकारण आदेश नाही.

**मा.उपमहापौर :-** काय पत्र आलेले आहे.

**श्री.उमाकांत नष्टे, अतिक्रमण अधिक्षक :-** या ज्या रस्त्यावरच्या झोपड्या आहे ते काढुन घ्या म्हणुन.

**मा.उपमहापौर :-** काढुन घ्या म्हणजे याचे अर्थ काय होते, सकारण आदेश नाही का तो.

**श्री.उमाकांत नष्टे, अतिक्रमण अधिक्षक :-** त्याच्यानंतर मी आणि समीर बोरोले साहेब आम्ही बघुन आलो तेथे. त्यांच्याकडे काही कागदपत्रे होते.

**मा.उपमहापौर :-** तुम्ही याची शाहनिशा केली का जे कागदपत्र मिळालेले आहे ते त्याच जागेचे आहे असे.

**श्री.उमाकांत नष्टे, अतिक्रमण अधिक्षक :-** ते प्रकरण त्यांना दिलेले आहे नगररचनाला, त्यानंतर बांधकाम विभागाला ते पत्र दिलेले आहे.

**मा.उपमहापौर :-** तुम्ही काय करा पहिले आपल्या प्रशासनाने ठरवुन घ्या. हे काम बांधकामचे आहे की, टाऊन प्लॅनिंगचे आहे, टाऊन प्लॅनिंग म्हणतो पत्र दिलेले आहे हे म्हणता बांधकामला पाठविले.

**मा.आयुक्त :-** जसे सोनगीरे साहेबांनी सांगितले की, कागदपत्र तपासुन आदेश काढण्याचे अधिकार आमचे नाही टी.पी.चे आहे. म्हणुन मी सांगितले सुरुवातीला,

**मा.उपमहापौर :-** ते सांगत आहे ना. ओदश काढले आहे म्हणुन.

**मा.आयुक्त :-** नाही ना पत्र दिलेले आहे.

**श्री.उमाकांत नष्टे, अतिक्रमण अधिक्षक :-** नाही ना पत्र दिलेले आहे.

**मा.उपमहापौर :-** पत्र दिले म्हणजे काय ?

**मा.आयुक्त :-** ते जे कागदं आलेत ना त्याची माहिती आम्ही तुम्हाला दिली.

**मा.उपमहापौर :-** सांगितले ना त्याची शाहनिशा झाली ना.

**मा.आयुक्त :-** नाही झाली.

**मा.उपमहापौर :-** बांधकामाने त्याची शाहनिशा केली.  दोन वर्षापासुन ते प्रकरण चालु आहे.

**मा.आयुक्त :-** मी सांगते ना, शेवटी माझ्याकडे आलेले होते, मी टी.पी.ला सुचना दिल्यात.

**श्री.सोनगीरे, शहर अभियंता :-** सकारण आदेश आणि या पत्रामध्ये फरक आहे.

**मा.उपमहापौर :-** सर ते रोडावरचे आहे. टाऊन प्लॅनिंगने पत्र दिले ना तुम्हाला की, काढुन टाका म्हणुन मग त्यात उरले काय ?

**श्री.सोनगीरे, शहर अभियंता :-** त्यात असे नाही की, नुसते काढुन टाका, त्याच्यावर सुनावणी झाली की नाही, आदेश झाले नाही, नाही तर उद्या ते कोर्टात जातील.

**मा.उपमहापौर :-** मला इतका काही कायदा समजत नाही. मी अन्नभिन्न आहे तुमच्या बांधकाम आणि टाऊन प्लॅनिंग विभागामध्ये, मला फक्त इतकी माहिती द्या तुम्ही की, जर कधी डी.पी.रोड आपल्या ताब्यात असेल, त्याचा भुसंपादन झालेले असेल. त्याच्यावर अतिक्रमण होत असेल तर त्याच्यासाठी ही प्रोसेस करणे गरजेचे आहे का? फक्त याचे उत्तर द्या तुम्ही. बाकी तुम्ही पत्र दिले, सकारण आदेश नाही. त्याच्यात अडथळा येईल, त्याचे म्हणणे ऐकुन घेण्याचे आहे. ही सगळी प्रोसेस फॉलो करण्याची गरज आहे का हे सांगा.

**श्री.सोनगीरे, शहर अभियंता :-** रस्त्यावरचे अतिक्रमण नुकतेच झालेले असेल तर ते आपण काढुन घेऊ. बरोबर आहे. पण हे किती वर्षापासुन आहे.

**मा.उपमहापौर :-** कोण ठरवेल आता हे की किती वर्षापासुन आहे ते.

**श्री.सोनगीरे, शहर अभियंता :-** त्यांच्याकडे काही पुरावे आहेत ना म्हणत आहे ते. म्हणुनच सुनावणी घ्यावी लागेल. ज्या वेळेला आपण घरकुल बांधले होते ना खेडीला,

**मा.उपमहापौर :-** त्यांनी पत्र केव्हा दिले तुम्हाला.

**श्री.सोनगीरे, शहर अभियंता :-** कोणी

**मा.उपमहापौर :-** संबंधीत जे कोणी असतील त्यांनी.

**श्री.सोनगीरे, शहर अभियंता :-** नाही माझ्याकडे नाही. मी रंधे साहेबांना जाऊन स्वत: भेटलो. ते पाहणी करुन आल्यानंतर नोटीस देणे आवश्यक आहे असे मला वाटते.

**मा.उपमहापौर :-** ते कसे ठरवले तुम्ही.

**श्री.सोनगीरे, शहर अभियंता :-** मला टाऊन प्लॅनर कडुन आले होते ना.

**मा.उपमहापौर :-** काय.

**श्री.सोनगीरे, शहर अभियंता :-** जावळे साहेबांनी लिहीले होते रंधे साहेबांना की, तुम्ही नोटीस इशु करा म्हणुन.

**मा.उपमहापौर :-** मग ती नोटीस इशु केली का तुम्ही.

**श्री.सोनगीरे, शहर अभियंता :-** आम्ही नाही करणार टाऊन प्लॅनींगचे काम आहे ते.

**मा.उपमहापौर :-** तोच तर गोंधळ आहे. आम्हाला तेच समजत नाही की, तुम्ही आम्हाला वेडे बनवित आहे की, आम्हाला समजत नाही. तुम्ही नेमके आम्हाला समजुन तर सांगा की, विषय काय आहे.

**श्री.सोनगीरे, शहर अभियंता :-** याच्यात विषय असा आहे की, त्या झोपडया आजच्या नाही. ते कितीक वर्षापासुन तेथे झोपड्या होत्या. ज्या वेळेला आपण खेडीला घरकुल बांधले, त्यावेळेला त्या रस्त्यावरचे जे झ ोपडी धारक होते. त्यांना तेथे घरकुल देण्यात आलेले होते. त्या सगळया झोपडी धारकांच्या त्याची पण

शाहनिशा करायला पाहिजे. त्यांना तेथे घरकुल दिलेले आहे, कोणी ना कोणी. समजा तेथे एक व्यक्ती राहतो.त्याच्या वडीलांच्या नावाने किंवा आईच्या नावाने त्यांना घरकुल दिलेले आहे का ? याची ही शाहनिशा केली पाहिजे. कारण काय आहे त्याला घरकुल ही दिलेले असेल. आणि पुन्हा ते झोपडीतच राहत असतील. मग पुन्हा ते म्हणतील आम्हाला घर द्या. त्याची ही शाहनिशा करायला पाहिजे. त्याबाबतीत मी आमच्या इंजिनिअरला ही सांगितले होते. टाऊन प्लानिंग वाल्यांना ही सांगितले की, त्यांची सुनावणी घ्या. म्हणजे त्यांचेकडे असतील तर ते माहिती देतील आणि मिनव्हाईल घरकुल मध्ये जाऊन त्या ४ व्यक्तींची नावे सर्वेक्षण मध्ये आहे का ? यांचे नावाने किंवा त्यांचे घरच्या व्यक्तींचे घरकुलमध्ये नावे आहे का ? तेवढी चौकशी करावी लागेल. हे केल्यावरच आपल्याला तेथे कार्यवाही करावी लागेल.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** याच्यामध्ये मॅडम, जसे साहेबांनी सांगितले, पिंप्राळा मध्ये जे घरकुल वाटप झालेले आहे. ख्वाजमियॉंची जी झोपडपट्टी आहे ती उचलुन आपण त्यांना पिंप्राळा घरकुलमध्ये जागा दिली होती. त्याच्यामध्येही घोटाळा झालेला आहे, एका व्यक्तीला ५-५ घरे, कोणाला ४ घरे, कोणाला ८ घरे देण्यात आलेले आहे. ती मंडळी सगळी बाहेर उभी आहे. ते निवेदन द्यायला आले होते. परंतु आपली सभा सुरु आहे म्हणुन ते बाहेर थांबलेले आहे. तर माझी अशी मागणी आहे की, त्या घरकुलांची ही चौकशी करण्यात यावी. हे सगळे पुरावे आहे ना. त्याचे पुरावे देखील आहे. त्याची ही चौकशी करावी. त्याची यादी आहे आपल्याकडे. त्याच्यात काय झालेले आहे. तुम्ही ५ घरकुल टाकले, यांनी ४ घरकुल टाकले. तर माझी सभागृहात ठाम मागणी आहे की, या वाटपाची चौकशी व्हायला पाहिजे.

**श्री.सोनगीरे, शहर अभियंता :-** घरकुलाची वाटपाची पध्दत होती, तेथे फक्त ३२८ घरे होती. मग ती घरे कोणाला द्यायची. हे ठरविण्यासाठी आपण महासभेसमोर गेलो. महासभेने आपल्याला लकीड्रा पध्दतीने घरकुल वाटप करण्याचे सांगितले.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** लकीड्रामध्ये एकाच व्यक्तीचे ५-५ नावे कसे काय आले. लकीड्राची चौकशी करा. माझ्याकडे महानगरपालिकेची अधिकृत यादी आहे.

**श्री.सोनगीरे, शहर अभियंता :-** लकीड्रा दोन वेळा झालेले आहे.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** मला एकच माहित आहे, लकीड्रा असो, वाटप असो, एका व्यक्तीला एकापेक्षा जास्त घरकुल दिलेले आहे. अधिकृत यादी आहे. कोणाला ५ घरे दिलेली आहे, कोणाला ४ घरे दिलेली आहे, दिलीप पोकळेला १,२,३,४,५ घरे दिलेली आहे. मग हे कसे काय आले.

**मा.आयुक्त :-** हा विषय जो समोर आलेला आहे याची चौकशी करावी.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** लोकं बाहेर आलेले आहे. याची चौकशी करावी.

**मा.महापौर :-** सखोल चौकशी करा. जो कोणी दोषी असेल त्यांच्यावर कार्यवाही करा.

**श्री.नितीन लढ्ढा :-** महापौरताई, माझी ऐवढीच विनंती आहे की, आता फक्त अजेंडयावरील विषयावरच चर्चा करा बाकी कुठल्याच विषयावर चर्चा करु नका. दुपारचे १.३० वाजुन गेलेले आहे. आपली मागची सभा ४.०० वाजता संपली.

**श्री.चेतन सनकत :-** महापौरताई, मी केव्हाची परवानगी मागत आहे. महापौरताई, आयुक्त मॅडम आणि कुलभुषणभाऊचे अभिनंदन करतो की, आज ते ॲक्शन मोडमध्ये दिसत आहे. एक अतिक्रमणाच्या विषयामध्ये सकारण आदेश झालेले नाही.त्या विषयावर अर्ध्या तासापासुन चर्चा सुरु आहे. दोन ते तीन वर्षापासुन मी बघतो आहे. आपले जे बेसमेंटवाले जे आहे. त्यांचे पण काही लोकांचे सकारण आदेश झालेले आहे. गरीब लोकांना घरातुन काढण्यासाठी आपण ॲक्शन मोडमध्ये आलेले आहे आज. पण जे धनदांडगे आहे त्यांच्यावर ॲक्शन मोडमध्ये केव्हा याल. न्याय सर्वांना सारखा द्या. गरीबांवर अत्याचार होऊ देऊ नका. आम्हाला आपल्याकडुन हीच अपेक्षा आहे की, त्यांच्यावर पण लवकरात लवकर ॲक्शन घ्या. आणि न्याय सगळयांना सारखा मिळायला पाहिजे.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** अतिक्रमण काढतांना सर्वच काढायला पाहिजे.

**मा.उपमहापौर :-** सन्मा.सदस्यांनी उपस्थित केलेला जो प्रश्न आहे तो खरा आहे. आणि बेसमेंटच्या अतिक्रमणाबाबत सर्व्हे झालेले आहे त्यांना सकारण आदेश झालेले आहे.त्यांच्यावर कार्यवाही का होत नाही याचे उत्तर द्या.

**श्री.चेतन सनकत :-** गरीब लोकांना आपण घरातुन बाहेर काढत आहे. पण जे धनदांडगे आहे त्यांचे काय.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** महापौर महोदया,

**मा.उपमहापौर :-** अरे, इनका हो जाने दो.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** इससे रिलेटेड है. महापौर महोदया,

**मा.महापौर :-** दोन मिनीटात संपवा. काहींनी केव्हाचीच परमिशन मागितलेली आहे.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** एकच मिनीट, आता पर्यंत तर मांडले गेले असते.रस्त्यांचे कामे सुरु आहे परंतु रस्त्यांवर जे धार्मिक स्थळे आहे. ते अडचणीचे ठरत आहे. तर हा विषय सभागृहाने मार्गी लावले तर बरे होईल.

**सौ.पार्वताताई भिल :-** महापौरताई, हरिविठ्ठल जय बजरंग सोसायटी मध्ये एक पिंपळाचे झाड आहे. तर २०२१-२२ मध्ये पण परवानगी काढली होती. आणि आता १० दिवस झाले परवानगी काढली आहे. तर याचा खुलासा आयुक्त मॅडम यांनी लावावा, हे पत्र बघा आणि याच्यावर खुलासा द्या मला,

**मा.आयुक्त :-** पिंपळाचे झाड आहे काय करायचे आहे.

**सौ.पार्वताताई भिल :-** काढायचे आहे ते. परवानगी काढली आहे, कोणी बघायला येत नाही. आणि बघा पिंपळाचे झाड बघा केवढे मोठे आहे. तिसऱ्या मजल्याच्या वरती गेलेले आहे.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** ताईंनी जसे सांगितले, त्यांनी मला दोन दिवसापुर्वीच अर्ज दिलेला आहे, आणि मी त्यांना मगाशी पण सांगितले की, वृक्ष प्राधिकरण समितीकडे तो अर्ज जाईन. वृक्ष प्राधिकरण समिती जी आहे आपली, त्याच्या सर्व्हे मध्ये त्या भागातील इंजिनिअर येऊन अहवाल देतील, ते झाड तोडण्याची आवश्यकता आहे किंवा नाही. त्यांचा अहवाल आल्यानंतर आपण तो प्रस्ताव वृक्ष प्राधिकरण समितीकडे पाठवु. त्या हिशोबाने तो निर्णय होईल.

**मा.महापौर :-** त्याला प्रोसेस आहे ताई. ती प्रोसेस झाल्याशिवाय आपण झाड नाही तोडु शकत.

**सौ.पार्वताताई भिल :-** मॅडम, आयुक्त मॅडमांचे पत्र आहे.

**मा.महापौर :-** येत्या मिटींगमध्ये पहिले हे प्रस्ताव घ्या.

**सो.पार्वताताई भिल :-** ते कधी झाड पडले ना तर ती बिल्डींगच खाली येऊन जाईल.

**श्री.मनोज चौधरी :-** घनकचराकडे जो रस्ता जातो चंदुअण्णा रिक्षा स्टॉपपासुन त्या रस्त्याची एक महिन्यात काय कार्यवाही केली. काय ईस्टीमेट केले, किंवा आपण रिकॉल करणार आहे. त्याच्यात काय झालेले आहे त्याची माहिती पाहिजे. आणि मॅडम मागे आपल्याला विनंती केलेली होती. आणि मॅडम मागे आपल्याला विनंती केली होती की, आपण जरी तो रस्ता सुरु केला नाही. काम चालु केले नाही. आम्ही चारही नगरसेवक लोकांना रस्त्यावर येऊन रस्ता रोकु. आता फक्त जास्तीत जास्त आम्ही आठ दिवस थांबु. ८ दिवसात तुम्हाला काय कार्यवाही करायची आहे ती करा. कारण तो मुख्य रस्ता आहे, आणि जळगांव शहराचा पुर्ण कचरा आमच्या प्रभागात येतो आहे. त्या रस्त्याचे काहीच नाही. साहेबांना मी सांगितले, साहेब म्हटले, साहेब आपण माहिती द्या आम्हाला व्यवस्थीत आणि त्या रस्त्याचे काम सुरु नाही झाले साहेब किंवा त्याची काही कार्यवाही झाली नाही तर निश्चितच आम्ही तो रस्ता बंद करु. मॅडम कचऱ्याने नाही तर धुराने आम्ही इतके परेशान झाले की, आज कुलभुषणभाऊंची बातमी आहे. त्या रस्त्याबद्दल तुम्ही मत मांडले आहे की, लोकांना काय काय त्रास होत आहे. त्यांचे आभार माणतो, पत्रकारांच्या लक्षात आणुन देतो, आम्ही जे बोलतो, पत्रकारांना सांगतो निश्चित आपण त्या रस्त्याबाबत सर्वांनी मागे लागुन ते काम करुन घ्यायला पाहिजे. कारण की, खुप महत्वाचा रस्ता आहे संपुर्ण जळगांव शहराचा कचरा आमच्या प्रभागात येतो आहे. आणि त्या रस्त्याची दुर्दशा अशी आहे. टु व्हिलर काय सांगता पायी तेथे चालु शकत नाही माणुस तेथे एवढी परिस्थिती खराब आहे. मी वारंवार १ वर्षापासुन तुमच्या

मागे लागत आहे. वारंवार तुम्ही आम्हाला कारणे देत आहे. आज होईल. ईस्टीमेट तयार करु. माझ्या माहितीनुसार तुम्ही टेन्डर काढले होते त्याचे. मला अशी माहिती होती की, १ कोटी १० लाखाचे त्याचे ईस्टीमेट होते. बरोबर आहे. तुम्ही टेन्डर काढले का नाही काढले माहित नाही. आता मी परवा तुमच्याकडुन माहिती घेतली, तुम्ही म्हणत आहे ६.५ कोटीचा त्याचा बजेट आहे. त्याच्यात आम्ही काय करायचे.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** सभागृहाला माहिती सांगतो की, मागच्या महासभेत सन्मा.सदस्यांनी हा मुद्दा मांडला होता. परंतु त्या रस्त्याची आजची परिस्थिती काय आहे किंवा त्याचे डॉक्युमेंट कुठपर्यंत आलेले आहे ते माहित नव्हते.

**श्री.मनोज चौधरी :-** साहेब मागच्या महासभेला महिना झाला महिना, एक महिना झाला आहे. माहिती का दिली नाही तुम्ही, एक महिन्यापुर्वी मागितली होती, दोन चार दिवसापुर्वी नाही मागितली साहेब.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** एकच मिनीट भाऊ, मला बोलुन घेऊ द्या मग तुम्ही बोला,यांनी जो मुद्दा उपस्थित केला, मागच्या महासभेचा विषय होता.महासभा झाल्यानंतर मी स्वत: ज्या ज्या निधी मधुन आपले प्रस्ताव गेलेले आहे त्या सगळया निधीच्या यादीमध्ये नाव आहे का त्याचा शोध घेतला, पहिले तेथे प्रकाश पाटील साहेब होते त्यानंतर योगेश वाणी आले, दोघांना बोलविले, दोघांशी चर्चा केली, प्रकाश पाटील साहेबांनी हे जसे म्हणत आहे तसे, १ कोटी १० लाखाचे ईस्टीमेट त्या वेळेला दाखविलेले होते. आपल्याला सर्वांना ज्ञात आहे की, आपल्या याद्या सतत बदलत गेल्या. १०० कोटीच्या याद्यात बदल होत गेला, त्याच्यामुळे ते नांव त्याच्यातुन वगळले गेले, त्याच्यानंतर मी योगेश वाणींना ३ इस्टिमेट करायला लावले. एक डांबरीकरणाचे, एक कॉंक्रीटीकरणाचे आणि दोघी बाजुच्या गटारी, असे तिन स्वतंत्र ईस्टीमेट माझ्या टेबलावर आलेले आहे. आज आपण या ठिकाणी बजेट सादर केलेला आहे. बजेट मधुन किंवा DPDC ज्या मधुन ही निधी मिळेल.

**श्री.मनोज चौधरी :-** साहेब, DPDC मधुन केव्हा निधी मिळेल.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** हे माझे काम नाही कोणता निधी मिळेल. माझे काम आहे मी प्रस्ताव तयार करेल.

**श्री.मनोज चौधरी :-** आम्ही ठेकेदार देतो ना साहेब, मनपा फंडातुन करा ना काम. बिल काढुन देण्याची जबाबदारी घ्या.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** आज बजेट मंजुर झाला आहे.

**श्री.मनोज चौधरी :-** मनपा फंडात टाका, आम्ही ठेकेदार देतो. त्याच्या बिलाची जबाबदारी घ्या. वर्षभर काम चालेल ते, कसे काम करेल त्याचे तुम्ही वर्षभर बिल देणार नाहीत, १ कोटी १० लाखाचे काम आहे ते. म.न.पा.फंडातुन करायला तयार आहे ठेकेदार पण तुम्ही त्याची प्रोसिजर केली पाहिजे.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** बजेट तरतुदी झाल्यानंतर प्रस्ताव महासभेकडे मंजुरीला येईल्.

**श्री.चंद्रशेखर पाटील** :- नंतर प्रोसेस करा, आज महासभेला ठराव घेऊन टाका. मागच्या दोन महिन्यापासुन तेच म्हणतो आहे आम्ही तुम्हाला. विलंब करु नका, प्रायरिटीचा विषय आहे तो.

**श्री.मनोज चौधरी :-** लोकं काय काय बोलतात, आम्हाला ऐकावं लागत, आम्ही तुम्हाला सांगत आहोत, एक महिन्यापुर्वीही सांगितले होते. याच्यावर जर काही कार्यवाही झाली नाही. तर आम्ही रस्ता रोखु . चारही नगरसेवक आम्ही लोकांना घेऊन रस्ता रोखुन आंदोलन करु.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** आपले प्रस्ताव तयार आहे, महासभेपुढे ठेवु.

**मा.महापौर :-** शेवटचे भाऊ आपण बोला नंतर विषयपत्रिकेवरील विषयांना सुरुवात करण्यात येणार आहे. याच्यानंतर एकही सन्मा.सदस्याला मी परमिशन देणार नाही.

**श्री.जितेंद्र मराठे :-** सर्व सन्मा.सदस्यांसाठी म्हणजे सर्वांसाठी हा विषय आहे. आज किंवा उद्या सर्व कामांसाठी वर्षभरात जे जे काम आपल्या प्रभागामध्ये होत आहे. त्या संदर्भात एक छोटे निवेदन आहे. प्रत्येकाच्या प्रभागामध्ये रस्त्यांचे कामे होत आहे. महापौरताई, आयुक्त मॅडम आता आपण २० व्या वर्धापन दिनानिमित्त खुप

खुप शुभेच्छा,या वर्धापन दिनानिमित्त सांगतो की, या ठिकाणी सगळे पदाधिकारी उपस्थित आहे, फक्त स्थायी समितीचे सोडुन एक पदाधिकारी आपले, हा गमतीचा भाग नाही,एक पदाधिकारी, कसे असते सगळे विरोधातले नगरसेवक असतात, त्यांचा कोणी तरी एक प्रमुख असतो, विरोधीपक्ष नेता, हे २ वर्षापासुन हरवलेले आहे. म्हणजे शहराच्या नागरीकांची पण व्यथा आहे. नगरसेवकांची ही जी ओरड चालु आहे ना.म्हणजे या ठिकाणी आम्ही वारंवार सांगतो की, कोणी तरी विरोधीपक्ष नेता जे आहे सक्षम म्हणजे आम्हाला दिसतच नाही शहरामध्ये,

**श्री.सुनिल महाजन, विरोधीपक्ष नेते :-** सत्ताधारी चांगले काम करत आहे.

**श्री.जितेंद्र मराठे :-** हे मोर्चेकारांनी तयार केलेले होते की, विरोधीपक्ष नेते २ वर्षापासुन हरवलेले आहे. याचे कारण आहे.

**श्री.सुनिल महाजन, विरोधीपक्ष नेते :-** पेपरबाजी चमकोगीरी करण्यासाठी करतात.

**श्री.जितेंद्र मराठे :-** पेपरबाजी करण्यासाठीचा विषय नाही. प्रभागामध्ये जेथे जेथे रस्त्यांचे कामे होत आहे. मी मागच्या महासभेला पण बोललो, सुनिलभाऊ त्यावेळेला मुंबईला होते, एखादा आमच्या जवळचा आहे की, तुमच्या जवळचा आहे. याच्याशी मला घेणे देणे नाही. महापालिकेत जे सत्तेत असणारे लोकं आहे की, प्रशासनाकडुन काम योग्यपध्दतीने झाले पाहिजे. ज्या वेळेला मी सांगतो आहे की, सिंधी कॉलनी पासुन मी एक्सॅम्पल सांगितले ते पांडे चौकापर्यंतचा रस्ता, असे भरपुर ठिकाणी रस्ते तयार झालेले आहे. आता त्या रस्त्याला ६ महिने पण नाही झालेले आहे. आणि त्याच्यानंतर अनुधानाने पाऊस पडला, त्या रस्त्यांची अक्षरशा चाळण झालेली आहे. ६ महिने अजुन कामाला पुर्ण झालेले नाही. आपण मागच्या महासभेमध्ये सांगितले आपण त्या ठेकेदाराकडुन करु. तुम्ही एक चक्कर मारा, भरपुर रस्ते आहे. तेथे मुरुम टाकुन खडी टाकुन ते खड्डे बुजविलेले आहे. म्हणजे मग ठेकेदाराच्या बाजुने आपण बळ द्यायचे का ? येथे प्रत्येक नगरसेवकाच्या वार्डात रस्त्यांचे कामे सुरु झालेले आहे. त्या ठिकाणी महाविकास अघाडीचे जे वरिष्ठ नेते आहे, आमदार श्री.एकनाथराव खडसे साहेब डी-मार्टच्या रस्त्याची पाहणी करायला आले. आमच्या प्रभागात काव्यरत्नावली ते गाडगेबाबा चौक या रस्त्याच्या कामाला सुरुवात होत होती. काही तक्रारी होत्या, आम्ही नागरीकांना घेऊन अधिकाऱ्यांना घेऊन मार्ग काढला, त्याठिकाणी २ दिवसापासुन माजी राज्यमंत्री श्री.गुलाबराव देवकर साहेब तेथे येवुन त्या रस्त्याची पाहणी करतात, मग नेमके आम्ही जायचे कोणाकडे. सत्ताधाऱ्यांना जर धारेवर धरायचे आहे तर विरोधीपक्ष नेत्यांनी आवाज उठविले पाहिजे. हे आमचे सर्व सभागृहाच्या वतीने, तुम्ही चोर आहात का सगळे, चोर आहात का सगळे, सोशल मिडीयावर ज्या वेळेला वायरल होत आहे की, नगरसेवक चोर आहे. पैसे खातात, कुठले पैसे खालले तुम्ही रस्त्यांचे कामामध्ये, खालले का सांगा ना, चुप बसले आहे म्हणजे याचा अर्थ काय समजायचा.

(सभागृहात काही सन्मा.सदस्य बोलायला लागले निषेद निषेद निषेद )

**श्री.जितेंद्र मराठे :-** म्हणजे आम्हाला सोशलमिडयावर बदनाम केले जाते की हे चोर आहेत, यांनी पैसे खाललेले आहे. आमची पहिल्यापासुन विनंती आहे की, तुम्ही रस्त्यांची पाहणी करा, दौरे करा. सर्व सन्मा.पदाधिकारी असतील, जे हरवलेले आहेत.

**श्री.सुनिल महाजन, विरोधीपक्ष नेते:-** जितु याच्यापुढे काय भाग घ्यायचा सांगा,

**श्री.जितेंद्र मराठे :-** गंमतीचा भाग नाही. तुमच्याकडुन सगळया शहराच्या अपेक्षा आहे भाऊ विरोधीपक्ष नेता म्हणुन काम करुन आमच्या सगळयांच्या समस्याचे जागर करुन महापौरांना धारेवर धरले पाहिजे. भाऊ तुम्ही पदाला न्याय द्या भाऊ, आमचे म्हणणे नाही, तुम्ही पदाला न्याय द्या. माझ्या प्रभागामध्ये मी मागच्या महासभेत पण बोललो, हे बघा, सगळयांना या गोष्टीची झडप असणारच आहे. पुढच्या वेळेला निवडणुक आहेच. आजचे रस्ते जे झाले, ठेकेदार कोण आहे आम्हाला त्याच्याशी घेणे देणे नाही. तो आमच्या जवळचा आहे की, तुमच्या जवळचा आहे. त्याच्याशी घेणे देणे नाही.दुरावस्था झालेली आहे रस्त्यांची, रस्त्यांना ५-६ महिने पण झाले नाही,

चाळण झालेली आहे रस्त्यांची. याच रस्त्यांबाबत आपण ३-४ वर्षापासुन ओरडतो आहे. म्हणजे अमृतची योजना २०१६-१७ पासुन सुरु झालेली आहे. ती संपणार केव्हा आहे ते कोणी जाहिर तर करा. जाहिर तर करा अधिकाऱ्यांच्या स्तरावर जाहिर तर करा की, ही संपणार आहे. रस्त्यांच्या कामांना एन.ओ.सी.दिली नेमाडे साहेबांनी, PWD कडुन पत्र घेतले, एन.ओ.सी. मिळाली. कामाला सुरुवात झाली आणि त्याच रस्त्यावर परत तो रस्ता खोदायला सुरुवात झाली, मग करायचे काय ? नागरीक तुम्हाला थोडी बोलवायला येणार आहे. आम्ही वार्डामध्ये मिटींगला जातो ना, आम्हाला सुरुवात तिथुनच होते. नागरीक तर रोष व्यक्त करणारच आहे ना. मग आम्ही कोणाकडे व्यक्त करायचा. गांभिर्याने या गोष्टीकडे आपण लक्ष द्यायला पाहिजे. म्हणजे जिथे असेल तिथे. सुनिलभाऊ आपल्याला पण एक विनंती आहे. खरंच या सगळयांचा नेतृत्व आपण करा. आणि चला जळगांव शहराचा दौरा करु आपण आणि तुम्ही स्वत: महापौरांना सांगा, धारेवर धरा की, या रस्त्यांची काय क्वालिटी असेल काय असेल, काय पत्र द्यायचे, काय तक्रारी करायच्या, लेखी तक्रार द्यायला मी पण तयार आहे. आपण या ठिकाणी गांभिर्याने घ्या. हसण्यामध्ये घेऊ नका. प्रत्येकाला याच्यातुन सफर व्हायचे आहे. प्रत्येकाच्या प्रभागामध्ये २०-२०, ५०-५० लाखाचे रस्त्यांचे कामे झालेले आहे. सहा महिन्यापहिले जे झालेले आहे तुम्ही सांगा तुमचे रस्ते व्यवस्थीत आहे का ? काय ते सिलकोट कारपेटमुळे रस्त्याची स्ट्रेन्थ वाढते मला त्यातले इतके नॉलेज नाही. अजुन पर्यंत कारपेट झालेले नाही. ६-६ महिने होऊन गेले. ८-८ महिने झाले सिलकोट झालेले नाही. नाही ना भाऊ ही जबाबदारी प्रशासनाने आणि सत्ताधाऱ्यांनी घ्यायची ना.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** ते जे ठेकेदार आहे तुमचे आहे.

**श्री.जितेंद्र मराठे :-** मी काय बोललो, ठेकेदार तुमचे आहे की, आमचे आहे मला घेणे देणे नाही.

**श्री.नितीन बरडे :-** ओ जितुभाऊ तुम्ही तरी डांबराची गोष्ट करत आहे, मागच्या महिन्यापासुन दुरुस्ती होत नाही.

**श्री.जितेंद्र मराठे :-** पहा सुनिलभाऊ तुमचेच सदस्य पहा.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** आमच्या महापौरांच्या काळात रस्त्यांचे कामे तरी होत आहे.

**श्री.नितीन बरडे :-** प्रशासनाची जबाबदारी आहे गुणवत्तेची, गुणवत्ता कोणी चेक करायची आहे.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** जितुभाऊ, तुमचा अडीच वर्षाचा कार्यकाळ आणि आमच्या महापौरांचा अडीच वर्षाचा जो कार्यकाळ आहे. आपण मान्य करावे की, तुमच्या कार्यकाळापेक्षा आमच्या महापौरांच्या कार्यकाळात रस्त्यांचे कामे जास्त होत आहे की नाही होत आहे.

**श्री.जितेंद्र मराठे :-** होत आहे ना, होत आहे.

(एकाच वेळेला अनेक सन्मा.सदस्य बोलत होते म्हणुन त्यावेळी कोण काय बोलले ते स्पष्ट समजुन येत नाही. )

**मा.महापौर :-** सर्व सन्मा.सदस्यांनी खाली बसायचे आहे.

(एकाच वेळेला अनेक सन्मा.सदस्य बोलत होते म्हणुन त्यावेळी कोण काय बोलले ते स्पष्ट समजुन येत नाही. )

**श्री.जितेंद्र मराठे :-** महापौरताई आपल्याला एक नम्र विनंती आहे. ज्या पध्दतीने ईबाभाई म्हणत आहे.

**श्री.सुनिल महाजन, विरोधीपक्ष नेते :-** जितुभाऊ, आता ही भांडण वेगळी आहे.

**श्री.जितेंद्र मराठे :-** भांडण कोणत्या गोष्टीसाठी आहे.

**श्री.सुनिल महाजन, विरोधीपक्ष नेते :-**आता.

**श्री.जितेंद्र मराठे :-** कोणत्या गोष्टीवर भांडण करत आहे मी, रस्त्यांची क्वालिटी चांगली असली पाहिजे. ते काय म्हणत आहे निधी आम्ही आणला,

**श्री.सुनिल महाजन, विरोधीपक्ष नेते :-**आमची सुध्दा मागणी आहे की, क्वालिटी चांगली असली पाहिजे.

**श्री.जितेंद्र मराठे :-** सुरुवात त्यांनी केली भाऊ आम्ही नाही केली.

**श्री.नितीन लढ्ढा :-** महापौरताई.

**मा.महापौर :-** ईबाभाई तुम्ही बसुन जा खाली. खाली बसा.

**श्री.नितीन लढ्ढा :-** महापौरताई, विषयांतर होत आहे. विरोधीपक्ष नेत्यांची जबाबदारी काय आहे. रस्त्यांची गुणवत्ता चेक करण्याची जबाबदारी ही प्रशासनाची आहे. आणि या संदर्भात प्रत्येक रस्त्याचा डिफेक्ट लायबिलीटी पिरियड निश्चित केलेला आहे. निश्चितपणे आपण जे म्हणतात की, काम गुणवत्तापुर्वक व्हायला पाहिजे. त्याबद्दल वाद नाही परंतु जबाबदारी कोणाची आणि दोषी आपण कोणाला पकडत आहे.

**श्री.जितेंद्र मराठे :-** मी दोषी नाही पकडत आहे. आमचे म्हणणे काय आहे. विरोधीपक्ष नेत्यांनी सत्ताधाऱ्यांना जाग आणावी.

**श्री.नितीन लढ्ढा :-** विरोधीपक्ष नेत्यांना जाब विचारण्याची ही तुमची पध्दत चुकीची आहे. हा जाब जो आहे ना. रस्ते खराब होण्याच्या संदर्भातले हा जाब तुम्ही प्रशासनाला विचारायला पाहिजे.

**श्री.जितेंद्र मराठे :-** भाऊ तुम्ही ऐकले का मी काय बोललो.मी एकदम शांत याच्याने निवेदन केले भाऊ. मी विरोधीपक्ष नेत्यांवर नाही तक्रार करत आहे. मी काय म्हटलो आमच्या तक्रारींचा पाढा तुम्ही घ्या आणि तुम्ही त्या सत्ताधाऱ्यांकडे चला. हे म्हणणे आहे आमचे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** त्यांच्यावर जबाबदारी टाकण्याचा भाग नाही, तुम्ही कमकुवत आहे अश्यातला भाग नाही. तुम्ही सुध्दा सक्षम आहात, तुमच्या भावना तुमची भुमिका तुम्ही सुध्दा व्यवस्थीतपणे मांडु शकतात. उगाच काय होत आहे. एक दुसऱ्यांना खालती आणि वरती दाखविण्याच्या नादामध्ये या संपुर्ण सभागृहाच्या कामाची दिशाभुल होत आहे.

**श्री.जितेंद्र मराठे :-** भाऊ, कोणी चोर म्हटले, कोणी म्हटले पैसे घेतले आहे तर ऐकुन घ्यायचे का आपण.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मला सांगा सोशल मिडीयावर जर कोणी चोर आपल्याला बोलत असेल, अरे शिव्या तर लोक पंतप्रधानांच्या नावाने सुध्दा देतात.

**श्री.जितेंद्र मराठे :-** मग सभागृहात मांडायचे नाही का विषय.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आपण त्याच्यामध्ये विपरित नाही तर आपण वाईट वाटुन घेण्याचे कारण नाही.शेवटी या लोकशाहीमध्ये टिका होतील.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** भाऊ, साफसफाई बद्दल बोला, साफसफाई बद्दल नाही बोलत आहे कोणी.

**श्री.जितेंद्र मराठे :-** ईबाभाऊ शांत बसा. नितीनभाऊ मला या ठिकाणी कुठल्याच प्रकारचे राजकारण करायचे नाही. आपण जे त्यांना टाईम पिरियड दिलेला आहे, महिन्याभरापुर्वी मी महासभेमध्ये बोललो. तुम्ही त्यांची पाहणी करा. भाऊ इतके मोठमोठे खड्डे आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मी स्वत: रस्त्यांच्या बद्दल बोललो ना.

**श्री.जितेंद्र मराठे :-** भाऊ ठेकेदाराचे काम आहे की नाही ते रिपेअर करणे. मग तेथे काही तरी वेस्ट मटेरिअल उचलुन त्याला बुजवणार का ? भाऊ माझे हेच म्हणणे आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रशासनाने मला सांगा याच्या मध्ये दोन गोष्टींची दखल होते. एक तर महानगरपालिका क्षेत्रामध्ये कामे PWD करते. PWD काय करते कामे करतांना त्यांच्या वर्कऑर्डरमध्ये जितके कामे दिलेले आहे तेवढेच करते.त्या बद्दल वाद नाही. कारण त्यांच्या ईस्टीमेटला तेवढीच तरतुद आहे. परंतु त्यावेळेला रस्त्यामध्ये गटार फुटलेली असेल, त्याचे कल्व्हर्ट असेल. त्याच्या बाबतीत PWD काही लक्ष देत नाही. ते म्हणतात की, माझ्या वर्कऑर्डर मध्ये कल्व्हर्टचा आईटमच नाही. त्याच्यामुळे काय होते की, त्या कामावरती महानगरपालिका सुध्दा कॉर्डीनेशन करत नाही. का तर तो PWD च्या वर्कऑर्डर मध्ये रस्त्याचा काम चालु असतात. PWD म्हणते माझ्या याच्यात रस्त्याचेच काम दिलेले आहे मी तितकेच काम करेल. मग मधल्या पिरियेड मधला जो गॅप आहे. जिथे गटारच्या बाबतीतला निर्णय घ्यायचा असेल.तो घेतला जात नाही. तो मक्तेदार आहे त्या स्थितीत काम करुन निघुन जातो.येथे ती गटार ओवरफ्लो होऊन रस्त्यावरुन पाणी वाहते. त्या रस्त्याची गुणवत्ता टिकत नाही. तो रस्ता पुन्हा ब्रेक होतो. असे दोन वेगवेगळया डिपार्टमेंटच्या समन्वये होत नसल्याकारणाने या कामांच्या गुणवत्तेवर मोठा परिणाम होत आहे. आणि या संदर्भात मग PWD चे काम चालु आहे. महानगरपालिकेचा अभियंता त्याच्यावर सुपरव्हिजन करत नाही. महानगरपालिकेच्या इंजिनिअरला विचारा

तो म्हणतो भाऊ महानगरपालिकेचे काम नाही. ते काम PWD च्या अखत्यारीत सुरु आहे. तर अश्या पध्दतीने समन्वयाचा खुप मोठा अभाव असुन या दोन यंत्रणांमध्ये कोणीच जर आपली जबाबदारी समजत नसेल तर प्रत्येक डिपार्टमेंट आपली जबाबदारी आली की, दुसऱ्याकडे बोट दाखवितो.

**श्री.धीरज सोनवणे :-** भाऊ, पांडे चौक ते सिंधी कॉलनी हा रस्ता PWD ने आपल्याकडे दिला आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मागच्या मिटींगमध्ये मी तेच बोललो ना.

**श्री.धीरज सोनवणे :-** त्याच्यामध्ये फक्त दोन लेयर झालेली आहे. डब्ल्यु.बी.एम. झालेले आहे एक बी.एम. झालेले आहे. त्याच्यावरचे कारपेट सिलकोट झालेलेच नाही. आता या गोष्टीला होऊन गेले ६ महिने. आपल्या मार्फत आपण काय कार्यवाही ठेकेदारावर केली .

**श्री.नितीन लढ्ढा :-** ही जबाबदारी कोणाची आहे. प्रशासनाची आहे.

**श्री.धीरज सोनवणे :-** प्रशासनाची जबाबदारी आहे.

**श्री.जितेंद्र मराठे :-** महापौरताई आपण त्यांच्यावर कार्यवाही करावी.

**श्री.धीरज सोनवणे :-** आताच्या परिस्थिती तो जो बी.एम.आहे भाऊ तो परत केला तर तो रस्ता टिकेल. नाही तर त्याची क्वालिटी संपलेली आहे. आणि सोनगिरे साहेब मला उत्तर द्या. त्याच्यावर पुढे काय कार्यवाही केली किंवा नविन ठेकेदार सुचवणार की, आपल्या माध्यमातुन ते काम पुर्ण करणार.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** ज्या रस्त्याचे आपण उल्लेख करत आहे भाऊ, सिंधी कॉलनीचा जो रोड आहे.

**श्री.जितेंद्र मराठे :-** तो एकच नाही साहेब सर्व शहराचा विषय आहे.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** पहिले त्याच्या बद्दल सांगतो की, त्या ठिकाणी काय झाले होते. तुम्ही सांगितले तसे लेयर झालेली आहे. ते जे कॉन्ट्रॅक्टर आहे अभिषेक पाटील त्यांना ब्रेनहॅमरेज झालेले होते, ते आजारी होते. म्हणुन ते काम थांबलेले होते. आणि सिव्हील हॉस्पीटलचा रस्ता देखील त्यांच्याचकडे आहे.

**श्री.अश्विन सोनवणे :-** अहो, त्यांना ब्रेनहॅमरेज आता झाला एक महिन्यापुर्वी. त्या रस्त्याला ५ महिने झाले. ते कारण नका सांगा तुम्ही.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** एक मिनीट ऐका, ते झाल्यानंतर, आपण सिव्हील हॉस्पीटलच्या रोडसाठी मागे लागलो होतो. आणि याचे बी.एम.झाल्यानंतर त्याला कारपेट सिलकोट जे आहे याच्यासाठी तो पुर्ण रस्ता एकच वेळेला करेल असा तो म्हटला होता, आणि हे जे तुम्ही म्हणत आहे.

**श्री.अश्विन सोनवणे :-** तुम्ही त्याला नोटीस पाठवली का ?

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** हो नोटीसा दिलेल्या आहे त्याला.

**श्री.अश्विन सोनवणे :-** काम केले काय त्यानी ५ महिन्यात. मग का नाही तुम्ही कार्यवाही केली.

**श्री.जितेंद्र मराठे :-** काम केलेले ते पुर्ण वाया जाईन ना. परत तेच करत बसायचे का ?

**श्री.अश्विन सोनवणे :-** पैसे गेले ना पाण्यात, नुकसान कोणाचे महापालिकेचे.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** ३१ तारखेपर्यंत आपण त्यांना अंतिम मुदत दिलेली आहे. कारण निधी परत जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे सगळे कॉन्ट्रॅक्टर लोकांना आपण पत्र दिलेले आहे.

**श्री.जितेंद्र मराठे :-** त्याचे पत्र दाखवा, पत्र दाखवा सगळयांसमोर. पत्र दाखवा त्याचे.

**श्री.अश्विन सोनवणे :-** रिपेअर करा ते सगळे.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** आणि त्या जे चाऱ्या पडलेल्या आहे ना. ते आपल्या पाणी पुरवठयासाठी व रामदेव बाबा मंदिरासाठी आणि हनुमान मंदिरासाठी आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मी सांगतो आपले अभियंता जे आहे ना गंभिर नाही. कामाच्या गुणवत्तेबाबत कोणीच गंभिर नाही.

**श्री.नितीन बरडे :-** सोनगिरे साहेब, स्टेट बँक कॉलनीच्या नोटीसांच्या तारखा संपलेल्या आहे. अश्विनभाऊ, ओ अश्विनभाऊ.

**श्री.धीरज सोनवणे :-** कसे पध्दतीने कामे केलेले आहे त्या एजन्सीने,

**श्री.अश्विन सोनवणे :-** तुम्ही रनींग बिल दिले का त्याला.

**श्री.धीरज सोनवणे :-** हे आम्ही स्वातंत्र चौक ते पांडे चौक बघुन घेतले आहे. त्यानी कश्या पध्दतीने काम केलेले आहे. आता त्या रस्त्यावरती तुम्ही कारपेट करा, सिलकोट करा त्याचा दर्जा टिकणार नाही. त्याचे कारण की, ८ महिने झाले तो रस्ता पडुन आहे. पावसाळा खालला आहे. त्या खडीमध्ये पाणी जाऊन जाऊन त्याचा खालचा सर्व बेस खराब झालेला आहे. तुम्ही त्याच्यावर परत बी.एम.करुन घेणार आहे का ?

**श्री.अश्विन सोनवणे :-** त्यांना हे पण माहित नाही की, रनींग बिल काढले की नाही काढले. काढले असेल तर झाले मग त्या रस्त्याचे. काही फरक पडत नाही त्याला. ब्लॅक लिस्ट पण केले तर काही फरक पडणार नाही. अनामत किती जप्त होईल त्याची २-३ लाख रुपये. तुम्ही चेक करा ना.

**श्री.जितेंद्र मराठे :-** या गोष्टींना गांभिर्याने घेतले पाहिजे.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** ज्या वेळेला तो कामाला सुरुवात करणार आहे. कामाची सुरुवात झालेली आहे.

**श्री.धीरज सोनवणे :-** किती दिवसात कधी.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** आता तो जो रस्ता आहे टॉवर चौकापासुन ते भिलपुरा पुलिस चौकपर्यंतचा तो सुरु केलेला आहे.

**श्री.धीरज सोनवणे :-** आहो, अगोदर त्यानी पेंडींग रस्ते केले पाहिजे ना.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** आता हा शेवटचा रस्ता बाकी होता त्यानी तो करुन घेतला, आता या कामानंतर त्याला हेच काम करायचे आहे. जे जे अपुर्ण कामे आहे.

**श्री.धीरज सोनवणे :-** कधी लावणार.

**श्री.अश्विन सोनवणे :-** ते रस्ते खराब झालेले आहे. उखडलेले आहे ते रस्ते.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** जागेवर जाऊन पाहणी करु. जी आवश्यकता असेल ते करु.

**श्री.अश्विन सोनवणे :-** त्याचे बिल थांबवा तुम्ही.

**श्री.धीरज सोनवणे :-** साहेब तुम्ही इंजिनिअर आहे, तुम्हाला कळत असेल की, आज त्या रस्त्याची परिस्थिती काय आहे. आवश्यकता आहे का असे म्हणु नका. आवश्यकता आहेच. त्याच्यावर परत बी.एम.चा लेयर करुन घ्या.

**मा.महापौर :-** नितीन भाऊ बसुन घ्या, बसुन घ्या.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मला वाटले की, एस.टी.चे कन्डाक्टर आले का ?

**श्री.अनंत जोशी :-** रिक्वेस्ट आहे, खुप वेळ झालेला आहे म्हणुन मी जास्त वेळ घेणार नाही. फक्त एक रिक्वेस्ट आहे, अनेक वेळी झालेले आहे. वाद पण झालेले आहे, आपण मिटींग पण घेतली, संबंधीत मक्तेदाराने सुध्दा माझ्या सोबत मिटींग केली. त्यांनी आश्वासन ही दिले. आजही परिस्थिती अशी आहे की, आमच्या वार्डामध्ये, जळगांव मध्ये जर बघितले तर सगळीकडे सारखीच परिस्थिती आहे. ज्या ठिकाणी रस्त्यांचे कामे लागतात. दुसऱ्याच दिवशी तेथे तुम्ही काय एम.बी. केले बी.एम.केले. दुसऱ्या दिवशी अमृतवाले येतात आणि खोद काम करतात. माझ्या वार्डमध्ये जर २० रस्ते चालु असतील. त्या ठिकाणी १० झालेल्या रस्त्यांवर खोदकाम चालु आहे. याला जर थांबवणार तर कसे थांबवणार. २०-२० , २५-२५ वर्षानंतर रस्ते होत आहे.याची काळजी नाही का, प्लॅनींग नाही का कॉर्डीनेशन नाही का, मी अनेक वेळा बोलुन झालेले आहे. आणि ते रस्ते लगेच फोडले जात आहे. हे दुर्देवीय आहे. आणि नागरीक याच्याने नाराज का होतात की, नगरसेवकांना काही घेणे देणे नाही. दुसरा विषय असा आहे की, अनेक वेळा आपण वृत्तपत्राच्या माध्यमातुन किंवा सोशल मिडीयाच्या माध्यमातुन असेल, कारण आता जळगांव शहरातील सर्व नागरीकांना माहित आहे की, आपल्याला कनेक्शन घ्यायचे आहे अमृतचे. ते बोलुन ५-५ वर्ष झालेले आहे. अजुन ही अनेक नागरीकांनी कनेक्शन घेतले नाही. आणि ज्या ठिकाणी रस्त्यांची कामे सुरु होतात. त्या ठिकाणी नळ कनेक्शनची मागणी नागरीकांकडुन केली जाते. आणि जेव्हा आपले इंजिनिअर त्यांना नाही म्हणतात की, रस्त्यांची कामे चालु आहे

फोडता येणार नाही. ते प्रेशर आणतात, कुठल्यातरी पदाधिकाऱ्याचा आणतील, कुठल्यातरी राजकीय पुढाऱ्याचा आणतील, किंवा काही संबंध काढुन त्या कॉन्ट्रॅक्टरवर प्रेशर आणला जातो की, कनेक्शन द्या म्हणुन रस्ता खोदुन कनेक्शन देणे चालु आहे. हे अमृतवाले जेथे रस्ता होतो तेथे रस्ता फोडतात, दुसरी नागरीकांची चुक ही आहे की, कनेक्शन नंतर मागतात. नागरीकांना या संदर्भात आपण सुचित केले पाहिजे. आणि त्यांच्यावर कार्यवाही केली पाहिजे. तो रस्ता झाल्यानंतर कनेक्शन मागेल. त्या नागरीकाकडुन खर्च वसुल केले पाहिजे. मी अनेकदा बोललो आहे पण तसे घडत नाही. राहिला तिसरा विषय, मी माझ्या प्रभागापुरते बोलत आहे. या लोकांनी मागे लागुन लागुन बऱ्याचपैकी कनेक्शन असतील, पाईपलाईन असेल, जे काही अमृतचे कामे होते. ते बऱ्यापैकी संपत आलेले आहे. मी आमचे अभियंता आहे संजय पाटील साहेब त्यांना रिक्वेस्ट करत आहे. त्यांच्याशी बोलुन झाले, मी संजय नेमाडे साहेबांना ही बोललो, मी प्रभागामध्ये सुचित केलेले आहे, नागरीकांना कळविलेले आहे की, अमृतची पाईपलाईन सुरु होणार आहे. जुने कनेक्शन बंद होणार आहे. तुम्ही कनेक्शन टाकीला जोडुन घ्या. पण नागरीकांमध्ये ही तेवढा काही उत्साह दिसत नाही, मी वारंवार विनंती करत आहे. अजुन ही बरेच रस्ते प्रभागात व्हायचे बाकी आहे. त्याचे काम पेंडींग आहे. आता जेव्हा आपण सप्लाय देतो, टेस्टींग करतो. त्याच्यात बरेच फॉल्ट निघत आहे. कुठे वॉल लिक असतो, कुठे पाईपलाईन जोडलेलीच नाही. असे अनेक प्रॉब्लम येत आहे. रस्ते फोडावे लागत आहे. मी संजय पाटील साहेबांना काय सांगत आहे, मी नेमाडे साहेबांना काय सांगतो आहे, आमच्या प्रभाग क्र.१२ मधील अमृतची पाईपलाईन सुरु करा.नागरीकांनी टाकलेले कनेक्शन जोडलेले असो किंवा नसो. तुम्ही सुरु करा, कारण नागरीकांना सांगुन झालेले आहे. दोन सप्लाय करीतांना त्रास होईल, तिसऱ्या दिवशी ते जोडुन घेतले, आमच्याकडचा अमृतचा सप्लाय सुरु करायला लावा. जो नंतर कनेक्शन मागील तर कठोर कार्यवाही नागरीकांवर पण झाली पाहिजे. कारण २०-२५ वर्षानंतर रस्ते होत आहे त्यांनी पण काळजी घेतली पाहिजे. त्यांच्यामध्ये पण अवेअरनेस झाले पाहिजे. आपल्याला फक्त सोशल मिडीयावर टारगेट करुन शिव्या देऊन भागणार नाही. ही गोष्ट त्यांना कळली पाहिजे आणि तिसरा विषय अमृतवाल्यांना सख्त ताकीद द्या. याच्यावर खुप वाद झालेले आहे, मी खुप काही बोललेलो आहे. प्रेस सुध्दा घेतलेली आहे. आपली भेट सुध्दा घेतलेली आहे. त्यांच्यावर काहीही कार्यवाही होत नाही. आजही रस्ता केल्यानंतर चार दिवसात माझ्या प्रभागात खोदला जात आहे. आज सकाळी परत खोदला गेलेला आहे झालेला रस्ता. किशोर ढाके राहतात गजानन हौसींगला, तो रस्ता काल रात्री केला, काल संध्याकाळी ७.०० वाजेपर्यंत मी तेथे होतो. आणि आज सकाळी मला फोन आला की, तो रस्ता खोदलेला आहे. वाईट आहे खुप वाईट आहे दुर्देवी आहे हे.

**श्री.जितेंद्र मराठे :-** महापौरताई आपल्या स्तरावर त्यांना आदेश करा, त्याच्यावर सिलकोट, काय कारपेट असेल, जे काम असतील ते आठ दिवसात त्यांना मार्गी लावायला लावा. ६-६ महिने ९-९ महिने होऊन गेलेले आहे कामांना, कारपेट सिलकोट नाही. याच्यासाठी आपल्या स्तरावर आदेश करा.

**मा.महापौर :-** सन्मा.सदस्य जितुभाऊ मराठे यांचे ज्या खऱ्या भावना होत्या. त्या आमच्यापर्यंत पोहचल्या. त्याअनुषंगाने मी सोनगिरे साहेब आणि इतर इंजिनिअर त्यांना सुध्दा मी आदेशीत केले होते की, तुम्ही सगळे मक्तेदारांची मिटींग घ्या. हे मी त्यांना वारंवार सांगितले होते. मक्तेदारांची मिटींग घ्या. जिथे अपुर्ण रस्ता अशीन तो पुर्ण करा, त्यांना आठ दिवसाचा टाईम पिरियेड द्या.त्यांना नोटीस द्या, नोटीस दिल्यानंतर त्याच्यावर ब्लॅकलिस्टची कार्यवाही करा. हे मी सोनगिरे साहेब आपल्याला सांगितले होते. पण याबाबत प्रशासनाने कोणतीही कार्यवाही केली नाही. आता सर्व सन्मा.सदस्यांना कळकळीची एकच विनंती आहे. आपल्या प्रभागात सुरु असलेली रस्त्यांची कामे जी पेंडींग असतील. त्यांच्यावर खड्डे पडलेले असतील.बी.एम.बाकी असेल, सिलकोट बाकी असेल, कारपेट बाकी असेल. आपण त्यांची लेखी तक्रार किंवा फक्त त्यांची नावे आपल्याकडे द्या.माझ्याकडे द्या. आयुक्त मॅडमांकडे द्या. त्यावर लगेच आपण त्या मक्तेदाराशी चर्चा करुन लागलीच ते काम आपण करायला लावु. आणि जर त्यांचे बिले पेंडींग असतील तर ते काम कमप्लीट झाल्याशिवाय त्यांचे बिले

काढण्यात येऊ नये. हे सुध्दा मी प्रशासनाला आदेश करते. मी दिलेल्या आदेशावर आयुक्त मॅडम आपण लवकरात लवकर कार्यवाही कराल अशी मी अपेक्षा व्यक्त करते.

**श्री.नितीन बरडे :-** मॅडमांनी सांगितले आहे तुम्ही एक महिना झाला कोणावर कार्यवाही केली, काय केली.

**मा.महापौर :-** या विषयाला दोन तीन महिने झाले असतील पण काहीच होत नाही. अश्विनभाऊ एक मिनीट, एकच मिनीट.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** या बाबतीत मी संबंधीत ठेकेदाराला नोटीस ही बजावली होती. त्यानंतर मी त्या रस्त्यावर जाऊन ही आलो. त्याच्या सोबतही पाहणी केली. त्या ठिकाणी जाऊन जो पोरशन खराब झालेला आहे. त्याची दुरुस्ती कश्या पध्दतीने करता येईल. त्याच्या बाबतीत बी ॲण्ड सी मध्ये जाऊन पण मी माहिती घेतली. आणि त्या ठिकाणी डांबरी करणाचा जो कोट आहे जो आपण पुलावर टाकतो. प्रिकास्ट सिलकोट ज्याला आपण म्हणतो. त्या पध्दतीने लेयर टाकायची आहे. कॉन्ट्रॅक्टरचे आणि जो काम करणारा कॉन्ट्रॅक्टर आहे दोघांचे समन्वये साधुन दोघांचे बोलणे करुन दिलेले आहे. त्या कॉन्ट्रॅक्टरचे काम दुसरीकडे चालु आहे. त्यांचे ते काम झाल्यानंतर तो इकडे येणार होता. आणि काही दिवसापासुन पाऊसाचे वातावरण आहे त्यामुळे आम्हाला थोडा विलंब झाला.

**मा.महापौर :-** नाही, पावसाळयाचा आताचा विषय आहे तुम्ही जर इतके इतके दिवस लावणार तर हा संताप होणारच आहे.

**श्री.नितीन बरडे :-** अध्यक्ष महोदया, हे मागच्या सभेच्या पहिले गेलेले आहे. हे मागच्या सभेला मी तक्रार केली. मागच्या सभेच्या पहिले झालेला विषय आहे हा. त्या सभेनंतर काय केले.

**मा.महापौर :-** त्यानी दुसरे काम घेतले आहे म्हणुन उशीर होत आहे ही संपुर्ण चुकीचा विषय आहे. दुसरे त्यानी काम घेतलेले आहे म्हणुन पहिल्या कामाला तो दिरंगाई करत असेल. हा चुकीचा विषय आहे.

**श्री.सोनगिरे , शहर अभियंता :-** आठ दिवसात होऊन जाईल ताई.

**मा.महापौर :-** आठ दिवसात, नाही तर सोनगिरे साहेब तुमच्यावर कार्यवाही होईल.

**श्री.नितीन बरडे :-** आयुक्त मॅडम, तुम्ही गुणवत्तेला साहेब नेमले होते, ते तुमचे गुणवत्तेचे साहेब कुठे गेले. मला सांगा कोणत्या अधिकाऱ्याकडे तक्रार करणार. तुमचा इंजिनिअर त्या रस्त्यावर का उभा नव्हता.

**मा.महापौर :-** इंजिनिअर लोकांनी पण हे करा, रस्ते सुरु आहे. इतके वर्षानंतर काम होत आहे. तुम्ही तेथे थांबले पाहिजे.

**श्री.नितीन बरडे :-** गुणवत्तेसाठी इंजिनिअर नेमला होता ना. मग कुठे गेली तुमची गुणवत्ता.

**मा.आयुक्त :-** त्यांनी दिले ना ते झाले नाही म्हणुन.

**मा.महापौर :-** थर्ड पार्टीचे ऑडिट नाही होत. त्याचा रिपोर्ट तपासला जातो.

**श्री.नितीन बरडे :-** थर्ड पार्टी पण मॅनेज होते. गुणवत्तेचे अधिकारी गेले कुठे आता रस्त्याचे. मग तो रस्ता का होत नाही. त्याचे बिले कसे काय निघाले. आता आम्ही ४ महिन्यानंतर या खुर्ची वरुन उतरु उर्वरित बिल त्याला देऊन मोकळे होऊन जाणार तुम्ही. आम्ही येणार नाही.

**श्री.अंनत जोशी :-** भाऊ महापौर आहे तुम्ही भावी महापौर आहात तुम्ही.

**श्री.अश्विन सोनवणे :-** जेव्हा पहिल्यांदा टेस्टींग केली अमृतची तेव्हा सगळयांना पाणी आल आणि आपण एन.ओ.सी.देऊन टाकली रस्ते करण्यासाठी, आता सेकंड टाईम जेव्हा फ्लशींग केली तेव्हा लोकांना पाणीच आले नाही. त्याच्यातुन मोठमोठे दगड निघाले आणि त्याच्यामुळे आपण नवसाचा गणपती ते पिंप्राळा रेल्वे गेट दोन ठिकाणी रस्ता खोदला. तो ४२ कोटीमध्ये रस्ता कमप्लीट झालेला आहे. मग आता कसे काय ? पहिल्यांदा पाणी येते आणि सेकंड टाईम फ्लशींग केले की, पाणी येत नाही. त्यात दगड येतात असे कसे काय ? तपास करायला पाहिजे ना. असे कसे काय होत आहे मॅडम. पहिल्यांदा पाणी आल लोकांना आणि सेकंड टाईम जेव्हा

फ्लशींग केली तर मोठमोठे दगड येत आहे पाईप मध्ये. पाणीच पोहचत नाही लोकांपर्यंत, ४ ठिकाणी खोदला तो ४२ कोटी मधला रस्ता.

**मा.आयुक्त :-** नेमाडे साहेब विषय माहित आहे का तुम्हाला. कारण हे टेक्नीकल आहे.

**श्री.अंनत जोशी :-** मॅडम, अमृतचा समारोप करायला लावा नाहीतर सगळे रस्ते खोदतील.

**श्री.अश्विन सोनवणे :-** १०१% तुमचे पाईप फुटणार आहे. म्हणजे ४२ कोटी पण गेले पाण्यात आणि १०० कोटी पण गेले पाण्यात. तुम्ही एन.ओ.सी. दिली त्याच्यानंतर रस्ता झाला की नाही.

**श्री.अनंत जोशी :-** संपुर्ण सप्लाय केल्याशिवाय हा विषय समजणार नाही. तुम्ही रस्ते करत आहात पण ते परत खोदले जातील.

**मा.आयुक्त :-** सभागृहात मी सांगितले पण स्पेसिफीक विषय असल्यामुळे मी नेमाडे साहेबांना सांगितले,

(एकाच वेळेला अनेक सन्मा.सदस्य बोलत होते म्हणुन त्यावेळी कोण काय बोलले ते स्पष्ट समजुन येत नाही. )

**श्री.अश्विन सोनवणे :-** सांगा लवकर, मला उत्तर पाहिजे याचा.

**श्री.संजय नेमाडे, पाणी पुरवठा अभियंता :-** पाणी सोडुन जेव्हा फ्लशींग करतो तेव्हा फक्त काही खडे जे आहे ते निघुन जातात. हे जे मोठमोठे खडे आहे एका ठिकाणी येऊन जमा होऊन जातात.

**श्री.अश्विन सोनवणे :-** पहिले टेस्टींग झाले माझ्या वार्डात पाणी आल व्यवस्थीत, दुसऱ्यांदा आले तर दगड आले. पाणी पोहचले नाही पण रस्ते खोदले गेले.

**श्री.संजय नेमाडे, पाणी पुरवठा अभियंता :-** पाईप टाकले ना त्यात जे खडे असतात ना त्यानंतर ते खडे येतात,

**श्री.अश्विन सोनवणे :-** पहिले व्यवस्थीत केले ना तुम्ही पहिले जेव्हा केले तेव्हा आले नाही आणि सेकंड टाईम केले तर खडे आले.

**श्री.धीरज सोनवणे :-** माझ्या वार्डात झालेला रस्ता ३ ठिकाणी खोदला गेला.

**श्री.अश्विन सोनवणे :-** तुम्ही काही तरी उपाययोजना करा ना. दगड जेथुन घुसत आहे तेथुन काही तरी उपाययोजना केली पाहिजे ना. येता कसे काय ते. कुठुन येत आहे. आता मी सांगतले ना आम्हाला हाड पण सापडले त्याच्यामध्ये. हाड सापडले हाड मी सांगितले नाही तुम्हाला. लोकांना पाठवत आहे. जे बिचारे खात नाही त्यांना पाठवत आहे. मॅडम अहो मॅडम हे काही उत्तर आहे का हे. असे उत्तर आहे का हे. संपुर्ण तपास करायला पाहिजे ना. किती दिवसापासुन चालु आहे तुमच.आता ४२ कोटीचे रस्ते खोदले जात आहे. म्हणजे पाण्यात गेले ना ते सगळ.लोकं कोणाला बोलतील आम्हाला बोलतील. तुम्ही एन.ओ.सी.देऊन टाकतात.

**श्री.धीरज सोनवणे :-** लेखी तक्रारी दिलेली आहे अजुन पण काही नाही.

(एकाच वेळेला अनेक सन्मा.सदस्य बोलत होते म्हणुन त्यावेळी कोण काय बोलले ते स्पष्ट समजुन येत नाही. )

सौ. ज्योती चव्हाण :- महापौरताई,

**श्री.अनंत जोशी :-** मॅडम, अमृतचे गांभिर्याने विचार करा, अमृतचे सगळे सप्लाय सुरु करा. सगळे रस्ते परत फुटतील माझे शब्द लक्षात ठेवा. याच्यावरुन खुप लाचारकी होणार आहे. प्रशासनाची पण पदाधिकाऱ्यांची पण, बॉडीची पण खुप लाचारकी होणार आहे.

**श्री.अश्विन सोनवणे :-** १०-१५ दिवस उशिरा सुरु केले ते चालणार आहे.

**मा.आयुक्त :-** आर्ध्ये उत्तरे दिले आर्ध्ये राहिले आहे. रस्ते आपल्याकडे तीन प्रकारामध्ये सुरु झालेत. ४२ कोटी मध्ये, DPDC मध्ये आणि मनपा फंडामध्ये. मनपा फंडातुन खुप कमी रस्ते असल्यामुळे आणि गल्ल्या बोळी असल्यामुळे त्यात आपल्याला जास्त काही जाणवल्या नाही. परंतु DPDC च्या रस्त्यांमध्ये आपल्याला सगळयांनाच माहित असेल की, जो काही ४ वर्षाचा गॅप झाला, त्यामुळे ती क्वॉनटीटी मॅनेज करतांना PWD च्या लोकांनी आहे त्या क्वॉनटीटी मध्ये रस्ता करणेसाठी रुंदी कमी केली आणि लांबी तिच ठेवली,तुम्हाला सगळयांनाच अनुभव असेल, रोडच्या बाजुने आर्धा रस्तो होत आहे आर्धा तसाच राहत आहे. त्यामुळे एक

बरीच ओरड आहे. प्लस त्यांनी जी काही क्वॉनटीटी कमी जास्त केली त्याची आपल्याला काहीच माहिती नाही. किंवा माहित नाही. म्हणुन आपल्याकडे ओरड आहे की, मनपाचा सुपरव्हाइझर लावावे, परंतु कॉन्ट्रॅक्टर त्याचच ऐकतो जो त्याची एम.बी. रेकॉर्ड करतो. म्हणुन आपण राईटींगमध्ये ३ ते ४ पत्र दिलेले आहे की, गुणवत्तापुर्ण रस्ते करा म्हणुन, कारण त्याची अधिनस्त पार्टी PWD आहे. बाकीचे रस्ते, आता काल भाऊ ज्या रस्त्यावर मला घेऊन गेले होते. झाशीच्या राणीच्या पुतळयाजवळ, PWD ने जेवढी क्वॉनटीटी होती तेवढाच रस्ता केला. ऐवढे वाईट वाटते.

**श्री.अश्विन सोनवणे :-** त्यांचे नका सांगा मॅडम, आपल्या रस्त्यांचे सांगा.

**मा.आयुक्त :-** सर, एक एक मुद्दा घेत आहे. सुरुवात झाली होती त्याबद्दल, तो बी ॲण्ड सी चा झाला, दुसरा DPDC चा झाला. DPDC चा निधी हा सन २०२०-२१ ला मान्यता झाला होता. त्याची मान्यताच मार्च २०२२ ला संपली होती. आणि सोनवणी साहेब, नंतर सिटी इंजिनिअर बदलले, त्यानंतर कुलकर्णी साहेबांनी टेंन्डर मध्ये काही बदल केला होता, त्यात वेळ गेला. तर वर्कऑर्डरच तुमच्या फेब्रुवारी मार्च मध्ये झाल्यात. आणि मार्च एन्डला पैसे खर्चायची मुदत संपत होती. म्हणुन ७-८ कोटी दलितोत्तर मध्ये ते पैसे परत करावे लागले. त्या गॅपमध्ये काय झाले हा निधी परत करणे, हे निधी परत गेले. यामध्ये कॉन्ट्रॅक्टरने दोन दोन लेअर केल्या, पैसे आले नाही तर दोन दोन लेअर केलेले नाही. आता ते पैसे आले तर ते लेअर करायले. आता तुमचे म्हणणे आहे की, एक्सट्रा बी.एम. करा. जश्या जश्या अडचणी येतील तसे तसे आपण तेथे व्हिजीट करुन जे.एम.सी. फंडातुन प्रयोजन करु कारण तो रस्ता टिकला पाहिजे. तिसरा महत्वाचा मुद्दा, जेव्हा आपण जे.एम.सी. फंडातुन रस्ते घेतो.मी प्रत्येक इंजिनिअरला तेच सांगते, लेन्थ कमी झाली तरी चालते परंतु क्वॉनटीटी चांगली घ्या. स्ट्राँग घ्या. कारण क्वॉनटीटी जर प्रॉपर नसेल, प्रॉपर लेअर नसेल तर रस्ता टिकत नाही. हे तिन मुख्य कारणे आहे, जितेंद्र भाऊंच्या प्रश्नाचे उत्तर आणि जे रस्त्यांचे बोलत होते ते. त्यानंतर अमृत मध्ये जो आहे पाणी पुरवठा. पाणी पुरवठयाच्या मागच्या बैठकीतच मी सांगितले होते. कालच्या सभेच्या बैठकीत ही सांगितले, आणि एच.ओ.डी.ची आपण दर मंगळवारी बैठक घेतो. कॅन्ट्रॅक्टर वगैरे सर्व उपस्थित असतात.सर्व इंजिनिअर्सला याच सुचना आहे की, चांगल्या पध्दतीने टेस्टींग, फ्लशींग करुन घ्या. क्रॉस १.०१. त्यानंतर आपण कनेक्शन देत बसु या म्हणुन कारण की, ते आपले झालेले नाही. तेव्हा जो गॅप झालेला आहे, जी.आय पाईप नव्हती, त्यामुळे आपण एक्सट्रा कनेक्शन दिले, लाईन टाकल्या.परंतु आजच्या घडीला मार्च एन्ड आपले टार्गेट होता स्कीम कमप्लीट करण्याचे. जास्तीत जास्त आपण इंजिनिअरला मुभा दिलेली आहे १५ एप्रिल पर्यंत. आता माझे २-३ टेक्नीकल मुद्दे आहे ज्याच्यामुळे काम लांबणार आहे. जसे रेल्वेची पर्मिशन, पैसे भरुनही रेल्वेला जात नाही. २-३ महिन्यापासुन मी फॉलोअप घेत आहे.

**श्री.धीरज सोनवणे :-** इंजिनिअर्सला आपण सांगितले आहे. त्यांना नोटीसा पण दिलेल्या आहे की, तुम्ही १५ दिवसात यांच्याकडुन काम नाही करुन घेतले तर तुमच्यावर काय कार्यवाही करण्यात येईल. पण ते जर इंजिनिअर लोकंचे ऐकतच नाही. अमृतचे लोकं.

**मा.आयुक्त :-** आपण ठेकेदारालाही नोटीस देतो आहे, ठेकेदाराची ही जबाबदारी निश्चित करण्यात येईल. इंजिनिअरची ही जबाबदारी निश्चित करण्यात येईल. जर वेळेत काम पुर्ण नाही झाल तर. कारण शासन याच्या बाबतीत खुप स्ट्रीक्ट आहे. हा आणि तिसरा जो मुद्दा तुम्ही सांगितला, मला पण यांच्या सांगण्यावरुन कळाले की, मी टेक्नीकल नाही, इंजिनिअर नाही, टेस्टींगच्या वेळेस आपण टँकरने टेस्टींग घेतो. फ्लशींगच्या वेळेस प्रेशर जास्त असतो तर उरला सुरला कचरा येतो. असे मला त्यांच्या बोलण्यातुन कळाले की, फ्लशींग जास्त प्रेशरने होते, टेस्टींग कमी प्रेशरने होते म्हणुन ते सुटलेला गाळ पण त्याच्यामध्ये येतो. हे त्यांच्या म्हणण्यावरुन कळाले.

**श्री.अश्विन सोनवणे :-** म्हणजे ज्या वेळेला आपण अमृतचे पाणी चालु करु तेव्हा प्रेशरचे पाणी येणार नाही.

**मा.आयुक्त :-** त्यासाठीच सांगते अगोदर पुर्ण झोनचे.

**श्री.धीरज सोनवणे :-** दगड येण्याचे कारण काय ? दगड येण्याचे कारण काय आहे. फ्लशींगसाठी जे पाईप ओपन ठेवले आहे.त्याला इनकॅप लावणे गरजेची आहे. तुम्ही बऱ्याच ठिकाणी जाऊन बघा इनकॅप लावलेले नाही.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ते दगड घ्या आणि डोके फोडा.

**श्री.धीरज सोनवणे :-** हो, तसेच काम आहे भाऊ ते, दगड घ्या आणि डोके फोडा. आम्हाला सगळे माहिती असतांना सुध्दा तुम्ही मोघम उत्तरे देऊन मोकळे होतात. पण ॲकच्युअल तेथे काय घडतं,त्याची माहिती तुम्ही घ्या. तेथे काय कश्या पध्दतीने होत. ते कसे काय कश्या पध्दतीने होते. आम्हाला सांगण्याची गरज नाही.

**मा.आयुक्त :-** सन्मा.सदस्यांना जर कळत आहे की, इनकॅप लावल्याने दगड जात नाही तर हे आपल्याला ही कळायला पाहिजे. जबाबदारी आपली आहे की, कॉन्ट्रॅक्टरने काय केलेले आहे.

**श्री.धीरज सोनवणे :-** बऱ्याच ठिकाणी इनकॅप नाही. मग सांगा दगड कसे काय जाणार नाही.

**मा.आयुक्त :-** सोनगीरे साहेब, नेमाडे साहेब तुम्ही सांगायला पाहिजे की, त्याला कॅपींग गरजेची आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आता काय झालेले आहे, हे निवडणुकीच वर्ष आहे. प्रत्येकाला रस्त्यांच्या कामांची सुध्दा घाई आहे. का ? कारण निवडणुकीला सामोरे जावे लागेल. एकीकडे अमृतचा काम जे आहे ते अपुर्ण अवस्थेत आहे. रस्त्यांचा निधी हा लॅप्स होऊन जाईल. म्हणुन आहे त्या परिस्थिती मध्ये कामांची घाई आहे. कामाची घाई झाल्यानंतर रस्त्यांच काम होऊन जातो. कुठेतरी पाण्याची फ्लशींग राहुन जाते.टेस्टींग राहुन जातो, कनेक्शन राहुन जातो. जी वेळ आहे ना, संयुक्तीक वेळ नाही ही. त्याच्यामुळे या तक्रारी येतील. परंतु या तक्रारींमध्ये सुध्दा याच्यातुन मार्ग काढण्या संदर्भात आपल्या अभियंत्यांनी थोडेशे लक्ष घालुन की, जेथे रस्त्यांचे काम माहित आहे की, दोन दिवसात सुरु होणार आहे. नेमके आज जे बंटीभाऊ बोलले ना ही वस्तुस्थिती आहे. नेमके कामाला सुरुवात होते. आणि त्याच वेळेला कोणी ना कोणी कनेक्शन मागतो. कुठेतरी जॉईंट राहुन जातो. कुठेतरी फ्लशींगची आठवण येते. जो की, आपण ज्या वेळेला एन.ओ.सी. घेतो. आणि एन.ओ.सी. घेतल्यानंतरच प्रत्यक्ष कामाला सुरुवात करतो. हा जो गॅप येतो आहे ना. हा गॅप यायला नको पाहिजे. याच्या संदर्भात आपण प्रशासनाने कुठेतरी दक्षतेने काम करणे गरजेचे आहे.

**श्री.नितीन बरडे :-** PWD च जो काम आहे तेथे कोणीच जाऊ शकत नाही का? आयुक्त मॅडम कामे ही सजेस्ट करु शकत नाही का ? जितु भाऊ, मॅडम.

**मा.आयुक्त :-** मनपा फक्त ना हरकत प्रमाणपत्र देते की, काम करायला हरकत नाही.

**श्री.नितीन बरडे :-** बरोबर आहे. जितुभाऊ, जितुभाऊ लक्ष द्या.

**श्री.धीरज सोनवणे :-** मॅडम जेव्हा आपण त्यांच्याकडुन रस्ते हस्तांतरीत करुन घेतो. तेव्हा रस्ते सुस्थीतीत असल्याचा दाखला देतो. त्यावेळेला आपण सगळं करुन देतो का ?

**सौ.ज्योती चव्हाण :-** महापौरताई, मी मागच्या महासभेमध्ये ही बोलली होती. त्यांच्याशी बोलणे झाले तर त्यांच्याकडे साहित्य नाही. आज एक महिना झाला, एकही जोडणी बाकी आहे. प्रभाग क्र.१३ मध्ये अशी परिस्थिती आहे. मराठे साहेबांना सुध्दा फोन केला मी, पण त्यांच्याकडे साहित्य नाही.

**श्री.नितीन बरडे :-** मॅडम आपण व्हिजीट करणार ना. माझ्या घराजवळुन ते गाडगेबाबा रस्ता चालु आहे.शकुंतला राणे हायस्कुलपाशी मोहन नगर मधुन एक गटार येते. तेथे एक खड्डा आहे तो उचलला गेला पाहिजे. ती नाली व्यवस्थीत झाली पाहिजे. नाही तर तेथे कायम खड्डा पडणार आहे. प्रत्येक पावसाळयात खड्डा पडणार. आता तेथे रोड होत आहे. उचलला गेला पाहिजे आणि ती नाली झाली पाहिजे. तर तो रस्ता टिकेल.

**श्री.जितेंद्र मराठे :-** आठ दिवसापुर्वी आयुक्त मॅडमांना भेटुन ते रोडक्रॉसींगचे दाखविलेले आहे मी ते. तुम्ही जे सांगत आहात ते.

**श्री.नितीन बरडे :-** ती नाली आणि रस्ता मॅडम, तुम्ही जर व्हिजीट मारली तर तेथे या.तो एकदम खड्डा आहे मॅडम.

**सौ.ज्योती चव्हाण :-** आयुक्त मॅडम,

**मा.आयुक्त :-** अमृत कनेक्शनच्या बाबतीत सर्व सन्मा.सदस्यांना एक विनंती आहे. त्यामध्ये पण ज्यांचे एकझीस्टींग कनेक्शन असतील त्या एखाद्याचा आपण विचार करु. पण माझे म्हणणे आहे की, फ्लशींग आणि टेस्टींग प्रायोरिटीने करुन घ्या. कनेक्शन चालत राहतील. कारण नाही तर एन्डच होणार नाही स्कीमचा.

(एकाच वेळेला अनेक सन्मा.सदस्य बोलत होते म्हणुन त्यावेळी कोण काय बोलले ते स्पष्ट समजुन येत नाही. )

**मा.आयुक्त :-** हो.

**श्री.अश्विन सोनवणे :-** अमृतच्या ठेकेदाराला येथे बोलवुन घ्या.

**मा.महापौर :-** विषयपत्रिकेला सुरुवात करु या. विषयपत्रिकेवरील विषय क्र.२ नगरसचिव गोराणे साहेब सुरु करा.

**नगरसचिव :- विषय क्र. ०२ :- मौजे मोहाडी गट नं.६० या ठिकाणी क्रिडा संकुल विकसीत करणे बाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.**

**श्री.नितीन लढ्ढा :-** महापौरताई, हा क्रिडासंकुलाचा मौजे मोहाडी गट नं.६० मधला विषय आहे. या संदर्भात काय झालेले आहे की, या जमिनीचा जितक क्षेत्रफळ आहे. त्यामध्ये ज्या स्टेडियमच्या साईजची निर्मीती होईल. ती साधारणता आपल्या गावातल जे स्टेडीयम आहे जवळपास तेवढयाच स्टेडियमची निर्मिती होईल.परंतु मेहरुण झोन नं.७ मध्ये माहिती घेतली असता गट नं. ३४३ ही गाळयांची जमिन आहे. आणि साधारणता त्या जमिनीचे क्षेत्रफळ आहे १४.६५ हेक्टर. म्हणजे साधारणता ३७-३८ ऐकरच क्षेत्र आहे. आणि त्या संदर्भात येथील ३७ चा प्रस्ताव सुरु करुन या सेक्टर ७ मध्ये जर कधी स्टेडियमची निर्मिती केली गेली तर एखाद्या अंतरराष्ट्रीय दर्ज्याच स्टेडियम उभारता येईल. आणि सुदैवाने क्रिडाचे राज्यमंत्री मा.गिरीषभाऊ महाजन स्वत: आहे. आणि त्यांना स्वत:ला सुध्दा स्वारस्य आहे की, एक चांगल अद्यावत स्टेडियम हे जळगांव शहरामध्ये व्हावे. जर करतांना हा एक मोठा विचार केला तर निश्चितपणे मी म्हणतो की, भविष्यात एक चांगल्या स्टेडियमची निर्मिती होण्याच्या संदर्भात निर्णय घेणे संयुक्तीक ठरेल. म्हणुन हा मोहाडीचा जो प्रस्ताव आहे. तो तहकुब करण्यात यावा आणि गट क्र.३४३ मेहरुण ही सरकारच्या मालकीची जमिन आहे. याचे ३७ चा प्रस्ताव क्रिडांगणासाठी सुरु करण्याची कार्यवाही करावी. ३७ चा प्रस्ताव गट क्र.३४३ मेहरुण याच्या बाबतीतला क्रिडांगणाचा प्रस्ताव तयार करण्यात यावा.

**मा.महापौर :-** याच्याशी संबंधीत आहे का ?

**श्री.ईब्राहिम पटेल :-** याच्यामध्ये आपण तेथे स्लॉटरहाऊस म्हणुन मंजुरी दिलेली आहे. कमीतकमी २००४-२००५ च्या दरम्यान,सद्यास्थितीला, तर त्याठिकाणी स्लॉटरहाऊस आपण बांधले पण आहे. आणि त्या लोकांनी मॅडम आपल्याकडे अर्ज पण दिला २-४ दिवसापुर्वी. त्यांना जर सोईसुविधा उपलब्ध करुन दिली तर बरं होईल. कारण हा ठराव जर दुसरीकडे जात आहे. त्यांचे ही विचार करायला पाहिजे.

**श्री.अश्विन सोनवणे :-** कत्तलखाने तर बंद केले ना आपण कशाला चालु करायला लावता आहे, ते तर बंद केले ना आपण.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** दुसरे आहे ते दुसरे आहे. कत्तलखाने बद्दल नाही.

**श्री.नितीन लढ्ढा :-** याच्याशी संबंधीत आहे ते दुसरे आहे.

**श्री.अश्विन सोनवणे :-** कत्तलखाने वगैरे चालु करा असे नका सुरु करा.

**श्री.नितीन बरडे :-** पुढच्या सभेत यायला पाहिजे फक्त.

**श्री.नितीन लढ्ढा :-** याच्या संदर्भातला प्रस्ताव तुम्ही असा घ्या की, मोहाडी ६० मध्ये जो प्रस्ताव सुचवलेला होता प्रशासनाने तो रद्द समजण्यात यावा त्याच्या ऐवजी मेहरुण गट क्र.३४३, हे महानगरपालिकेच्या मालकीची जमिन आहे. याच्यावरती क्रिडांगणाच्या आरक्षणाच्या प्रस्ताव ३७ ची कार्यवाही तातडीने सुरु करावी. असा तो ठराव करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** हा विषय तहकुब न करता.

**श्री.नितीन लढ्ढा :-** तहकुब न करता, मोहाडी गट क्र.६० मधला प्रस्ताव नामंजुर करण्यात येत आहे. त्याच्या ऐवजी मेहरुण गट क्र.३४३ ही महापालिकेची आहे आणि जवळपास ३७ ऐकर जमिन आहे.

**श्री.सुनिल महाजन, विरोधीपक्ष नेता :-** पैसे पण वाचतील ना आपले,

**श्री.अश्विन सोनवणे :-** आणि मेहरुण शिवार आहे.

**मा.उपमहापौर :-** अडचण आहे थोडीशी, यांचे म्हणणे आहे की प्रशासनाचे की, ती जागा आपल्याला विस्तृतपणे माहित नाही. मग त्यांचे म्हणणे आहे की, हा विषय तहकुब करायचा आणि पुढच्या महासभेमध्ये तो ठराव घ्यायचा.

**नगरसचिव :-** मॅडमांचे म्हणणे असे आहे की, हा प्रस्ताव रद्द करुन टाका आणि नविन प्रस्ताव यांना आणुन द्या.

**मा.उपमहापौर :-** आरक्षण क्रमांक हा जो आहे तुमचा मोहाडी गट नं.६० त्याच्या ऐवजी जसा आपण आता १९९ केला तेथे ठरावामध्ये फक्त हे म्हणावे लागेल की, ६० ऐवजी तुम्ही जे म्हणत आहात तो घ्यावा लागेल.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ॲकच्युल मध्ये काय आहे. या प्रस्तावात ३७ ची कार्यवाही होऊन जाईल. ती जमिन आज नो-डेव्हलपमेंट झोन मध्ये आहे. आणि नो-डेव्हलपमेंट झोन मध्ये असल्या कारणाने ते राज्य शासनाकडुन सजेशन ऑब्जेक्शन करुन त्याची मान्यता घ्यावी लागेल.त्या कारणामुळे या मान्यता विलंब लागेल म्हणुन या ठरावाच्या अनुषंगाने याची कार्यवाही सुरु करावी. करवंदेजी कसे करता येईल. करवंदेजी अजुन त्याच्या बद्दल योग्य बोलतील.

**श्री.अशोक करवंदे, नगररचनाकार :-** तुम्ही सांगितले की, ते आजच्या घडीत ते नो-डेव्हलपमेंट झोन मध्ये आहे. आणि २०२० मध्ये शासनाने नेमणुक केली आहे. परंतू त्याला आपण हा प्रस्ताव दिला आहे आणि तो जर होत नसेल तर आपल्याला बॉडीकडे जावे लागेल आणि आपण हा प्रस्ताव सादर करू

**श्री.नितीन लढ्ढा :-** बरोबर आहे म्हणजे याच्यात आपल्याला प्रशासनाच्या दृष्टीकोनातुन योग्य पध्दतीने आपण प्रस्ताव तयार करून टाकायचा आणि पुन्हा महासभेसमोर आणायचा. तुर्त हा प्रशासनाचा प्रस्ताव रद्द करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्रं. २ हा सर्वानुमते नामंजुर करण्यात येत आहे.

**ॲड.शुचिता हाडा :-** नामंजुर करण्यासोबत जे सॉल्युशन दिलेले आहे सभागृहाने ते पण टाका.

**मा.महापौर :-** सन्मा.नितीनभाऊ यांनी दिलेल्या सुचनानुसार मेहरुण गट नं.३४३ चा जो गार्डनचा एरिया आहे तो ३७ चा प्रस्ताव महासभेमध्ये पुन्हा प्रशासकीय सादर करावा.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. १००८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, मौजे मोहाडी गट नं.६० या ठिकाणी क्रिडा संकुल विकसीत करणे बाबत प्रशासनाकडुन आलेला प्रस्ताव नामंजूर करण्यात येत आहे. सभागृहात झालेल्या चर्चेनूसार मेहरुण गट नं.३४३ या जागेवर क्रिडा संकुल विकसीत करणे कामी मान्यता प्रदान करण्यात येत आहे. या जागेसंदर्भात प्रशासनाने कलम ३७ अन्वये प्रस्ताव तयार करुन पूढील कार्यवाही तत्पर करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ५५**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्र. ०३ :-** जळगांव शहराच्या मंजुर विकास योजना (वाढीव हद्द) मौजे मेहरुण स.नं.१६४/२ या जमिनीतुन दर्शविलेले आरक्षण क्र.१५१,डीस्पेन्सरी ॲन्ड मॅटर्निटी होम ने बाधीत जमिनीचे भुसंपादना बाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** महानगरपालिकेस त्या जागेची आवश्यकता आहे किंवा नाही असा आपण स्पष्ट अहवाल मागविला होता. त्याबद्दल येथे काहीच म्हटलेले नाही. त्या बद्दल पण आपण खुलासा करा.

**श्री.अशोक करवंदे, नगररचनाकार :-** ( आवाज स्पष्ट ऐकु येत नसल्यामुळे समजुन येत नाही. )

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** आपण जसा हा प्रस्ताव आणला ना, डिस्पेनसरी ॲण्ड मॅटर्निटी होम, मला सभागृहाला हे विचारायचे आहे की, जळगांव शहरात महानगरपालिकेचे डिस्पेनसरी किंवा मॅटर्निटी होम किती आहे. आणि ही जागा जर आपण भुसंपादीत केली, पैसे दिले तर त्या जागेचा आजच्या चालु स्थितीला, चालु सेवेला काय परिणाम होईल यांची उपयुक्तता किती आहे आपल्याला,याची शाहनिशा प्रशासनाने केलेली आहे का ?

**श्री.नितीन लढ्ढा :-** बघा आता कसे आहे पोकळे साहेब, डिस्पेनसरी आणि मॅटर्निटी होमचे आरक्षण कसे होईल ते तर आवश्यक आहे कारण मेहरुण भागातील लोकसंख्या जी वाढत चालली आहे तर ते बघा अत्यंत जास्त संख्येचे परिसर आहे. त्याच्यामुळे अश्या पध्दतीने कुठलेतरी आरक्षण आपण सोडले तरी आपल्या वरती आरोप होतील. त्यापेक्षा आवश्यक असलेले आरक्षण आहे. आणि आवश्यक असलेल्या आरक्षण असल्या कारणाने.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** साहेब तुम्ही जे सेक्टर सांगितल्याना त्या ठिकाणी महानगरपालिकेच्या जितक्या जागा प्रस्तावीत केलेल्या आहे सगळेच प्रस्ताव घ्या. मंजुर करुन घ्या. आपले ५०० आरक्षण असतील सगळे घ्या पटलावर. सगळे मंजुर करा. माझे हेच म्हणणे आहे आवश्यकता आहे तर व्हायलाच पाहिजे. पण जळगांव शहरामध्ये आपले मॅटर्निटी होम किती. त्यांची आज काय परिस्थिती आहे.

**श्री.महेश चौधरी :-** जे आहे ते बंद आहे एकही दवाखाना चालु नाही.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** आवश्यक कामे आपण केलेच पाहिजे.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** मॅडम, मुलतानी हॉस्पीटल आहे आपला, तेथे ऐवढी मोठी जागा पडलेली आहे, तेथे आम्हाला तुम्ही सुविधा उपलब्ध करुन देत नाही. ऐवढा ३०-३० हजार लोकांचा वार्ड आहे. आहे त्याला करायला तयार नाही. लाखो करोडो रुपये वाया घालायचे फक्त.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** विना उपयोग महानगरपालिका पैसे खर्च करणार असेल, तर या ठरावाला मान्य करावे अन्यथा या जागेचा उपयोग काहीच्या काही झाला आणि याच्या आधीची जी आपली डिस्पेनसरी आहे किंवा मॅटर्निटी होम आहेत. त्याच्या सारखी दयनिय परिस्थिती या जागेची होत असेल. तर याची सर्व जबाबदारी ठराव आणारे प्रशासनावर राहिल.

**ॲड.शुचिता हाडा :-** महापौरताई, याची उपयुक्तता प्रशासनाने तपासुन बघावे. गरज आहे का हे सभेसमोर आणाव. मग भुसंपादनाबद्दल ठरवु.मला थोडेसे वेगळे याच्या बद्दल बोलायचे आहे. मुळात यासाठी जागा आपण भुसंपादीत डी.पी.आर.नुसार केली असणार.किंवा आरक्षण केलेले असणार, आता ही जी जागा आहे. ही डिस्पेनसरी आणि मॅटर्निटी होमसाठीची आहे. ही मला वाटते सुप्रीम कॉलनीच्या जवळची आहे. आता आपण नुकतेच महापौर महोदया आपण नुकतेच आपले एन.यु.एल.एमच्या अंडरचे मोहल्ला क्लिनिकच्या मिटींग

घेतल्या होत्या. मोहल्ला क्लिनिकसाठी आपल्याला जागा मिळत नव्हत्या. अनेक ठिकाणी प्रायव्हेट जागा भाड्याने घेतलेल्या आहे. जेव्हा आपली ही डिस्पेनसरीची जागा आरक्षीत आहे. आणि त्याच्याकडे आपले दुर्लक्ष होत आहे. आता मला मुद्दा हा लक्षात आणुन द्यायचा आहे. प्रशासन कश्या पध्दतीने काम करत आहे नितीनभाऊ. आपल्याला सगळयांना ज्ञात आहे. सर्व सभागृहाला आता तोंडीपाट झालेले आहे की, आरक्षण पडल्यानंतर खरेदी सुचना जमिन मालकाला दिल्यानंतर २ वर्षाच्या आत जर आपण ते भुसंपादीत केले नाही. ते व्यपगत होते. खरेदी सुचना दिलेली आहे जमिन मालकाने दि.१७/०८/२०२१ ला. म्हणजे ते २०२३ ला व्यपगत होणार आहे. आता जर आपण हालचाल केली नाही तर अत्यंत मौक्याच्या जागेवर असलेली ही जमिन आहे. ज्याच्या आरक्षणाचा उपयोग अत्यंत उपयुक्त आहे. मॅटर्निटी आणि डिस्पेनसरी याच्यासाठी आहे आणि जो गरीब लोकांची, ज्याला लोवर इनकम गट आपण म्हणतो असे लोकंची ती वस्ती आहे असे लोकांचा तो भाग आहे. मला वाटते तेथे सुध्दा आपण, आता हे हेल्थपोस्ट जे केले होते. त्याच्यासाठी कोणता तरी महानगरपालिकेचा हॉल आपण निवडलेला आहे. सुप्रीम कॉलनीसाठी. म्हणजे जर असे आरक्षण आपले आहे. पण प्रशासन योग्यवेळी प्रस्तावच देत नाही आपल्याकडे. म्हणजे प्रशासन आपल्या खांद्यावर बंदुक ठेवुन मदत करतो का जमिन मालकांना, व्यपगत होऊन जायला पाहिजे आजच्या यास्थितीत. अशी काही तरी ही प्रक्रिया सुरुआहे येथे. स्लो पॉईझनींग सारखे हे चालु आहे. मोहल्ला क्लिनीकसाठी आपल्याला या जागेची गरज आहेच. भविष्यातली तेथील लोकसंख्या गणताही वाढतच राहणार आहे. आणि नेटवर जे सगळे दिसत आहे. शासकीय रेटने ते विकलेले असता, त्यापेक्षा आपला बाजार भाव जास्तच असतो. १.५ कोटी मध्ये जर आपल्याला ही ४०४८ चौ.मी. जागा मिळत आहे तर मला वाटते आहे ती खुप महाग पडत नाही. आणि आवश्यक असलेल्या कामासाठी आहे. तर इमिजिएट आपण भुसंपादनाचा प्रस्ताव पाठवावा. प्रशासनाने याची नोंद घ्यावी की, ज्या लेव्हलवर हे भुसंपादनाचे प्रकरणे हाताळले जात आहे. सभेत काही पॅज घेऊन पाठवायचे किंवा काही वेळेला घाई घाईने पाठवायचे.तर या पध्दती बंद करावे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** आपण एकच पॉलिसी ठरवलेली आहे. महापालिकेची आर्थिक परिस्थिती बघता आपण आतापर्यंत कोणालाही आपण भुसंपादनाचे पैसे द्यावयाचे नाही. ही आपली सभागृहाची भुमिका राहिलेली आहे. कारण आपली परिस्थिती नाही. आज नाही तर उद्या परिस्थिती हळुहळु होणार आहे. तेव्हा तेव्हा आपण हेच म्हटलेले आहे, जेव्हा जेव्हा प्रशासनाचा प्रस्ताव आलेला आहे की, त्याला टी.डी.आर.देण्यात यावा. त्यांनी जरी नाकारले असेल तर ठराव असाच केला पाहिजे की, त्याला टी.डी.आर.देण्यात यावे. मग तो जाईन कोर्टात.कोर्टातुन घेईल तो. कशाला आपली परिस्थिती नाही. याचे मागचे जर ठराव तुम्ही काढले, जी मागची पॉलिसी ठरलेली आहे सभागृहाची सर्वांना विचारुन घ्या.

**श्री.नितीन लढ्ढा :-** पॉलिसी ठरलेली आहे परंतु ती एक्सजरसाईज केल्यानंतर म्हणजे बघा या जागा मालकाने केव्हा दिलेला आहे, दि.१७/०८/२०२१ ला. म्हणजे आजच्या जवळपास दोन वर्षापुर्वी. या कार्यालयाने दि.०९/०२/२०२१ टी.डी.आर. घेण्याच्या संदर्भातला पत्र व्यवहार केलेला आहे. जी आपली पॉलिसी आहे की, तुम्ही टी.डी.आर.च्या मोबदल्यात जमिन द्या. परंतु तो ऑप्शनल आहे. तो बंधनकारक नाही जमिन मालकावर की, त्यानी टी.डी.आर.च्या मोबदल्यामध्ये जमिन महापालिकेला द्यायची. असे बंधनकारक नाही. तो ऑप्शनल आहे. ईच्छिक आहे. त्याला वाटले की, टी.डी.आर.च्या मोबदल्यात जमिन द्यायची. तो देऊ शकतो. त्याची ईच्छा नसेल तर तो मोबदला तुमच्याकडुन मागणी करु शकतो. त्या मदतीने अर्जदाराने या संदर्भात दि.१८/१०/२०२१ ला खुलासा केलेला आहे. मला टी.डी.आर.ची आवश्यक नाही.मला भुसंपादनाचा मोबदलाच पाहिजे. त्यानंतर आपण महासभा ठराव क्र. ८९३ दि.०७/१०/२०२२ ला हा निर्णय घेतला की, याला पुन्हा टी.डी.आर.च्या संदर्भातच विचारणा करावी. पुन्हा विचारणा केल्यानंतरही जमिन मालक त्याच्या त्याच भुमिकेवरती ठाम आहे की, मला टी.डी.आर.च्या मोबदल्यात जमिन द्यायची नाही. आता हा सगळा खटाटोप करत असतांना १२७ च्या नोटीसीला कायदेशीर रित्या २ महिन्यानंतर किंवा ३ महिन्यानंतर आठव्या महिन्यामध्ये त्याची मुदत संपुष्टात येईल. आणि एकदा त्याची मुदत संपुष्टात आली. ते आरक्षण आपोआप व्यपगत होईल. म्हणजे काय होईल

की, त्या आरक्षणाची जमिन इनडायरेक्टली आपण सोडविण्याचे संदर्भात ही भुमिका घेऊन मदत करतो आहे. म्हणजे एका प्रकारे हे आरक्षण मुक्त करण्याचा वेगळा डाव आहे. असे त्याचे अर्थ आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** भाऊ माझ्या भावना त्या नाही. आता तुम्ही बोलले की, हा प्रस्ताव तिसऱ्यांदा महासभेपुढे येत आहे. लक्षात घ्या. मी एकुण पॉलिसीचा विचार करुन सांगतो आहे. मला बाकी कोणाशी काही विषय नाही. दोनदा, एकतर जेव्हा सुरुवातीला जेव्हा प्रस्ताव आपल्याकडे येतो. १२७ ची नोटीस आल्यानंतर त्याच्यानंतर जेव्हा भुसंपादनाचा प्रस्ताव येतो. मग परत तिसऱ्यांदा महासभेसमोर प्रस्ताव येण्याच कारण काय

**श्री.नितीन लढ्ढा :-** त्यानी पत्र दिले आहे तसे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** त्यानी निर्णय घ्यायचा आहे तो, प्रशासनाने पैसे द्यायचे किंवा काय

**श्री.नितीन लढ्ढा :-** जो पर्यंत बॉडी ठरविणार नाही तो पर्यंत प्रशासन कसे निर्णय घेईल.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** मग तिसऱ्यांदा प्रस्ताव कसा आला. याच्यापुर्वीचे आलेले नाही, मग अजुन येतील का ? मग अजुन येतील का प्रस्ताव यापुर्वी जसे केलेले आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** जो पर्यंत त्याच्या १२७ च्या नोटीसीला कायदेशीर २ वर्ष होत नाही तोपर्यंत तुमच्या समोर प्रशासन हा विषय आणेल. याच्या बाबतीत तुम्हाला निर्णय दोनच घ्यायचे आहे. प्रस्ताव मान्य करायचा आहे की, अमान्य करायचा आहे. तुम्ही ठरवुन घ्या सदरहु आरक्षणची महानगरपालिकेला आवश्यक नसल्याकारणाने हा प्रस्ताव जो आहे तो नामंजुर करण्यात येत आहे. म्हणजे काय होईल, प्रशासन त्याच्यातुन मुक्त होईल. म्हणजे हे आरक्षण महानगरपालिकेला विकसित करण्याची गरज नाही. असे बॉडीचे धोरण आहे किंवा विकसित करण्याची गरज आहे.त्याचा भुसंपादनाचा मोबदला अदा करण्यात यावा. असा यस किंवा नो. दोनच धोरण ठरविले जातील.आपण काय करतो आहे या निर्णयाला, अधांतरीत करतो, आणि वारंवार बॉल तो प्रशासनाच्या कोर्टात टाकतो, प्रशासन निर्णयासाठी बॉल आपल्या कोर्टात टाकतो, आपण त्याला पुन्हा काही तरी निर्णय देऊन पुन्हा त्याला त्यांच्या येच्यात टाकतो. आणि अश्या मध्ये त्याचा १२७ च्या नोटीसीचा २ वर्षाचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर जमिन मालक हायकोर्टात जातो आणि तो सांगतो की, सदरहु महानगरपालिका माझ्या जमिनीचा १२७ च्या नोटीसीचा कुठलाच आदर करत नसुन मला जमिनीचा मोबदला सुध्दा देत नाही. आणि मग तो आरक्षण व्यपगत ठरतो. आणि इनडायरेक्टली त्या जमिन मालकाला फायदा पोहचवण्याच्या दृष्टीकोणातुन सुध्दा पाहिले जाऊ शकते.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** मागच्या ४ वर्षापुर्वी मी एक विषय मांडले होते की, आपले जितके आरक्षण आहे. एकुण आपले जितके आरक्षण आहेत.त्या सर्वांचा एक आढावा घेण्यात यावा. जर ५०० आरक्षण असतील, त्यापैकी किती, नाही मग बजेट शासनाकडुन मागवु ना आपण, इतके जर गरजेचे आहे तर शासनाकडुन मागवु. करवंदे साहेब मला एक गोष्ट सांगा भाऊंनी जी माहिती दिली. १२७ ची, त्या प्रकरणातील किती आरक्षण आपल्याकडे आहे. किती प्रकरणे पेन्डींग आहे तसे. ते का आले नाही महासभेसमोर मंजुरीला,

**श्री.अशोक करवंदे, नगररचनाकार :-** ( आवाज स्पष्ट ऐकु येत नसल्यामुळे समजुन येत नाही. )

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** नाही मला ते नका सांगा, मला सांगा १२७ च्या नोटीसी खाली आलेल्या किंवा भाऊ सांगत आले त्या क्रायटेरीयेत बसलेल्या किती प्रकरण आहे.

**श्री.अशोक करवंदे, नगररचनाकार :-** बघा टी.पी. मंजुर झाल्यानंतर १० वर्षानंतर.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** १० वर्ष झाल्यानंतर बघा हायकोर्टाचा निर्णय आहे. १० वर्ष झाल्यानंतर तो आरक्षण ऑटोमेटीक व्यपगत होतो,मला त्याची कल्पना आहे पण मला सांगा, असे किती प्रकरणे आहेत.किती प्रकरणे प्रलंबित आहेत.

**श्री.अशोक करवंदे, नगररचनाकार :-** ( आवाज स्पष्ट ऐकु येत नसल्यामुळे समजुन येत नाही. )

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** मी काय म्हणतो आता आपल्याकडे १२७ च्या नोटीसी दिले गेलेले किती प्रकरणे आहे.

**श्री.अशोक करवंदे, नगररचनाकार :-** ( आवाज स्पष्ट ऐकु येत नसल्यामुळे समजुन येत नाही. )

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** म्हणजे हे शेवटच प्रकरण आहे आपल्याकडे. माझी मागणी आहे, मला पुढच्या महासभेमध्ये तुमच्याकडुन पुर्ण माहिती पाहिजे की, महानगरपालिकेचे एकुण आरक्षण किती आहे. एकुण आरक्षणापैकी आपल्याला किती उपयोगाचे आहे. त्यापैकी आपले हायकोर्टात किती केस चालु आहे. त्याची परिस्थिती कशी आहे, आपल्याला किती पैसे देणे गरजेचे आहे. आणि यातुन जमिन सोडविण्याचे चालु आहे की, पैसे घेणे चालु आहे त्याच सुध्दा खुलासा महासभेसमोर येईल.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ज्या पध्दतीने पोकळे साहेब म्हणत आहे ना, त्यापध्दतीने एक घोषवारा महासभेसमोर यायला पाहिजे.

**श्री.अशोक करवंदे, नगररचनाकार :-** ( आवाज स्पष्ट ऐकु येत नसल्यामुळे समजुन येत नाही. )

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** मी पुढच्या महासभेपर्यंत मागत आहे. मी थोडी उद्या मागत आहे.

**मा.आयुक्त :-** एक ओझरती माहिती तुम्ही म्हणत आहात ना तसे यादी २०१८ ला जी.बी.समोर आली होती. तेव्हाचा त्याचा खर्च ४०० कोटी होता.

**मा.उपमहापौर :-** ३३३ कोटी.

**मा.आयुक्त :-** हा. म्हणजे फक्त ६०-७० प्रस्ताव ते पण परिपुर्ण नाही की, ज्यांनी आपल्याला नोटीस दिल्या, विविध स्टेटस सुप्रीम कोर्ट, हायकोर्ट, अश्या, सरांनी सुरुवात बरोबर केलेली होती.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मला एक माहिती द्या येथे, ज्या जमिनी द्यायला पाहिजे. आणि तश्या एक्सजरसाईज आपण प्रत्येक सभेला केलेल्या आहे. ज्या पध्दतीने टी.डी.आर.च्या मोबदल्यात जमिन आपल्याला मिळालेली नाही. किंवा जमिन मालकाला आपण भुसंपादनाचा मोबदला दिलेला नाही. असे किती प्रकरण उच्च न्यायालयामध्ये गेलेले आहे. आणि उच्च न्यायालयाने त्यांचे आरक्षण व्यपगत केलेली आहे. त्याची माहिती कमीतकमी तुम्ही पुढच्या महासभेत द्या की, आपण या धोरणावरती अडुन राहिलो आणि ज्या धोरणावरती अडुन राहिलो, त्याच्यामुळे आपली आरक्षणे, काही महत्वाची आरक्षणे सुध्दा व्यपगत झालेली आहे. आणि ती आता तरी हे आरोप राहील,अश्या पध्दतीने ते आरक्षणे सोडविण्याच्या संदर्भात आपण इनडायरेक्टवे मध्ये मदत केलेली आहे त्यांना. तर याची माहिती पुढच्या महासभेत द्या.

**मा.उपमहापौर :-** अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.३ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. १००९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहराच्या मंजुर विकास योजनेतील (वाढीव हद्द) मौजे मेहरुण स.नं.१६४/२ या जमिनीतील आरक्षण क्र.१५१,डिस्पेन्सरी व मॅटर्निटी होम करीता आरक्षित जमिनीच्या क्षेत्राचे संपादनासंबंधी म.प्रा. व न.र अधिनियमाचे कलम १२७ नुसार खरेदी सुचना जमिन मालक श्री.रमेश खुशाल कोल्हे तर्फे ॲड श्री.एम.आर.कुलकर्णी यांनी नियोजन प्राधीकरणास दिलेली आहे. त्या अनुषंगाने विकास योजना आरक्षणाने बाधीत होणाऱ्या जमिनीचे संपादना बाबतची कार्यवाही करणे कामी अहवाल सादर करण्यात आलेला होता. त्याअनुषंगाने महासभा ठराव क्र.८९३ दि.०७/१०/२०२२ हा ठराव पारित करण्यात आलेला आहे. "जळगांव शहराच्या मंजुर विकास योजना (वाढीव हद्द) मौजे मेहरुण स.नं.१६४/२ या जमिनीतुन दर्शविलेले आरक्षण क्र.१५१,डीस्पेन्सरी ॲन्ड मॅटर्निटी होम ने बाधीत जमिनीचे भुसंपादनाची महानगरपालिकेस आवश्यकता आहे किंवा नाही हे सभागृहात झालेल्या चर्चेनुसार प्रशासनाने तपासुन पुढील महासभेत सविस्तर परिपुर्ण प्रस्ताव सादर करावा तोपर्यंत सदरचा प्रस्ताव तहकुब ठेवण्यात येत आहे."

वरीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आलेला असुन महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये दिलेल्या दि.१७/०८/२०२१ रोजीच्या नोटीसच्या अनुषंगाने भुसंपादनाची कार्यवाही करणे क्रमप्राप्त आहे.

१) अर्जदार यांना अर्जाच्या अनुषंगाने टी.डी.आर बाबतचे पत्र जा.क्र./नर/६२९ दि.०९/०९/२०२१ अन्वये अर्जदार यांना त्यांच्या मालकीच्या जमिनीतुन आरक्षणाने बाधीत क्षेत्राच्या मोबदल्यात टी.डी.आर बाबत विचारणा

केली असता त्यांनी दि.१८/१०/२०२१ रोजीच्या पत्रान्वये टी.डी.आर घेण्यास नकार दिलेला आहे. त्यामुळे सदर आरक्षणाने बाधीत जमिनीचे भुसंपादन करणे आवश्यक झालेले आहे.

२) अर्जदार यांचे मालकीचे मौजे मेहरुण स.नं.१६४/२ या आरक्षणाखालील जमिनीचे एकुण क्षेत्र ४०४८.०० चौ.मी असुन आरक्षणाने बाधीत जमिनीचे भुसंपादन प्रस्ताव जिल्हाधिकारी जळगांव यांचेकडे सादर करुन भूसंपादन प्रक्रिया ०२ वर्षाच्या आत पुर्ण करणे आवश्यक आहे. या कामी विषयांकीत जमिनीचे सन २०२२-२३ च्या शिघ्रसिध्दगणका मधील दरा नुसार रु.१८८०/- प्रति चौ.मी इतके आहे त्या अनुषंगाने भुसंपादन कामी अपेक्षीत खर्च खालील प्रमाणे होईल.

| प्रयोजन | शिवार | स. नं. | भुसंपादन क्षेत्र | शि.सि.गणक दर/ चौ.मी | अंदाजीत खर्च |
|---|---|---|---|---|---|
| आरक्षण क्र.१५१, डीस्पेन्सरी ॲन्ड मॅटर्निटी होम | मेहरुण | १६४/२ | ४०४८.०० चौ.मी | रु.१८८०/- (२०२२-२३) | रु.७६,१०,२४०/- + रु.७६,१०,२४०/- रु.१,५२,२०,४८०/- |

वरील प्रमाणे रु.१,५२,२०,४८०/- खर्च अपेक्षीत असुन, संयुक्त मोजणी साठी येणारा खर्च, व प्रस्तावाअंतर्गत वेळोवेळी येणाऱ्या खर्चास व प्रस्ताव जिल्हाधिकारी तथा भुसंपादन अधिकारी यांचेकडेस पाठविणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

तसेच सभागृहात झालेल्या चर्चेनूसार जमीनीच्या मोबदल्यात टि.डी.आर.देणेबाबत चे विरोधात किती प्रकरणे मा. उच्च न्यायालयात गेली आहेत त्यांची माहिती पूढील महासभेत प्रशासनाने सादर करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ५५**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्र. ०४ :-** मौजे मेहरुण शिवार स.नं.२७१ मधील खुली जागा (ओपन स्पेस) घुगे पाटील फाऊंडेशन,जळगांव या संस्थेला मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा, या संदर्भात प्रस्ताव मान्य करण्यात यावा. प्रस्ताव मान्य करुन फक्त प्रशासनाने प्रस्तावाची अंमलबजावणी करण्यापुर्वी संबंधीत ले-आऊट मधील जे नागरीक असतील. त्या नगारीकांची एक स्वतंत्र सुनावणी घेऊन खात्री करुन घ्यायची. तसा प्रस्ताव बघितला तर उपयुक्त आहे. एक अभ्यासिका बनविण्याच्या दृष्टीकोणातुन एक चांगला उद्देश आहे. आपण बघतो की, ओपन-स्पेसेसचे दुरुपयोग होतात, परंतु हा एक समाजासाठी उपयोगी असलेला कार्यक्रम असल्याकारणाने याला मान्य करण्यात यावा. परंतु नागरीकांच्या सुनावणी घेऊन हा विषय मंजुर करुन घेण्यात यावा.

**श्रीमती रेखा पाटील :**- महापौरताई, तिथल्या नागरीकांना त्रास होत आहे. त्यांनी लेखी दिलेले आहे तुमच्याकडे, युवा संघाच्या यांनी ही पत्र दिलेल आहे. त्याला माझे विरोध आहे.

**श्री.जितेंद्र मराठे :-** या संदर्भात जसे ताईंनी सांगितले की, नागरीकांचा विरोध आहे. नितीनभाऊंनी प्रशासनाला सांगितले, हा विषय मंजुर करावा, जो तिथले नागरीक असतील त्यांची सुनावणी घेऊन जी अडचण असेल त्याच्यासाठी बंधनकारक राहुन निर्णय प्रशासनाने घ्यायचा आहे. या विषयाला माझे अनुमोदन आहे.

**ॲड.शुचिता हाडा :-** प्रशासनाचा हा प्रस्ताव मान्य करण्यात यावा. मुळात हा प्रशासनाने आणलेला विषय आहे. नितीनभाऊंनी जसे आज लक्षात आणुन दिले की, आज आपण ठरावाला मंजुरी देतो आहे. त्यानंतर प्रशासन त्या संदर्भातल्या योग्य त्या सुनावण्या घेईल.आणि त्यानंतरच त्या विषयाचे इमप्लीमेंटेशन होणार आहे. अर्थातच ही प्रशासकीय पध्दत योग्य असते आणि ती फॉलो व्हायला हवी असते.जेव्हा जेव्हा आपण अश्या ओपन स्पेसेस देतो. या बद्दल बोलायचे राहिले तर मी नक्की अशी आठवण करुन देईल. आपले सन्मा.नेते जळगांव शहराचे आदरणीय सुरेशदादा जैन यांनी त्यांच्या कार्यकाळामध्ये अनेक सेवाभावी संस्थांना, अनेक सामाजिक

संस्थांना, जळगांव महानगरपालिकेच्या अनेक मोठमोठया जागा या त्या त्या संस्थेच्या मागणीनुसार दिलेल्या होत्या. त्यापैकी काही सेवाभावी संस्था खरोखर त्या जागेचा सद्‌उपयोग करत आहे. आणि आपल्याला डिटेल्स मध्ये जाण्याची गरज नाही पण हे सर्व जळगांव शहराला ज्ञात आहे. काही समाज मंदिर म्हणुन देण्यात आलेल्या जागांचा वैयक्तीक वापर सुध्दा होत आहे. आपल्याला त्याकडे जायचे नाही. मुळात विषय काय आहे एक सेवाभावी संस्था एक अश्या भागामध्ये अभ्यासीका उभारत आहे की, जेथे लोवर इनकम असलेला गृप असतो, म्हणजे ज्या भागामध्ये लोकांमध्ये मुळात शिक्षणाचा अभाव आहे, शिक्षणाच्या संधीचा अभाव आहे. शिक्षणासाठी लागणारे साधनांचा अभाव आहे. जर अश्या वेळेला ती संस्था तेथे अभ्यासीका उभारणार असेल, आणि त्या भागातील मुलांचा वेसनाकडे जाण्याचा अभाव कमी होऊन शिक्षणाकडे जाणार असेल तर आपल्याला नक्कीच अश्या संस्थेला द्यायला हरकत नाही. ज्यांचे कोणाचे याला विरोध असणार आहे त्यांचे व्यक्तीगत हेवेदावे स्वार्थ आहे. व्यक्तीगत काही अतिक्रमण आहे. प्रशासनाने ह्या सर्व गोष्टी पडताळुन घ्याव आणि प्रशासनाने इमप्लीमेंटेशन करतांना त्याचा आधार घ्यावा. हा ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात यावा.

**श्रीमती रेखा पाटील :-** माझा याला विरोध आहे, त्या ठिकाणच्या नागरीकांचा पण विरोध आहे तुमच्याकडे लेखी पण दिलेले आहे त्यांनी.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ताई, तसे बघितले गेले ना, तर आम्ही तुमच्या भुमिकेला समर्थनच करत आहोत. नागरीकांचा विरोध असेल तर ती सुचना प्रशासन आपल्याला देईल.

**श्रीमती रेखा पाटील :-** नागरीकांचा विरोध आहे त्याठिकाणी.

**श्री.नितीन लढ्ढा :-** काय झाले आहे आता, दोन निवेदन आलेले आहे, एक अभ्यासिकेच्या बाजुने आणि एक निवेदन आहे अभ्यासिकेच्या विरोधात. परंतु काय आहे दोघी ठिकाणी काही व्यक्तींनी सह्या केलेल्या आहे. म्हणजे विरोधाला ही सहमती दिलेली आहे आणि सकारात्मकतेला ही सहमती दिलेली आहे. म्हणुन आपण म्हणतो की, प्रशासनाने खात्रजमा करुन घ्यावे या विषयाची.

**श्रीमती रेखा पाटील :-** माझे वैयक्तीक विरोध नाही पण तेथील लोकांचा विरोध आहे.

**मा.महापौर :-** सन्मा.सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे याबद्दल कार्यवाही करावी आणि सन्मा.सदस्या रेखा चुडामण पाटील यांचा विरोध नोंदवुन बहुमताने विषय क्र.०४ मंजुर करण्यात यावा.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** त्यांचा ही विरोध नाही ते म्हटले आता की, लोकांचा विरोध आहे. त्यांचा वैयक्तीक विरोध नाही लोकांचा विरोध आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मग सर्वानुमते करा.

**मा.उपमहापौर :-** त्यांना विचारुन घ्या. ते पहिले असे म्हटले की, माझे वैयक्तीक विरोध आहे. प्रस्तावाला तुमचा विरोध आहे की, अनुमोदन आहे.

**श्रीमती रेखा पाटील :-** दिलेली आहे तुमच्याकडे, देऊ काय तुमच्याकडे ही प्रत,

**मा.महापौर :-** नागरीकांचा विरोध आहे,

**श्रीमती रेखा पाटील :-** नागरीकांचा विरोध आहे पण माझे ही विरोध नोंदवुन घ्या.

**मा.महापौर :-** विषय क्र.०४ बहुमताने मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. १०१० पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, घुगे पाटील फाऊंडेशन,जळगांव या संस्थेचा मा.महापौर यांचे मार्फत प्राप्त प्रस्ताव आवक क्र.२४ दि.११/११/२०२२ चे पत्रान्वये मौजे मेहरुण शिवार स.नं.२७१ या मंजुर अभिंन्यासातील खुला भुखंड (ओपन स्पेस) विकसीत करणेकामी घुगे पाटील फाउंडेशन,जळगांव यांना मिळणेबाबत विनंती अर्ज दिलेला आहे. सदर अर्जावर मा.महापौर यांनी डॉकेट सादर करणे बाबत आदेशीत केलेले आहे.

त्या अनुषंगाने अहवाल खालील प्रमाणे,

शासनाने डिसेंबर २०२० रोजी मंजुर केलेल्या एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (UDCPR) मध्ये ओपन स्पेसच्या बाबत दिलेल्या तरतुदी नुसार अभिंन्यासातील भुखंडधारक यांची सोसायटी/ असोसिएशन, यांनाच खुली जागा (ओपन स्पेस) वितरीत करणे बाबत नमुद आहे.

सदर अभिंन्यासात एकुण ७० भुखंड असुन यांचे सदर संस्थेस खुली जागा देण्यास दि.२५/११/२०२२ रोजीचे संमतीपत्र सादर केलेले आहे, याप्रमाणे सदर अभिंन्यासातील बहुताश: नागरिकांनी स्वाक्षरीसह संमती पत्र दिलेले आहे.

दरम्यानच्या काळात या कार्यालयास दि.२१/११/२०२२ व २२/११/२०२२ नुसार सदर जागेबाबत या रेखंकनातील काही रहिवाश्यांनी हा खुला भुखंड कोणत्याही संस्थेला देण्यात येऊ नये या बाबत मागणी अर्ज परीसरातील नागरीकांची स्वाक्षरी दिलेली आहे. यावरुन असे दिसुन येते की संबंधीत भुखंडधारक यांची सदर खुली जागा विकसीत करणे बाबत संदीग्धता दिसुन येते.

एकत्रिकृत विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुद क्र.३.४.७ नुसार अनुज्ञेय वापर नमुद आहे. घुगे पाटील फाउंडेशन या संस्थेमार्फत मौजे मेहरुण शिवार गट क्र.२७१ मधील खुली जागा विकसित करणेबाबत देण्यात यावा याबाबत विनंती अर्ज केलेला आहे. सदर अर्जामध्ये अभ्यासिका वर्ग, व इतर शैक्षणिक, सामाजिक, आरोग्य सेवा, क्रिडा, सांस्कृतिक, जनजागृती, लोकहितार्थ इत्यादी उपक्रम या प्रयोजनांकरिता मागणी केलेली असून एकत्रिकृत विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुद क्र.३.४.७ नुसार अनुज्ञेय वापर नमुद असल्याने मौजे मेहरुण शिवार स.नं.२७१ मधील खुली जागा (ओपन स्पेस) घुगे पाटील फाऊंडेशन,जळगांव या संस्थेला मनपा अटी-शर्तीच्या अधिन राहुन देणेकामी मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

सभागृहात झालेल्या चर्चेनूसार सदर जागे संदर्भात तेथील स्थानिक नागरीकांच्या तक्रारीवर ठरावाची अंमलबजावणी करणेपूर्वी प्रशासनाने संबंधीत लेआऊटधारकांची सुनावणी घ्यावी त्यानंतरच नियमानुसार पूढील कार्यवाही करावी.

**बहुमताने मंजुर**

**अनुकूल - ५४ प्रतिकुल - ०१**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- मराठे जितेंद्र भगवान**

**नगरसचिव :- विषय क्र. ०५ :-** शहरातील खोटे नगर बसस्टॉप जवळील चौफुलीस क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले चौक असे नामकरण करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** महापौरताई, विषय क्र.५ आणि ६ दोन्ही नाव देण्याच्या संदर्भातील विषय आहे. दोन्ही मंजुर करण्यात यावे.

**श्री.अनंत जोशी :-** माझे अनुमोदन आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** एक मिनीट.

**श्री.चंद्रशेखर पाटील :-** याच संदर्भात बोलत आहे मी, आपल्याकडे नागरीकांनी प्रस्ताव दिला होता,आपण शिफारस करुन हा प्रस्ताव शहर अभियंत्यांकडे हा प्रस्ताव दिला होता. आणि या मध्ये म्हटले आहे की, मा.महापौर यांनी सदर चौकाचे नामांकन झाले नसल्यास सदर चौकास क्रांती ज्योतीबाई फुले चौक असे नाम देणेस शिफारस केलेली आहे. याबाबत प्रशासनाने महासभेपुढे डॉकेट आणले आहे. परंतु प्रशासनाने कुठलीही खात्री न करता हा प्रस्ताव आणलेला आहे. २०२० मध्ये भारतीताई ज्या वेळेस महापौर होत्या. त्या वेळेस या चौकाला नाव दिले गेलेले आहे. त्यावेळेस प्रस्ताव ही आला होता, खोटेनगर बस स्टॉप जवळील चौकाला आदरणीय तिर्थरुप डॉ.श्री.नानासाहेब धर्माधिकारी असे नाव देणेस त्या परिसरातील नागरीकांचे १००० सह्यांचे निवेदन प्राप्त झालेले आहे. त्यानुसार आदरणीय तिर्थरुप डॉ.श्री.नानासाहेब धर्माधिकारी चे मार्फत अनेक सामाजिक उपक्रम राबविले जातात. व आदरणीय तिर्थरुप डॉ.श्री.नानासाहेब धर्माधिकारी यांचे विचाराने प्रेरीत झालेला नागरीकांचा एक मोठा वर्ग या ठिकाणी राहत असल्यामुळे खोटे नगर बस स्टॉप जवळील चौकाला आदरणीय तिर्थरुप डॉ.श्री.नानासाहेब धर्माधिकारी नाव देणेस प्रशासनामार्फत स्वखर्चाने चौक सुशोभिकरण

करणेस व देखभाल करणेस, मान्यता प्रदान करण्यात येत आहे. हा २०२० मध्ये ठराव झालेला आहे. याच्यामुळे आपण लोकप्रतिनिधी आज अडचणीत येतो.त्यांनी खात्री करायला पाहिजे होती. आपण म्हणतो, प्रशासनाने बघितले पाहिजे. मग ठराव होतो आणि अडचणीत येतो सभागृह. आपल्याला कोणाच्या भावना दुखवायचे नाही.पण खात्री केली गेली पाहिजे होती या गोष्टीची.

**श्री.नितीन लढ्ढा :-** समजा अनावधानाने ती बाब प्रशासनाने लक्षात आणुन दिली नसेल किंवा त्यांचे ही लक्षात राहिली नसेल. परंतु आपले धोरणच आहे की, एखाद्या चौकाला, एखाद्या वास्तुला किंवा एखाद्या रस्त्याला आपण पुर्वी नाव दिलेले असेल. मग शक्यतो आपण ते बदल करत नाही. तर त्या दृष्टीकोणातुन श्री.नानासाहेब धर्माधिकारी यांचे नाव दिलेले असेल, तर हा प्रस्ताव जो आहे रद्द करण्यात यावा.

**श्री.चंद्रशेखर पाटील :-** दुसऱ्या जागेचे निवेदन मागवुन.

**श्री.नितीन लढ्ढा :-** त्या रस्त्याला दुसरी जागा असेल किंवा दुसरा चौक असेल, त्या दुसऱ्या चौकाला सावित्रीबाई फुलेंचे नाव देण्याचे धोरण ठरविले पाहिजे.

**श्री.चंद्रशेखर पाटील :-** ताई एक विंनती अशी होती आपल्याला की, आपल्याकडे नागरीकांचे निवेदन जेव्हा येतो. ते असे महासभेसमोर येण्यापुर्वी आपण नागरीकांची बोलु शकतो की, असे नाही झाले पाहिजे.

**मा.महापौर :-** मला नागरीकांच जेव्हा निवेदन आल त्यावेळेला मी प्रशासनाला रितसर सांगितले की, या चौकाला पहिले कोणत नांव दिल गेलेल आहे का ? याची पहिले शाहनिशा करा. जर दिलेल असेल तर हा प्रस्ताव येऊ देऊ नका. दिलेला नसेल तरच हा प्रस्ताव महासभेपुढे येऊ द्या.

**श्री.चंद्रशेखर पाटील :-** मग प्रशासनाने काय केले.

**म.महापौर :-** मग ते त्यांचे काम आहे प्रशासनाचे की, आहे की नाही ते तपासावे म्हणुन.

**श्री.नितीन लढ्ढा :-** याच्या संदर्भात रेकॉर्ड असे मेनटेन नाही केलेले आहे. एखाद्या विषयाच्या संदर्भात किती चौक आहे, किती रस्ते आहे, आणि त्यांना कुठले कुठले नामकरण करण्यात आलेले आहे. ठराव झालेले आहे परंतु स्वतंत्र असे काही रेकॉर्ड मेनटेन नाही. त्याच्यामुळे ते पडताळुन पाहणे, कारण काही काही ठराव हे १०-१०, २०-२० वर्षापुर्वी झालेले आहे. तिथले कर्मचारी बदललेले आहे, तिथले अधिकारी बदललेले आहे. बॉडी बदललेली असते. स्मृतीतुन निघुन गेलेले असते,

**श्री.विशाल त्रिपाठी :-** नितीनभाऊ हा जो विषय आहे ना, मी दोन वर्षापासुन या विषयाचा पाठपुरावा करत आहे.मी महापौरताई असतांना ही बोललो हा विषय.एकदा आपले इंजिनिअर, डिपार्टमेंट हे आठ दिवसात यादी बनवु शकतात यांनी जर मनावर घेतले तर. त्यांचे त्यांचे एरिया कोणत्या चौकाला नांव आहे. कुठे काय आहे त्याची यादी बनवुन घ्या एक. जो रस्त्यांना नाव दिलेले आहे त्याची यादी बनवुन घ्या. आपले ठराव होतात, त्याच एक स्वतंत्र विभाग करुन किंवा त्याची फाईलींग करुन म्हणजे मी तुम्हाला आजही सांगतो, ही माहिती मी घेतली होती, यांच्याकडे माहिती नाही. मी सांगतो, ख्वाजामियॉ चौकाला आपले अर्थतज्ञ खासदार वाय.एस.महाजन, मी लहान होतो त्यांचे नाव दिलेले आहे. मला आठवतो हे, असे बरेच आहे. मग अश्या ठिकाणी काय होतो, बरेच डबल डबल नाव दिले जातात. त्याच्यातुन वाद उत्पन्न होतो आणि मग भावना पण दुखविल्या जातात. तर माझे म्हणणे आहे की, महापौरताई तुम्ही आदेश करा की, आठ दिवसात यादी बनवा म्हणुन हा विषय बऱ्याच वेळा होतो. तुम्ही आदेश करा किंवा लेखी काही तरी करा की, इतक्या दिवसात यादी तयार झाली पाहिजे. आणि ती यादी करुन पब्लिश करा. जेणेकरु कुठले चुकीचे असेल किंवा त्याच्यात ॲड करायचे असेल, आता ताईंचा पण मागे असाच विषय झाला. त्यांची आणि आमची नाराजी किती फार ओढवली गेली. त्यांना थोडी माहित असत, आज मी आहे उद्या बॉडीमध्ये दुसरे नगरसेवक येतील. त्यांना तर माहिती पाहिजे तर याची. तुम्ही सांगा किती दिवसात यादी अपडेट करुन सभागृहापुढे येईल. आणि अजुन एक म्हणणे आहे. जर सभागृहाला कोणी अधिकारी या ठिकाणी माहिती देत असेल. आणि महापौरांना किंवा बॉडीला वारंवार विनंती करावी लागत असेल, यांनी दिलेला शब्द जर पाळला नसेल, तर यांच्यावरती हक्कभंगाची किंवा शिस्तभंगाची कार्यवाहीची एक प्रथा ठेवा. कारण ते मनोजभाऊ ओरडतात, सदस्य ओरडतात. आणि हे

सांगुन देता सभागृहात आम्ही करतो बघतो, काहीच होत नाही त्याच्यामुळे हे बिनधास्त शांततेने काम चालु असतो. काही तरी धोरण आपण पण ठरविले पाहिजे. काही तरी निर्णय आपण पण घेतले पाहिजे. कुठपर्यंत आपण बोलत राहणार या सभागृहात. एक विषय घेऊन, नितीनभाऊंनी मागच्या महिन्यात खड्डयांचा विषय केला, जितुभाऊंनी केला.परत परत तेच विषय सभागृहात येतात. सभागृहाचा वेळ वाया जातो आणि विषयांतर होतो.तर तुम्ही हे विषयाचे सांगा काय करायचे.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** जसे आता विशालभाऊंनी सांगितले की,  तयार करण्यात आलेला नाही. ही गोष्ट खरी आहे परतु तुम्ही वारंवार सांगतात, डॉक्टर साहेबांनीही तो मुद्दा उपस्थित केला, त्याला नाव दिलेले आहे सन २०२० ला. आता आमच्याकडे ३१ मार्चची थोडी गडबड आहे. हे झाल्यानंतर १५-२० दिवसांमध्ये चौकांची आखलेली यादी आणि त्यांचे नांव, आणि नांव नसतील तर ते. माझी विनंती आहे सभागृहाला की, या पुढे कोणत्याही रस्त्याला किंवा चौकाला नांव देण्यात येत असेल, मागणी केलेल्या लोकांनी मंजुर केल्यानंतर तेथे काही तरी लावले पाहिजे. जसे आता यांनी नानासाहेब धर्माधिकारींचे नांवाचे सांगितले, त्या ठिकाणी जर काही लावलेलेच नसेल,

**श्री.जितेंद्र मराठे :-** लावलेले आहे ना.

**श्री.चंद्रशेखर पाटील :-** नांव लावलेले आहे, ठराव पण झालेला आहे.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** ठराव झालेला आहे पण जागेवर काही आहे का ?

**श्री.चंद्रशेखर पाटील :-** नाव लावलेले होते, हायवेचे काम चालु असल्यामुळे परत काढण्यात आल.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** तेथे जाऊन चौकशी केली जाते, इंजिनिअरने तेथे जाऊन विचारले जाते की, या चौकाला काय म्हणुन बोलविले जाते.

**श्री.चंद्रशेखर पाटील :-** साहेब कमान आहे तेथे.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** कमान तर त्याठिकाणी इन्ट्रीला बनलेली आहे. परंतु हा चौकाचा विषय आहे. भाऊंनी जसे विषय सांगितले,सुचना बजविल्या,यापुढे परवानगी देतांना त्याच्यात एक अट टाकली गेली पाहिजे की, ज्या संस्थेला किंवा नागरीकांना तुम्ही परवानगी देतात. त्या ठिकाणी नागरीकांनी त्या नावाचा उल्लेख त्या ठिकाणी केला पाहिजे.

**श्री.चंद्रशेखर पाटील :-** केलेले होते तेथे पण हायवेचे काम सुरु झाले म्हणुन काढण्यात आले.

**श्री.मनोज चौधरी :-** सन्मा.सदस्य काय म्हणत आहे आम्हाला महात्मा फुले नाव द्यायला अडचण नाही. पण त्यांना ठराव केलेला आहे ना आपण पहिले, त्यांना आम्ही काय उत्तर द्यायचे.लोकं आमच्याकडे येतील. ही जबाबदारी कोणाची.

**श्री.चंद्रशेखर पाटील :-** ९८७ आहे दि.१२/०८/२०२०

**मा.उपमहापौर :-** ठराव मंजुर करत असतांना कुठल्या प्रकारे ठराव केलेला आहे.

**श्री.चंद्रशेखर पाटील :-** त्याच्यात पण असेच म्हटले आहे. प्रशासनाने सदर चौकास कोणाचे नाव दिलेले नसल्यास खात्री करुन घ्यावी व सदर प्रकरणी शासन निर्णय आदेश प्रमाणे ठरावाची पुर्तता करुन घ्यावी.

**मा.उपमहापौर  :-** कॉपी पेस्ट.

**श्री.चंद्रशेखर पाटील :-** हो, हे तर तेच झाले,

**नगरसचिव :-** रद्द करायचा,

**श्री.चंद्रशेखर पाटील :-** रद्द करण्या ऐवजी त्यांच्याकडुन परत निवेदन मागवा, डॉकेट जर पुन्हा येईल तर आम्ही संबंधीत लोकांशी बोलु शकतो.

**नगरसचिव :-** अनुमोदन कोण देईल, हा जर रद्द करायचा आहे प्रस्ताव.

**श्री.विजय पाटील :-** अनुमोदन काय, लताताई भोईटे आहे ना अनुमोदन.

**श्री.मनोज चौधरी :-** याचा रोल तुम्हाला लक्षात आला का साहेब, प्रशासनने निर्णय घ्यायचा याच्यावर.

**श्री.चंद्रशेखर पाटील :-** प्रशासनाने निर्णय घ्यायचा याच्यावर.

**श्री.मनोज चौधरी :-** नाही नाही भाऊ, तुम्ही जर रद्द केले ना तर आम्ही कसे काय देणार अनुमोदन. प्रशासनामार्फत तुम्हीच माहिती घ्या.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** प्रशासनाने दिलेला प्रस्ताव मागे घेण्यात यावा.

**श्री.मनोज चौधरी :-** हे काय आहे. तुम्ही तुमची बाजु झटकून देता आणि आमच्यावर टाकुन देता तुम्ही. पण नितीनभाऊ लोकांचा रोष कोणावर येणार आहे. नगरसेवकांवर येईल ना.

**श्री.चंद्रशेखर पाटील :-** चुकीचे प्रस्ताव जर करत असले ना तर कार्यवाही झालीच पाहिजे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** तसे जर बघितले तर प्रस्तावामध्ये डॉक्टर साहेब प्रस्तावामध्येच ती पार्श्वभुमी आहे की, जळगांव शहरामध्ये खोटेनगर बस स्टॉप चौफुलीस क्रांती ज्योतीबाई फुले असे नामकरण करणेबाबत स्थानिक नागरीक यांचा दि.२६/१२/२०२२ रोजीचा प्रस्ताव प्राप्त असुन मा.महापौर यांनी यापुर्वी सदर चौकाचे नामकरण झाले नसल्यास सदर चौकास क्रांती ज्योतीबाई फुले चौक असे नामकरण करणेस शिफारस केलेली आहे. झालेले आहे असे लक्षात आले आपण विड्राल करत आहे प्रस्ताव. बंटी जोशीचे अनुमोदन घेऊन घ्या आणि मला सुचक घेऊन घ्या.

**मा.महापौर :-** विषय क्र.०५ सर्वानुमते नामंजुर करण्यात येत आहे.

**मा.उपमहापौर :-** असे घेऊन घ्या त्याच्यामध्ये की, यापुर्वी असे असे नामकरण झालेले आहे म्हणुन हा प्रस्ताव नामंजुर करण्यात यावा.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. १०११ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, यापूर्वी महासभा ठराव क्रं.२८७ दि.१२/०८/२०२० अन्वये खोटेनगर बस स्टॉप समोरील चौकाला “आदरणीय तीर्थरुप डॉ.श्री.नानासाहेब धर्माधिकारी” असे नांव देणेबाबत ठराव पारीत झालेला असल्याने सभागृहात झालेल्या चर्चेनूसार प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावाचा विचार करता येणार नाही.

**सर्वानुमते नामंजुर**

**अनुकूल - ५५**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- जोशी अनंत हरिश्चंद्र**

**नगरसचिव :- विषय क्र. ०६ :-** श्री.अशोक सिताराम महाले यांचा आव्हाणे शिवार गट नं.८४९, ८५०, ८५१, ८५२, ८५३ व ८५४ या भागाचे श्री. समर्थ नगर असे नामकरण करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मंजुर करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.०६ हे मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. १०१२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, सन्मा.महापौर यांचेकडेस श्री.अशोक सिताराम महाले यांचा अर्ज प्राप्त झाला असुन सदर अर्जात त्यांनी सर्वे नं. / गट नं.८५० प्लॉट नं. ७ व ८ येथे भव्य बैठक हॉलचे बांधकाम केलेले असुन तेथे विविध धार्मिक तसेच सांस्कृतीक व समाजउपयोगी कार्यक्रम राबविण्यात येतात या बाबत नमुद असुन अर्जदार यांचे मागणीनूसार संपूर्ण परीसर आव्हाणे शिवार गट नं.८४९, ८५०, ८५१, ८५२, ८५३ व ८५४ या भागाचे नामकरण “ श्री. समर्थ नगर ” असे नामकरण करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ५५**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्र. ०७ :-** मनपा क्षेत्रातील वृक्ष गणना करणे कामी एजन्सी नियुक्ती कामी निविदा मागवण्यास व त्यासाठी येणारे खर्चास मंजुरी मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** काय आहे,आपले वृक्ष किती आहे या महापालिकेत, ती आकडेवारी आहे आणि आपला जो वृक्ष गणना आहे, आता जळगांव शहरातील.

**श्री.अश्विन सोनवणे :-** १० लाखापेक्षा जास्त तर कसे काय किती. १० लाखापेक्षा जास्त असे मोघम का सांगत आहात तुम्ही.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** जर मला माहित राहिले असते की, जळगांव शहरात किती झाडे आहे. तर एका झाडाला रु.१ प्रमाणे जरी खर्च काढला तर

**श्री.अश्विन सोनवणे :-** कसा काढला तो खर्च.

**श्री.नितीन लढ्ढा :-** कसा काढला तो.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** अंदाजीत आकडा आहे. नुसते आपल्याकडे उपराउपरी रेकॉर्डला जे आहे. आणि तेच च केलेले आहे जे झाडे आपल्याला माहित आहे.

**श्री.अश्विन सोनवणे :-** नुसते झाडे मोजग्ले, मोजले का नुसते रु.५० लक्ष खर्च.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** हे नुसते मोजले नाही जाणार. जिओ टॅपींगसह ती मोजणी करायची आहे. शासनाने धोरण ठरविले आहे. आणि प्रत्येक नगरपालिकेला हे काम करणे आवश्यक आहे. तुम्ही सांगणार तर मी तुम्हाला दाखवु शकतो, दर ५ वर्षाने ही गणना करायची आहे, जशी जनगणना येते तशी ही वृक्ष गणना आहे. कारण शासनाचे मोठमोठया ज्या योजना येतात. वृक्ष योजना येते, हरीत क्षेत्राची योजना येते. तुमची आता माझी वसुंधराची योजना चालु आहे. याच्यात त्यांना हे नेहमी अपेक्षीत असते की, तुमच्या शहराचे क्षेत्रफळ किती. त्याच्याप्रमाणे तुमचा ग्रिनझोन किती आहे. ही वृक्षांची दर ५ वर्षाने गणना झाल्यानंतर याच्यात तुमची कमतरता झाली की, वाढ झाली. हे सगळे समजणार आहे म्हणुन आपण ते प्रस्ताव शासनाच्या परिपत्रकानुसार आपल्यासमोर ठेवलेला आहे. आता याच्यात अंदाजी खर्च जास्त लागणार याच्यासाठी म्हणतो आहे की, कमीत कमी ऐवढया जरी खर्चाला मंजुरी मिळाली तर.आपल्याला निविदा मागवायची आहे. ऑनलाईन निविदा मागविणार आहोत. या निविदा मागविल्यानंतर आपल्याला समजेल की, कोण एका झाडासाठी किती रेट देत आहे. तर ज्याचे रेट कमी असेल त्याच्याकडुन आपण वृक्ष गणना करुन घेऊ. आणि हे सगळे जिओ टॅबने ऑनलाईन पध्दतीने होणार आहे. त्याच्यामुळे हे सर्व तुम्हाला केव्हाही पाहता येणार आहे. आणि भविष्यात हे जळगांव शहरासाठी चांगले आहे.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** सोनगिरे साहेब, आपल्या जळगांव शहरात एकुण जी वृक्ष असतील, यात धोक्यातले वृक्ष किती, याची माहिती घेतली आहे, सर्व्हे केला आहे.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** धोक्याच्या वृक्षांची गणना केलेली नाही.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** नाही, नाही, एक मिनीट, हे असा राहतो की, समजा आपण रु.१, रु.२, रु.५ ने झाडे देणार आहे. दर महिन्याला आपली मिटींग असते झाडे तोडण्याचे संदर्भात, नागरीकांचे अर्ज असतात.मग ते किती नुकसान झाले ते आपण करायला पाहिजे, सर्व्हे करुन घ्यावा लागेल की, धोकादायक झाडे किती, ते पहिले तोडुन टाकावे, म्हणजे तेवढा पैसा आपला वाचेल, आणि त्याच्यानंतर हा निर्णय आपण घ्यावा.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** भाऊ, दर वर्षी झाडांच्या बाबतीत असे असते की, काही झाडे वाढतात, काही झाडे कोमजतात, काही धोकेदायक होतात, काही वाढतात, काही कमी केले जातात. तर आपल्याला आकडेवारी त्याच्यावर आज तरी सांगता येणार नाही.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** मग जिओ टॅपींगने काय होईल.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** जिओ टॅपींगने काय होईल समजा तुमच्या वार्डात एखादा १०० नंबरचा जिओ टॅपींगचे झाड आहे, आणि तुमचा अर्ज आहे की, मला हे झाड तोडायचे आहे, जर ते जिओ टॅपींगला बघितले की, किती नंबरचे झाड आहे, तर ते झाड तेथुन काढण्यास आपण परवानगी दिली की, ते झाड काढायचे आहे. ऑटोमेटीक आपल्या संख्येतुन ते कमी होणार.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** ठिक आहे. इतके सांगा तुम्ही सभागृहाला की, आपल्या शहरात जे प्रमाण आहे सरासरी झाडे तोडण्याचा जे प्रमाण आहे ते लक्षात घेऊन धोरण ठरविण्यात यावे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** एक अजुन याच्यामध्ये असे आहे की, मागे आपण या झाडांचे सर्व्हे पण केलेले आहे. त्यांचे आपल्याकडे रेकॉर्ड पाहिजे, कारण माझ्या माहिती प्रमाणे शासनाने विचारले होते. झाडांचे आयुष्यमान म्हणुन काही तरी स्कीम होती.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** त्यामध्ये सगळया झाडांची गणना केली नाही. त्याच्यामध्ये त्यांनी असे म्हटले होते की, कमीत कमी १०-१५ झाडांची निवड करा, त्याला सुशोभिकरण करा वगैरे, अमृतच्या स्तरावर ते काम होते. आणि त्यावेळेला आपण एस.पी.ऑफिसचे काही झाडांची गणना केलेली होती.  आणि ५-७ झाडे काही संस्थेमार्फत ते मोफत मध्ये करुन घेतले होते.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** मी ते नाही म्हणत आहे, संख्या काढली आहे, ती यादी आहे का आपल्याकडे,

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** फक्त १८० झाडांची संख्या काढायला सांगितली होती, ते ही त्यावेळेला, त्यात ही फक्त ५-७ झाडांना ओटे बांधुन सुशोभिकरण केलेले होते.

**श्री.नितीन लढ्ढा :-** चला मान्य करण्यात यावा.

**श्री.सुनिल महाजन, विरोधीपक्ष नेते :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.०७ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. १०१३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ (दिनांक ०३ नोव्हेंबर २००६ पर्यंत सुधारलेला) मधील प्रकरण चार वृक्ष प्राधिकरणाची कर्तव्य ०७ (ख) नुसार डिसेंबर १९९६ पूर्वी एकदा आणि त्यानंतर प्रत्येक पाच वर्षातुन एकदा त्याच्या अधिकारीतेतील सर्व जमिनींवरील विदयमान झाडांची गणना करणेसाठी वृक्ष प्राधिकरणाची जबाबदारी आहे.

जळगांव शहर महानगरपालिका क्षेत्रातील सर्व प्रकारच्या वृक्षांची गणना करणे आवश्यक असुन शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग शानाच्या माझी वसुंधरा ०३ अंतर्गत अग्नी, जल,वायु, आकाश व भुमी अशी पंचतत्वे जोपासणे बाबत तसेच पर्यावरणाचे संतुलन राखणे कामी शासनामार्फत विविध उपक्रम राबवण्यात येतात व त्यात उत्कृष्ठ काम करणाऱ्या न.पा, म.न.पा. यांना गुण देवुन त्या अनुषंगाने कार्यवाहीसाठी निधीच्या रुपाने पारितोषिक देवुन गौरवण्यात येते. या सर्व बाबींच्या अनुषंगाने जळगांव शहर महानगरपालिका क्षेत्रातील सर्व वृक्षांची गणना करणे आवश्यक असुन त्यासाठी अनुभवी तज्ञ एजन्सीची नियुक्ती करणे देखिल आवश्यक आहे. अशा एजन्सी मार्फत काम करुन घेतल्यास आपल्या क्षेत्रातील सर्व वृक्षांची गणना, जिओ टॅगिंग सह वृक्षाच्या जाती-प्रजातीसह त्यांच्या वयासह व हिस्टॉरिकल वृक्षाच्या सविस्तर माहितीसह डाटा उपलब्ध होवुन पूढील धोरण ठरवणे शासनाच्या विविध योजनेत सहभागी होवुन लाभ घेणे मनपास शक्य होईल व शासन निर्णयाची अंमलबजावणी देखिल करता येईल. या सर्व बाबींचा विचार करता जळगांव शहर महानगरपालिका क्षेत्रातील सर्व वृक्षांची गणना करणे आवश्यक असुन त्यासाठी अनुभवी व तज्ञ एजन्सीची नेमणुक करणेकामी निविदा प्रसिध्द करुन एजन्सी मार्फत १५ ते १८ महिन्यांच्या कालावधीत सदर काम पूर्ण करणेकामी प्रती वृक्ष येणाऱ्या खर्चासाठी  दर मागविणे व त्यानंतर त्यास नियमानुसार मान्यता प्राप्तीनंतर कार्यादेश देवुन काम पूर्ण करुन घेणे आवश्यक असल्याने त्यासाठी जाहीर ई-निविदा मागविण्यास व त्यासाठी येणारे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ५५**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- महाजन सुनिल सुपडू**

**नगरसचिव :- विषय क्र. ०८ :-** भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजना सन २०२१-२२ या आर्थीक वर्षा अंतर्गत मा.लोकप्रतिनिधींनी मा.सुरेश दामु भोळे यांनी सुचविलेल्या ०१ ते १० कामांना मान्यता देणे व ना-हरकत दाखला देणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.सुनिल महाजन, विरोधीपक्ष नेते :-** मंजुर

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.०८ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. १०१४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, विभागिय अधिकारी सार्व.बांधकाम विभाग उपविभाग जळगांव यांचे कार्यालयाकडील पत्र क्रं.जा.क्र.साबांउविज/व.लि/११७/२०२३ दि.०६/०२/२०२३ अन्वये भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजने सन २०२१-२२ या आर्थीक वर्षा अंतर्गत मा.लोकप्रतिनिधी मा.सुरेश दामु भोळे (राजु मामा) यांनी सुचविलेल्या खालील नमूद ०१ ते १० कामांना मान्यता देणे व ना-हरकत दाखला देणे बाबत सुचित केलेले आहे. ते कामे खालील प्रमाणे

| अ.क्रं. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम (लक्ष) |
|---|---|---|
| १. | पंचशिल मागासवर्गीय हौ.सो. शिवकॉलनी जळगांव येथे बुध्दविहाराचे सुशोभिकरण करणे. | ३०.०० |
| २. | पंचशिल मागासवर्गीय हौ.सो. शिवकॉलनी जळगांव येथे संरक्षण भिंत कमान व बुध्दविहाराचे सुशोभिकरण करणे. | ३०.०० |
| ३. | पंचशिल मागासवर्गीय हौ.सो. शिवकॉलनी जळगांव येथे पोहोच रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | ३०.०० |
| ४. | पिंप्राळा गट नं.२७७ सोनी नगर, विनोद जोगी यांच्या घराजवळ रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | १०.०० |
| ५. | तक्षशिला बौध्दविहाराचे सुशोभिकरण करणे. | २१.०० |
| ६. | प्रभाग क्रं.१० अंतर्गत मातंगवाडा येथे रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | १०.०० |
| ७. | प्रभाग क्रं.१० अंतर्गत पिंप्राळा गावठाण चिंचपुरा ते मुस्लिम गल्ली येथे रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | १०.०० |
| ८. | प्रभाग क्रं.१० अंतर्गत पिंप्राळा गट नं.२१९ दिशाभुमी येथे रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | १०.०० |
| ९. | प्रभाग क्रं.१० अंतर्गत पिंप्राळा गावठाण चिंचपुरा ते मातंगवाडा ते भावरु भिल यांचे घरापर्यंत रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | १०.०० |
| १०. | प्रभाग क्रं.१० अंतर्गत पिंप्राळा भिलवाडा येथे रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | १०.०० |
| | एकुण रक्कम रु. :- | १७१.०० |

सदरहु ०१ ते १० कामे करण्यास कार्यान्वयन यंत्रणा सार्व.बांधकाम विभाग,जळगांव असल्याने प्रस्तुत विकास कामे सार्व.बांधकाम विभाग,जळगांव यांच्या कडुन करणेकामी ना हरकत दाखला देण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ५५**

**सूचक :- महाजन सुनिल सुपडू**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्र. ०९ :-** प्रभाग क्र.०५ व.वा.मार्केट मनपा जवळ फायर ऑफीस ते खाऊगल्ली पर्यंतचा रस्ता कॉक्रीटीकरण करणे बाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.सुनिल महाजन, विरोधीपक्ष नेते :-** मंजुर

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.०९ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** मला बोलायचे आहे.

**मा.महापौर :-** बोला,

**श्री.विशाल त्रिपाठी :-** मनपा निधीचा हा विषय आहे. असे नाही म्हणायचे आहे. नामंजुरचा विषय नाही मंजुर कराच. पण त्याच्या व्यतिरिक्त शहरात असे मनपा निधीचे बऱ्याच नगरसेवकांचे छोटे छोटे कामे होत नाही त्याची खंत आहे. हा महत्वाचा भाग आहे. किरकोळ म्हणजे आपण मागे ठराव केला २५ लाख नगरसेवक निधीचा. म्हणजे हसण्याचा विषय का होतो माझ्यावरती की, मी वारंवार या विषयावर भांडतो आहे. आणि माझे म्हणणे आहे आता बजेटची मिटींगमध्ये नगरसेवक निधीची तरतुद करावी सगळयांनी

**श्री.सुनिल महाजन, विरोधीपक्ष नेता :-** केलेली आहे प्रशासनाने.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** केलेली आहे प्रशासनाने. किती केली आहे.

**मा.उपमहापौर :-** आता पुढच्या महासभेमध्ये येईल बजेट सुधारणा करुन.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मला सांगा प्रशासनाने कितीही सुचवले की, बजेटमध्ये ही तरतुद केली आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** भाऊ मला ते नाही म्हणायचे आहे, जसा आमदारांचा निधी असतो, ते सुचवतात ते काम मार्गी लागते, आणि वर्षभरात तो निधी संपतो,तसे नगरसेवकांनी सुचविल्यानंतर त्या निधीचे एक अकाऊंट ठेवा, ज्यानी काम दिले त्यांचाच निधी मान्य करा.वर्षात संपवा की, ६ महिन्यात संपवा,कुठेतरी सगळयांनी मिळुन या विषयाला चालना दिली पाहिजे.हे माझे म्हणणे आहे.

(एकाच वेळी अनेक सन्मा.सदस्य बोलत असल्यामुळे त्या वेळी कोण काय बोलले ते स्पष्ट समजुन येत नाही)

**श्री.ईब्राहिम पटेल :-** प्रत्येक प्रभाग समितीला ५ कोटीचा निधी मंजुर केला आपण मागच्या मिटींगला आता पर्यंत किती खर्च केले. फक्त नियोजन करुन ठेवता.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** प्रभाग समितीचा विषय नाही, नगरसेवक निधीबाबत बोलत आहे मी.

**ॲड.शुचिता हाडा :-** नगरसेवक निधी हा असलाच पाहिजे, कारण होत काय नितीनभाऊ,तुमच्या सारखे पावरफुल नगरसेवकांचे मनपा निधीतील कामे लगेच मंजुर होतात. बाकी इतर प्रत्येक नगरसेवकांचे छोटे छोटे कामे आहेत. खुप मोठया अपेक्षा नाही पण छोटया छोटया कामांसाठी सुध्दा बाकी नगरसेवकांना इथल्या पायऱ्या झिझवावे लागतात. तरी सुध्दा त्यांचा एकही विषय मार्गी लागत नाही. ही वस्तुस्थिती आहे. आणि त्यामुळे जर समसमान नगरसेवक निधी दिला असेल, तर फक्त पावरफुल नगरसेवकांचे कामे होणार नाही. प्रत्येक प्रभागातील नगरसेवक निधीतील छोटे छोटे कामे होतील. प्रत्येक वेळेस स्पॉट व्हिजीट होतात आमच्या छोटया छोटया कामांसाठी, त्यांचे इस्टीमेट बनतात पण ते नुसते बनुन पडुन राहतात पुढे जात नाही.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** दोन महिन्यापासुन मी जे.सी.बी. मागत आहे निधी तर दुर जे.सी.बी.देत नाही.

**ॲड.शुचिता हाडा :-** महापौरताई, धुळे महानगरपालिकेने मागच्या आठवडयात नगरसेवक निधी अंतर्गत बांधकाम विभागाने निविदा प्रसिध्द केल्या आहेत. मी आपल्याला यापुर्वी सुध्दा सांगितले होते. आणि जळगांव महानगरपालिका नगरसेवक निधी करायचा आहे याचेच फक्त स्वप्न पहात आहे. आता ते प्रत्यक्षात आणावे, कदाचित पुढच्या टर्मला आम्ही असु नसु. पण नगरसेवक निधी मध्ये नगरसेवकांचे कामे झालेच पाहिजे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ताई, काही समाधानकारक जर निधी असला तर काही कामे सुचवु शकतो किंवा करु शकतो. तुम्ही दिलेला निधी आता मी कॅलक्युलेट केला तो खुप तोकडा आहे.

**ॲड.शुचिता हाडा :-** या सोबत अजुन एक आयुक्त महोदयांना विनंती करेल की, आता पर्यंत मनपा फंडात किती किती कामे झाले,मला वाटते ज्योतीताईंनी ही मागणी केली होती, पहिली श्वेतपत्रिका अजुन ही प्रशासनाने दिली नाही. मी जे सांगत आहे, आमचे नगरसेवक विशालभाऊ वारंवावर मागे लागतात.नगरसेवक निधीसाठी वारंवार माझे म्हणणे एकच आहे नितीनभाऊ. परंतु ही वस्तुस्थिती आहे की, जे नगरसेवक दिवसभर येथे असतात किंवा जे पावरफुल नगरसेवक आहे. त्यांना मनपा निधी हा जास्तच मिळतो.आमच्या वाट्याला ते येत नाही. तर ती श्वेतपत्रिका प्रसिध्द करा.

**श्री.जितेंद्र मराठे :-** नितीनभाऊ तुम्हाला हे मान्य करावे लागेल, मागच्या वेळेस पण ह्याच विषयामुळे गोंधळ झाला होता. म्हणजे विशिष्ट पदाधिकाऱ्यांच्या प्रभागात जसे कुलभुषणभाऊंच्या प्रभागात सुरुवात झाली ६८ लाखाची, बरोबर आहे ना भाऊ. त्याच्यानंतर महापौरताईंच्या प्रभागात सुरुवात झाली.नंतर आपल्या प्रभागामध्ये सुरुवात झाली. याच्या व्यतिरिक्त भाऊ हे तुम्हाला ही मान्य करावे लागेल.

**श्री.नितीन लढ्ढा :-** माझ्या प्रभागात जे आहे ना, निश्चितपणे मी असे म्हणत नाही.

**ॲड.शुचिता हाडा :-** मान्य भाऊ की, तुमचा शहराचा मध्यवर्ती भाग आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो हार्ट ऑफ सिटी आहे.

**श्री.जितेंद्र मराठे :-** ठिक आहे तुम्ही ६०-६० लाख खर्च करा, आमचा प्रभाग जरी कोपऱ्यावर असला, तरी आम्हाला ३०-३० लाखांच्या कामाची मंजुरी तर द्या.

(एकाच वेळी अनेक सन्मा.सदस्य बोलत असल्यामुळे त्या वेळी कोण काय बोलले ते स्पष्ट समजुन येत नाही)

**श्री.नितीन लढ्ढा :-** विषय क्र.०९ मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.०९ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. १०१५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, प्रभाग क्र.०५ व.वा.मार्केट मनपा जवळ फायर ऑफीस ते खाऊगल्ली पर्यंतचा रस्ता कॉक्रीटींगकरण करणेच्या कामाचे रक्कम रु.६२,४४,००२/- मात्रचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले असुन सदरचे काम करणे अत्यावश्यक असल्याने सदरचे काम करणे कामी येणाऱ्या रक्कम रु.६२,४४,००२/- मात्रचा खर्च मनपा निधीतुन नविन रस्ते या लेखाशिर्षाअंतर्गत करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ५५**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्र. १० :-** प्रभाग क्र.०५ गांधीनगर परिसरात रस्ते डांबरीकरण करणे बाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मंजुर

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.१० सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. १०१६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, प्रभाग क्र.०५ गांधीनगर परिसरात रस्ते अत्यंत खराब झाले असल्यामुळे सदर ठिकाणी डांबरी रस्ते तयार करण्याच्या कामाचे रक्कम रु.७९,०४,९०८/- मात्रचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. सदर रस्ते प्रभागातील प्रमुख मार्ग असुन अमृत योजने अंतर्गत पाणी पुरवठा जलवाहीनी व मलनिस्सारणच्या कामामुळे रस्त्याची दुरावस्था झालेली असल्याने सदरचे काम मनपा निधीतुन करुन घेणेसाठी येणाऱ्या अंदाजित खर्च रक्कम रु.७९,०४,९०८/- मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.नं. | कामाचे नांव | अंदाजीत रक्कम रु. |
|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.०५ गांधीनगर, डॉ.सुभाष चौधरी जुने हॉस्पिटल ते हॉटेल करिष्मा पर्यंतचा रस्ता डांबरी करण करणे. | ३८,१०,१२१/ |
| २ | प्रभाग क्र.०५ गांधीनगर श्याम मेडीकल ते गोकुळ हॉस्पिटल पर्यंतचा रस्ता डांबरी करण करणे. | २३,१९,९८३/- |
| ३ | प्रभाग क्र.०५ गांधीनगर मधील डॉ.गणेश रोटे ते श्री.नारायण खडके यांच्या घरापर्यंतचा रस्ता डांबरी करण करणे. | १७,७४,८०४/- |
| | एकुण रक्कम रु. :- | ७९,०४,९०८/- |

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल -** ५५
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्र. ११ :-** प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत AHP- ८१६ घरकुले प्रस्ताव पुर्नविचार करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** या प्रस्तावाच्या संदर्भात मा.महापौरताई आपल्या दालनात झालेल्या बैठकीत सन्मा.सदस्या शुचिताताई होत्या, अश्विनभाऊ होते. विशालजी होते आणि सर्व सन्मा.सदस्यांच्या चर्चेमध्ये की, या योजना राबविण्याच्या दृष्टीकोणातुन महानगरपालिकेच्या मालकीच्या जागांवरती या योजना राबविण्याच्या दृष्टीकोणातुन हा प्रस्ताव आहे. आणि या संदर्भात मेहरुण सर्व्हे नं.५०९ ही जागा महानगरपालिकेने स्वसंपादीत केलेली जागा आहे. मोठया प्रमाणावरती भुसंपादनाचा मोबदला महानगरपालिकेने या जागेच्या संदर्भात चुकवलेला आहे. प्रश्न राहिला की, या जागा विकास करण्याच्या दृष्टीकोणातुन MSDC ला देण्याच्या संदर्भातला, प्रशासनाकडुन माहिती घेतली असता, या जागेचा मोबदला महानगरपालिकेला काय मिळेल, या संदर्भात शहर अभियंत्यांनी जी माहिती दिली की, सदरहु जागेचा मोबदला महानगरपालिकेला आजच्या रेडीरेकनर प्रमाणे होणारे दर हे महानगरपालिकेला मिळतील, साधारणता समजा १८ कोटी रुपये त्याचा मोबदला रेडीरेकनरच्या अनुषंगाने होईल. आता या जमिनी ज्या आहेत हे भुसंपादन करुन घेतलेल्या आणि कोट्यावधी रुपये मोबदला देऊन घेतलेल्या जमीनी आहे. याच्या वरती यापुर्वी सुध्दा घरकुल योजना आपण राबविलेली होती. काही कारणाने ते पुर्णत्वास गेल्या नाही. अर्धवट अवस्थेत पडलेली घरकुले आजही तेथे उपस्थित आहे. आता महानगरपालिकेच्या आर्थिक परिस्थितीचा आपण विचार करता, ज्या जमीनी खुल्या बाजार भावाने आपण विक्री केल्या. तर त्याचे कोट्यावधी रुपयाचे उत्पन्न महानगरपालिकेला मिळु शकतात. आणि या योजने खाली या जमिनी MSDC ला दिल्या. तर फक्त १७ कोटी रुपये उत्पन्न रेडीरेकनर प्रमाणे महानगरपालिकेला मिळेल. संपुर्ण महानगरपालिकेच्या आर्थिक परिस्थितीचा विचार करता की, अश्या पध्दतीने महानगरपालिकेच्या जमिनींवरती पंतप्रधान आवास योजना राबविणे हा व्यवहारीक विषय, महानगरपालिकेच्या दृष्टीकोणातुन योग्य नाही. जरी केंद्र शासनाची योजना आहे, योजना चांगली आहे, गरीबांना घरकुल देण्याच्या संदर्भातली आहे. त्या बद्दल कोणतेही दुमत नाही. परंतु या संदर्भातल्या ज्या काही शासकीय जमिनी असतील, जसे तांबापुरातील जमिन ती संपुर्ण शासकीय जमिन आहे. तेथे योजना राबवायची असेल, तेथे मल्टीस्टोरी

पंतप्रधान आवास योजना राबवायची असेल, त्याच्यासाठी प्रयत्न केले, तर मी म्हणतो दोन गोष्टी साध्य होईल की, ऑलरेडी ती जमिन घरकुल धारकांमध्ये व्यापली गेली आहे. त्याचे पुर्णनिर्माण करण्याच्या दृष्टीकोणातुन विचार केला, तर तेथे मोठया इमारती उभ्या राहुन तो परिसर झोपडपट्टी म्हणुन मुक्त होऊ शकतो. पंतप्रधान आवास योजनेचा सुध्दा फायदा त्याना मिळु शकतो. किंवा समता नगर येथील जमिन, ती ही शासकीय जमिन आहे. मोठया प्रमाणावरती जमिन आहे. ही योजना महानगरपालिकेच्या जागेवर राबविण्यापेक्षा ही योजना शासकीय जमिनीवरती राबविली तर महानगरपालिकेच्या आर्थिक परिस्थिती वरती याचा बोझा पडणार नाही. महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती आपली आज नाही तर उद्या सुधरण्याच्या दृष्टीकोणातुन या जमिनींचा कुठेतरी याची विक्री करुन याच्यातुन कोट्यावधीचे उत्पन्न महानगरपालिकेला प्राप्त करुन कुठेतरी या शहराच्या विकासाचे धोरण राबविण्याच्या दृष्टीकोणातुन विचार करावा लागेल, अश्या अजुन काही जमिनी असतील, आज पिंप्राळा हुडकोच्या येथे पण आपण शेकडो ऐकर जमिनी खाजगी वाटाघाटीतुन विकत घेतलेली होती. शेकडो ऐकर जमिनींपैकी कितीक ऐकर जमिन जी आहे अजुन ही त्या अवस्थेत पडलेली आहे की, त्याच्यावरती अतिक्रमण होत चालले आहे. अश्या जमिनी शोधुन त्याचे योग्य पध्दतीने विनियोग करुन महानगरपालिकेचे उत्पन्न कश्या पध्दतीने वाढविता येईल. त्या बाबतीत प्रशासनाने विचार करुन तसा प्रस्ताव आणावा, हा प्रस्ताव माझ्या मते तहकुब करुन मा.खासदार आणि मा.आमदारांची जी ईच्छा आहे की, पंतप्रधान आवास योजना राबविण्याच्या दृष्टीकोणातुन शहरामध्ये प्रयत्न होणे गरजेचे आहे. तर त्यांच्यासोबत पुन्हा बैठक घेवुन शासकीय जमिनींवरती अश्या पध्दतीची योजना राबवुन सामान्य माणसांना घरकुले उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीकोणातुन या योजनेचा कसा फायदा घेता येईल. या बाबतीत विचार करता येईल.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** मेहरुणच्या जागेबद्दल तर हे झालेले आहे ना, मेहरुणची जी जागा आहे लिलाव करुन पत्र मागुन ते पैसे महापालिकेला प्राप्त होतील, तशी आपण एक चर्चाही केलेली आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** कालही या संदर्भात मा.आयुक्त महोदयांना.

**मा.आयुक्त :-** त्याचे रिझरवेशन असल्यामुळे करावच लागेल ते. जर कोणी लिलावाने जरी घेतले तर त्याला ३७ मध्ये करावच लागेल.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** जनरल लिलाव करु आपण.

**मा.आयुक्त :-** ते काम आपल्याला करावे लागेल.

**श्री.नितीन लढ्ढा :-** अश्या ज्या मौक्याच्या जागा आहे ना आपल्या की, ज्याचे ३७ चे प्रस्ताव करुन त्याचे वापराबद्दल करुन त्या जागेंचा कश्या पध्दतीने आपल्याला फायदा करुन घेता येईल.

**मा.आयुक्त :-** आता भुसंपादनाशीच रिलेटेड, जशी आपली काल चर्चा झाली, सानेगुरुजी, न.पा. ला आपण ऑलरेडी कमर्शियलसाठी प्रपोजड केले होते ३७ मध्ये पण शासनाने स्वत:हुन तेथे पार्कींग टाकली. आणि सोडु नका म्हटले ती जागा. म्हणुन पुन्हा आपल्याला दुसरा भुसंपादन देता येईल की, १,२,३ फ्लोअर पार्कींग आणि त्याच्या वरती कमर्शियल करा, असे काही तरी करु.

**मा.महापौर :-** विषय क्र.११ सर्वानुमते तहकुब करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. १०१७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती पाहता प्रशासनाकडुन आलेला प्रस्ताव तहकूब करण्यात येत आहे. सभागृहात झालेल्या चर्चेनूसार प्रशासनाने प्रधानमंत्री आवास योजना ही शासकीय जागेवर राबवावी व तसा परिपूर्ण प्रस्ताव पूढील महासभेत सादर करावा.

**सर्वानुमते तहकूब**

**अनुकूल - ५५**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्र. १२ :-** मनपा प्रशासकीय इमारत व विविध प्रभागातील एकूण १० कामे करणे कामी मक्तेदार यांनी मनपा खजिन्यात भरलेली कालबाहय इसारा अनामत रक्कम परत करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** विषय क्र.१२,१३,१४ मान्य आहे.

**मा.उपमहापौर :-** विषय क्र.१२,१३,१४ ला माझे अनुमोदन आहे.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** मला विषय क्र.१४ विषयी बोलायचे आहे. आम्हाला सर्व सन्मा.सदस्यांना प्रशासनाने अशी माहिती पुरवावी की, अश्या कोणत्या कोणत्या योजना आहेत किंवा असे कोणते कोणते विषय आहे. ज्याच्यामध्ये रस्ते किंवा इतर कोणतेही रोड ही करता येऊ शकता. अतिवृष्टी असेल तर आम्हाला पुल वगैरे करता येत नाही पण त्यात रस्ता बांधु शकतो, तर अशी माहिती देण्यात यावी. ----२०.५८----- त्यात पण आपण रस्ता बनवितो आहे. ते ही सदस्यांना माहित नसते, तर असे जर काही विषय असले, तर ते सर्व सदस्यांपर्यंत पोहचवावे. त्यांनी त्याचे इमप्लीमेंट करावे. म्हणजे त्यांना त्यांच्या भागात काम करता येईल. अशी माझी सभागृहाला विनंती आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.१२,१३,१४ सर्वानुमते मंजुर करण्यता येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. १०१८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, म.न.पा.बांधकाम विभागामार्फत खालील कामांचे निविदा सुचना प्रसिध्द करण्यात आली होती. त्यानुसार सदर कामाकरिता मक्तेदारांनी खाली नमूदकेलेप्रमाणे इसारा रक्कम भरलेली होती. सदरची कामे मनपा निधी अंतर्गत पूर्ण करण्यात आलेली असून काम पूर्ण झाल्याने मक्तेदारांनी इसारा रक्कमेची मागणी केलेली असून सदरची इसारा अनामत तीन वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला असल्याने जनरल फंडात जमा करण्यात आलेली सदरची इसारा अनामत रक्कम मक्तेदार यांना परत करणेस महाराष्ट्र नगरपरिषद लेखा सहिंता २०११ चे नियम २९९ नुसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.क्रं. | मक्तेदाराचे नांव | पावती क्रं. | दिनांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| १. | यु.क्र.०२ अंतर्गत डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त सभोवताली रंगकाम करणे. | ५८४६८ | १९/०१/२०१८ | १०१२/- |
| २. | यु.क्र.०४ वार्ड क्र.१४ रस्ता दुभाजकास रंगकाम करणे. | | | १०३८/- |
| ३. | प्रभाग क्रं.०१ वार्ड क्र.०७ मध्ये काटया फाईल भागात श्री.गफ्फार मलीक यांचे घरासमोरील आर.सी.सी.रोड क्रॉसिंग गटार व स्लॅब कल्व्हर्ट टाकणे. | | | २५२४/- |
| ४. | मा.आयुक्त सो यांचे निवासस्थानी खिडक्यांना ग्रिल बसविणे. | | | २६७३/- |
| ५. | मा.आयुक्त सो यांचे निवासस्थानी नविन स्लायडिंग विंडो बसविणे. | | | ४७३५/- |
| ६. | प्र.स.क्र.०४ अंतर्गत भोईटे शाळा येथे निवासस्थान गेट बसविणे व संरक्षण दरवाजे बसविणे. | | | ३७३०/- |
| ७. | प्र.स.क्र.०४ अंतर्गत भोईटे शाळा येथे निवासस्थानात पाण्याची टाकी पुरविणे व फरशी बसविणे. | | | २२७८/- |
| ८. | प्र.स.क्र.०४ अंतर्गत यु.क्र.०६ भोईटे शाळा येथे क्वार्टरला रंगकाम करणे व इतर कामे. | | | ४५२२/- |
| ९. | मनपा प्रशासकीय ईमारती मधील ०४ था मजला अर्थ विभाग कार्यालयास रंगकाम करणे. | | | ८२६/- |
| १०. | म.न.पा.प्रशासकीय इमारती मधील १३ व्या मजल्यावरील मा.आयुक्त सो यांचे कार्यालयात रंगकाम करणे व कारपेट बसविणे. | | | ३५३३/- |
| | एकुण रक्कम रु.:- | | | २६,८७१/- |

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ५५**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्र. १३ :-** मनपा विविध प्रभागातील एकूण ०७ कामे करणे कामी मक्तेदार यांनी मनपा खजिन्यात भरलेली कालबाहय इसारा अनामत रक्कम परत करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. १०१९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, म.न.पा.बांधकाम विभागामार्फत खालील कामांचे निविदा सुचना प्रसिध्द करण्यात आली होती. त्यानुसार सदर कामाकरिता मक्तेदारांनी खाली नमूद केलेप्रमाणे इसारा रक्कम भरलेली होती. सदरची कामे मनपा निधी अंतर्गत पूर्ण करण्यात आलेली असून काम पूर्ण झाल्याने मक्तेदारांनी इसारा रक्कमेची मागणी केलेली असून सदरची इसारा अनामत तीन वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला असल्याने जनरल फंडात जमा करण्यात आलेली सदरची इसारा अनामत रक्कम मक्तेदार यांना परत करणेस महाराष्ट्र नगरपरिषद लेखासहिंता २०११ चे नियम २९९ नुसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.क्रं. | मक्तेदाराचे नांव | पावती क्रं. | दिनांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| १. | वार्ड क्र.२३ अंतर्गत मुस्लीम कब्रस्थानाजवळील सार्व. शौचालय (लेडीज) मध्ये सिमेंट कोबा करणे. | ५८४८१ | २४/०१/२०१८ | ३८८२/- |
| २. | वार्ड क्र.२३ अंतर्गत मुस्लीम कब्रस्थाना जवळील सार्व. शौचालया मधील (पुरुषांच्या) संडाशीचे भांडे बदलविणे. | | | ४८६६/- |
| ३. | वार्ड क्र.२३ मध्ये मुस्लीम कब्रस्थाना समोरील सार्व. शौचालया मधील (लेडीज) संडाशीचे भांडे बदलविणे. | | | ५११०/- |
| ४. | ला.ना.शाळा ते नेहरु चौकापर्यंत रोड डिव्हायडरला रंगकाम करणे. | | | ५२००/- |
| ५. | नेहरु चौक ते टॉवर चौक व नेहरु चौक ते रेल्वे स्टेशन पर्यंतच्या रोड डिव्हायडरला रंगकाम करणे. | | | ३४६२/- |
| ६. | प्र.स.क्र.०१ अंतर्गत आकाशवाणी चौका पासुन ते शास्त्री टॉवर पर्यंत असलेल्या रस्त्यामधील दुभाजकाला प्रायमर कलर मारणे. | | | ५५२३/- |
| ७. | प्र.क्र.२० डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती निमीत्त पुतळा सभोवताली रंगकाम करणे. | | | ८५४/- |
| | एकुण रक्कम रु. :- | | | २८,८९७/- |

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ५५**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्र. १४ :-** अतिवृष्टी अनुदाना अंतर्गत युनिट क्रं. १२ निमखेडी गट नं. ७९ पासुन हिराशिवा कॉलनी पर्यंत रस्ता रुंदीकरण करून डांबरीकरण करणे कामाची मक्तेदार वाय.एम.महाजन यांची अनामत परत करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. १०२० पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, अतिवृष्टी अनुदाना अंतर्गत युनिट क्रं. १२ निमखेडी गट नं. ७९ पासुन हिराशिवा कॉलनी पर्यंत रस्ता रुंदीकरण करून डांबरीकरण करणेकामी मक्तेदार

वाय.एम.महाज,जळगांव यांची सुरक्षा अनामत पावती क्रं.१७४६६ दि.२६/०४/२०२२ अन्वये रक्कम रु.१,१५,०४१/- मात्र सुरक्षा अनामत म्हणुन मनपा अर्थ विभागात जमा आहे.

सदर कामी मक्तेदार यांचे निविदा दर सर्वात कमी आल्याने त्यांना पत्र क्रं.पवडी/९० दि.१४/१२/२००७ अन्वये कामाचा कार्यादेश देण्यात आला त्यानुसार मक्तेदार यांनी सदरचे काम कार्यादेशानुसार दिलेल्या मुदतीत दि.१२/०६/२०११ रोजी पुर्ण करुन दिलेले आहे. सदरचे काम पुर्ण होवून ५ वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला असल्याने मक्तेदार यांनी वर नमुद प्रमाणे रक्कम रु.१,१५,०४१/- मात्र सुरक्षा अनामत म्हणुन जमा रक्कम परत मिळण्याची मनपा सा.बा.आ.क्रं.२०१३ दि.०५/०८/२०२२ अन्वये मागणी केलेली आहे. त्यानुसार मुख्यालेखाधिकारी यांचेकडुन मक्तेदार यांची जमा सुरक्षा अनामत मनपा खजिन्यात जमा आहे किंवा कसे याबाबत अभिप्राय मागविला असता त्यांनी सदरची सुरक्षा अनामत ०३ वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला असल्याने अदायगी करायचे असल्यास महासभेची मान्यता घेवून जनरल फंडाकडे अदायगी करता देयक सादर करण्याबाबत सुचित केलेनूसार अतिवृष्टी अनुदाना अंतर्गत युनिट क्रं. १२ निमखेडी गट नं. ७९ पासुन हिराशिवा कॉलनी पर्यंत रस्ता रुंदीकरण करून डांबरीकरण करणे कामाची मक्तेदार वाय.एम.महाजन यांची रक्कम रु.१,१५,०४१/- मात्र सुरक्षा अनामत महाराष्ट्र नगरपरिषदा लेखसहिता २०११ मधिल नियम २९९ नुसार परत करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल -** **५५**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्र. १५ :-** नागरी दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत (DPDC) सादर करण्यात आलेल्या प्रस्तावातील कामात बदल करुन सुधारीत प्रस्ताव सादर करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** विषय क्र.१५ मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.१५ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**मा.आयुक्त :-** एक सबमिशन आहे सर्व सन्मा.सदस्यांना, ३१ मार्चच्या अनुषंगाने DPDC तुन प्रस्तावांची मागणी येत आहे. सर्व सन्मा.सदस्यही माझ्याकडे येत आहे. काही ठिकाणी अमाऊंट बदललेली आहे काही ठिकाणी कामाचे नांव बदललेले आहे. अश्या ज्याकाही किरकोळ दुरूस्त्या असतील तर मा.महापौर यांच्या स्वाक्षरीने प्रस्ताव जाऊ द्यावेत. ३१ मार्चच्या अनुषंगाने परवानग्या मिळतील फास्ट.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. १०२१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सेवा सुविधांचा विकास कार्यक्रमाअंतर्गत मनपा ११ कोटी रक्कमेच्या कामांना शासनाकडुन मान्यता मिळालेली असुन त्यापैकी अ.क्रं.१८ प्रभाग क्रं.०४ मधील काटयाफाईल गुरुनानक नगर, बळीराम पेठ या भागात रस्ते कॉक्रीटीकरण करणेचे कामास १ कोटी रक्कमेचा निधी मंजुर झालेला असुन त्यास महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग शासन निर्णय क्रं.मनपा-२०२२/प्र.क्र.१७४ (२)/ नवि-१६ मंत्रालय मुंबई ४००-३२ दिनांक १० ऑगस्ट २०२२ अन्वये मंजुरी देण्यात आलेली आहे. त्यानुसार अंदाजपत्रक तयार करुन प्रस्ताव सादर करण्यात येत आहे. परंतु सदर प्रस्तावातील कामे यापुर्वी नागरी दलित वस्ती सुधारणायोजने अंतर्गत जिल्हाधिकारी जळगांव यांच्या कडे पत्र क्रं.जशमनपा/साबा/१०७६/२०२२ दिनांक २७/०७/२०२२ अन्वये यापुर्वी सादर करण्यात आलेला होता. सदर नागरी दलित वस्ती

सुधारणा योजने अंतर्गत सादर केलेला प्रस्तावातील अ.क्रं.१४ चे काम वगळुन दुसरे काम प्रस्तावीत करणे आवश्यक आहे. जेणेकरुन व्दिरुक्ती टाळता येईल.

नागरी दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत प्रस्तावातील अ.क्रं.१४ प्रभाग क्रं.०४ गुरुनानक नगर, काटया फाईल, इस्लामपुरा इ. भागात रस्ते कॉक्रीटीकरण करणे रक्कम रु.१,५३,९२,७८०/- मात्रचे काम वगळुन त्याऐवजी खालील काम नव्याने प्रस्तावीत करण्यात येत आहे.

प्रभाग क्रं.०४ चौघुले प्लॉट, बागवान मोहल्ला, (जोशी पेठ) व इतर भागात रस्ते कॉक्रीटीकरण करणे रक्कम रु.१,४९,७७,९३६/- मात्र

नागरी दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत जशमनपा/साबा/१०७६/२०२२ दि.२७/०७/२०२२ च्या प्रस्तावात वरील प्रमाणे बदल व दुरुस्ती करणेस तसेच जिल्हाधिकारी कार्याल यांच्याकडेस सुधारीत प्रस्ताव सादर करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे तसेच वर नमुद नागरी दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत यापुर्वी प्रस्तावीत केलेले काम रद्द करुन नव्याने प्रभाग क्रं.०४ चौघुले प्लॉट, बागवान मोहल्ला (जोशी पेठ) व इतर भागात रस्ते कॉक्रीटीकरण करणेचे काम प्रस्तावीत करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ५५**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्र. १६ :-** शिवाजी नगर मधिल मनपा मालकीच्या शाळेच्या आवारात श्री.छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्र्वारूढ पुर्णाकृती पुतळा तयार करणे कामी शिल्पकार नहुष सरमद पाटील यांचे वाटाघाटी अंती रक्कम रू. ८१,३०,०००/- मात्रचे दरास मान्यता देणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** विषय क्र.१६ आणि १७ दोन्ही मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** विषय क्र.१६ आणि १७ ला माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.१६ आणि १७ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** भाऊ,माझी एक विनंती होती. विषय क्र.१६ जो आहे.

**नगरसचिव :-** मांडा ना तुम्ही, विषय क्र.१६ चे काय आहे मांडा तुम्ही.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** विषय क्र.१६ ला सुचक म्हणुन माझे नाव घ्या आणि अनुमोदक म्हणुन नवनाथभाऊला घ्या.

**श्री.नितीन लढ्ढा :-** स्थानिक नगरसेवकांना घ्या.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.१६ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे. विषय क्र. १७ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. १०२२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, शिवाजीनगर मधील रेल्वे उड्डाण पुलाचे नव्याने बांधकाम पुर्ण झाले असुन त्या पुलालगत मनपा मालकीच्या शाळेच्या आवारातील जागेत पुर्वीपासुन असलेला छत्रपती शिवाजी महाराजांचा अर्धाकृती पुतळा हा नविन पुलाच्या उंचीपेक्षा अतिशय खाली आलेला आहे. त्यामुळे सदर अर्धाकृती पुतळा काढुन त्याचठिकाणी नव्याने चबुतरा बांधुन त्यावर पुर्णाकृती अश्वारुढ पुतळा उभारण्याची मागणी त्या भागातील सन्मा.नगरसेवक श्री.नवनाथ दारकुंडे व नागरिकांनी केलेली होती. त्यास अनुसरुन मनपा महासभा ठराव क्रं.७८८ दि.२४/०३/२०२२ अन्वये त्यास मान्यता प्रदान करण्यात आली आहे. तसेच नविन पुतळे बसवणे कामी अर्थसंकल्पात पुरेशी तरतुद नसल्याने मनपा महासभा ठराव क्रं.९०२ दि.०७/१०/२०२२ अन्वये याकामी सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात नविन पुतळे बसवणे कामी रक्कम रु.२.०० कोटी व शहरातील महापुरुषांच्या

पुतळयासाठी पुतळे व्यवस्था व दुरुस्ती या लेखाशिर्षात रक्कम रु.२.०० कोटीची अर्थसंकल्पात तरतुद करणेस मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

पिंप्राळा येथील चौकात छत्रपती शिवाजीमहाराज यांचा अश्वारुढ पुर्णाकृती पुतळा उभारण्याच्या कामासाठी आवश्यक निविदा प्रक्रिया राबवुन या कामी शिल्पकार यांच्यामार्फत मागवण्यात आलेलया क्ले मॉडेल मधुन एक क्ले मॉडेल अंतीम करुन कार्यवाही करण्यात येत आहे. त्यावेळी प्राप्त एकुण ०६ क्ले मॉडेल पैकीच एक मॉडेल सुनिश्चित करुन शिवाजीनगर येथे बसविण्याचे काम करण्यात यावे अशी सन्मा. नगरसेवकांची मागणी आहे. तरी त्यानुसार शिवाजीनगर मधील मनपा मालकीच्या शाळेच्या आवारातील पुर्वीपासुन असलेला छत्रपती शिवाजी महाराजांचा अर्धाकृती पुतळा हा तेथे नव्याने बांधण्यात आलेल्या उड्डाण पुलाच्या खाली व कमी उंची असल्याने तो काढुन टाकण्यास व त्याच जागेवर मागील बाजुस नव्याने चबुतरा बांधुन त्यावर छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारुढ पुर्णाकृती पुतळा बसविण्यास मान्यता मिळणेस तसेच पिंप्राळयातील चौकात नविन पुतळा बसविण्यासाठी मागवण्यात आलेलया क्लेमॉडेल पैकीच एक मॉडेल निश्चित करुन त्यानुसार पुर्णाकृती पुतळा तयार करुन बसवण्यास व याकामी येणारा संपुर्ण खर्च अंदाजे १.०० कोटी ७५.०० लक्ष मात्र हा मनपा निधीतुन करण्यास महासभा ठराव क्रं.९६४ दि.२३/१२/२०२२ अन्वये मान्यता प्रदान केलेली आहे. तसेच या कामी होणाऱ्या खर्चास सुध्दा प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे.

वर नमुद ठरावानुसार मान्यता दिल्यानुसार पिंप्राळा येथील मुख्य चौकात उभारण्यात येणाऱ्या महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळयाकरीता शिल्पकार यांच्या कडुन मागविण्यात आलेल्या क्ले मॉडेल पैकी एक क्ले मॉडेल सुनिश्चित करण्याकरीता आयुक्त यांनी सर्व गट नेता, पदाधिकारी, तसेच प्रशासनाकडुन शहर अभियंता, मुख्य लेखाअधिकारी, मुख्य लेखापरिक्षक यांची समिती गठित करण्यात आली. सदर समितीने प्राप्त ०६ क्ले मॉडेल पैकी ०३ क्ले मॉडेलची निवड करण्यात आली त्यात प्रथम पसंती सरमद क्रिऐशन धुळे यांचे क्ले मॉडेलला, व्दितीय क्रमांकाचे मॉडेल श्री. नहुष सरमद पाटील,धुळे तर तृतीय क्रमांकाची पसंती अजिक्य जे. चौलकर मुंबई यांचे क्ले मॉडेलला दर्शविण्यात आली. त्यावेळी शिवाजी नगर भागातील सन्मा.नगरसेवक श्री.दिलीप पोकळे व श्री.नवनाथ दारकुंडे यांनी उक्त समितीने दुसऱ्या क्रमांकावर पसंती नोंदविलेल्या क्ले मॉडेल प्रमाणे शिवाजी नगर मधिल मनपा मालकीच्या शाळेच्या जागेवर असलेला छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारुढ पुर्णाकृती पुतळा बसविण्याची पसंती नोंदविलेली आहे. त्यानुसार पिंप्राळा येथील छत्रपती शिवाजी महाराज यांचे अश्वारुढ पुर्णाकृती पुतळा उभारणे कामी मागविण्यात आलेल्या दरातील दुसऱ्या क्रमांवर आलेले शिल्पकार श्री.नहुष सरमद पाटील,धुळे याचं सदर पुतळा उभारणे कामी रक्कम रु.८२,४५,०००/-मात्रचे दर आलेले आहे. तसेच पहिल्या क्रमांकावर आलेले शिल्पकार सरमद क्रिऐशन,धुळे यांचे रक्कम रु.८१,३०,०००/- मात्रचे दरास महासभा ठराव क्र.९७५ दि.२३/१२/२०२२ अन्वये मान्यता दिलेली आहे. त्याअनुषंगाने दुसरे क्रमांकावर असलेले शिल्पकार श्री.नहुष सरमद पाटील,धुळे यांना दराबाबत वाटाघाटीसाठी पत्र क्र.जशमनपा/साबा/१८२३ दि.१०/०२/२०२३ रोजी शहर अभियंता यांच्या समक्ष बोलविले असता वाटाघाटी अंती शिल्पकार यांनी मनपा आ.क्रं.४६७२ दि.२०/०२/२०२३ अन्वये सादर केलेल्या क्ले मॉडेलप्रमाणे व त्यावेळेच्या निविदेतील अटी शर्तीनुसार व सुचनेनुसार त्याचप्रमाणे ठरवून दिलेल्या उंची व वजनानुसार पुतळयाचे काम रक्कम रु.८१,३०,०००/- मात्र या रक्कमेत करुन देण्यास तयार असल्याचे लेखी समंती दिलेली आहे. त्यानुसार यापुर्वी वर नमुद ठरावानुसार पिंप्राळा येथील मुख्य चौकात श्री छत्रपती शिवाजीमहाराज अश्वारुढ पुर्णाकृती पुतळा तयार करणेकामी मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार शिवाजी नगर मधिल मनपा मालकीच्या शाळेच्या आवारात श्री छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारुढ पुर्णाकृती पुतळा तयार करणे कामी शिल्पकार श्री.नहुष सरमद पाटील यांचे वाटाघाटी अंती रक्कम रु.८१,३०,०००/- मात्रचे दरास व होणारा खर्च हा मनपा अर्थ संकल्पातील नविन पुतळे या लेखाशिर्षा अंतर्गत करणेस तसेच वाटाघाटीअंती आलेल्या दरात शिल्पकार श्री.नहुष सरमद पाटील यांच्याकडुन पुतळा करुन घेणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल -** ५५

**सूचक** **:- पोकळे दिलीप बबनराव**

**अनुमोदक** **:- दारकुंडे नवनाथ विश्वनाथ**

**नगरसचिव :- विषय क्र. १७ :-** जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत पिंप्राळा येथे महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्र्वारूढ पुर्णाकृती पुतळा उभारणेचे काम पुर्ण करण्याकरीता शासन निर्णयानुसार ०१ वर्षाच्या आतील मंजुर ठराव व इतर ना-हरकत दाखले सादर करणेबाबत सुचित केल्यानुसार दि.२४/०३/२०२२ रोजी महासभेत पारीत केलेल्या ठरावास १ वर्ष पुर्ण होत असल्याने पुतळा उभारणेकामी ०१ वर्षापुर्वीचे कागदपत्र परवानगी कामी सादर करणेबाबत व दिलेल्या मुदतीपेक्षा ०१ वर्षाची मुदतवाढ मिळणेबाबत सदर प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी यांचेकडेस सादर करणेकामी मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. १०२३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत पिंप्राळा येथे महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्र्वारूढ पुर्णाकृती पुतळा उभारणे कामी महाराष्ट्र शासन निर्णय क्रं.पुतळा-३११६/प्र.क्र.-३०८/२९ मंत्रालय मुंबई दि.०२ मे २०१७ अन्वये जळगांव शहर महानगरपालिकेने सर्वसाधारण महासभा ठराव क्रं.७८८ दि.२४/०३/२०२२ अन्वये मान्यता दिलेली आहे त्याअनुषंगाने सदर कामाचे संकल्पचित्र जागेचे नकाशे तयार करण्यात येवून जिल्हाधिकारी जळगांव यांच्याकडेस दि.१४/०६/२०२२ रोजी पुतळा उभारण्यास मान्यतेकरीता प्रस्ताव सादर करण्यात आला त्यानुसार जिल्हाधिकारी जळगांव यांनी सदर प्रस्तावात शासन निर्णयानुसार पोलीस अधिक्षक,जळगांव यांचे ना-हरकत दाखले, कला संचालनालयाची पुतळयाचे क्ले मॉडेला मान्यता घेणे तसेच पुतळयाचे चबुतऱ्याला मुख्य वास्तुशास्त्रज्ञ मुंबई यांची मान्यता इत्यादी मनपाचे ना-हरकत दाखले यांची अपुर्णता असल्याचे त्यांनी दि.२३/०६/२०२२ च्या पत्रानुसार कळविलेले आहे. त्याअनुषंगाने सदर कामाचे पुतळयाचे क्ले मॉडेल शिल्पकार यांच्याकडुन तयार करण्यात आलेले असुन त्यास कलासंचालक,कलासंचालनालय मुंबई यांच्या कडुन मान्यता प्राप्त झालेली असुन त्यानुसार शिल्पकार सरमद क्रियेशन,धुळे यांना १४ ते १५ फुट उंच व ब्रांझ धातुत ४.०० टन वजनाचा पुतळा तयार करण्यास दि.२९/१२/२०२२ रोजी कामाचा कार्यादेश निर्गमीत करण्यात आलेला आहे. तसेच पुतळयाकरीता लागणारे नकाशे व अंदाजपत्रक तयार करण्याकरीता वास्तुविशारद यांची नेमणुक करुन नकाशे व अंदाजपत्रके तयार करण्यात आलेले आहे. सदरचे अंदाजपत्रक व नकाशे शासन निर्णयानुसार मुख्य वास्तुशास्त्रज्ञ मुंबई यांची मान्यता मिळण्यासाठी दि.०२/०३/२०२३ रोजी प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. तसेच वर नमुद प्रमाणे जिल्हाधिकारी जळगांव यांची सुचितकेलेल्या त्रृटींचे निरसन करण्यात आलेले असुन चबुतरा बांधकाम करण्याच्या नकाशांना व अंदाजपत्रकास मुख्य वास्तुशास्त्रज्ञ,मुंबई यांची मान्यता होणे बाकी आहे.

वर नमुद दि.०२ मे २०१७ च्या शासन निर्णयानुसार एखादया संस्थेने पुतळा उभारणेचे कामास ठराव पारित केल्यानंतर ०१ वर्षाच्या आत सर्व मंजुरी होवून पुतळा उभारण्याचे काम करणे बंधनकारक असल्याचे नमुद करण्यात आलेले आहे. त्याअनुषंगाने महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारुढ पुर्णाकृती पुतळा उभारणे कामी महानगरपालिकेने दि.२४/०३/२०२२ रोजी ठराव पारीत केलेला आहे. त्यास दि.२४/०३/२०२३ रोजी ०१ वर्ष पुर्ण होत असल्याने शासन निर्णयानुसार दिलेल्या मंजुरी पुर्ण झालेल्या नसल्याने आजतागायत पुतळा तयार करण्याचे काम शिल्पकार सरमद क्रियेशन,धुळे यांच्या स्टुडिओत सुरु आहे. तसेच पुतळयाचे चबुतऱ्याचे बांधकाम करण्याचे नकाशांना व अंदाजपत्रकांना मुख्य वास्तुशास्त्रज्ञ,मुंबई यांची मान्यता होणे बाकी असल्याने पुढील कामे करण्याकरीता जवळपास ०६ महिन्याचा कालावधी लागणार आहे. व त्यानंतर चबुतरा बांधणे व त्यावर पुतळा बसविणे याकरीता मंजुरी प्राप्त झाल्यानंतर ०६ महिन्याचा कालावधी लागणार आहे. त्याकरीता ०१ वर्षाचा कालावधी लागणार आहे. सदरचे काम पुर्ण होण्यासाठी शासनाने शासन निर्णयानुसार ०१ वर्षात काम पुर्ण करण्याची मुदत दिलेली आहे. परंतु वर नमुद परिस्थिती पहाता शासनाने पुतळा उभारण्यासाठी लागणारी मंजुरी घेण्याचे कार्यवाही सुरु असल्याने शासनाने दिलेली ०१ वर्षाची मुदत संपलेली असल्याने सदरचे काम पुर्ण करण्याकरीता ०१ वर्षाची मुदतवाढ मिळण्यासाठी जिल्हाधिकारी जळगांव यांच्या कडेस प्रस्ताव सादर करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ५५**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्र. १८ :-** तहकुब विषय :- केंद्र शासनाच्या अमृत २.० अभियाना अंतर्गत पाणी पुरवठा व मलनिस्सारण योजनेसाठी शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणुन नियुक्ती करणेसाठी महासभा ठराव क्रं. ८६९ दि.०८/०८/२०२२ मधील निश्चित धोरणात बदल करून शासनाच्या निर्देशांनुसार सल्लागार नियुक्तीस मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**मा.उपमहापौर :-** मा.महापौर महोदया, आयुक्त महोदया, सन्मा.सभागृह सर्व प्रथम तुम्हाला या ठरावाबद्दल जर काही निर्णय घ्यायचे असेल तर योग्य निर्णय निश्चित घ्यावा. परंतु सदरील विषयामध्ये जो विलंब झालेला आहे की, तो कोणामुळे झालेला आहे. या संदर्भामध्ये सभागृहात भरपुर चर्चा झालेली होती. संबंधीतांवर कार्यवाही करण्याबाबत त्यावेळेस सुचना ही झाल्या होत्या. ठराव पण झाला होता. त्यानंतर मी स्वत: वयक्तीक पत्र दिलेले आहे महापौरांनी पत्र दिलेले आहे. सन्मा. माजी महापौर भारतीताई सोनवणे यांनी पण पत्र दिलेले आहे. तर माझी आपल्याला विनंती आहे. विनंती म्हणजे मी सुचना करतो की, आपण तात्काळ शासन दरबारी त्या कार्यवाही संदर्भात प्रस्ताव पाठवावे आणि जोपर्यंत कार्यवाही निश्चित होत नाही. तोपर्यंत आपण संबंधीत अधिकाऱ्याचा सी.आर.शासनाला पाठवु नये. आणि हे ठरावात नोंदवुन घ्यायचे.

**श्री.सुनिल महाजन, विरोधी पक्ष नेता** :- माझे अनुमोदन आहे.

**ॲड.श्री. दिलीप पोकळे :-** महाराष्ट्र जिवन प्राधिकरणाने ३ टक्के दराने अथवा

**मा.उपमहापौर :-** पोकळे साहेब, तुमचा विषय वेगळा आहे, आपल्याला जे ठरवायचे आहे. या ठरावामध्ये काय होणार आहे हे नंतरचा विषय आहे. त्याच्या पुर्वी म्हणत आहे मी,

**ॲड.श्री. दिलीप पोकळे :-** तुम्ही जो विषय आणलेला आहे ह्या विषयपत्रिकेत आहे का ? तुम्ही हे बोलत आहे आम्हाला काही अडचण नाही पण विषयपत्रिकेत आहे का तो विषय ? तो विषय डॉकेटवर नाही ना.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मा.उपमहापौर महोदय, आपण आपली जी सुचना मांडली ना, ती या ठरावामध्ये येऊ शकणार नाही.

**मा.उपमहापौर :-** त्याची इतिवृत्तात नोंद करुन घ्या.

**श्री.नितीन लढ्ढा :-** तुम्ही अश्या पध्दतीची चर्चा करुन तश्यापध्दतीचे निर्देश मा.आयुक्त महोदयांना देऊ शकतात.

**मा.उपमहापौर :-** मा.महापौर महोदयांनी देखील विनंती केलेली आहे आयुक्तांना.

**श्री.नितीन लढ्ढा :-** या ठरावाशी संबंधीत विषय नसेल तो. आणि या ठरावाशी संबंधीत नसल्यामुळे इतिवृत्तात चर्चेचा भाग म्हणुन तो येईल सभागृहाच्या कामकाजामध्ये परंतु ठरावामध्ये येणार नाही.

**मा.उपमहापौर :-** ठिक आहे, मा.महापौर महोदयांनी संबंधीत विषयासंदर्भामध्ये मनपा प्रशासनाला योग्य त्या सुचना द्याव्या.

**श्री.नितीन लढ्ढा :-** म्हणजे मा.उपमहापौर जे म्हणत आहे ना, त्या गोष्टीचा, सन्मा.सदस्य श्री.कैलास आप्पा आज नाही आहेत येथे, आणि भारतीताईंनी जो ठराव केलेला होता. त्याचे एक कारण अजुन म्हणतो की, आता आपला बायोमाईनींगच्या संदर्भातला टेक्नीकल सॅन्कशनला ही पत्र आपण दिलेले आहे बघा, संदर्भ क्र.जमनपा/प्रकल्प/३८२/२०२२ दि.१५/१२/२०२२ म्हणजे आज किती महिने झालेत. तीन महिन्याचा कालावधी झाला, प्रति, कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जिवन प्राधिकरण,जळगांव, स्वच्छ महाराष्ट्र अभियान नागरी २.० अंतर्गत बायोमाईनींगच्या कामास तांत्रिक मान्यता मिळणेबाबत शासन निर्णय क्रमांक सो ॲण्ड सो ४७३४ दिनांक.१०/०२/२०२२ वरील विषयास अनुसरुन जळगांव शहर महानगरपालिकेस स्वच्छ महाराष्ट्र अभियान नागरी दल अंतर्गत बायोमाईनींगच्या कामास प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. तरी सदर कामी अंदाजपत्रक व प्रशासकीय मान्यतेची प्रत सोबत जोडलेली आहे. तरी सदर कामास तांत्रिक मान्यता मिळणेस विनंती आहे. म्हणजे टेक्नीकल सॅनक्शनसाठी गेल्या तीन महिन्यापासुन हा प्रस्ताव एम.जी.पी.कडे आपण पाठविलेला आहे. आणि गिरगांवकर साहेबांचाच प्रस्ताव आहे. फि सुध्दा भरली गेलेली आहे. मला सांगा, ज्याचा ३ कोटी ४० लाख रुपयाचा निधी बायोमाईनींगचे काम करण्याच्या अनुषंगाने महानगरपालिकेला प्राप्त झालेले आहे. स्थानिक पातळीवरती येथे जळगांव मध्येच तांत्रिक मान्यतेसाठी गेलेला प्रस्ताव ३ महिने त्या झालेले असुन प्रस्तावाला मान्यता मिळत नसेल.तर कश्या पध्दतीने आपण महानगरपालिकेचे कामकाज करु. एकीकडे बायोमाईनींगचा काम होत नसल्या कारणाने त्या भागातील नगरसेवक समजा आता मनोजभाऊ सांगत होते. त्या भागातील नगरसेवकांना त्रास काय आहे की, त्या कचऱ्यावरती प्रक्रिया होत नाही. आणि प्रक्रिया होत नसल्या कारणाने

त्या संदर्भीत स्थानिक नागरीकांचे आयुषमान धोक्यात येवु शकते. आणि अश्या पध्दतीने ३-३ महिने तांत्रिक मान्यता मिळत नसेल. तर निश्चितपणे त्या अधिकाऱ्यांवर कार्यवाही करण्यात यावी.

**मा.उपमहापौर :-** मी तर सांगत आहे, त्यांचे सी.आर.च पाठविण्यात येऊ नये जो पर्यंत कार्यवाही निश्चित होत नाही.

**श्री.नितीन लढ्ढा :-** नक्की, म्हणजे कुठेतरी आपण या विषयाचे गांभिर्याची दखल घेणे गरजेचे आहे. कारण ही गंभिर बाब आहे की, ३ कोटी ४० लाखाचा निधी पडलेला असतांना तो आपण खर्च करु शकत नाही. प्रस्ताव पाठविल्यानंतर त्याला तांत्रिक मान्यता मिळत नसेल. तर ही गंभिर बाब आहे बिलकुल.

**मा.आयुक्त :-** आस्थापना, द्या उत्तर,

**मा.उपमहापौर :-** याच्यामध्ये आस्थापनेचा काही रोल नाही.

**मा.आयुक्त :-** दोन वेगवेगळया गोष्टी आहे, बायोमाईनींगच्या टी.एस.साठी एक पत्र पाठविले आणि त्यांच्या ज्या तक्रारी प्राप्त झालेल्या आहे त्या संबंधीत विभागाने उत्तर देऊ या.

**मा.उपमहापौर :-** मॅडम माझी सुचना व माझी मागणी मुळात हीच आहे. हा जो प्रकल्प जळगांव शहर वासियांना मिळणेस विलंब होत आहे. म्हणजे आपण दि.०८/०८/२०२२ च्या महासभेत ठराव केलेला होता. दि.०८/०८/२०२२ च्या महासभेमध्ये जर संबंधीत अधिकाऱ्यांनी महासभेला अवगत करुन दिले असते, अश्या पध्दतीने कायद्याचे प्रोव्हीजन दिलेले आहे. आपण संबंधीत एजन्सीला सांगु शकलो असतो की, आपण शासनाच्या गाईडलाईन्सनुसार तो योग्य पध्दतीने पाठपुरावा करुन तो डी.पी.आर. तयार करुन घेऊ शकलो असतो. परंतु महासभेला अवगत न करता अंधारात ठेवुन परस्पर रित्या त्या संबंधीत एजन्सीला हेतुपुरस्करपणे स्वत:चा हेतु साधण्यासाठी त्याला कार्यादेश द्यायचे. त्याने योग्य पध्दतीने काम नाही करायचे. आणि या सर्व गोष्टींसाठी प्रशासनाला आणि पदाधिकाऱ्यांना या ठिकाणी अडचणीत आणायचे. अश्या पध्दतीने काम या ठिकाणी झालेले आहे. या सर्व गोष्टींसाठी जे दोषी आहे ते आज रोजी निघुन गेले. परंतु भोगत तर आपण आहे. आपण अमृत २.० च्या संदर्भात अजुन निर्णय घेऊ शकत नाही याच्यामध्ये एजन्सीच्या बाबतीत निर्णय होत नाही तो पर्यंत डी.पी.आर. बनणार नाही. आणि डी.पी.आर. सादर नाही झाला तर या योजना वेळेत पुर्ण होणार नाही. आणि योजना वेळेत पुर्ण न झाल्यास ते शहर वासियांना आपल्याला सर्वांना भोगावे लागणार आहे. मग अश्या अधिकाऱ्यांच्या चुकांमुळे आपण त्यांना पाठीशी का घालायचे. आणि त्यांनी ज्या केलेल्या चुका आहे त्यासाठी त्यांना शिक्षा झालीच पाहिजे. आणि त्याच्यात वारंवार पत्र व्यवहार झालेले आहे वारंवार चर्चा झालेली आहे. सभागृहामध्ये सर्वपक्षीय सदस्यांनी रोष व्यक्त केलेला आहे. असे असतांना ही मला समजत नाही आपण त्यांना पाठीशी का घालतो आहे. झालेला विलंब, कामात केलेल्या कर्तव्यात कसुर या सर्वच गोष्टींचे आता भाऊंनी सांगितले बायोमाईनींगच्या बाबतीमध्ये, बायोमाईनींगच्या बाबतीमध्ये आपल्याला २०१८ जुलै किंवा ऑगस्टमध्ये आपल्याला शासन निर्देश प्राप्त झालेले आहे. असे असतांना त्या ठिकाणी प्रभाग क्र.०८ मध्ये जो डंपींग स्टेशन आहे त्या ठिकाणी दररोज जो दैनंदिन कचरा जमा होणार आहे. तेथे मला असे वाटते की, ३ लाख क्युबीक मिटर टन इतका कचरा तेथे साचलेला आहे. आणि त्याच्यातुन आपोआप धुर निघतो, त्या ठिकाणातील नागरीक, महापौर असतील, मी असेल, स्थानिक नगरसेवक असतील, मॅडम तुम्ही त्या भागात जाऊन पहा, नागरीक अक्षरश:, कचरेच्या डंपींग स्टेशन वरुन निघणाऱ्या धुरासाठी रस्त्यावर येऊन आंदोलन करत आहे. इतकी गंभिर परिस्थिती असतांना त्या ठिकाणी नागरीकांच्या आरोग्याला धोका निर्माण झालेला आहे. आणि असे असतांना जर महानगरपालिका प्रशासन संबंधीत चुकी केलेल्या अधिकाऱ्यांना आपण जर पाठीशी घालत असेल तर हे योग्य नाही. माझी पुनश्च आपणास व सभागृहास विनंती आहे. आणि आपल्याला मी सुचना करतो आणि महापौर महोदयांना या ठिकाणी विनंती करतो की, संबंधीतांवर कार्यवाही प्रस्तावीत करणेसाठी आपण आपल्या स्तरावर आदेश करावे.

**मा.महापौर :-** सन्मा.नितीनभाऊ यांनी मांडलेल्या सुचना आणि सन्मा.उपमहापौर कुलभुषणभाऊ पाटील यांनी मांडलेल्या सर्व सुचनांची प्रशासनाने नोंद घ्यावी आणि संबंधीत जो कोणी याला दोषी आहे. त्यांच्यावर कार्यवाहीचा प्रस्ताव हा मंत्रालयात शासन दरबारी पाठवावा.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** या ठरावाच्या संदर्भामध्ये, महाराष्ट्र जिवन प्राधिकरणाचे ३ टक्के दराने ७ सल्लागारांपैकी निवनतम दर प्राप्त होणाऱ्या सल्लागाराची नियुक्ती करणेबाबतचा हा प्रस्ताव आहे. येत्या काळात आपण ७ लोकांपैकी दर मागविणार होते. त्यात जे सर्वात कमीचे दर आहे त्याचा आपण विचार करणार आहोत. असा हा विषय आहे पण ७ लोकांचे दर आल्यानंतर एक संधी महाराष्ट्र जिवन प्राधिकरणाला

शासन म्हणुन आपण द्यावी अशी सभागृहाला माझी विनंती आहे. ७ लोकांचे दर आलेले आहे आणि सर्वात निवंतम दर जो आहे. आणि यात आपण काम करायला तयार आहात का ? असे एक पत्र देऊन त्यांना विचारावे. त्याच्यानंतर पुढचा निर्णय घ्यावा अशी माझी सभागृहाला विनंती आहे.

**मा.उपमहापौर :-** याच्या बाबतीत काल सर्वपक्षीय बैठक झाली, प्रशासनाने असेच ठरविलेले आहे, त्याच्या मध्ये महाराष्ट्र जिवन प्राधिकरणाचे पॅनलवर ज्या ७ एजन्सीज आहे, त्यांना आमंत्रित केले होते, त्यांचे काय दर दिलेले आहे, त्यांच्या कामाची पध्दत कशी आहे. शासनाला आपण सांगितल्यानंतर आपण ठरवु की, काय करायचे आहे. ते सांगु प्रशासनाला की, हे चेक करुन प्रस्ताव द्या, चेक करणे बाकी आहे.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** कालच्या मिटींगमध्ये जी चर्चा झाली, परंतु ठोस काही ठरले असे मला वाटत नाही.

**मा.उपमहापौर :-** याच्यामध्ये दराचा विषयच नाही मुळात. शासन निर्देशच असे आहे की किमान रकमेचे ३ टक्के दराने, आता या पॅनलवरती जी एजन्सीज आहे, त्यांना आमंत्रित केल्यानंतर ३ एजन्सीज पार्टीसिपेट झाल्या होत्या. ३ एजन्सीपैकी १ प्रिजेंटेशनला आला नाही, ज्या २ एजन्सीज आल्या होत्या त्यात आपल्याला तुलना करायची आहे.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** उपमहापौर महोदय, महाराष्ट्र जिवन प्राधिकरणाला का देण्यात येऊ नये.

**मा.उपमहापौर :-** ठिक आहे ना, आता प्रशासन सांगेल ना आपल्याला ते.

**श्री.नितीन लढ्ढा :-** उपमहापौर साहेब, ते कसे आहे. पोकळे साहेब जे म्हणत आहे ना, महाराष्ट्र जिवन प्राधिकरणाला आपण पत्र व्यवहार केलेले आहे. आणि दि.०३/०२/२०२३ म्हणजे मागच्याच महिन्यात. त्यांनी आपल्याला उत्तर दिलेले आहे. विषय अमृत २.० पाणी पुरवठा व मलनिस्सारण कामाचे प्रकल्पासाठी व्यवस्थापन सल्लागार सेवा पुरविणेबाबत आपल्या कार्यालयाचे पत्र क्र. सो ॲण्ड सो दि.२१/१२/२०२२ ला आपण पत्र पाठविले होते. साधारणता त्यांनी दोन महिन्यानंतर उत्तर आपल्याला दिले. विषयांकित प्रकरणी नगरविकास विभाग कार्यालयाचे शासन निर्णय क्रमांक अमृत २०२२ सो ॲण्ड सो, सो ॲण्ड सो, सो ॲण्ड सो दि.१४/०७/२०२२ अन्वये मुद्दा क्र.३१ मध्ये व शासन निर्णय क्रमांक अमृत सो ॲण्ड सो, सो ॲण्ड सो, सो ॲण्ड सो, मधील मुद्दा क्र.५ मध्ये पी ॲण्ड सी शुल्क कमाल ३ टक्के पर्यंत मर्यादीत असे नमुद केलेले आहे. त्याअनुषंगाने वरील संदर्भीय पत्राच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, विषयांकित प्रकरणी महाराष्ट्र जिवन प्राधिकरणकडुन प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार सेवा उपलब्ध करुन घेण्याची झाल्यास महाराष्ट्र जिवन प्राधिकरण ३ टक्के पी.एम.सी. शुल्क म्हणुन घेवुन काम करणेस तयार आहे. सदर बाब मान्य असल्यास त्यानुसार पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी ही विनंती.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** माझे सभागृहाला एवढेच सांगणे आहे की शासनाचीच आहे ती म्हणजे शासनच आहे ते, आणि आपल्याला पुढची जी कार्यवाही करायची आहे सर्व, ती त्यांच्या मार्फतच करायची आहे. मागचे सगळे त्यांनीच केले होते. आपल्याला पुढचे काम सोपे जाईल. नविन एजन्सी आल्यानंतर, त्यांच्या मागच्या झालेल्या चुका पुन्हा होणार नाही. या भरपुर जर छोटया मोठया गोष्टींची काळजी जर घेतली, तर योजनेवर त्याचा परिणाम होईल. प्रशासनाने या प्रमाणे कार्यवाही करावी.

**श्री.नितीन लढ्ढा :-** पोकळे साहेब कसे आहे. महाराष्ट्र जिवन प्राधिकरण हीच आपली पी.एम.सी. होती पुर्वीच्या कामामध्ये, आज अमृतची योजना सुरु होऊन आपल्याला ५ वर्षाचा कालावधी झाला, आपल्याला प्रचंड अडचणी ज्या निर्माण झाल्या या कामामध्ये त्या पी.एम.सी.महाराष्ट्र जिवन प्राधिकरण असल्या कारणाने या सगळया अडचणी निर्माण झाल्या. कारण त्यांच्याकडे तोकडे मनुष्यबळ आहे. आणि त्या तोकडया मनुष्यबळामुळे बऱ्याच वेळेला आपला मक्तेदार आणि एम.जी.पी. यांच्यामध्ये समन्वयेच होत नव्हते, आणि समन्वये होत नसल्या कारणाने या सगळया योजनांमध्ये विलंब होण्यासाठी या सगळया गोष्टी जबाबदार आहे. पी.एम.सी. कधी ही आपल्याला अत्यंत स्ट्रॉंग अशी पी.एम.सी.पाहिजे. ही आऊट डेटेड झालेली आहे. जरी शासनाची असेल आणि ते स्वत: मान्य करतात. आणि त्यांनी मान्य करण्याचे कारण म्हणजे काय ? त्यांच्याकडे असलेल्या अपुर्ण मनुष्यबळाच्या अनुषंगानेच त्यांनी या पॅनलवरती १६ कन्सल्टन्सी अपॉईंट केल्या. त्याचे मुख्य कारण ते आहे की, आम्ही ती पी.एम.सी. चांगल्या पध्दतीने राबवु शकत नाही. म्हणुन त्यांनी कन्सल्टन्ट अपॉईंट केलेले आहे. त्या कन्सल्टन्ट मधुन आपल्याला एकाची निवड करायची आहे. आणि याच्यामध्ये सुध्दा प्रशासनाने मला वाटते, जितके काही कन्सल्टन्ट होते, त्या कन्सल्टन्ट सोबत पत्र व्यवहार करुन त्यांच्याकडुन दर मागवुन घेतलेले आहे. तर त्या दराची सुचना प्रशासनाने जी आहे सभागृहासमोर द्यायला पाहिजे.

**मा.आयुक्त :-** माहिती द्या सोनगीरे साहेब,

**श्री.सोनगीरे, शहर अभियंता :-** या संदर्भात सभागृहाला सांगु ईच्छितो की, या ज्या ७ एजन्सीज होत्या, या ७ ही लोकांना आम्ही पत्र देऊन याच्यात सहभागी होण्याबाबत कळविले होते. त्यापैकी ३ लोकांनी आम्हाला कळविले होते की, त्यापैकी ३ लोकांनी आपल्याला कळविले होते की, आम्ही यात सहभागी होणेस तयार आहोत. येथे येऊन प्रिजेन्टेशन करण्याची संधी आपण त्यांना दिली होती. त्यापैकी २ एजन्सी काल उपस्थित होत्या. एकाने असे उत्तर दिले की, मला इतक्या धावपळीने येता येणार नाही. म्हणुन ते उपस्थित राहिले नाही. मग काल ज्या २ एजन्सीज आल्या त्यांचे सर्व सन्मा.सदस्यांसोबत प्रिजेंटेशन आपण बघितलेले आहे. त्यावेळेस बरेच लोकं उपस्थित ही होते. त्यांनी याचे दर ही आपल्याला सांगितले होते, जी फोरटेक्स आणि यश इमल्शन म्हणुन जी कंपनी आहे यांनी १.४०% दराने काम करण्याची तयारी दाखविलेली आहे. आणि सेन्टेक्स लि. नागपुर यांनी २.४५% च्या दराने काम करणेस तयारी दर्शविलेली आहे. आणि तिसरी जी एजन्सी काल अनुपस्थित होती, शाह टेक्नीकल कन्सल्टन्सी यांनी १.२०% दराने काम करण्याची तयारी दर्शविलेली होती पण त्यांचे प्रिजेंटेशन आपल्याला पाहायला मिळालेले नाही. परंतु या दोन लोकांचे प्रिजेंटेशन आपण पाहिलेले आहे. आणि काल बरीच चर्चा आपण सर्वांनी याच्यावर केलेली होती. पण त्याच्यावर काही ठोस निर्णय झालेला नव्हता. या ठिकाणी मी सभागृहाला असे नमुद करु ईच्छिता की, हे जे दर प्राप्त झालेले आहे. त्याच्या अनुषंगाने जर एजन्सी नियुक्त करायची राहीली तर सगळयात कमीचे दर शाह टेक्नीकल कन्सल्टन्सीचे आहे. परंतु पी.एम.सी.नियुक्त करतांना अनेक गोष्टींचा विचार केला गेला पाहिजे. आणि या ठिकाणी सर्व अनुभवी नगरसेवक देखील आहे. त्यांनाही माहिती आहे की, पी.एम.सी. जर चांगली असली तर योजना चांगल्या पध्दतीने राबविली जाते. ती टेक्नीकली साऊंड पाहिजे, प्रत्यक्ष ग्राऊंडवर काम केलेली पाहिजे. त्यांना कामाचा एक्सप्रियन्स पाहिजे. त्यांच्याकडे टेक्नीकल स्टॉफ एवढा पाहिजे, ऑलरेडी आपल्याकडे मनुष्यबळ कमी आहे. आणि पी.एम.सी.चे जर कायम कर्मचारी येथे उपस्थित राहिले तर ज्या ज्या वेळेला आपण मागु त्या त्या वेळेला योजनेचे अपडेट आपल्याला मिळत राहिल. आमच्या अटीप्रमाणे काम होत आहे किंवा नाही. हे आपण बघु शकतो. आणि प्रत्येक्ष जागेवरती चांगले काम होईल. अश्या पध्दतीने आपण टेक्नीकली साऊंड आणि अनुभवी एजन्सी नेमली पाहिजे हे आमचे मत आहे आता आपण सर्वांनी याच्यावर चर्चा करुन मार्गदर्शन करुन निर्णय द्यावे.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** काल ज्या ३ एजन्सीज आल्या, त्यात शाह जे आहे ते अनुपस्थित होते, दुसरी एक एजन्सी जी होती ती पार्टनरशीप मध्ये होती.

**श्री.नितीन लढ्ढा :-** जॉईंट वेनचर,

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** जॉईंट वेनचर असल्यामुळे, म्हणजेच ते सक्षम नसल्यामुळेच जॉईंट वेनचर आहे.ती ही अटकली, मग उरले काय

**श्री.सोनगीरे, शहर अभियंता :-** काल आपण त्यांना तेही विचारले होते,

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** जॉईंट वेनचरचे अर्थ मी तेच समजतो की, ते सक्षम नाही. तिसरी गोष्ट महत्वाची, सगळयांचे रेट आलेले आहेत. आणि आता तुम्ही गुणवत्ते विषयी बोलत आहे. दर बद्दल बोलत नाही, शाहने जर तुम्हाला सर्वात कमी दर ठरविलेले आहे तर सभागृहाला हे ठरवायचे आहे की, ३ % जास्त की, यांनी दिलेले दर जास्त आहे. आणि यांनी दिलेले दर जर आपण अपेक्षित धरले की, कमी जरी असले तर आपण म्हणत आहे गुणवत्ता पाहिजे. तर गुणवत्तेचा क्रायटेरीया काय ठरवायचं, ज्यांनी ज्यांनी दर दिलेले आहे, त्यांचे क्रायटेरीया तुम्ही आमच्या समोर मांडा, ते सक्षम कसे आहेत, त्यांच्याकडुन आपल्याला काय फायदे आहे. आणि मनुष्यबळाचा विषय आला, आता आपल्याकडे मनुष्यबळ नाही, पण म्हणतात की, पुढच्या वर्षी आपण गौरव भरती करणार, मनुष्यबळ फुलफिल होऊन जाईल. तसेच महाराष्ट्र जिवन प्राधिकरण पण सांगेल. राहिले साऊंडचे विषय, महाराष्ट्र जिवन प्राधिकरण हे सरकारच आहे. पैशांचा विषय नाही, मॅनपावरचा विषय, उद्या जर महाराष्ट्र जिवन प्राधिकरणाने १०० लोकं भरले, तर तुम्ही त्याला कसे करणार.

**श्री.सोनगीरे, शहर अभियंता :-** विषय असा आहे, काल आपणही उपस्थित होते, त्यांनी त्यांचे टेक्नीकल नॉर्मस ही सांगितले, त्यांच्याकडे उपस्थित असलेला टेक्नीकल स्टॉफ, आणि त्यांनी आतापर्यंत केलेल्या विविध कामांच्या बद्दल ही सांगितले,

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** कसे आहे आपल्याकडे १०० ठेकेदार येतात, १०० लोकं कामे भरतात, काम होऊन गेल्यानंतर कळते की, त्याच्याकडे काय आहे. आपण त्यांना वर्कऑर्डर देतो, नंतर ते म्हणतात की, सुट्टीवर गेलेले आहे, रजेवर गेलेले आहे.

**मा.आयुक्त :-** सोनगीरे साहेब, आपण आलेले दर सांगितलेले, तर सन्मा.सदस्यांचा विषय समजुन घ्यावा.आणि आपले मत व्यक्त करावे. कारण की, खुप महत्वाचा विषय आहे. सगळयांचे इनपुटस घेऊ आपण.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** मला फक्त इतकेच म्हणायचे आहे, जास्तीचे दर किंवा वर्क क्वालिटी, याच्यापैकी एक, आम्ही ३ टक्केवर बोलतो आहे की, कमी दरावर बोलतो आहे. आपण दरा विषयी बोलत आहे का हे पहिले ठरवा. दराचा विषय फायनल झाल्यानंतर मग तुम्ही क्वालिटीच्या विषयावर बोला,

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** महापौरताई, आयुक्त महोदया आणि सन्मा.सदस्य, काल सर्वांनी या विषयावर आपला पुर्ण दिवसच दिलेला आहे. मला वाटते की, सगळयात पहिले दिलीपभाऊंनी हे लक्षात घेतले पाहिजे, दिलीपभाऊ जे वारंवार म्हणत आहे की, एम.जी.पी.ही शासनाची एजन्सी आहे. त्याच्याकडे उद्या भरती होऊन जाईल, १०० लोकं येऊन जातील. एम.जी.पी.चा आपला पुर्व अनुभव काय आहे. आता जसे नितीनभाऊंनी सांगितले की, फेज-१ चे काम हे एम.जी.पी.कडेच होते. आणि कदाचित त्यामुळेच आपण सगळयात जास्त सफर झालो, नितीनभाऊंच्या मताशी मी १०० टक्के सहमत आहे. जे जे सदस्य सभागृहाचे यापुर्वीही सदस्य होते. जेव्हा या योजनेची सुरुवात झाली. सगळयांना ज्ञात असेल, जेव्हा एम.जी.पी.ने याचे डी.पी.आर. बनविले. त्यावेळेला रस्ते जे खोदले जाणार आहे. त्या रस्त्यांची दुरुस्ती अंतरभुत केलेली होती, सुनिलभाऊंनी रस्त्यांची दुरुस्ती त्यात अंतरभुत केलेली होती, पण जेव्हा ते शासन दरबारी सँक्शनसाठी गेले, त्यावेळेला वरुन ते नाकारण्यात आले, आता एम.जी.पी.ही शासनाची एजन्सी आहे असे वारंवार पोकळे साहेबांचा आग्रह आहे. पण शासन दरबारी ही शासनाचीच एजन्सी आहे. त्या कामाचा जसा डी.पी.आर. बनविला होता, तश्या पध्दतीने मंजुर करुन आणु शकलो नाही. ही वस्तुस्थिती आहे आणि त्याच्या मागचे लॉजीकल कारण हे आहे की, एम.जी.पी.चा अधिकारी त्यांच्याच वरीष्ठ अधिकाऱ्याकडे आग्रह करु शकला नाही. म्हणुन शेवटी आपल्याला जर रिजल्ट ओरियंटेड काम हवं असेल, तर आपल्याला एक दमदार एजन्सीची नियुक्ती करावी लागणार आहे. त्या दमदार एजन्सीच्या हातुन डी.पी.आर. प्रॉपर पध्दतीने बनवणे, सँक्शन करुन आणणे, आणि नंतर त्याने पी.एम.सी.ची जबाबदारी सांभाळणे, हे सगळे आपल्याला करुन घ्यावे लागेल, असे दिलीपभाऊ होऊ शकणार नाही की, फक्त कोणाचे दर काय आलेले आहे. त्यानुसार काम देऊन टाकले, असे करता येणार नाही. त्याचे सगळया प्रकारचे निकष तपासावे लागणार आहे. सोनगीरे साहेबांनी येथे सांगण्याचे प्रयत्न येथे केलेले आहे. अगदी सादा सरळ विषय आहे. मुळात एम.जी.पी.ने स्वत: रेकॉर्डवर पत्र दिलेले आहे की, आमच्याकडे मनुष्यबळ नाही. मनुष्यबळ अभावी आम्ही हे काम करु शकत नाही. त्यामुळे ह्या १६ एजन्सी इमपॅनलमेंट केलेल्या आहेत. या १६ एजन्सीची आर्थिक वर्गवारी ठरवुन दिली, डी.पी.आर. आपला २०० कोटीच्यावर जाणार आहे पाणी पुरवठयाच, २०० कोटीचा डी.पी.आर. बनविण्यासाठी ७ एजन्सी आहे. त्या ७ च्या ७ एजन्सीला प्रशासनाने फोन केले पत्र व्यवहार केले. ७ पैकी ३ एजन्सीजने इन्ट्रेस्ट दाखविले, एक शाह, एक फोर्टीज जॉईट वेनचर यश इनोव्हेशनचे, तिसरे सिनसीक्स, यापैकी दोनच लोक हजर झाले, शाह आलेच नाही, त्यांना कितपर्यंत इन्ट्रेस्ट आहे ते आपल्याला येथुनच दिसत आहे. मग हा विषय फक्त असाच मुव्ह ऑन करायचा आहे का ? ज्या दोन एजन्सीजने आपल्यासमोर प्रिझेन्टेशन दिलेले आहे.त्याचे पुर्ण प्रशासनाकडुन समजुन घेऊन, निर्णय घ्यायचा आहे. फक्त या मुद्दयावर आपल्याला करता येणार नाही. दर ज्याचे कमी आलेले आहे त्याला देऊ. कदाचित उद्या १ टक्केने काम करणारी एखादी एजन्सी तयार होईल. पण त्याची कॅपेसीटी पण आपल्याला चेक करावी लागणार आहे. आणि अर्थातच आपण जे काही पेमेंट करणार आहोत. ज्या एम.जी.पी.च्या गाईडलाईन दिलेल्या आहे त्या स्लॉटनुसार पेमेंट होणार आहे. त्याचे स्लॉट डिसाईडेड आहे. किती काम झाले किती परसेंटेजनुसार त्यांना पैसे अदा करायचे आहे. त्यानुसारच ते होणार आहे. त्यामुळे असा तर्क बांधणे हे सुध्दा चुकीचे आहे. मला आयुक्त महोदयांनी हे सभागृहासमोर सांगावे. आपण काय काय हित बघितले पाहिजे. जे सोनगीरे साहेबांनी थोडक्यात सांगितले होते, ते अजुन डिटेल मध्ये सभागृहासमोर आणा की, सगळयात महत्वाचे आपल्याला काय बघावे लागणार. काल ज्या दोन एजन्सीज आल्या होत्या. त्यांची

तुलना जर केली, त्यांचे अनुभव, त्यांनी केलेले कामे, त्यांची वर्कींग कॅपेसीटी, त्यांचे मनुष्यबळ, त्यांचे टर्नओवर, ह्या सगळया गोष्टींची पुर्तता करुन प्रशासन सादर करु शकतो सभागृहासमोर की, या दोन पैकी कोणती एजन्सी चुझ करायची. एम.जी.पी. ही एजन्सी असावी असे व्यक्तीश: मला वाटत नाही. कारण एम.जी.पी.चा आपल्याला पुर्व अनुभव चांगला नाही. एम.जी.पी. स्वत: म्हणते की, आम्ही काम करायला सक्षम नाही. म्हणुनच या १६ एजन्सी इनपॅनल केलेल्या आहे. म्हणजे एम.जी.पी.चा विषय येथेच संपला, आणि मुळात आपल्याला कमाल मर्यादा ठरवुन दिलेली आहे. ३% ही कमाल मर्यादा आहे. त्याच्या आत मध्ये आपण जो काम देतो आहे त्याच्यामध्ये ऑडिट ऑब्जेक्शनचा प्रश्नच निघत नाही. हवे तर त्याच्यात एक्सपर्टचे ओपेनियन घेऊन विषय क्लियर करावे.

**मा.उपमहापौर :-** त्यांनी जे पत्र दिलेले आहे लेटेस्ट, त्यांनी पण म्हटलेले आहे की, आमचे PMC चार्जेस ३% असतील. त्याच्यापेक्षा हे कमी आहे.

**ॲड.शुचिता हाडा :-** आणि शेवटी एम.जी.पी.ला जरी दिले तर एम.जी.पी. आऊटसोर्सच करणार आहे. या १६ एजन्सीमधुनच कोणाला एकाला देणार आहे. मग आपणच या एजन्सीवर आपला अंकुश का ठेवायचे नाही. आणि शासन स्तरावर वजन असणारी दमदार एजन्सी नेमा. जेणे करुन फेज-१ मध्ये आपण जे सफर झालो, तसे पुन्हा पुन्हा सफर व्हायला नको.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** जो तिसरा आहे, सोनगिरे साहेब, आपण सांगितले की, शाह कंपनी आहे. त्याचे १.२० बरोबर आहे. त्यांना ही बोलवुन घ्या समोर चर्चा करुन घ्या.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** सभागृहाला हे सांगा पहिले की, आपल्याला दरावर चर्चा करायची आहे की, क्वालिटीवर चर्चा करायची आहे. हे पहिले ठरवा.आयुक्त महोदया.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** या विषयाच्या संदर्भात मी महापौरांच्या दालनात मी मिटींगमध्ये होतो. विषय असा आहे आता जे पोकळे साहेबांनी सांगितले, शुचितातार्इंनी मांडले. मी दोन तीन मुद्दे तुम्हाला विचारणार आहे, त्याचे उत्तरे रेकॉर्डवरती घ्या. आणि या विषयाला मार्गी लावा. पहिला मुद्दा जे आता सोनगिरे साहेबांनी या कंपन्यांचे दर सांगितले. आणि एक कंपनी काही कारणास्तव येऊ शकली नाही. असे त्यांचे स्टेटमेंट आहे. हा पहिला मुद्दा तुम्ही शासनाने निवडलेल्या ७ एजन्सीला पत्र पाठविले. ७ एजन्सीपैकी ३ एजन्सीने तुम्हाला अप्लाय केले.दोन एजन्सींनी प्रिझेन्टेशन दिले.एक एजन्सीने प्रिझेन्टेशन दिले नाही. म्हणुन तुमचे मत असे आहे की, ती प्रिझेन्टेशनला आली नाही म्हणुन तिला विचारात घेतले जाऊ नये. असे आहे का ? कारण त्यांनी तुम्हाला सांगितले की, मला वेळ नाही. तुम्ही त्यांना केव्हा कॉल केले. त्यांना कॉल केव्हा केले.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** ज्यावेळेला ठरले की, एजन्सीला काम द्यायचे आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** बरोबर, आता जर त्यांचा हा निरोप आहे. हा एक मुद्दा झाला, ७ एजन्सी जेव्हा शासनाने ठरवुन दिलेली आहे तर तुम्ही कसे म्हणतात की, यांच्याकडे मॅनपावर आहे यांच्याकडे नाही. मी चौथी पास आहे पण माझे कपडे चांगले आहे माझा चष्मा चांगला आहे. त्याच्यामुळे तुम्ही असे बोलु नाही शकत की, मी गोल्ड मेडलीस्ट आहे. हे तुम्ही माझ्या बोलण्यावरुन वक्तव्यावरुन थोडी सिध्द करु शकतात. याच्यामुळे हा जो विषय आपला चर्चेला सुरु आहे. ७ एजन्सी जेव्हा शासनाने ठरवुन दिलेली आहे.शासनाने त्यांचा जी.आर. काढलेला आहे. म्हणजे त्याची काहीतरी क्रेडीबीलिटी असेल ना. त्याला काही तरी मान्यता असेल. त्यांची काहीतरी कंपनी असेल रजिष्टर्ड. त्यांच्याकडे माणसे आहे की नाही त्यांचे रेकॉर्डवर असेल. हे तुम्ही परस्पर कसे ठरवु शकतात. जेव्हा शासन तुम्हाला एजन्सी देऊन राहिला आहे त्याच्या हिशोबाने मग तुम्ही १.२० वाल्याला सोडा, १.४ वाल्याला सोडा आणि २.५ वाल्याला द्याल, मग पोकळे साहेब म्हणतात तसे एम.जी.पी.तर ही शासनाची एजन्सी आहे. मग शासनाच्या एजन्सीवर तुम्हाला भरोसा नाही का ?किंवा शासनावर तुम्हाला विश्वास नाही का? एक मिनीट दुसरा विषय, एक मिनीट त्यांनी लेखी दिल्यानंतर त्यांनी दर दिलेले आहे. तुम्ही जे म्हणत आहे ते आधीचे विषय आहे. त्याच्यानंतर त्यांनी तुम्हाला ३ तारखेचे दर दिलेले आहे.

**मा.उपमहापौर :-** त्याच्यापेक्षा कमी % हे आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** मग मी हेच सांगतो, आता ३% हा शासनाने काय म्हणतात अबाऊ हे फायनल केलेले आहे. आता आपण एखादी निविदा काढतो. त्याचे दर आपण ठरविलेले आहे. इस्टीमेटेड कॉस्ट. जर समजा कोणी बिलो दिले आपल्याला टेन्डर मध्ये बिलो रेट दिले मग आपण त्याला म्हणणार का की, हा काम करणार नाही. याला देऊ नका टेन्डर. असे म्हणणार आहे.

**मा.उपमहापौर :-** नॅर्मस, नॅर्मस.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** तेसच म्हणत आहे मी. ७ एजन्सी कोणी ठरवुन दिल्या आहेत तुम्हाला, शासनाने नॅर्मस कोणी ठरवुन दिलेले आहे शासनाने, ती एजन्सी तर नॅर्मस प्रमाणेच काम करणार आहे ना. मग एखादे टेन्डर जर बिलो आले आणि आम्ही अबाऊला मंजुरी दिली. तर मला लेखाधिकाऱ्यांनी सांगावे की, त्याचे ऑडिट शक निघेल की नाही निघेल. सांगावे मला.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** उद्या जर बिलोवाल्याला काम दिले ना तर त्याच्याकडुन आपण गॅरंटी भरून घेतो. कारण का उद्या त्यानी बिलोचे रिट टाकले आणि कामच नाही केले तर आपल्या हातात काही तरी पाहिजे. असे आपण करतो बिलो वाल्याच्या बाबतीत.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** बिलो घेतो पण त्यालाच देतो ना काम.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** हो.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** त्याची पत्रता आहे की नाही हे पाहतो का आपण.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** त्याला आपण जे मागीतलेले आहे कागदपत्र त्याच्या प्रमाणे तो काम करतो.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** बरोबर आहे, शासनाने तुम्हाला ७ एजन्सी दिली. त्या बाकीच्या पात्र नाही का ३ पैकी,त्याचे उत्तर तुम्ही घ्या रेकॉर्डवर. मग आता लेखाधिकाऱ्यांनी सांगाव, या तिन एजन्सीपेक्षा जर आपण एम.जी.पी.ला जरी दिले आजच्या घडीला. किंवा त्याच्या खालच्या माणसाला दिले.तर तो ऑडिट मध्ये निघणार आहे की नाही. त्याचा खुलासा लेखाधिकाऱ्यांनी येथे द्यावा.रेकॉर्डवर हा विषय घ्यावा.सोपा विषय आहे. कारण दर तुमच्याकडे आलेले आहे. दर आता तुमच्या सांगण्याप्रमाणे दिलेले आहे.

**श्री. चंद्रकांत वानखेडे, उपायुक्त तथा मुलेअ :-** विशालभाऊंनी जो मुद्दा उपस्थित केलेला आहे. त्याचा खुलासा करायला लावलेला आहे.शासनाने जिआर काढला सप्टेंबर २०२२ ला आपल्याला जे टप्पे करून दिलेले आहेत. त्यानुसार करता येईल किंवा हे सात पॅनल जे आहेत ते ओपन टेंडर करता येतील. आता शासनाने जी नियुक्ती केलेली आहे या सात लोकांची , ती काय सहज केली आहे का ? त्यांनी सुध्दा ओपन टेंडर केले असेल आणि आपल्यापेक्षा टेक्निकल लोक हे केले असतील आणि विशालभाऊंनी सांगीतल्याप्रमाणे स्क्रुटिनी करून आणि सगळी कागदपत्र तपासुन सर्व धोरण तपासुन पॅनलवर त्यांना घेतलेले आहे आणि त्यांनी आपल्याला कळविलेले आहे की ७ माणस शासनाने नियुक्ती केलेली आहे. आता प्रश्न असा आहे की आता पोकळेभाऊंनी जसे सांगीतले की, आपण MJP ला विचारले तर MJP करायला तयार नाहीये आणि ते MJP ७ लोक करायला तयार आहे आपल्या रेट प्रमाणे करायला. आपण त्यांना विचारत होते. आपण शासनाच्या आदेशाप्रमाणे करायला हे तयार आहेत. आता प्रश्न असा आहे की ओपन टेंडर करून करता येईल पण आपल्याकडे इतके एक्सपर्ट माणस नाहीयेत अस माझ स्वत:च मत आहे. कारण काय दुसरा विषय त्याची स्क्रुटीनी करायची आपल्याला शासनाने रेडीमेड दिलेले आहे आणि हे ७ माणस दिलेले आहेत की हे सात माणस नियुक्त केलेले आहेत तुम्ही यांना द्या. आता सात लोकांची जी नियुक्ती करायची आहे आपल्याला तर शासनाने त्यांना रेट निश्चित करून दिलेली आहे. म्हणजे चार असेल काय सातवा असेल काय तर ते फिक्स करून दिलेले आहे शासनाने, तरी देखील आपल्या महापालिकेचे हित पाहाता जास्तीत जास्त फायदा होण्याच्या दृष्टीकोनातुन आपण त्यांना ऑफर लेटर पाठवले होते. बरोबर ना बोरोले आणि त्या सात लोकांना पत्र दिले आहे की आम्हाला असे असे काम द्यायचे आहे. आणि त्या सात पैकी तिन लोक आले. एकाने सांगीतले की मी हे काम १.२५ ने करायला तयार आहे असे आणि एकाने सरसकट करायला तयार आहे आणि एकाने टप्पे दिलेले आहेत. तर माझ वैयक्तिक मत अस आहे की शासनाने जे नियुक्त केलेले आहे त्याच्यामधुन ज्याने लोयेस्ट रेट दिलेले आहेत आणि त्या तिघांनी म्हणुन दिलेले आहे की आम्ही तुमच्या म्हणण्याप्रमाणे आम्ही काम करायला तयार आहे. बरोबर आहे का बोरोले साहेब आज आपण त्यांना अस म्हणु शकत नाही की त्यांच्याकडे

मॅनपॉवर आहे की नाहीये कारण शासनाने बघितले आहे त्यांच्या स्तरावर , त्याच्याशिवाय शासन निर्णय निघालेला नाही. आपल काम एकच आहे की सगळयात कमी ऑफर जो देत असेल कॅल्क्युलेशन प्रमाणे लोयेस्ट देत असेल जर त्याला काम दिले आपण तर आणि जर तो अटी शर्तीप्रमाणे काम करायला तयार असेल तर त्याला वर्कऑर्डर दिल्यावर तर त्याच्याकडून काम करून घ्याव लागेल नाही केले तर आपण त्याला ब्लॅकलिस्ट मध्ये टाकु आणि शेवटी बिल काढायच की नाही ते आपल्या हक्काच आहे कारण पेमेंट देतांना महासभेची मंजुरी घेवुन देणार आहे कारण काम चांगले झाले आहे किंवा नाही. तर अशा पध्दतीने आपण जर फर्स्ट लोयेस्ट सोडून जर आपण सेकंड किंवा थर्डला दिले तर हा एक पॉईंट ऑडीट मध्ये तिथे उपस्थित राहणार आहे कारण जर आपण एल-१ ला दिले तर कमीत कमी महापालिकेचा ५० लाखांच्या पुढे फायदा होणार आहे. पैसे वाचणार आहे महापालिकेचे

**श्री.नितीन लढ्ढा** :- जास्त वाचतील.

**श्री. चंद्रकांत वानखेडे, उपायुक्त तथा मुलेअ :-** ५० लाखांपेक्षा म्हणजे ७५ लाखांच्या पुढे तर आपण जर आपल्या महापालिकेच हित बघितल तर त्यामध्येही हे होणार आहे तर त्यामध्ये जो लोयेस्ट येईल. काम करायचा प्रश्नच नाही कारण तो करणारच आहे आणि त्याला द्यावे अस मला वाटत आणि जर आपण म्हंटल की त्याला लोयेस्ट सोडून सेकंडला काम दिल तर ऑडीटमध्ये नक्कीच प्रश्न उपस्थित होणार आहे.

**श्री. विशाल त्रिपाठी :-** वानखेडेसाहेब तुम्ही जो आता मुद्दा मांडताहेत तर त्याचेपण जस आता होणे गरजेचे आहे. कारण तुम्ही कस म्हणाले की स्लॅब दिलेला आहे. हे कसे की कॅल्कुलेशन केले आहे ते सुध्दा सभागृहापुढे सांगा.

**श्री. चंद्रकांत वानखेडे, उपायुक्त तथा मुलेअ :-** बोरोलेसाहेबांनी कॅल्कुलेशन तक्ता बनविलेले आहे केले आहे ना बोरोलेसाहेब त्यांनी केलेले आहे आणि मला अस वाटत की १.२० वाला जो आहे तो योग्य आहे. जो लोयेस्ट आहे तो योग्य आहे.

**श्री. विशाल त्रिपाठी :-** म्हणजे जो साढेचार रूपया वाला आहे, अडीच रूपये वाला , तिन रूपये वाला आहे या स्लॅब मध्ये तेच काम तो १ रूपया २० पैसे वाला करणार आहे. कारण त्यांनी सांगीतले ना तर मी कन्फ्युज झ ाालो.

**श्री. चंद्रकांत वानखेडे, उपायुक्त तथा मुलेअ :-** हो आणि त्याला आपण त्याला देणार आहे आणि जरी १.२० असेल तो जरी पुढे गेला तर आपण जो सिलॅबस ठरलेला आहे त्याच्यापुढे आपण जाणार नाही. आता काल जो आला होता प्रेझेंटेशनसाठी आणि काही टेक्निकल प्रॉब्लेम मुळे तो आला नाही तर त्याला सुध्दा बोलावुन घेता येईल आणि जो प्रेझेंटेशनकरीता आला म्हणुन त्याला आपण काम द्याव अस मला तरी वाटते की ते योग्य नाहीये. तो काम करायला तयार आहे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- याच्यामध्ये मला काय वाटत

**श्री. चंद्रकांत वानखेडे, उपायुक्त तथा मुलेअ :-** काम द्यायला काही हरकत नाहीये जस विशालभाऊंनी मांडल्याप्रमाणे परंतू आपल्याकडे फाईल असल्यामुळे ऑनपेपर मुद्दा ऑडीटमध्ये उपस्थित होणार आहे किंवा होवू शकतो.

**श्री.नितीन लढ्ढा** :- मा.महापौरताई याच्यामध्ये कुठेतरी अंतिम निर्णय घेण्याची वेळ आलेली आहे. कारण हे प्रकरण साधारणत: आठव्या महिन्यामध्ये सुरू झालेले होते. आठव्या महिन्यामध्ये निसर्ग कंन्सलटंटला २.५० टक्क्यांमध्ये हे काम देण्यात आलेल होत. त्यावेळेला सभागृहाला विश्वासात न घेता हे काम देण्यात आलेल होत असा आक्षेप आपला सभागृहाचा होता आणि त्याच्यामुळे ते काम आपण रद्द केल होत. ते काम रद्द केल्यानंतर साधारणत: दिवाळीच्या अगोदर दिवाळी मला वाटत दोन दिवस होती आणि दिवाळीच्या तोंडावर तातडीने आपण महासभा बोलावली होती. या विषयावर तातडीने निर्णय होण अपेक्षित होत कारण याचा निधी परत जाईल या दृष्टिकोनातुन आदरणिय आमदार राजुमामा यांनी महानगरपालिकेमध्ये बैठक आयोजित केली होती तातडीची महासभा बोलावुन त्याच्यावर निर्णय झाला होता. निसर्गवाल्याला दिलेले काम हे तातडीने रद्द कराव आणि अशा पध्दतीने प्रशासनाने अहवाल सादर करावा. आज साधारणत: मला सांगा की आपली जी महासभा झाली होती साधारणत: २१/१०/२०२२ ला म्हणजे आज किती महिने झाले त्याला बरोबर ५ महिने झाले आहे आज या ५ महिन्याच्या कालावधीमध्ये सुध्दा आपण या विषयाच्या निर्णयापर्यंत येवु शकलो नाही की सदरहु कंन्सलटंट कोणाला अपॉईंट करावा आणि कोणाकडुन काम कराव म्हणजे जितकी तत्परता ज्यावेळेला आमदारांनी सभा घेतली त्या सभेच्या मिटींगमध्ये झालेल्या महापालिकेच्या जवळपास येथे चार तास चर्चा झाली आणि चार तास चर्चा झाल्यानंतर चार ते पाच महिन्यांचा कालावधी होवुन गेला अजुन आपण त्या

विषयावर कोण कंन्सलटंट नेमावा या चक्रव्युहातुन सुध्दा बाहेर पडलेलो नाहीये. तर मला काय वाटत की यासंदर्भात जो काही निर्णय घ्यायचा असेल तो तातडीने घेवुन या विषयाला एक अंतिम स्वरूप देण्याच्या संदर्भातील भुमिका स्विकारावी. आताच ऑडीटर साहेबांनी जो विषय सांगीतला की याच्यामध्ये या तिन ऑफर आलेल्या आहेत आणि पोकळे साहेबांच अस म्हणण होत की MJP ला विचारणा करण्यात यावी. त्यांच्यात आपण खुलासा केला की MJP त्याच्यापेक्षा ३ टक्क्यांच्या पेक्षा कमी मध्ये काम करायला तयार नाहीये. राहीले आता पोकळेसाहेब आपण आग्रह धरता MJP चा MJP चे ८ एप्रिल २०२१ चे पत्र आहे. या पॅनलवर नेमणुकीची त्यांची भुमिकाच तुम्हाला दाखवतो की ८ एप्रिल २०२१ ला महाराष्ट्र जिवन प्रधिकरणाने महाराष्ट्र जिवन कडुन करण्यात येणारी प्रकल्पांवर कामे करणेकरीता विभागनिहाय कामे करणेबाबत त्याच्याबाबत त्यांनी कारणेमिमांसा केली आहे की महाराष्ट्र जिवन प्राधिकरणमध्ये दिवसेंदिवस कमी होणाऱ्या मनुष्यबळाच्या अभावी महाराष्ट्र जिवन प्रधिकरण मार्फत अंमलबजावणी करण्यात येणाऱ्या योजनांच्या बाबतीत अडचणी निर्माण होवू नये यादृष्टीने महाराष्ट्र जिवन प्रधिकरण मार्फत अंमलबजावणी करण्यात येणाऱ्या ग्रामीण व नागरी कामे पाणी पुरवठा व मलनिस्सारण योजनेंच्या अंमलबजावणी करणेकामी प्रकल्प व्यवस्थापन करण्यासाठी पॅनल तयार करून नेमणूक करण्यासाठी मा.संचालक मंडळाच्या दि.०२/०९/२०२० च्या बैठकीत विषय क्रं. १६ नुसार मंजुरी प्रदान करण्यात आली आहे. मंजुर प्रकल्पांच्या व्यवस्थेकामी पॅनल त्यांनी गठीत केलेले आहे. म्हणजे या महाराष्ट्र जिवन प्रधिकरण स्वत: मनुष्यबळाअभावी पॅनल नियुक्त करतात आणि आपण एकीकडे आग्रह धरतो की ते काम महाराष्ट्र जिवन प्राधिकरणाकडे सोपवावे. तर आपण त्याच्यामध्ये आलेल्या कंन्सलटंट आणि महाराष्ट्र जिवन प्रधिकरणाच्या सुचना सुध्दा आपण बघितलेल्या आहेत ते सुध्दा हायेस्ट स्टॅंडर्ड आहे. आपण जर कधी बघितले की एका कंन्सलटंटने दिलेले दर आहेत ४ रूपये ९० पैसे सेन्सेक्स टेक्नॉलॉजी नागपुर त्याच्यानंतर ओटीस आणि जस्ट ईन्क्लु यांनी दिलेले आहे १.४० आणि शाह टेक्निकल कंन्सलंटंट मुंबई यांनी दिलेले १.२० , साधारणत: कस आहे की महाराष्ट्र जिवन प्रधिकरणाकडुन काम केल आणि २०० कोटींची योजना असेल तर साधारणत: कंन्सलटींग फी ६ कोटी रूपये महाराष्ट्र जिवन प्रधिकरणाला द्यावे लागतील. सेंन्सेक्स नागपुरवाल्याला काम दिले तर ४ कोटी ९० लाख रूपये द्यावे लागतील. ओटीस सोल्युशनला दिले तर साधारण २ कोटी ८० लाख रूपये द्यावे लागतील आणि शाह कंन्सलंटंन्सी ला दिले तर साधारण २ कोटी ४० लाख रूपये द्यावे लागतील. म्हणजे साधारणत: फर्स्ट आणि थर्डमध्ये साधारण जवळपास साढेतिन कोटी रूपयांचा रेट डिफरेंट येतो. तर महानगरपालिकेच्या आर्थिक हिताच्या दृष्टीकोनातुन सभागृहाने कुठेतरी निर्णय घ्यायला पाहीजे आणि निर्णय घेवुन लवकरात लवकर या विषयाच्या बाहेर पडायला पाहीजे. हि माझी सभागृहाला विनंती आहे.

**श्री.दिलीप पोकळे** :- नितीनभाऊ मला काय वाटतय की ज्यांनी सर्वात कमी दर दिलेले आहे ते प्रिझेंटेशनला येवू शकले नाही. तर त्यांना कसे अप्रोच करता येईल. येण्याकरीता तर तो एक प्रयत्न आपण करावा.

**ॲड.शुचिता हाडा** :- महासभेपुढे नितीनभाऊ जसे प्रशासनाने हे सुध्दा येथे विक्षिप्त कराव की फक्त लोयस्ट दर हा एवढा एकच मुद्दा विचारात घेवुन चालणार आहे का ? मग आपण काल जे प्रिझेंटेशन घेतलं ते कशासाठी घेतले. आता यांचे स्कॉटनुसार जे दर ठरवुन दिलेले आहेत. शासनाने जे दर ठरवुन दिलेले आहेत. मग खर तर तस म्हंटल तर प्रशासनाने दर कोट करायची काहीच गरज नव्हती.

**श्री.नितीन लढ्ढा** :- नाही नाही ताई तस नाहीये.

**ॲड.शुचिता हाडा** :- मग तस म्हंटल तर आपण या ७ एजन्सी पैकी एक नेमणार आणि याच्यात फक्त आर्थिक वर्गवारी हा एवढा निकष हा एकच मुद्दा आहे काय ? याच्यामध्ये दर कसे लावावे लागणार आहे कोणकोणते निकष लागणार आहेत. मग कोणते निकष लागणार आहे हे सगळं प्रशासनाकडून आले पाहीजे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- नाही नाही ताई याच्या संदर्भामध्ये जस आता विशालभाऊ बोलले आणि वानखेडेसाहेब बोलले. तर दोन गोष्टी याच्या अनुषंगाने येथे सांगणे गरजेचे वाटत की कंन्सलटंट अपॉईंट केलेले आहेत महाराष्ट्र जिवन प्राधिकरणने आणि कंन्सलटंट अपॉईंट करत असतांना कुठेतरी काही क्रायटीरीयाज असतील आणि त्या क्रायटीरीया फॉलो केल्यानंतरच हे पॅनल गठीत झालेले आहे. म्हणजे त्याचा अर्थ की महाराष्ट्र जिवन प्राधिकरणने या सगळ्या गोष्टींची खातरजमा केलेली असेल. राहीला प्रश्न की आपल्या कामाचे जे स्वरूप आहे अमृत २.० च्या ज्या गाईडलाईन आहेत. त्या केंद्रशासनाच्या गाईडलाईन या सर्वश्रुत आहे. म्हणजे हे तिघे चारही जे कंन्सलटंट आहेत याच्यामध्ये पत्रव्यवहार केला असेल आणि कन्स्पेट दिला असेल आणि कन्स्पेट देवुन यांचे दर दिले असतील. तर त्यांना या सगळ्या कामाची व्याप्ती ही माहिती आहे आणि त्यांनी या कामाची व्याप्ती अभ्यास करून त्या दृष्टीकोनातुन आपल्याला दर दिलेले आहेत आणि आपण ते प्राथमिक दृष्टया गृहीत धरतोय

आणि या उपरांत आता वानखेडे साहेबांनी सांगीतले की, या संदर्भात त्यांच्या काही डिपॉझिट आपल्याकडे असतील किंवा आणि काम केल्यानंतर त्यांनी आपल्याकडे समाधानकारक काम केल्यानंतरच त्यांच्या बिलाची अदायगी आपण करू. तर अशा पध्दतीने या तिघं कंन्सलटंटच्या दरांचा विचार हा आपल्याला ऑडीटच्या दृष्टीकोनातुन सुध्दा करणे गरजेचे वाटत आहे. तरी सभागृहाने या संदर्भात चर्चा करून एकमत कराव आणि योग्य तो निर्णय सभागृहाने सर्वानुमते घ्यावा अशी विनंती आहे.

**श्री.दिलीप पोकळे** :- भाऊ मी काय म्हणतो आहे की या एजन्सीज पॅनलवर आहेत महाराष्ट्र जिवन प्राधिकरणाच्या पॅनलवर आहेत आणि आपल्याही पॅनलवर आहेत. म्हणजे याच्यावर विषय असा आहे की आता राहीला विषय दर काय आहेत. साहेबांनी सांगीतले की ऑडीटचा विषय येईल.

**श्री.नितीन लढ्ढा** :- हो हो.

**श्री.दिलीप पोकळे** :- तिन टक्के, दोन टक्के, एक टक्का तर याच्यामध्ये त्याने

**मा.उपमहापौर** :- याच्यामध्ये या आपण ऑनलाईन पध्दतीने निविदा मागविल्या त्याच्यानंतर आपण त्यापध्दतीने देवू शकता.

**श्री.दिलीप पोकळे** :- नाही त्याच्यामध्ये त्यांनी जो दर दिलेला आहे. आपण त्याला निविदा देता आहेत तर त्याला येथे बोलावुन घ्यावे आपण

**श्री.नितीन लढ्ढा** :- नाही नाही.

**मा.उपमहापौर** :- पोकळेसाहेब आज मला अस वाटत की या विषयावर निर्णय घेतला पाहीजे. आता आपण जे रेट कोट करू पण मग आता ते ऑनलाईन मध्ये आणि आठ महिन्यांचा वेळ झाला आहे.

**श्री.दिलीप पोकळे** :- भाऊ आता मागचा ठराव जो होता तो आपल्या डॉकेटमध्ये आलेले आहे. त्याच्यामध्ये जे नमुद केलेले आहे की शहर अभियंता यांनी सादर केलेल्या प्रस्तावामध्ये प्रश्न विचारलेले आहेत की निसर्ग वाल्याला काम दिलेले होते ते रद्द केलेले आहे किंवा कसे? याबाबत कायदेशीर रित्या काही अडचणी निर्माण होतील का, किंवा त्यांचे कार्यादेश रद्द केले आहे किंवा कसे? त्याचा परिपुर्ण अहवाल तात्काळ तयार करून पुढील महासभेसमोर सादर करण्यात यावे. आता या प्रस्तावामध्ये तस काहीही दिले नाहीये. ते रद्द झाले आहे का,त्याचा कार्यादेश रद्द झालाय का ? ते काही दिसत नाहीये

**श्री.नितीन लढ्ढा** :- ते तर रद्द केले आहे आपण

**श्री.दिलीप पोकळे** :- ते आले नाहीये हा ठरावच परिपुर्ण नाहीये. हा ज्यावेळेला आपण तहकुब ठेवलेला होता त्याची या ठरावाची याच्यामध्ये कुठेच चर्चा नाहीये.

**श्री.नितीन लढ्ढा** :- नाही नाही पोकळेसाहेब

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी चर्चा करीत होते त्यामुळे सभागृहातील चर्चेचा स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.नितीन लढ्ढा** :- पोकळेसाहेब हे बघा पॅरा नंबर दोन मध्ये ही सदर कामे महानगरपालिकेने यामध्ये नियुक्त निसर्ग कंन्सलटंन्सी यांना २.५० टक्के दराने काम दिलेले होते. तथापी मार्गदर्शक सुचनांप्रमाणे त्यांनी डिपीआर न केल्याने सदर कामे नियुक्ती दिनांक १७/०१/२०२३ रोजीच्या पत्रानुसार रद्द केलेली आहे. म्हणजे निसर्ग कंन्सलटंन्सी चे कार्यादेश रद्द केलेले आहे आणि आपल्याला निविदा प्रक्रीया राबविण्याचा हा प्रस्ताव आहे.

**श्री.दिलीप पोकळे** :- भाऊ दिनांक १७/०१/२०२३

**श्री.नितीन लढ्ढा** :- त्यापत्रानुसार रद्द केलेले आहे.

**श्री.दिलीप पोकळे** :- हो

**श्री.नितीन लढ्ढा** :- म्हणजे निसर्ग कंन्सलटंट ला रद्द केलेले आहे महापालिकेने

**श्री.दिलीप पोकळे** :- म्हणजे तांत्रिकदृष्टया हा योग्य आहे अस तुमच म्हणण आहे.

**मा.आयुक्त :-** परिपुर्ण प्रस्ताव सादर केला आहे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- मला तरी वाटते ताई की कुठेतरी सभागृहाने एकमत करून या विषयावर निर्णय घेण गरजेच वाटतय.

**ॲड. शुचिता हाडा** :- भाऊ या विषयाबद्दल बोलले आता आपल्याला अमृत २.० चा जर निर्णय घ्यायचा आहे. आता वस्तुस्थिती काय दिसते आहे की जो टेंडर जो एल-१ आलेला आहे तो आतापर्यंत आपल्यापर्यंत आलेला दिसत नाही.

**श्री.नितीन लढ्ढा** :- बरोबर आहे.

**ॲड. शुचिता हाडा** :- म्हणजे त्यांच प्रिझेंटेशन आपण बघितलेले नाही मग आपण एल-१ आलेला आहे तर काम द्यायच का? असा निर्णय घ्यायचा आहे बरोबर आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी** :- भाऊ मला एक सांगा की ७ एजन्सी

**मा.उपमहापौर** :- विशालभाऊ एक मिनिंट ताईंच जे म्हणण आहे की आपण ज्याला बघितले नाही. याला आपण काम द्यायचे का ?

**ॲड. शुचिता हाडा** :- नितीनभाऊ तो कदाचित एल-१ आलेला असेल

**श्री.विशाल त्रिपाठी** :- बरोबर आहे. साहेब एक सांगा अस म्हंटले आहे का की त्या ७ एजन्सीने त्या-त्या महापालिकेत जावुन डेमो द्यावा किंवा प्रिझेंटेशन द्यावे.

**ॲड. शुचिता हाडा** :- मग कशासाठी त्यांचे रेट आले आणि प्रतिनिधी आले होते कशासाठी त्यांच प्रिझेंटेशन घेतले. सात एजन्सी पैकी कोणत्यातरी एजन्सीला द्यायचा हा क्रायटेरिया ठेवावाच लागणार ना

**श्री.नितीन लढ्ढा** :- ताई एल-१ च्या संदर्भातील भुमिका स्पष्ट करतो की काय झालय की पॅनलवर ७ एजन्सीज होत्या आणि ७ एजन्सीला रेटचे क्रायटेरिया महाराष्ट्र जिवन प्राधिकरणाने ठरवुन दिलेले होते. परंतू मग ७ मध्ये एकाचीच नियुक्ती आपण करण्याच्या संदर्भात आग्रह धरला समजा, तर मग त्याचीच नियुक्ती का? हा प्रश्न उपस्थित होईल. समजा आलेल्या सात पॅनलपैकी मला वाटल असत की शाहा कंन्सलटंन्सीला काम द्यायच आणि सभागृहामध्ये मी माझी भुमिका सुध्दा मांडली असती तर मग सातही जर एकच क्रायटेरिया फुलफिल करत असतील तर मग शाहा कंन्सलटंन्सीलाच काम का द्यायच म्हणुन मग मी आयुक्त मॅडमांना त्यावेळेला सुचना केली की मी म्हंटल आपण एक काम करा. सात पैकी कुठलीही एजन्सी निवडण्याकरीता कुठेतरी एका निष्कर्षापर्यंत पोहोचता यायला पाहीजे निर्णय घेण्याच्या संदर्भात पण कारण आपण सभागृहाने कुठल्याही एका एजन्सीच्या बाबतीस आग्रह धरला तर सहा म्हणतील की आम्हाला का विचारणा करण्यात आली नाहीये. म्हणुन विचारणा करण्याच्या दृष्टीकोनातुन सातहींशी पत्रव्यवहार करा आणि त्यांचे दर मागवुन घ्या की जरी शासनाने महाराष्ट्र जिवन प्राधिकारणाने जरी निश्चित करून दिलेले असले तरी आपण कुठल्या दरामध्ये काम करायला इच्छुक आहात. त्यासंदर्भात आपल्या ज्या काही ऑफर्स असतील त्या महानगरपालिकेला कळवाव्या. म्हणुन त्याच्यामुळे वेगवेगळ्या कंपनीच्या वेगवेगळ्या दराच्या ऑफर्स आपल्याकडे आल्या आणि त्याच्यामध्ये सगळ्यात कमी ऑफर जी आहे. ती स्विकारण्याच्या संदर्भातील भुमिका प्रशासन किंवा विशालभाऊ जे म्हणता आहे की आपण ही चर्चा करतोय की ज्याच्यामध्ये महानगरपालिकेच आर्थिक हित पाहीले जाईल. राहीला प्रिझेंटेशनचा विषय तर प्रिझेंटेशन हा क्रायटेरिया नाहीये. प्रिझेंटेशन कंम्पलसरीही नाहीये. उद्या समजा त्याला येणे शक्य झाले नाही म्हणुन त्यांनी नकार कळविला असेल त्या कंपनीने, परंतू जर कधी आपण निर्णय घेतल्यानंतरही उद्या जावुन त्याच प्रिझेंटेशन मागवले किंवा कामाच्या संदर्भातील जो काही अमृत २.० च्या ज्या काही गाईडलाईन्स आहेत त्याच्याप्रमाणेच कॉन्ट्रक्ट तयार होईल आणि त्याच्यामध्ये जर का काही समर्थता दर्शविली तरच ती प्रक्रीया पुढे जाईल अन्यथा पुन्हा विचार करता यईल. परंतू आता पुन्हा याचा विचार करायचा की त्याचा विचार करायचा याच्यामध्ये वेळ वाया घालवण्यामध्ये काहीच अर्थ नाहीये कारण ऑलरेडी आपण खुप लेट झालेलो आहे म्हणुन सभागृहाने कुठेतरी विचार करावा या बाबींचा

**ॲड. शुचिता हाडा** :- या सातही एजन्सीचे आपल्याला प्रत्यक्षात प्रिझेंटेशन झालेली नसतांना मग फक्त एल-१ आहे या क्रायटेरियावर देण योग्य आहे का अस माझ म्हणण आहे. त्याच्यामुळे पुन्हा एकदा त्याला प्रिझ ेंटेशनसाठी बोलावणे आणि मग काहीच विषय नाहीना नितीनभाऊ सरळ काम सुरू करता येईल ना. अमृत २.० मधुन पाणीपुरवठा आहे मलनिस्सारण आहे. जळगांव शहरातील जे नाले आहे. तलाव आहे मग त्याच्यासाठी काम तर बघु आपण कोणाच काय कॉन्फीडंस आहे ते हे फक्त आर्थिक निकष तपासुन चालणार नाहीये याच्यात टेक्निकल बाबी तपासण सुध्दा महत्वाच आहे आणि पॅनलवर नियुक्त आहे म्हणुन त्यांची कॉन्फीडंसी एक सारखी असणार नाही. अस गृहीत धरण मला योग्य वाटत नाही. सोनगिरेसाहेब काही टेक्निकल ईश्युज असतील तुम्ही आता सुरूवातीला काही मुद्दे मांडले ज्यावेळेला तुम्ही निविदा प्रक्रीया राबवता तेव्हा सगळे तपासतात आणि एल-१ ला देणार आहोत त्यामध्ये तुम्ही अनेक गोष्टींचा उहापोह केला.

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता** :- बरोबर आहे ताई आपण जो मुद्दा मांडलेला आहे तो अतिशय बरोबर आहे.

**श्री.दिलीप पोकळे** :- पॅनलचे काय आहे की सगळ्यांचा क्रायटेरिया सारखा असला पाहीजे म्हणुन कमी जास्त जर राहीले असते तर त्यांची नियुक्तीच केली नसती शासनाने

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता** :- नाही आणि आता ताईंनी जशी सुचना दिली की ही लोयेस्ट जी एजन्सी आहे आपली शाहा टेक्निकल यांना आपण प्रिझेंटेशनची संधी देवुन बोलावुन घेवु शकतो. आता याच्यात माझ्या काही व्यक्तीगत शंका मांडतो की याच्यात ज्या सात एजन्सी आहेत आणि सात एजन्सी पैकी समजा यामध्ये ज्यांना चांगला एक्सपिरियंस असेल तर आपण त्यांनाही त्यांचा एक्सपिरियंस बघुन काम देवु शकतो हा एक विषय आहे. आता ह्या सहापैकी जे आहे तर एकाने १.२० टक्क्यांचे दर दिलेले आहेत. आपण त्यांना एक संधी देवुन त्यांच प्रिझेंटेशन बघु आणि सन्मा. गटनेत्यांनीही त्या दिवशी उपस्थित ठेवुन त्यांचे प्रिझेंटेशन घेवु शकतो आणि त्या समितीलाच हे अधिकार दिले पाहीजे की याचा निर्णय घेवुन टाकायचा त्याच दिवशी म्हणजे पुन्हा महासभेपुढे येण्याची आवश्यकता राहणार नाही. अशी जर शक्यता असेल तर आपण तशी समिती गठीत करून घ्यायची.

**ॲड.शुचिता हाडा** :- आता याला इतका वेळ झालेलाच आहे. जो महासभेचा विषय आहे आणि महासभेसमोर पुन्हा विषय आला काय हा विषय पुन्हा परत येणार आहे.

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता** :- ठिक आहे पण मग आता ताई माझी एक अशी सुचना राहील की आता आपण म्हणत आहोत की याचा रेट कमी आहे पण मग यांच्या कामाचाही एक्सप्रियंसही पाहिला पाहीजे.

**ॲड.शुचिता हाडा** :- तेच म्हणते आहे, काल आपण जे दोन प्रिझेंटेशन बघितले त्या दोघींची तफावत सभागृहासमोर आली पाहीजे ना आपण लिमिटेड लोकांनी ते प्रिझेंटेशन बघितलेले आहे. दोन एजन्सीज अप्रोच झालेल्या आहेत. सभागृहासमोर ही प्रशासनाची जबाबदारी आहे की दोन एजन्सीज ने काय प्रिझेंटेशन दिल आहे. त्यामध्ये कोण उजव ठरत आहे. ठिक आहे दुसरी एक एजन्सी येणार आहे त्याला संधी द्या.

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता** :- ठिक आहे आपण त्याला संधी देवु.

**ॲड.शुचिता हाडा** :- त्या एजन्सींचा तुलनात्मक तक्ता हा प्रशासनाने सादर केला पाहीजे. याचा रेट हा आहे याच्या गुणवत्तेत हा येथे सरस आहे. याच्या गुणवत्ते हा येथे कमी पडतो आहे. या पुर्ण तुलनात्मक तक्ता हा पुर्णपणे बनवुन आणला का महासभेपुढे निर्णय एवढा मोठा निर्णय आपण घेणार आहोत. मग प्रशासनाकडून हे सगळ येवू द्या अगोदर

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता** :- याचे गुणवत्तेचे काही निकष ठरलेले नाहीयेत ताई, आता आपण जे प्रिझेंटेशन बघितले आहे आणि आपण त्यांची गुणवत्ताही तपासणार आहोत. आपण असे कुठलेही

**श्री.नितीन लढ्ढा** :- ठिक आहे काल आपण प्रिझेंटेशन बघितल काय कळाले त्यातील आपल्याला, जवळपास बरेच सदस्य होते सभागृहातील प्रिझेंटेशन ला कुणाला काय कळाल त्यातील

**ॲड.शुचिता हाडा** :- ते प्रशासनाने टेक्निकल समजवायच आहे नितीनभाऊ

**श्री.नितीन लढ्ढा** :- नाही नाही काय आहे टेक्निकल क्रायटेरिया काय कंपनी करते आहे हेच काम महाराष्ट्र जिवन प्राधिकरणने

**श्री.दिलीप पोकळे** :- भाऊ ताई बरोबर म्हणत आहेत त्यांचा तुलनात्मक तक्ता आला पाहीजे. टेक्निकल काम जे आहेत आपले ते महाराष्ट्र भरातील काम करत आहेत. महाराष्ट्राच्या बाहेरचे कोणी आहे का म्हणजे आपण एवढे मोठे काम त्याला देत आहेत.

**श्री.नितीन लढ्ढा** :- म्हणजे त्याच्यातील टेक्निकल काही कळत नाहीये आपल्याला

**श्री.दिलीप पोकळे** :- हो तेच

**ॲड.शुचिता हाडा** :- नितीनभाऊ टेक्निकल एक्सपर्ट आपण नाहीच आहे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- हो ना मग

**ॲड.शुचिता हाडा** :- पण ते एक्सपर्ट आहेत ना आपल्याकडे प्रशासनाने तो तसा परिपुर्ण प्रस्ताव तयार करून महासभेसमोर पाठवावा. असा ब्लाईंडली निर्णय घेता येणार नाही. फक्त हा एल-१ आलेला आहे असा प्रस्ताव आलेला आहे की प्रशासनाने त्यांच्याकडून रेट मागविले आणि तो एल-१ दिसतोय तर त्याला काम द्यायचा निर्णय नाही घेवू शकत.

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी चर्चा करीत होते त्यामुळे सभागृहातील चर्चेचा स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.नितीन लढ्ढा** :- रेकॉर्ड तर आहे ना त्याचे

**मा.उपमहापौर** :- भाऊ मला अस वाटत की आपण याच्यामध्ये वेळ वाया घालवण्यापेक्षा या रेटच्या संदर्भामध्ये जे अंतर आहे आणि याच्यामध्ये बराच कालावधी लोटुन गेला आहे जवळपास आठ महिन्यांचा कालावधी निघुन गेलेला आहे. याच्यामध्ये तत्कालीन आयुक्त पवार साहेब असतांना. प्रधानसचिव मॅडमांचे एक पत्र आले आहे की तुम्ही डिपीआर वेळेमध्ये सादर करणे म्हणुन आपल्याकडे कार्यवाही करण्यात येवू नये किंवा आपल्याकडून डिपीआर वेळेत सादर झाला नाही म्हणुन आपल्याला वंचित ठेवता येणार किंवा ही देता येणार नाही म्हणुन हे पत्र आपल्याला प्रधानसचिवांचे आलेले आहे. इतका गंभीर विषय असतांना आपण मतमतांतर याच्यामध्ये आपले आठ महिने निघुन गेलेले आहे याच्यामध्ये आपण ०८/०८/२०२२ च्या महासभेमध्ये निर्णय घेवुन टाकलेला आहे की एजन्सी नेमण्याच्या संदर्भामध्ये ऑनलाईन प्रोसेस राबवुन याच्यामध्ये एजन्सी नेमावी म्हणुन तर मला आता अस वाटत आहे की याच्यामध्ये अजुन अधिकचा वेळ वाया न घालवता आपण याच्यामध्ये दि.०८/०८/२०२२ च्या ठरावाची अंमलबजावणी करून जेणेकरून तात्काळ निर्णय घेवुन आपला लवकरात लवकर डिपीआर तयार करून तो शासनाला वेळेमध्ये सादर करता येईल. कारण याच्यामध्ये आता MJP च्या पॅनलवर ज्या एजन्सीज आहेत. एकीकडे आपण म्हणतोय की त्या MJP च्या पॅनलवर नियुक्ती दिलेल्या आहेत. एकीकडे म्हणतो की आपण सात लोकांना आमंत्रित केले आहे आणि त्याच्यापैकी तिनच लोक आलेले आहे. कोणी कोणी प्रिझेंटेशन दिले आता आपण नगरसेवक म्हणुन त्याच्यामध्ये टेक्निकल कोणी नाहीये. त्याच्यामध्ये आपण करू शकत नाहीये. एकीकडे म्हणतोय आपण की एल-१ ला जर काम दिले तर आपण गुणवत्ताच्या बाबतीमध्ये तर गुणवत्ता ठरवणारे आपण कोण याच्यामध्ये आपले कॅफोसाहेब सांगत आहेत की याच्यामध्ये एल-१ ऐवजी जर एल-२ ला जर दिले तर उद्या उठुन भविष्यात लेखापरिक्षणामध्ये अडचणी निर्माण होवू शकतात. याच्यामध्ये सर्व सदस्य आता या घोळामध्ये अनभिज्ञ झालेले आहे. याच्यामध्ये सगळा घोळ निर्माण झालेला आहे. तर काय कराव आणि कोणालाही निर्णय क्षमतेपर्यंत पोहोचण्यासाठी शंका निर्माण झालेली आहे. तर मला अस वाटत की ऑनलाईन पध्दतीने ही प्रोसेस राबवुन घेतली तर ती कायदेशीर दृष्टया योग्यपण होईल आणि याच्यात लेखापरिक्षणात भविष्यामध्ये कुठल्याही आक्षेप पण येणार नाही. कारण आपण आता निर्सगला यापुर्वीच आपण त्याला रद्द ठरविलेले आहे. त्यामुळे काही अडचण राहणार नाही. आपण याच्यामध्ये मला अस वाटत की कुठेतरी कायदेशीर न्यायालयीन प्रकरण चालु नाहीये आणि भविष्यातही ते होईल अस मला वाटत नाहीये. कारण आपण कायदेशीररित्या योग्य ते पत्रव्यवहार केलेले आहेत. तर याच्यामध्ये मतमतांतर करण्यापेक्षा, अधिकचा वेळ वाया घालवण्यापेक्षा , प्रशासनाने याचा योग्य तो निर्णय आणि दि.०८/०८/२०२२ रोजी जो झालेला ठराव आहे तर त्याची तात्काळ अंमलबजावणी करावी अस मला वाटत.

**श्री.दिलीप पोकळे** :- आपण जो ठराव केलेला आहे त्याच्यानंतर शासनाला पत्र दिलेले आहे आणि आता सोनगिरे साहेबांनी जे मत व्यक्त केले त्या मताशी मी सहमत आहे आणि आपल्याला याच्यामध्ये आठ महिने झालेले आहेत आणि आता येणाऱ्या महासभेतच त्या संबंधित एजन्सीला बोलावुन घ्याव आणि त्याचे जे काही दर असतील ते घ्यावे आणि जो कॅपेबल आहे आणि ज्याचे कमी दर आहेत त्यालाच देण्यात यावे.

**मा.उपमहापौर** :- मी तेच म्हणतोय की आपण हे काम कोण तयार करणार त्याचे दर काय आहे किंवा असे काम कोणी केले असेल.

**ॲड.शुचिता हाडा** :- हो ना ही प्रशासनाची जबाबदारी आहे. फक्त प्रशासनाने आपल्यासमोर तुलनात्मक तक्ता द्यायचा आहे.

**मा.उपमहापौर** :- ताई आता हा जो प्रस्ताव आहे. हा आज अजेंड्यावर प्रशासनाने आपल्याकडे विस्तृतपणे परिपुर्ण का घेत नाही.

**ॲड.शुचिता हाडा** :- प्रशासन पुर्णपणे प्रस्तावच ठेवत नाहीये. म्हणुन हा निर्णय घेण्यात अडचण येतेय.

**मा.उपमहापौर** :- याच्यामध्ये जो होणारा विलंब आहे.

**ॲड.शुचिता हाडा** :- १०० टक्के प्रशासन जबाबदार आहे आणि प्रशासनाने ही जबाबदारी स्विकारावी की याला उशिर झाला आहे आणि प्रशासनाने आता तरी परिपुर्ण प्रस्ताव ठेवला पाहीजे.

**मा.उपमहापौर** :- १०० टक्के म्हणुन म्हणतोय की याच्यामध्ये अजुन अधिकचा वेळ वाया घालवण्यापेक्षा मला अस वाटत की आपण जो दि.०८/०८/२०२२ ला जो निर्णय घेतलेला आहे. त्याची प्रशासनाने अंमलबजावणी केली पाहीजे.

**ॲड.शुचिता हाडा** :- आता याच्यामध्ये आपल्या ज्या या सात एजन्सी आहेत. त्या शासनाने व्हेरीफाय करून पॅनल नियुक्त केलेले आहे. त्या व्यतिरीक्त कुठलीही एजन्सी नाहीये. तर तीची क्षमता नाही मग तुम्ही फक्त आर्थिक निकष कसा काय बघता आणि निविदा प्रक्रीया तुम्ही फक्त आर्थिक निकषांवर राबवत असाल तर

**मा.उपमहापौर** :- ताई याच्यामध्ये प्रशासनाने टेक्निकल बाबी तपासुनच हे टेंडर केलेले आहे. जे आपल्याकडे आजरोजी दर आलेले आहेत आणि शासनाने आपल्याला ठरवुन दिलेले आहे.

**ॲड.शुचिता हाडा** :- मग यायची गरजच नव्हती. त्याचे मार्क्स बघितले जातील की नाही.मग फक्त आर्थिक निकष बघणार का

**मा.उपमहापौर** :- ताई याच्यामध्ये जर ऑडीट ऑब्जेक्शन येईल आणि १०० टक्के टेक्निकल तपासुनच आणि आता जो दराच्याबाबतीत आहे तर मला अस वाटत की दराच्याबाबतीमध्ये आपण त्याच्यासंदर्भात चर्चाच करत नाहीये. याच्यामध्ये आपण टेक्निकल पध्दतीने हा परिपुर्ण प्रस्ताव आला पाहीजे होता. ताई याच्यामध्ये जो आपण निकष लावतोय तो मला अस वाटत की शासनाने ठरवुन दिलेले आहे. तर प्रशासनाने टेक्निकल पध्दतीने जो योग्य असेल हे पुर्ण तपासावे.

**ॲड.शुचिता हाडा** :- हो ना आपल्या सर्वांना मार्गदर्शित करणे हे प्रशासनाचे काम आहे त्याच्याशिवाय तुम्ही आणि आम्ही हे करूच शकणार नाहीये.

**मा.उपमहापौर** :-

**(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी चर्चा करीत होते त्यामुळे सभागृहातील चर्चेचा स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)**

**सौ.ज्योति चव्हाण** :- कुलभुषणभाऊ, महापौरताई

**श्री.जितेंद्र मराठे** :- वानखेडेसाहेब आता याच्यापुर्वी एक घटना अशीच घडलेली होती अशाच टेंडरच्या संदर्भातली आणि आपण एल-१ वाल्याला काम दिलेले होते.जो लोयेस्ट होता त्याला आपण काम दिलेले होते. आपण वर्कऑर्डरच्या प्रोसेस पर्यंत पाहोचलो होतो आणि आपल्याला अस पत्र प्राप्त झालेले होते की हा ब्लॅकलिस्टेड आहे. त्याचा सगळा अभ्यास करून निकष काढुन त्याच्यानंतर सेकंड वाला जो होता. त्याच्याशी पत्रव्यवहार केला होता की आपण याच्या रेट मध्ये काम करायला तयार आहे का? तर आपण याच्यामध्ये भविष्यात ताई जे सांगता आहे की लोयेस्ट जो आहे तो काम व्यवस्थित करणार नाही अस ताईंच म्हणण आहे तर असा ही प्रश्न भविष्यात उदभवु शकतो ना तर आपण कारण ही घडलेली घटना आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी** :- एकच विषय आहे तो सभागृहामध्ये संपवुन टाका की प्रशासनाने हे जे प्रस्ताव आलेले आहेत. त्याचे प्रिझेंटेशन झालेले असो किंवा नसो आणि काळा आहे गोरा आहे आणि कोणाला मंजुर करायचे आम्ही सभागृहाने तुम्ही सभागृहापुढे स्वंयस्पष्ट सांगा आम्ही मंजुरी देतो एका मिनिंटात याला.

**श्री.सुनिल महाजन, विरोधी पक्षनेता** :- स्पष्ट शिफारस करा आता

**श्री. चंद्रकांत वानखेडे, उपायुक्त तथा मुलेअ :-** ताईंनी जो मुद्दा उपस्थित केला आहे. मी शासनाचा अधिकारी आहे आणि ३५ वर्षांपासुन मी काम केलेले आहे. माझी भुमिका जी आहे ॲज अ ऑडीटर आणि चिफ अकाऊंट म्हणुन तो जर शासनाचा अधिकारी आहे. तर त्याने निश्चित भुमिका व्यक्त केली आहे का आणि आपण थर्ड पार्टी म्हणुन काम देत नाहीये. आपण जे ओपिनियन दिले तसे या कामासाठी ही निविदा आपण मागविलेली नाही. ज्या मोठमोठ्या निविदा आहे आम्ही शासन स्तरावर केलेल्या आहेत त्या तर त्याचे आपण प्रिझेंटेशन मागवितो तरी तांत्रिक स्क्रुटिनी मध्ये जो फर्स्ट येईल . रेटचा विषय पाहीला जातो. मोठमोठ्या निविदा मागविल्या जातात त्यावेळेस तर त्यामध्ये टेक्निकल जे एक्सपर्ट असतात ते डेमो बघतात त्याच्यानंतर ते चर्चा करतात आणि त्यांच्या शंकाच समाधान करतो त्याच्यानंतर जर तांत्रिक बाबींमध्ये जर तो पात्र ठरला तरच आपण त्याला देतो हे सगळ आपण तपासतात. ही निविदा आपण मागविलेली नाहीये. त्यामुळे जस नितिनभाऊंनी सांगीतले वगैरे की प्रिझेंटेशन तर मुद्दा नाही आहे. आपण हे एक्स्ट्रा केलेले आहे तर का सर्व सदस्यांना संबंधिताची माहिती व्हावी आणि अवगत व्हाव म्हणुन त्याच्यामुळे थर्ड पार्टी म्हणुन भुमिका ही होती की हे शासनाने केलेले आहे आणि शासनाने ऑलरेडी त्यांची नियुक्ती करून दिलेली आहे. म्हणजे आपल्याला रेट निश्चित करायची गरज नाहीये. जस नितीनभाऊंनी सांगीतले की यालाच का , कोणाला शंकेला कारण नको किंवा कोणी संशयित व्हायला कारण नको, म्हणुन ना प्रशासनाकडे ना पदाधिकारी नको आणि अधिकारी नको सगळे त्याच्यामध्ये आपण आलो. तर प्रक्टिकली याला ऑरोगेशन होवू नये अश्या तक्रारी होवु नये. म्हणुन आपण काय केले की मॅडम आणि सोनगिरे साहेब , बोरोले साहेब यांना सांगीतले की रेट तरी निश्चित करून

द्या आपल्याला आणि त्यांनी मान्यही केलेले आहे. आपण आपल्या महापालिकेच हित पाहत आहोत. तर त्याचा फायदा घ्याना जर ऑफर आहे तर आणि बोरोले साहेबांनी जेव्हा मेल पाठवला तर त्या मेल मध्ये काय म्हंटले आहे बोरोले साहेबांनी की शासनाच्या निकषांप्रमाणे, त्यांनी असे डायरेक्ट म्हंटलेले नाहीये की तुम्ही आम्हाला रेट द्या. बरोबर आहे का बोरोले साहेब, त्यांनी असा मेल पाठविलेला आहे की शासनाच्या निकषांप्रमाणे काम करायला कोण तयार आहे. त्याच्यानुसार तुम्ही आम्हाला रेट द्या बोरोले साहेब बरोबर आहे का ?

**श्री.योगेश बोरोले, प्रकल्प अभियंता:-** हो.

**श्री. चंद्रकांत वानखेडे, उपायुक्त तथा मुलेअ :-** आणि त्यांनी जेव्हा मला बोलविले आणि त्याच्यानंतर त्यांचे रेट आले. त्याच्यात एकाने १.२०, एकाने १.४० असे एकाने ४ रूपयाचे आपल्याला जे दर दिलेले आहेत. तर त्याच्यामध्ये आपला जो डिपीआर आहे. आपले हित काय आहे तर १.२० जे आहे. हा दर दोनच्या पुढे गेला तर अवाढव्य रक्कम होते. परंतू १.२० जरी धरला तर आपल्याला ३.५० ला करावे लागेल बोरोले साहेब, आणि सेकंड जो आहे मला वाटते तो जरी १.४० प्रमाणे गेला, तरी तो फस्ट पेक्षा अबाऊ येतो आहे. त्याच्यामुळे मी म्हणतो की, ते लोयेस्ट आहे. माझे जे ओपेनीयन आहे, ते थर्डपार्टी ओपेनीयन आहे, शेवटी निर्णय सभागृहाला घ्यायचा आहे. पुर्ण अधिकार तुम्हाला आहे.

**श्री.धीरज सोनवणे :-** नियमच तो आहे.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** विषय काय आहे, पॅनलवरील शासनाने ठरविलेले आहे. डेमो वगैरे सगळे झालेले आहे. जे दर दिलेले आहे आणि जर कोणी कमी करत असेल तर आपल्याला त्याला द्यायचे आहे. तुम्ही थर्डपार्टी, फोर्थपार्टी असे नका बोलु, स्पष्ट मत द्या.तुमचे मत द्या थर्ड ला द्यायचे की, फस्टला द्यायचे.

**श्री.जितेंद्र मराठे :-** एक मिनीट, बापु एक मिनीट, तुम्ही जी ह्या ७ एजन्सी सांगत आहात ना, सगळयात लोयेस्ट जो आहे त्याला आपण द्यायचे असे म्हणणे आहे ना. तर सभागृहापुढे तुम्ही स्पष्ट मत मांडा.

**श्री. चंद्रकांत वानखेडे, उपायुक्त तथा मुलेअ :-** आता हा जो विषय आहे, तो तांत्रिक शाखेचा आहे. त्यांनी डिक्लेअर करावे किंवा आयुक्त महोदयांनी सांगावे. फक्त आर्थिक सल्ला देणे माझे काम आहे.

**श्री.सुनिल महाजन, विरोधीपक्ष नेते** :- साहेब, तीन ऑफर लेटर आलेले आहेत की नाही, ३ पैकी महापालिकेचे आर्थिक हित कुठे जोपासले जाईल एवढेच सांगा बाकीचे काहीच सांगु नका.

**श्री. चंद्रकांत वानखेडे, उपायुक्त तथा मुलेअ :-** महापालिकेच हित जे लोयेस्ट दर दिलेले आहे कॅलक्युलेशन प्रमाणे त्याला दिलं गेल पाहिजे. कारण शासनाने सगळे निकष तपासलेले आहे. असे माझे मत आहे. ॲज अ लिगल फायनान्स ॲडव्हाजर म्हणुन तर आता याच्या बाबतीमध्ये आयुक्त महोदया, आयुक्त महोदया, प्रशासकीय हेड आणि तांत्रिक हेड म्हणुन आपण बोलावे.

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी चर्चा करीत होते त्यामुळे सभागृहातील चर्चेचा स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**मा.आयुक्त :-** सगळयांच मत मांडुन झाले असतील तर मी प्रशासकीय समारोप करते.

**श्री.जितेंद्र मराठे :-** आपण आपले मत सांगा.

**श्री.अश्विन सोनवणे :-** मॅडम बोला ना तुम्ही.

**मा.आयुक्त :-** सगळयांचे मत मांडुन झाले असतील तर बोलते. १६ सप्टेंबर २०२२ चा जो शासन निर्णय आहे त्यामध्ये १४ जुलै २०२२ चा एम.जी.पी.च्या ७ एजन्सीजच पत्र त्याच्यासोबत जोडलेले आहे. त्याच्यामध्ये त्यांनी स्पष्ट म्हटलेले आहे. अमृत २.० अभियान अंतर्गत मंजुर झालेल्या प्रकल्पासाठी, प्रकल्प व्यवस्थापन करण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांना पुढील एक पर्याय पैकी एक पर्यायाची मुभा राहीले. पहिला पर्याय आहे. महाराष्ट्र जिवन प्राधिकरणास प्रथम प्रकल्प व्यस्थापन सल्लागार म्हणुन नेमणे, दुसरा पर्याय आहे संदर्भ क्र.४ म्हणजे एम.जी.पी.च्या पत्राच्या अनुषंगाने १६ संस्थांची इमपॅनलमेंट केलेली असुन त्यापैकी एका संस्थाची आपण डायरेक्टली नेमणुक करु शकतो. असे एम.जी.पी.चे पत्र दिलेले होते. त्याच्यातुन आपण एकाची नेमणुक करु शकत होतो आणि तिसरे होते की, तुम्ही निविदा मागवुन करा. यामध्ये त्यांनी मॅक्सीमम कॅपींग लावुन दिली होती ३%. आपल्याकडे ऑप्शन काय अव्हेलेबल होते, एकतर एम.जी.पी.ला द्या एम.जी.पी.म्हटली आम्ही ३% ने करु. मग आपल्याकडे ऑप्शन होता, दुसरे होते, जे इमपॅनलमेंट एजन्सीज आहे त्यापैकी एकाला देऊ. आणि मॅक्सीमम लिमिट ठरवुन दिलेली आहे ३% ची. म्हणुन आपण असे पत्र त्यांना दिले की, तुम्ही इमपॅनल एजन्सीज आहे, आम्ही तुम्हाला गाईडलाईन पण दिलेल्या आहे. तुम्ही टेक्नीकली पात्र पण आहात. तुम्ही आमच्याकडे काम करायला ईच्छुक आहात का ? कोणत्या दराने ईच्छुक आहात. म्हणजे टेक्नीकल कॉलीफिकेशन ऑलरेडी एम.जी.पी.ने चे करून झालेले आहे. फक्त एक्स पर्सनलाच का द्यायचे म्हणुन आपण

सगळयांना पत्र दिले, त्या ७ लोकांना, ७ पैकी तिघांनी आपल्याला रिस्पॉन्स दिले की, आम्ही या या रेटला करायला तयार आहोत. आम्ही मुद्दाम रेट या पध्दतीचा वापरलेला आहे की, पुन्हा कन्फ्युजन नको, पुन्हा चार जण आले असते आम्ही ईच्छुक आहोत, म्हणुन असा शब्द आम्ही त्याच्यामध्ये वापरला, आणि मग त्यामध्ये ३ रेट आले, १.२, १.४ आणि २.४ या तिघांचे असे रेट असतांना असे वाटले की, गटनेत्यांची बैठक होती त्यांच्या समोर त्यांची प्रिझेन्टेशन झाली पाहिजे. कोण कसे काम करावे म्हणुन आपण ही. आपण प्रिझेन्टेशन जरी नाही घेतले असते तर टेक्नीकली दि ऑल आर कॉलीफाईड फक्त एक्स पर्सनला का द्यायचे या मुद्दयाचे उत्तर आपल्या सर्वांना मिळावे म्हणुन आपण रेट मागविलेले होते.म्हणुन एकतर आपण एम.जी.पी.ला द्यायला पाहिजे. काही मुबा आहे आपल्याला, पण त्याचे ३% रेट आहे. आणि ३% शासनाने जनरेट केलेले आहे. तो आपल्याला ठरवायचा आहे आपल्याला घ्यायचे की नाही घ्यायचे. मग आपण ७ ही पैकी ज्यांनी ऑफरलेटर दिलेले आहे. १,२,३ तर L१ घेणे संयुक्तीक होईल. अस केले नाहीतर आपल्याला ऑडीटमध्ये प्रॉब्लेम येवु शकतो आणि हे टेक्निकल वर्क आहे सातहीच्या सातही ---४३.४१--- आहेत त्यामुळे एल-१ घ्यावा किंवा MJP घ्यावा. त्यामुळे आपण दोन्हीपैकी सभागृहाने एकाला घेण्यासाठी सभागृहाने निर्णय घेणे उचित होईल अस माझ मत आहे.

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी चर्चा करीत होते त्यामुळे सभागृहातील चर्चेचा स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**ॲड.शुचिता हाडा :-** महापौरताई आणि आयुक्त महोदया, एल-१ जो आपल्याकडे अजुन अप्रोच झालेला नाही आणि त्याने प्रिझेंटंशनचा विषय केलेला नाही तर आता त्याला हे काम देण्यापेक्षा त्याला येवू द्या आपल्यापर्यंत कारण

**मा.आयुक्त :-** म्हणजे त्याचे प्रिझेंटंशन घेतल्यानंतर पुढच्या मिटींग मध्ये ठेवायचे.

**ॲड.शुचिता हाडा :-** पुढच्या मिटींगमध्ये ठेवा त्याच प्रिझेंटंशन घ्या. त्याचही प्रिझेंटंशन आपण पाहुया

**मा.आयुक्त :-** अजुन काही मत

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी चर्चा करीत होते त्यामुळे सभागृहातील चर्चेचा स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**मा.उपमहापौर :-** प्रशासनासमोर मी मत मांडलेले आहे की, ऑनलाईन पध्दतीने टेन्डर काढावे.

**मा.आयुक्त :-** शुचितातार्ईचे मत आहे की, L१ वाल्याला प्रिझेन्टेशनसाठी बोलवावे. कुलभुषणभाऊंचे मत आहे की, ओपन टेन्डर करावे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** प्रशासनाने आपले मत दिलेले आहे, आयुक्त मॅडमांनी सांगितले आहे की, L१ वाल्याला द्या किंवा एम.जी.पी.ला द्या. तर मॅडमांनी सांगितल्या प्रमाणे, तर आपण महानगरपालिकेचे हित पाहता L१ ला देऊन टाका. त्यांनी आताच सांगितले की, मग त्याला प्रिझेंटंशनची गरज नाही. त्यांचे तसेच म्हणणे आहे मी नाही. प्रशासनाने याठिकाणी आयुक्त मॅडम असतील, वानखेडेसाहेब असतील यांनी जे जे सांगीतले आहे ते रेकॉर्डवर घ्या. ते ठरावात घ्या आणि हा विषय मंजुर करावा.

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी चर्चा करीत होते त्यामुळे सभागृहातील चर्चेचा स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**ॲड.शुचिता हाडा :-** बर जस आता आपण सांगीतल की भविष्यामध्ये हा एल-१ आला आहे जर काही प्रॉब्लेम आला तर त्याच काय करायच आहे.

**मा.महापौर :-** बोरोलेसाहेब L१ वाले जे आहे शाह त्यांच्याशी बोलणे सुरु आहे का ? ते प्रिझेन्टेशनला नाही आले तर नंतर बोलवु त्यांना.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ताई, ते प्रिझेन्टेशनला आले नाही, ते तयार आहेत. त्याचे कारण वेगळे आहे. इलेवन्थ आवरला आपण कोणाला बोलविले, त्यांचे काही प्लॅनींग असेल त्यांचे काही हातामधील कामे असतील, त्या कारणाने ते येऊ शकले नाही.

**मा.महापौर :-** आपण जर ठरविले की, एवढे मोठे काम आपण त्यांना देतो आहेत तर ते इनट्रेस्टेड आहे का ?

**श्री.नितीन लढ्ढा** :- त्यांची ऑफर रेकॉर्डवर आहे ना. जर त्यांची ऑफरच नसती, तीन लोकांची ऑफर आली म्हणुन आपण त्यांच विचार करत आहे.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** नितीनभाऊ काही वेळेला ऑफर दिली जाते पण इनट्रेस्ट नसतो हे आपल्याला चांगला अनुभव आलेला आहे.

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी चर्चा करीत होते त्यामुळे सभागृहातील चर्चेचा स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.नितीन लढ्ढा :-** ही जी कंपनी आहे म्हणजे शाह कन्सल्टन्ट ही वन ऑफ दि ओल्डेस्ट कंपनी आहे म्हणजे याच्या संदर्भात जी माहिती मिळाली. ही इकव्हीव्यालेन्ट टु टाटा कन्सल्टन्सीच्या बरोबरीची कंपनी आहे. महानगरपालिकेमध्ये संपुर्ण महाराष्ट्र मध्ये अमृत योजनेच्या संदर्भातला थर्डपार्टी ऑडिट जे करत आहे. ती ही शाह कन्सल्टन्ट करत आहे. शाह कन्सल्टन्ट ही महानगरपालिकेच्या आता पर्यंतच्या महाराष्ट्रतिल अमृतच्या जेथे जेथे कामे सुरु आहे. त्यांचे महाराष्ट्रातील थर्डपार्टी ऑडिट शाह कन्सल्टन्ट करत आहे. राजस्थान मध्ये संपुर्ण काम ती करत आहे. अशी माझ्याकडे उपलब्ध माहिती आहे. म्हणजे मी तीची वकीली करत नाही. निर्णय सभागृहाला घ्यायचा आहे. येथे प्रॉब्लेम काय आहे. जर येथे कोणाची बाजु धरली, त्याच्यामध्ये तो भेटीगाठी घेऊन गेला का ? त्याच्यातील भाग नाही, त्याला मी ओळखत नाही, त्याला मी पाहिलेले नाही. ऐकलेली माहिती आहे. निर्णय सभागृहाला घ्यायचे आहे. महानगरपालिकेच्या आर्थिक हिताच्या दृष्टीकोणातुन निर्णय घ्यायचा आहे आणि दुसरे की, या कामाला आता विलंब होता कामा नये कारण आपण याच्यामध्ये खुप टाईम स्पेंड केलेला आहे आणि याच्यामुळे काय होते, आपल्यावर जो महाराष्ट्र शासनामध्ये जळगांव महानगरपालिकेची प्रतिमा अशी झालेली आहे की, या योजनांना जाणिवपुर्वक विलंब होतो की या महानगरपालिकेच्या कार्यप्रणाली मध्ये हा ठपका आपल्या वर आहे. कारण काय आहे बघा. घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प तसाच रखडलेला आहे. म्हणजे ३०-३० कोटी रुपयाचे निधी येऊन वर्षानुवर्ष चालले जातात. आपण निर्णयापर्यंत येत नाही. याच्या संदर्भातला निर्णय आज जवळपास ८-९ महिन्यापासुन आपण पाहतो आहे. फक्त चर्चेमुळे रखडलेला आहे. अस होता कामा नये म्हणुन आज जो निर्णय घ्यायचा आहे सर्वसंमतीने विचार करुन निर्णय घ्यायला पाहिजे. आता प्रशासनाने आपली भुमिका स्पष्ट केलेली आहे. सभागृहाला आपली भुमिका स्पष्ट करायची आहे. मला वाटते की प्रशासनाच्या भुमिकेशी आपण सहमत करुन जो शाह कन्सल्टन्ट असेल L१ आलेला त्याला कार्यादेश देण्याच्या संदर्भातली भुमिका मान्य करायला हरकत नाही.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** त्याला डायरेक्ट कार्यादेश देणे अगोदर त्याची प्रशासनासोबत एक मिटींग तरी होऊ द्या.

**श्री.नितीन लढ्ढा :-** निर्णय तर कुठेतरी आपल्याला घ्यावा लागेल ना ताई.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** नितीनभाऊ, जसे कुलभुषणभाऊ म्हणत आहे. त्या पध्दतीने निविदा प्रक्रिया राबवा.आपण ऑलरेडी ठराव केलेलाच आहे. जर एवढे करुन होत नसेल तर निविदा प्रक्रिया राबवा. ऑनलाईन निविदा येऊ द्या.

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी चर्चा करीत होते त्यामुळे सभागृहातील चर्चेचा स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.अश्विन सोनवणे :-** निविदा प्रक्रियेला १ महिना जाईल अजुन. कसे काय म्हणत आहे तुम्ही टेन्डर राबवा, टेन्डर किती दिवस चालतो, माहिती आहे ना तुम्हाला येथे.

**श्री.सुनिल महाजन, विरोधीपक्ष नेते :-** अश्विनभाऊ, लोयेस्ट वाल्याला मान्यता देण्यात यावी.

**श्री.जितेंद्र मराठे :-** जो आपल्या महानगरपालिकेच्या हिताच्या दृष्टीकोणातुन अटीशर्तीला बांधुन जो आहे. तर लोयेस्टला आपण मान्यता द्यायची आणि सगळया सदस्यांसमोर त्याची एकदा मिटींग करुन घ्या. याच्यामध्ये भविष्यामध्ये यापुर्वी झालेली एक घटना होती, असेच एका ज्या लोयेस्टला काम दिले होते. त्याच्यानंतर पत्रव्यवहार झाले आणि जेव्हा समजले की तो ब्लॅकलिस्टेड आहे तर वर्कऑर्डर पर्यंत आपण पोहचलो होतो. त्यानंतर आपण कालांतराने सेकंडवाल्याला आपण पत्र व्यवहार केला होता महापालिकेने आणि त्याला सांगितले की, तु या रेट मध्ये काम करशील का ? अशी पुढची प्रोसिजर त्यावेळेला प्रशासनामार्फत झाली होती. भरपुर रस्ते आहे हे करण्यासाठी. तो लोयेस्ट आहे इतके हे बघा ५ महिने झाले, ही एजन्सी ती एजन्सी, ओपन एजन्सीचे आता उपमहापौर साहेब सांगत आहे. ओपन एजन्सीमुळे भोगत नाही का आपण, किती त्रास भोगत आहोत.

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी चर्चा करीत होते त्यामुळे सभागृहातील चर्चेचा स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**सौ.ज्योती चव्हाण :-** माझी एक सुचना आहे, आपली परत मिटींग २९ ला आहे. २९ तारखेला शाहला येथे बोलवायचे, त्यांचे डी.पी.आर. येथे बघु आणि त्याच दिवशी निर्णय घेऊ.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** २९ च्या आधीच बोलवा ना, २९ पर्यंत तहकुब ठेवा हा विषय, त्यांना येऊ तर द्या त्या एजन्सीला त्या एजन्सीने कितपर्यंत इनट्रेस्ट दाखविलेले आहे त्या एजन्सीला प्रत्यक्षात येऊ द्या.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** आयुक्त साहेबांनी प्रस्ताव ठेवलेले आहे, त्या प्रस्तावाला मंजुरी द्या आणि संपवा ना विषय.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** ज्या एजन्सीने इनट्रेस्ट दर्शविलेला आहे, तिला प्रशासनासमोर येऊ द्या, त्यांच्या सोबत एक मिटींग होऊ द्या. आणि तो पर्यंत विषय तहकुब ठेवा. आठ दिवसानंतर पुढची मिटींग घेणारच आहोत आपण.

**श्री.नितीन लढ्ढा :-** महापौरताई, सर्व सभागृहाची ईच्छा एकत्रीत करता की, सगळयात कमी दर आलेले, म्हणजे १.२०% ने शाह टेक्नीकल कन्सल्टन्ट, मुंबई यांच्या दराला मान्यता देऊन सदरहु एजन्सीला कार्यादेश देण्याच्या संदर्भातील प्रक्रिया प्रशासनाने राबवावी. प्रशासनाला अपेक्षित असलेल प्रिझेन्टेशन जे आहे. ते सदरहु कंपनीला बोलवुन प्रिझेन्टेशनही घ्यावे आणि त्याच्या संदर्भात जर काही प्रिझेन्टेशन मध्ये जर काही वाटले, तर तसा अहवाल महासभेसमोर नंतर पाठवा. परंतु आज विषयाला मान्यता देण्यात येत आहे. म्हणजे पुन्हा पुन्हा प्रक्रिया राबविण्याच्या दृष्टीकोणातुन वाट पाहवी लागणार नाही.

**श्री.सुनिल महाजन, विरोधीपक्ष नेते :-** अनुमोदन आहे.

**ॲड.शुचिता हाडा :-** महापौरताई, सदर विषयाच्या संदर्भात माझे मत नोंदवुन घ्यावे. शेवटी तीन एजन्सीने म्हणजे ज्यांनी ऑफर दिलेली होती त्याच्यानंतर आपण सहा महिन्यानंतर काम देण्याच्या संदर्भात हा ठराव करत आहात. ती एजन्सी प्रत्यक्षात आपल्यापर्यंत आलेली नाही. त्यामुळे त्या एजन्सीला अस ब्लाईंडली काम देण हे योग्य होणार नाही अस माझ व्ययक्तिक मत आहे ते नोंदवुन घेण्यात याव.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ठिक आहे मत नोंदवुन घ्या.

**मा.महापौर :-** ठिक आहे.

**ॲड.शुचिता हाडा :-** कारण हा एकच क्रायटेरिया असुच शकत नाही फक्त एल-१ आला आहे. दर दिलेले आहे त्याचेही अनेक काहीतरी क्रायटेरिया असतात. प्रशासन त्या विषयाबद्दल काहीच बोलत नाहीये. त्याच्यामध्ये प्रशासन एकच उत्तर देत आहे. पॅनलवर आहेत ते सगळे सारखेच आहेत. सगळे सारखेच आहे असे होवूच शकत नाही. प्रत्येक एजन्सीचा टर्नओवर वेगवेगळा आहे. प्रत्येक एजन्सीकडे मनुष्यबळ वेगवेगळे आहे. आपण याचे दोनच प्रिझेंटेशन बघितले. त्या दोघ प्रिझेंटेशन मध्ये खुप मोठी तफावत आहे. बोरोले साहेबांनी सांगाव सांगाव की त्याच्यामध्ये तफावत आहे की नाही आहे. सभागृहाला कळु तर द्या काय काय तफावत आहे.

**मा.महापौर :-** प्रशासनाने एल-१, एल-२ आणि एल-३ यांच्या संदर्भात जी माहिती दिली त्या माहितीच्या आधारे सभागृहातील सर्व सन्मा. सदस्य तसेच सन्मा.सदस्या शुचितातार्ई हाडा यांनी दिलेल्या सुचना नोंदवुन, त्यांचा विरोध नोंदवुन एल-१ ला एजन्सी निश्चित करण्याचे धोरण ठरविणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** शाहा टेक्निकल कंन्सलटंट, मुंबई

**मा.महापौर :-** शाहा टेक्निकल कंन्सलटंट , मुंबई यांना देण्यात येत आहे आणि हा निर्णय सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** ताई त्याच्यामध्ये फक्त एक वाक्य टाका की मा.आयुक्त सो यांनी सभागृहाला दिलेल्या माहितीनुसार असे एक वाक्य त्याच्यात आले पाहीजे. प्रशासनाच मत असे आले पाहीजे.

**(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी चर्चा करीत होते त्यामुळे सभागृहातील चर्चेचा स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)**

**मा.महापौर :-** याची नोंद घेण्यात यावी.

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य तसेच मा.महापौर, मा.आयुक्त , मा.उपमहापौर तसेच नगरसचिव आपआपसात एकाच वेळी **चर्चा करीत होते त्यामुळे सभागृहातील चर्चेचा स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)**

**मा.महापौर :-** सन्मा.सदस्या. सौ. शुचितातार्ई हाडा यांनी दिलेल्या सुचनांची पुर्ण नोंद प्रस्तावात घ्या आणि त्यांचा विरोध नोंदवुन बहुमताने विषय क्रं. १८ हा मंजुर करण्यात येत आहे.

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी चर्चा करीत होते त्यामुळे सभागृहातील चर्चेचा स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**नगरसचिव:-** सभागृहाने विषय क्रं.१८ हा बहुमताने मंजुर केलेला आहे आणि सन्मा.सदस्या. शुचितातार्ई हाडा यांचा विरोध आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. १०२४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, महासभा ठराव क्रं. ८६९ दि.०८/०८/२०२२ मधील प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांचे नियुक्तीचे धोरणांत बदल करुन या कामांसाठी शासन परीपत्रकातील

मुद्दा क्रं.०३ (अ) नुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नियुक्ती करणेबाबत बदलाचा प्रस्ताव यापूर्वी दि.२१/१०/२०२२ च्या महासभेत सादर केलेला होता.

महासभा ठराव क्रं.९३४ दि.२१/१०/२०२२ नुसार प्रशासनाचा प्रस्ताव कायदेशीर व आर्थिक हिताचा नसल्याने व त्यात चुका झालेल्या असल्याने योग्य कायदेशीर कारवाई करण्याच्या सुचना दिलेल्या आहेत. तसेच पाणी पुरवठा व मलनिस्सारण योजनेच्या कामी सर्व बाबींचा अभ्यास करुन शहर अभियंता यांनी सादर केलेल्या प्रस्तावातील द निसर्ग कन्स्ल्टंसी ही एजन्सी तांत्रिकदृष्टया अयोग्य आहे किंवा कसे ? याबाबत सुस्पष्ट कारणांसह कायदेशीररित्या या एजन्सीला दिलेला कार्यादेश रद्द करायचा किंवा कसे ? याचा सुधारीत परिपुर्ण प्रस्ताव तात्काळ तयार करुन पुढील महासभेस सादर करण्याच्या सुचना दिलेल्या असून प्रस्ताव निर्णयार्थ तहकूब ठेवलेला आहे.

सदर कामी महानगरपालिकेने यापूर्वी नियुक्त सल्लागार निसर्ग कंन्स्ल्टंसी,नाशिक यांना २.५०% दराने काम दिलेले होते तथापि मार्गदर्शक सुचनांप्रमाणे DPR सादर न केल्यामुळे नियुक्ती दि.१७/०१/२०२३ रोजीच्या पत्रानुसार रद्द केलेली आहे. महासभा ठराव क्रं.८६९ दि.०८/०८/२०२२ अन्वये अमृत योजनेची अंमलबजावणी करणेचा प्रस्ताव महासभेने मान्य केलेला असून यात सल्लागार नियुक्तीसाठी निविदा प्रसिध्द करुन अंमलबजावणी करणेच्या सुचना दिलेल्या आहेत. मात्र तद्नंतर शासनाने शासन परीपत्रक क्रं.अमृत-२०२२/प्र.क्रं.२०३/नवि-३३ दि.१६ सप्टेंबर २०२२ नुसार विस्तृत मार्गदर्शक सुचना दिलेल्या असून यात प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार सेवेसाठी सल्लागारांची सूची व सेवेचे दर निर्धारीत करुन दिलेले आहे.

सदर कामी शासन परीपत्रक दिनांक १६ सप्टेंबर २०२२ नुसार १६ संस्थांची नामीका निश्चित केली असून यात वर्गवारी निहाय शुल्क निश्चित केलेली आहे व या शुल्क रकमेत काम करण्याचे शासनाचे निर्देश आहेत.

सदर कामी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने दि.०३/०२/२०२३ च्या पत्रानुसार सदरचे काम ३% शुल्क आकारणी करुन काम करण्यास तयार असल्याचे व सदर बाब मान्य असल्यास पुढील कार्यवाही करावी असे कळविले आहे.

पाणी पुरवठा योजनेच्या कामांचा प्रकल्प अहवाल हा रु.२०० कोटी व त्यापेक्षा अधिक रकमेच्या वर्गवारीत होणार असून वर्ग- ०३ च्या ०७ शासनाने निर्देशित केलेल्या सुचीबध्द सल्लागारांपैकी Ceinsys Tech Ltd, नागपूर यांनी स्वत:हून पत्र देवून काम करण्याची तयारी दर्शविलेली आहे मात्र दर नमूद केलेले नाहीत. सदर ०७ सूचीबध्द सल्लागारांकडून कामासाठी प्रशासनाने ई-मेलव्दारा दर मागविले असता खालील तीन सल्लागारांचे दर प्राप्त झालेले आहेत.

१) शहा कंन्सल्टन्ट, मुंबई- १.२ टक्के २) फोट्रेस इन्फ्राकॉन लीमिटेड, व यश इनोव्हेटीव्ह सोल्यूशन (जे.व्ही.)- १.४ टक्के ३) सिनसिस टेक लीमिटेड,नागपूर- २.४५ टक्के. सदर सल्लागारांपैकी अ.नं.२ व ३ यांनी प्रत्यक्ष महानगरपालिका कार्यालयात येवून प्रशासकीय अधिकारी व काही म.न.पा. सन्मा.पदाधिकारी व सन्मा.सदस्य यांचे समोर प्रकल्प व दरासंदर्भात प्रेझेंन्टेशन सादर केलेले आहे परंतू अ.नं.१ शहा कंन्सल्टन्ट, मुंबई या एजन्सींचे सल्लागार हे प्रेझेंन्टेशनसाठी प्रत्यक्ष उपस्थित नव्हते.

सभागृहात प्रशासन व सन्मा.सदस्यांमध्ये झालेल्या चर्चेनूसार तसेच सूचनेप्रमाणे उपरोक्त ई-मेलव्दारे प्राप्त दरापैकी १.२ टक्के इतके सर्वात कमीचे दर शहा कंन्सल्टन्ट, मुंबई यांनी दिलेले असल्याने अमृत २.० अभियाना अंतर्गत पाणी पुरवठा योजनेचा प्रकल्प अहवाल तयार करणेसाठी शहा कंन्सल्टन्ट, मुंबई यांची सल्लागार म्हणून नियुक्ती करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने शहा कंन्सल्टन्ट, मुंबई यांचे प्रेझेंटेशन पाहून घ्यावे.

**बहुमताने मंजुर**

**अनुकूल - ५४ प्रतिकूल - ०१**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- महाजन सुनिल सुपडू**

**नगरसचिव :- विषय क्रं. १९ :-** स्वच्छ भारत अभियान (नागरी) अंतर्गत जळगांव महानगरपालिकेच्या घनकचरा प्रक्रीया प्रकल्पाचे कामी मक्तेदारामार्फत मे. न्यायालयात दाखल दाव्या प्रकरणी बाजु मांडणेबाबत व वाढीव खर्चास मान्यता देणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री. नितीन लढ्ढा** :- मा.महापौरताई आपल्या झालेल्या चर्चेनुसार आपण या निष्कर्षावर आलेलो होतो. शुचिताताई हाडा यांचे त्यांनी काही प्रश्न उपस्थित केलेले होते. त्यांचे प्रश्न महानगरपालिकेच आर्थिक हित आणि प्रकल्पाच्या कामाला होणार विलंब या सगळ्या संदर्भात सगळा उहापोह झाल्यानंतर चर्चेअंती कोणत्याही ठोस निष्कर्षापर्यंत आपण कोणीही आलेलो नव्हतो आणि अंतिमत कायदेशीर वाद उपस्थित होतील भविष्यात महानगरपालिकेच्या आर्थिक हिताच्या दृष्टीकोनातुन कायदेशीर बाबींच्या अनुषंगाने या निष्कर्षापर्यंत आलेलो होतो. याबाबत महानगरपालिकेचे विधी सल्लागार यांनी शुचिताताई हाडा यांचे असलेले प्रश्न याच्यातील कायदेशीर अडचणी आणि भविष्यात होणारा कायदेशीर लढा आणि मक्तेदार आणि महानगरपालिका यांच्यामध्ये जे काही वाद उपस्थित होतील. त्याअनुषंगाने महानगरपालिकेवर येणारी आर्थिक बाबींच्या बाबतीतील संपुर्ण एक कायदेशीर अहवाल देण्याच्या संदर्भातील भुमिका काल ठरवलेली होती की विधी सल्लागारांनी आज मिटींग सुरू होण्याच्या पुर्वी आपल्याला तश्या पध्दतीचा अहवाल सादर करणे अपेक्षित होते की जेणेकरून या विषयाशी निगडीत ज्या काही शंका कुशंका उपस्थित झाल्या होत्या त्याच कायदेशीररित्या निरसण व्हाव या दृष्टीकोनातुन निर्णय घेतलेला होता. तर या संदर्भात विधी सल्लागारांकडून अहवाल आला असेल तर त्या अहवालाची माहीती या सभागृहाला देण्यात यावी जेणेकरून या विषयावर निर्णय प्रक्रीया राबविणे संयुक्तिक होईल.

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता :-** अद्यापपावेतो अहवाल प्राप्त झालेला नाही त्यामुळे आपल्याला आज सादर करता येणार नाही. त्यांनी वेळ मागीतलेला आहे त्यामुळे आपल्याला थांबायचे असेल तर पुढच्या महासभेला घेऊ हा विषय , त्यांनी वेळ मागीतलेला आहे.

**श्री. नितीन लढ्ढा** :- आपल्याला या विषयावर निर्णय घेण्यासाठी तातडीने हा विषय आणला होता आणि या संपुर्ण विषयांना खुप डिले झालेला आहे आणि अशा पध्दतीने मी म्हणतो की आपली प्रतिमाच ती आहे. ती विनाकारण अशा पध्दतीने होते. निधी असुन सुध्दा आपण खर्च करू शकत नाही. तुम्ही वकील साहेबांशी बोला कधी तयार झाला असेल तर

**मा.आयुक्त** :- सकाळ पासुन आपण जिबी मध्ये आहोत. म्हणुन फोन करता नाही आला आणि रात्री माझे बोलणे झाले होते त्यांच्याशी तर ते म्हणाले की एखादा दिवस तरी अजुन लागेल.

**ॲड.शुचिता हाडा** :- माझेही त्यांच्याशी बोलणे झाले होते आणि ते म्हणाले की ते आज कोर्टामध्ये होते ते , या प्रस्तावाला बेस काय आहे की दि.१४/०२/२०२२ ला झालेला आपला ७४० नंबरचा महासभा ठराव , जो मिटींगमध्ये महासभेमध्ये घनकचरा प्रकल्पाचा ठराव झालेला होता. घनकचरा प्रकल्प याला विरोध कोणत्याही नगरसेवकाचा असणे शक्यच नाही. प्रत्येकाला घनकचरा प्रकल्प कार्यान्वित होण आवश्यक आहे. ते करत आहेत तो झालाच पाहीजे, त्याची उपयुक्तता तो किती आवश्यक आहे हे सगळे नगरसेवक या प्रकल्पाशी सर्वश्रुत आहेत. सगळ हे सगळयांना ज्ञात आहे पण हा ७४० नंबरचा ठराव झालेला होता. त्यावेळेला सुध्दा माझी विरोधाची भुमिका होती. भारतीय जनता पार्टीच्या वतीने मी ती भुमिका मांडलेली होती. सगळ्यांचा विरोध दुसरी मिटींग होती आपली दोनही मिटींगमये आमचा विरोध होता. मी माझ वैयक्तिक मत सुध्दा दिलेल होत. माझ्या वैयक्तिक विरोधाची नोंद तिथे झालेली होती. आता माझा प्रशासनाला प्रश्न असा आहे. माझा वैयक्तिक विरोध आहे असे मला वाटते, माझ्या माहितीप्रमाणे सुनिलभाऊ खडके तटस्थ होते त्यावेळी सभागृहात आणि बाकी जेवढे सदस्य असतील. तर त्यांची अनुकुलता प्रशासनाने गृहीत धरलेली होती आणि तो ठराव झाला १४/०२/२०२२ ला वाढीव संविदा रकमेचा प्रस्ताव, मग एक वर्ष झाल अजुनपर्यंत त्या ठेकेदाराला कार्यादेश का नाही दिले ठरावानुसार , दिले का आपण कार्यादेश ? का नाही दिले माझा एकटीचा विरोध होता. नविन ठरावानुसार त्याला कार्यादेश देण आणि त्याच्याकडुन ते काम करून घेण. कारण शासनाकडे आपल नुसत नाव खराब होतय की ही महापालिका अशीच आहे. त्यांचे प्रस्तावच येत नाही. निर्णय दिला भाऊ घेवुन. प्रशासनाने माझ्या म्हणण्याप्रमाणे प्रशासनाने आपल्यासमोर जे चित्र उभ केल ते तुम्ही मान्य केल तुम्ही प्रशासनाला पाठींबा

देवुन केले. जिथे CVC कार्यालय म्हणत की २६ टक्क्यांच्या पेक्षा काम आपण देवु शकत नाही. याउलट १०० टक्के वाढीव काम देण्याचा प्रस्तावाला मंजुरी दिली गेलेली आहे. प्रशासनावर तुम्ही सगळ्यांनी विश्वास ठेवला आणि मंजुरी देवुन टाकली. प्रशासनाने काय केल वर्षाभरात ? त्यावेळेला तत्कालीन आयुक्त जे होते आपले मा.कुलकर्णीसाहेब त्यांनी १४ फेब्रुवारीच्या ठरावावेळी तेव्हा कुलकर्णीसाहेब आयुक्त म्हणुन होते येथे, का नाही केली साहेबांनी त्याची प्रतिपुर्ती , आयुक्त महोदया माझा तुम्हाला हा प्रश्न राहील. कुलकर्णीसाहेब त्यांचा आग्रह होता प्रशासन म्हणुन , वाढीव रकमेचा जो बेकायदेशीर प्रस्ताव त्यांनी पटलावर आणला. प्रशासकीय प्रस्ताव म्हणुन सभागृहाची दिशाभुल केली. तो प्रस्ताव बहुमताने मंजुर करून घेतला. त्यावेळेला त्याला कार्यान्वित करणे त्यांची आयुक्त म्हणुन जबाबदारी नव्हती का? त्यांनी त्यांची जबाबदारी पार पाडलेली नाही. माझ्या मते हा विषय बेकायदेशीर पध्दतीने मंजुर  झालेला आहे. माझा विरोध प्रकल्पाला नाही पण निविदेतील अटी शर्ती या कधीच बदलवता येत नाही. टेंडर कॉज मध्ये बदल करता येत नाही आणि त्यात हे म्हंटलेल आहे की वाढीव रकमेचा प्रस्ताव म्हणुन असा प्रस्ताव आणणे हे गैरकायदेशीर आहे येथे सांगते. तरी प्रशासनाने सदस्यांची दिशाभुल केलेली आहे आणि आमच्या सदस्यांनी भारतीय जनता पार्टीच्या सदस्यांनी विरोध केलेला असतांनाही ऑनलाईन मिटींगमुळे त्यांचा विरोध नोंदवुन न घेता , सगळ्यांची अनुकुलता दर्शविलेली आहे. माझ्या एकटीचा विरोध दर्शविलेला आहे आणि आता हा जो पुढचा ठराव आलेला आहे. तो त्याच्याच पुढचा बेस ठराव आहे. दिले ना आयुक्तांना सभागृहाने अधिकार दिले ना मग काय केले तुम्ही मंजुर करून घेतात आणि मग आम्हालाच सांगत आहेत. यांच काम नव्हते का नितीनभाऊ यांनी ठराव मंजुर करून घेतला त्यांनी काय केल. कुलकर्णीसाहेब होते त्यावेळेला आयुक्त म्हणुन त्यानंतर ते निघुन गेले. आता हेही मॅडम बेकायदेशीर करता आहेत तुम्ही. मी स्वत:

**श्री. नितीन लढ्ढा** :- कुलकर्णीसाहेब जाण्याला बराच कालावधी झाला आहे.

**ॲड.शुचिता हाडा** :- बराच कालावधी झाला , बराच मोठा कालावधी झालेला आहे. याच्यामध्ये इतकी दिशाभुल केली आहे या सभागृहाची, जसा हा बेकायदेशीर ठराव झालेला आहे ७४० नंबरचा तो मी वैयक्तिक विखंडनासाठी पाठवलेला आहे.

**श्री. नितीन लढ्ढा** :- याच्यामध्ये असे आहे की काही आज अनुपस्थित झालेले असतील आणि वकील साहेबांनी जे काही मुद्दे त्यांच्याकडे असतील त्याच्यावर त्यांनी मत द्यावे आणि काही राहीलेले मुद्दे म्हणुन मी म्हंटले की सगळेच जे काही मुद्दे असतील ना

**ॲड.शुचिता हाडा** :- माझा प्रश्न तो नाहीये नितीनभाऊ प्रशासन कधी वर्कऑर्डर देत आहे. मग ज्यांनी ज्यांनी त्यावर सह्या केलेल्या आहेत त्या सगळ्यांवर कारवाई करण्यासाठीही पाठवलेले आहे आणि विखंडनासाठीही पाठविलेला आहे आणि प्रशासन काहीच कार्यवाही करत नाहीये वर्षभर होवुन गेले आहे.

**श्री. नितीन लढ्ढा** :- प्रशासन नाही ताई करणार विखंडन

**ॲड.शुचिता हाडा** :- विखंडन नाही ते तर शासन करेल विखंडन वर्कऑर्डर, तुम्ही जो ठराव करून दिला त्याच काय झाल त्याच केल काय या लोकांनी

**श्री. नितीन लढ्ढा** :- हो तो मंजुर केला होता.

**ॲड.शुचिता हाडा** :- १४ फेब्रुवारी २०२२ ला केला ना भाऊ तो ठराव केला होता आणि अस दाखवुन केला ना की घनकचरा प्रकल्प किती महत्वाचा आहे. घनकचरा प्रकल्प महत्वाचा नाहीये अस कुणीच म्हणत नाहीये. पण काहीतरी महत्वाच आहे म्हणुन बेकायदेशीर पध्दतीने करणार का, बेकायदेशीर पध्दतीने हे अस करू शकत नाही.

**श्री. नितीन लढ्ढा** :- ताई आपण विखंडनाला पाठवला आहे प्रस्ताव पण जर कधी शासन विखंडन करत नाहीये. म्हणजे शासनही अनुकुल दिसत नाहीये आणि त्याच्यानंतर आता वाढीव याला शासनानेही मान्यता दिली आहे.

**ॲड.शुचिता हाडा** :- वाढीव रकमेचा जसा करून घेतला मग आज परत हा प्रस्ताव आणायची गरज काय होती. मागील ठरावाला त्यांनी वाढीव रकमेच्या प्रस्तावाला मंजुरी दिली आहे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- ताई त्याच्यामध्येही वेगळ्या घडामोडी झालेल्या आहेत. ज्या दराने दिलेले होते. त्या दराने तो मक्तेदार काम करायला तयार नाहीये.

**ॲड.शुचिता हाडा** :- तो काम करत नाही तर मग प्रशासन काय करत आहे. तो तयार नाही ना विषय संपला, नव्याने निविदा प्रक्रीया राबवणे हा एकच उपाय आहे नितीनभाऊ याच्यामध्ये त्याच्याशिवाय हा तिढा कायदेशीर

मार्गाने सुटुच शकत नाही. ७४० नंबरचा ठराव प्रशासनाने दिशाभुल करून सभागृहाकडून मंजुर करून घेतलेला आहे. आता तरी सभागृहाने सावध व्हा. आता तरी युटर्न घ्या.

**श्री.नितीन लढ्ढा** :- ताई

**ॲड.शुचिता हाडा** :- आता तरी निविदा प्रक्रीयेचा विषय ठेवा किती दिवस झाले आहे. निविदा प्रक्रीया होवुन कधीचाच मार्गी लागला असता हा विषय , दरवेळेला वेगवेगळे कारण प्रशासनाकडुन दिले जातात. मला सांगा हा वाढीव चा विषय का आला जो डिपीआर आपला मंजुर होता त्याच्या इंम्पिलीमेंटच्या वेळी हे लक्षात आहे की हा डिपीआर आपला कमीचा झालेला आहे. मग आपण वाढीव डिपीआरचा प्रस्ताव पाठवला. तो मंजुर होवुन आला बरोबर आहे. मग त्यानुसार आपल सगळच बदलत आहे. मग का तोच ठेकेदार कंन्टीन्यु झाला पाहीजे. तो ठेकेदार जर म्हणतोय की मी काम करू शकत नाही. विषय तिथेच संपला, नविन निविदा प्रक्रीया राबविणे हा एकच पर्याय आहे आणि राहणार आहे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- ताई , नाही काम करू शकत नाही अस ठेकेदाराच म्हणण नाहीये. वाढलेले दर आणि बदललेल्या परिस्थितीमुळे मी काम करण्यास असमर्थ आहे.

**ॲड.शुचिता हाडा** :- विषय तो नाहीये नितीनभाऊ

**श्री.नितीन लढ्ढा** :- ताई , या संदर्भात

**ॲड.शुचिता हाडा** :- जर तो काम करण्यास तयार नाहीये नितीनभाऊ

**श्री.नितीन लढ्ढा** :- ताई , या संदर्भात कार्यादेश देण्यामध्ये जो विलंब झाला

**ॲड.शुचिता हाडा** :- विलंब प्रशासनाने केलेला आहे या सदस्यांचा त्यामध्ये काही हे नाहीये.

**श्री.नितीन लढ्ढा** :- ताई महासभेमध्ये जो निर्णय झाला त्याच्यावरच प्रशासनाचे नियंत्रण पाहीजे होते आणि तो तहकुब ठेवलेला होता आणि मला वाटते की तो जवळपास सात-आठ महिन्यांनतर तो आलेला आहे.

**ॲड.शुचिता हाडा** :- हो ना मग तो तहकुब ठेवलेला होता. प्रशासनाने त्याच्या आधीची जी मिटींग होती. आता मला त्याची तारीख नाही आठवत पण त्या मिटींगमध्ये या विषयावर सर्वाधिक भाष्य हे तुमचे आहे आणि त्यावेळेला आपण तो तहकुब केला होता. या प्रशासकीय घोडचुकांमुळे आम्ही सकल होतो आहे. आम्ही शिव्या खातो आहे हे तुमच वाक्य आहे नितीनभाऊ

**श्री.नितीन लढ्ढा** :- बरोबर आहे ना

**ॲड.शुचिता हाडा** :- आणि आता याच्यामध्ये जे जे कर्मचारी दोषी आढळता आहेत त्यांच्यावर कारवाईची मागणी केली होती. कारवाई तर झाली नाहीच. पण प्रशासनाने पुन्हा एकदा दिशाभुल करणारा ठराव व्यवस्थित सभागृहाकडून मंजुर करून घेतला आणि तो करून दिला. पण त्यानंतर काय झालं की प्रशासनाने पुढे काहीच केल नाही आणि प्रशासनानेकडे तो ठराव मंजुर करून पडलेला आहे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- कस आहे ताई की आपण ही चर्चा का करतोय की, मक्तेदार न्यायालयात गेलेला आहे.

**ॲड.शुचिता हाडा** :- मक्तेदाराला न्यायालयात जाण्याचा प्लॅटफॉर्म त्याला तयार करून देण्यात आलेला आहे. आम्हा सगळयांचा तोच रोष आहे प्रशासनावर

**श्री.नितीन लढ्ढा** :- हो ना मग त्याच्यामध्ये आपला काही दोष आहे का? की न्यायालयीन प्रक्रीयेमध्ये शेवटी मक्तेदार हा जिकंतो.

**ॲड.शुचिता हाडा** :- हो ना मग प्रशासन त्याला मदत करते म्हणुन तो न्यायालयात जिकंतो.

**श्री.नितीन लढ्ढा** :- हो ना, म्हणुन आपण या गोष्टींची परिस्थिती पुन्हा महानगरपालिकेवर येवू नये. म्हणुन त्या दृष्टीकोनातुन कायदेशीर मत काय आहे हे अगोदर घ्यायच आणि मग

**ॲड.शुचिता हाडा** :- नितीनभाऊ म्हणुन म्हणतेय की

**श्री.नितीन लढ्ढा** :- या संदर्भात आपण महापालिकेच हित कशा पध्दतीने जोपासले जाईल तशा पध्दतीचा निर्णय घ्यायचा आणि काल झालेल्या आपल्या चर्चेअंती आपण त्या निर्णयापर्यंत आलो की विधी सल्लागारांच मत घ्याव आणि जे काही स्पष्ट मत विधी सल्लागारांचे असेल तर त्या मताची भुमिका सभागृहाने स्विकारली पाहीजे कारण जेणेकरून जे काही झाले.

**ॲड.शुचिता हाडा** :- त्याला माझा काही आक्षेप नाही.

**श्री.नितीन लढ्ढा** :- कारण आपण त्या पध्दतीनेच करणार

**ॲड.शुचिता हाडा** :- काय करायचे आहे हे आपणच ठरवु. एकदा विधी सल्लागारांचे मत आले की पुन्हा आपण एकदा सभागृहाच्या लक्षात आणुन देवु ईच्छिते की प्रशासनाने आपली दिशाभुल करत आहे. प्रशासनाच्या प्रत्येक गोष्टींवर ब्लाईंडली विश्वास ठेवुन चालणार नाही आणि या सर्वांना तो विचार करून निर्णय घ्यावा लागेल.

**श्री.नितीन लढ्ढा** :- ताई विधी शाखेचे मत जे आहे ते तातडीने मागवयाच्या संदर्भात त्यांना पुन्हा सुचना करण्यात याव्यात आणि पुढील महासभेमध्ये विधी सल्लागारांच्या मतासह हा प्रस्ताव ठेवण्यात यावा.

**सौ.दिपमाला काळे** :- महापौरताई आम्ही या विषयाला विरोध केला होता पण त्यावेळी ऑनलाईन असल्यामुळे आमचा विरोध काही नोंदवला गेला नाही. त्यामुळे आता माझा या विषयाला विरोध आहे. मागच्या वेळेसही आम्ही बोललो होतो आणि मागच्यावेळेस एकट्या शुचिताताई हाडा यांचाच विरोध नोंदवला गेला आहे. तर या विषयाला माझा विरोध आहे.

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी चर्चा करीत होते त्यामुळे सभागृहातील चर्चेचा स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**सौ.दिपमाला काळे** :- हो तहकुब आहे तरी मी सांगुन देते की, ऑनलाईन असल्यामुळे मी विरोध नोंदवुन देते. कारण ऑनलाईन असल्यामुळे त्यांनी आमचा सगळ्यांचा विरोध नोंदवुन घेतला नाही.

**श्री.विशाल त्रिपाठी** :- सगळ्यांचा विरोध होता या विषयाला

**सौ.दिपमाला काळे** :- आणि आताही या विषयाला माझा विरोध आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी** :- त्यावेळेस काय झाले होते की, विरोध नोंदवला गेला नाही आणि त्याच्यानंतर सुध्दा आम्ही सह्यांचे लेखी पत्र रेकॉर्डवर दिले आहे. तर त्यांचे म्हणणे बरोबर आहे की त्यांचा विरोध नोंदवला नाही.

**सौ.दिपमाला काळे** :- त्यावेळी ऑनलाईन असल्यामुळे विरोध नोंदविला नाही त्यामुळे मी आता स्वत: या विषयाला विरोध नोंदवत आहे जर आपण तो विषय तहकुब केलेला होता पण तरी सांगायचे आहे मला की तेव्हाही आमचा विरोध होता आणि ऑनलाईन मुळे तो घेतला गेला नाही.

**श्री.नितीन लढ्ढा** :- ठिक आहे विरोध नोंदवुन घ्यावा आणि पुढील महासभेसमोर येतांना विधीसल्लागारांचे मत मागवुन तातडीने हा विषय पुढील महासभेसमोर ठेवण्यात यावा आणि तशा सुचना विधी सल्लागारांना देण्यात याव्यात.

**मा.उपमहापौर** :- माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर** :- सन्मा.सदस्य नितीनभाऊंनी दिलेल्या सुचनेनुसार प्रशासनाने याची नोंद घ्यावी आणि विषय क्रं. १९ सर्वानुमते तहकुब करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. १०२५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, स्वच्छ भारत अभियान (नागरी) अंतर्गत जळगांव महानगरपालिकेच्या घनकचरा प्रक्रीया प्रकल्पाचे कामी मक्तेदारामार्फत मे. न्यायालयात दाखल दाव्या प्रकरणी बाजु मांडणेबाबत व वाढीव खर्चास मान्यता देणेबाबत प्रशासनाकडुन आलेला प्रस्ताव तहकूब करण्यात येत आहे.

सभागृहात झालेल्या चर्चेनूसार प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा विधी सल्लागार यांचे सदर प्रकरणी परिपूर्ण व कायदेशिर स्पष्ट मत घेवून पूढील महासभेत तातडीने प्रस्ताव सादर करावा.

**सर्वानुमते तहकुब**

**अनुकूल - ५५**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं. २०:-** अग्निशमन अत्याधुनिक साधन सामुग्री व उपकरणे साहित्य खरेदी करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर** :- माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर** :- विषय क्रं. २० सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. १०२६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, अग्निशमन सेवा अत्यावश्यक सेवा असल्याने नागरिकांना सक्षम व प्रभावीपणे अग्निशमन सेवा पुरविणेकरीता अग्निशमन विभागात प्रशिक्षित मनुष्यबळ असणे गरजेचे असते तसेच अग्निशमन विभागात अत्याधुनिक साधन सामुग्री व उपकरणे असणे आवश्यक आहे. याकरीता अग्निशमन विभागाकडून जा.क्र./जशमनपा/फायर/३०/२०२२-२३ दि.१७/०५/२०२२ नुसार संचालक महाराष्ट्र अग्निशमन सेवा मुंबई यांना तांत्रिक मान्यता मिळणे करीता पत्र पाठविण्यात आले होते. त्यानुसार संचालक महाराष्ट्र अग्निशमन सेवा मुंबई पत्र क्र.मअसे-२०२२/३७-ए/१२७५ दि.०२/०८/२०२२ रोजी अग्निशमन अत्याधुनिक साधन सामुग्री व उपकरणे यांना तांत्रिक मान्यता मिळालेली आहे. याचा तपशिल खालील प्रमाणे.

| अ.क्र. | साहीत्य व उपकरणांचे नांव | नग |
|---|---|---|
| १. | कॅनव्हस डिलेवरी होज (GM मेल/फीमेल कप्लींग सह) | ५० नग (१५ मी.प्रमाणे) |
| २. | मल्टीपर्पज हॅंड कंट्रोल ब्रांच (as per IS Standard) | १० नग |
| ३. | स्मोक एकझॉस्टर (as per IS Standard) | ०२ नग |
| ४. | सर्च लाईट (LED) (as per IS Standard) | १० नग |
| ५. | Co2 टाईप फायर एक्सटींग्युशर (४.५ किलो) (as per IS Standard) | ४० नग |
| ६. | ABC टाईप फायर एक्सटींग्युशर (४ किलो) (as per IS Standard) | ३० नग |
| ७. | AFFF Foam टाईप फायर एक्सटींग्युशर (९ लि.) (as per IS Standard) | २० नग |
| ८. | सिंगल लेअर फायरमन ड्रेस (आर्टीकल सह) | १५ नग |
| ९. | डार्क नेव्ही ब्ल्यू पॅंट शिलाई सह | १२० नग |
| १०. | स्काय ब्ल्यू हाफ शर्ट शिलाई सह | ११६ नग |
| ११. | व्हाईट हाफ शर्ट शिलाई सह | ०४ नग |
| १२. | ब्लॅक ऑक्सफर्ड शुज | ६२ जोड |
| १३. | ब्लू टी शर्ट मोनोग्राम सह | ६० नग |
| १४. | लाईन यार्ड डार्क नेव्ही ब्लू (स्टील व्हिसल सह) | ६० नग |
| १५. | बेरीकॅप नेव्ही ब्लू मोनोग्राम सह | ६० नग |
| १६. | पी कॅप नेव्ही ब्लू मोनोग्राम सह | ०२ नग |
| १७. | नेम प्लेट (स्टिल) | ६० नग |
| १८. | शोल्डर बॅच (स्टिल) | ६० जोड |
| १९. | शोल्डर इंम्पेलीअर (अधिकारी) | १२ नग |
| २०. | सॉक्स ब्लू | ६२ जोड |
| २१. | ब्लॅक बेल्ट (कंबर पट्टा) मोनोग्राम सह | ६२ नग |
| २२. | ड्रायव्हर व्हिल (स्टिल) | ३० नग |
| २३. | पावसाळी रेनकोट (डकबॅक) | ६० नग |

| | | |
|---|---|---|
| २४. | हिवाळी स्वेटर | ६० नग |
| २५. | फुल बनियान मोनोग्राम सह | १२० नग |

उक्त अग्निशमन अत्याधुनिक साधन सामुग्री व उपकरणे साहित्य खरेदी करणे करीता रक्कम रु.७५,००,०००/- (पंचाहत्तर लक्ष रु.) मात्र अंदाजे खर्च अपेक्षित आहे. सदर खरेदी प्रक्रिया तांत्रिक मान्यता पत्र क्र.मअसे-२०२२/३७-ए/१२७५ दि.०२/०८/२०२२ नुसार ई-निविदा किंवा Gem पोर्टल व्दारे शासनाने निर्धारीत केलेल्या खरेदी प्रक्रीयेनुसार करण्यात यावी असे पत्रात नमूद आहे. सदर सन २०२२-२३ च्या सुधारीत अंदाजपत्रकात अग्निशमन साधन सामुग्री व सादील या लेखाशिर्षाखाली रक्कम रु.२,००,०००/- मात्र ची आर्थिक तरतूद केलेली आहे. महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जिव संरक्षक उपाययोजना अधिनियम २००६, कलम २५ पोटकलम १ नुसार आगसुरक्षा निधी स्थापन आहे. अधिनियमातील कलम २५ पोटकलम ३ नुसार प्राधिकरणाच्या हद्दीतील अथवा हद्दीबाहेरील कोणत्याही जमिनीवर किंवा कोणत्याही इमारतीत आगीस प्रतिबंध करण्याच्या किंवा आग विझविण्याच्या प्रयोजनार्थ, अग्निशमन अत्याधुनिक साधन सामुग्री व उपकरणे पुरविण्यासाठी खर्च करणे अनुज्ञेय आहे. नोव्हेंबर २०२२ अखेरपर्यंत आग सुरक्षा निधीमध्ये शिल्लक रक्कम रु.१,७१,५९,४६८/- मात्र आहेत. महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जिव संरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ कलम २५ पोटकलम ३ नुसार खर्च अनुज्ञेय असल्यामुळे व तांत्रिक मान्यता प्राप्त झाल्यामुळे सदर अत्याधुनिक साहित्ये खरेदी करण्यास व होणारा खर्च आग सुरक्षा निधी मधुन करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल -** **५५**

**सूचक** **:- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक** **:- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं. २१:-** प्रभाग क्रं.०२, प्रभाग क्रं.०८, प्रभाग क्रं.०९, प्रभाग क्रं.१०, प्रभाग क्रं.१२ व प्रभाग क्रं.१७ अंतर्गत एकुण ०८ ठिकाणी पोल उभारुन एलईडी पथदिवे बसविणे कामी नाहरकत दाखला देणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर** :- माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर** :- विषय क्रं. २१ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. १०२७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, प्रभाग क्रं.०२ अंतर्गत गट नं.३३७-५ मधील महादेव मंदिराजवळ, नवीन घरकुल (हुडको), शिवाजी नगर, प्रभाग क्रं.०८ अंतर्गत गट नं.९४-२, चामुंडा स्वीट मार्ट जवळ, लंडन कॉलनी, प्रभाग क्रं.०८ अंतर्गत गट नं.१९ हनुमान मंदिर जवळ निमखेडी रोड, प्रभाग क्रं.०९ अंतर्गत गट नं.२८ प्लॉट नं.२० मुक्ताई नगर, प्रभाग क्रं.१० अंतर्गत गट नं.२७७-२ सोनी नगर येथील महादेव मंदिराजवळ मनपा ओपन स्पेसमध्ये, प्रभाग क्रं.१२ अंतर्गत सर्वे नं.४८२-२ रामानंद नगर रोड, गिरणा टाकी जवळ ए-१ प्लाझा समोर, विदया इंग्लीश स्कुलजवळ, प्रभाग क्रं.१७ अंतर्गत अयोध्या नगर, रायसोनी शाळेच्या मागे, श्री.एल.एन.पाटील यांच्या घराजवळ वर नमुद एकुण ०८ ठिकाणी पोल उभारुन एलईडी पथदिवे बसविणे कामी उपअभियंता, सा.बां.विदयुत उपविभाग जळगांव यांनी पत्र जा.क्रं./जविउवि/१०४ दि.७/२/२०२३ अन्वये मा.आमदार श्री.सुरेश दामु भोळे यांचे आमदार स्थानिक विकास कार्यक्रम सन २०२२/२३ अंतर्गत जळगांव शहरात पोल उभारुन

त्यावर एलईडी पथदिवे बसविणे कामी नाहरकत दाखला मिळण्याबाबतची मागणीनुसार नाहरकत दाखला देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ५५**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं. २२:-** महानगरपालिका प्रशासकीय इमारत लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल टॉवर या ठिकाणी नव्याने बसविण्यात आलेल्या एस्के एलेव्हेटर्स प्रा.लि.मुंबई या कंपनीच्या ६ उव्दाहकांच्या वार्षीक देखभाल दुरुस्ती (AMC) कामी एजन्सीची नियुक्ती करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**श्री.विशाल त्रिपाठी** :- फक्त याच्यामध्ये यांनी काम करण्याच्या संदर्भात की त्यानी काम इतक्या वेळेत केले पाहीजे असे काही मुदत दिली पाहीजे अन्यथा त्याला दंड करा काहीतरी, जे काही असेल त्याच्यामध्ये टेक्निकल पार्ट असेल तर त्याला दंडाची काहीतरी एक तरतूद ठेवावी.

**मा.उपमहापौर** :- माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर** :- विषय क्रं. २२ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. १०२८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, महानगरपालिका प्रशासकीय इमारत लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल टॉवर या ठिकाणी नव्याने बसविण्यात आलेल्या एस्के एलेव्हेटर्स प्रा.लि.मुंबई या कंपनीचे ६ उव्दाहके बसविण्यात आलेले असुन त्यांचा हमी कालावधी ३१ मार्च २०२३ अखेर संपुष्ठात येत असल्याने व पुढील एक वर्ष कालावधी करिता ६ उव्दाहकांचे वार्षिक देखभाल दुरुस्तीचा मक्ता AMC (comprensive maintanance) देणे आवश्यक असल्याने एस्के एलेव्हेटर्स प्रा.लि.मुंबई यांचेकडील दि.०८/१२/२०२२ महानगरपालिकेस प्राप्त दि.२३/०२/२०२३ चे पत्र प्राप्त झाले असता एजन्सीने AMC कामी रक्कम रु.३७,७०,६९०/- मात्र दर दिलेले होते. सदरहु दर comprensive maintenance वगळता AMC चे दिलेले होते. या सदंर्भात एजन्सीच्या प्रतिनिधीशी चर्चा केली असता त्यांनी रक्कम रु.३७,७०,६९०/- या दरात AMC comprensive maintenance करण्याची तयारी दर्शविली. तथापि सदरहु दर जास्त असल्याने दर वाटाघाटी कामी कळविले असता एजन्सीचा कोणीही प्रतिनिधी दर वाटाघाटी कामी उपस्थित राहीलेला नाही. एजन्सीचे पत्र क्रं.MT/J/४२९२ To ४२९७-Total ६ units दि.०८/०२/२०२३ रोजीचे पत्र प्राप्त झालेले असुन त्यांनी दर कमी करण्याची तयारी दर्शविलेली नाही. दर जास्त असल्याने व मुळ उत्पादक कंपनी यांनी दर कमी न करुन दिल्यामुळे ई-निविदा प्रक्रिया राबवून एजन्सीची नियुक्ती करणे आवश्यक आहे.

प्रस्तृत कामी रक्कम रु.३७,७०,६९०/- मात्र खर्च अपेक्षित असल्याने त्यास महासभेची प्रशासकीय मान्यता घेणे तद्नंतर ई-निविदा प्रक्रिया राबविणे याकरिता काही कालावधी लागण्याची शक्यता असल्याने व १ एप्रिल २०२३ पासून पुढील एक वर्ष कालावधी करिता comprensive maintenance AMC देणे आवश्यक असल्याने कामाची निकड लक्षात घेता प्रस्तृत कामी येणाऱ्या अपेक्षित अंदाजपत्रकीय रक्कम रु.३७,७०,६९०/- मात्रचे खर्चास तसेच ई-निविदा प्रक्रिया राबविणे याकामी जाहिरात खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने अर्थसंकल्पीय लेखाशिर्षका अंतर्गत सदर काम अनुज्ञेय असल्याबाबत खातरजमा करुन व प्रचलीत शासन निर्णयान्वये तसेच विहीत पध्दतीचा अवलंब करुन नियोजीत कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ५५**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं. २३:-** जळगांव शहर महानगरपालिका मालकीच्या मिळकती / इमारती वरील टेरेसची जागा, खुल्या जागा, वाहतुक बेट, जागा इत्यादी मोबाईल टॉवर उभारणाऱ्या कंपनीस महाराष्ट्र टेलीकॉम इन्फ्रास्ट्रक्चर मार्गदर्शक तत्व २०२२ मधील नियमावलीनुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार व मनपाच्या अटीशर्तीनुसार भाडेपट्टयाने देण्या संदर्भात धोरणात्मक निर्णय घेणे बाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- प्रशासना कडुन आलेला धोरणात्मक निर्णय घेणेबाबतचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर** :- पंरतू याच्यामध्ये माझी एक सुचना आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी** :- माझी पण एक सुचना आहे की ज्याची परवानगी होती त्या जागेवर टॉवर बसवायचे आहे. तेव्हा परत महासभेपुढे आणले पाहीजे विषय हे म्हणजे ती जागा आपल्या उपयोगाची आहे की नाही नाहीतर हे परस्पर हे देवुन टाकु नये.

**श्री.नितीन लढ्ढा** :- विशालभाऊ नाही काय आहे आपण धोरण ठरवायचे आहे

**श्री.विशाल त्रिपाठी** :- आता उद्या , होना मग धोरण ठरवायचे आहे ना तर धोरणामध्ये हा विषय नाही आला आहे ना की महासभेपुढे पाठवु आम्ही

**श्री.नितीन लढ्ढा** :- हो ना मग आपल्याला ते ठरवता येईल ना.

**श्री.विशाल त्रिपाठी** :- कस आहे नितीनभाऊ

**श्री.नितीन लढ्ढा** :- पॉलीसी आपण यालाच म्हणतो ना की.

**श्री.विशाल त्रिपाठी** :- नितीनभाऊ या डॉकेटमध्ये तस म्हंटलेले नाही ना

**श्री.नितीन लढ्ढा** :- या संदर्भातील कुठल्या जागा ज्या संस्थांच्या असतील तर ते प्रस्ताव अंतिम मान्यतेसाठी महासभेपुढे येईल.

**श्री.विशाल त्रिपाठी** :- आरोग्य आणि ह्या गोष्टी लक्षात घेवुन रहिवास वगैरे काही NOC वगैरे द्यावी लागेल. उद्या आपल्याला उदाहरणार्थ मिनाताई ठाकरे कॉम्प्लेक्सला वर मजला बांधायचा आहे. जर तुम्ही त्याला देवुन टाकले तर आपल्याला तो दाखला पुन्हा एक्पंन्ड करता येणार नाही.

**श्री.नितीन लढ्ढा** :- हो ना मग हे सगळे प्रस्ताव महासभेसमोर यायला पाहीजे.

**श्री.विशाल त्रिपाठी** :- म्हणुन सांगतोय मी भाऊ

**ॲड.शुचिता हाडा** :- सुचना अशी आहे की हे जे सगळं राबविले जाणार आहे तर हे किरकोळ वसुली विभागाकडुन जाणार आहे का? किरकोळ वसुली विभागाकडे देण्यात येवु नये याच्यासाठी स्वतंत्र विभाग उभारण्यात यावा. कारण मी ज्यावेळी स्थायी समिती सभापती होती त्यावेळी म्हणजे आता जो मोबाईल टॉवरचा विषय आहे पण याचा अजुन एक विषय मी लक्षात आणुन देवु ईच्छिते सभागृहाच्या की महापालिकेला अनेक ठिकाणांवरून उत्पन्न आपल्याला मिळु शकते आणि म्हणुन अनेक वेगवेगळया कंपन्यांच्या जाळं हे महापालिकेच्या क्षेत्रातुन फिरत असते आणि नागेश्वर कॉलनीला मी सभापती असतांना हे या अशा पध्दतीने अंडरग्राऊंड केबल टाकत होते आणि त्याची कोणतीही परवानगी त्यांनी घेतलेली नव्हती. निव्वळ आपल्या सिटी इंजिनियरला अथवा त्या भागातील आपल्या बांधकामच्या इंजिनियरला माहिती सुध्दा नव्हत की अस काही काम चालु आहे, तेव्हा मी ते लक्षात आणुन दिले. त्यानंतर प्रशासनाकडुन फक्त आश्वासन देण्यात आले. आपण माहिती घेवु त्यांनी परवानगी घेतली की नाही. त्यांना दंड करू अशा पध्दतीचे तोंडाला पान पुसली जात आहेत. तर अनेक प्रकारे आपण उत्पन्न वाढ करू शकतो. आयुक्त महोदया तुमच्या लक्षात आणुन देवु ईच्छिते मी की धुळे नगरपालिकेने एक टेंडर काढले होते. धुळे म्युनिसिपल कार्पोरेशन PYMC प्रोजेक्ट मॅनेजमेंट कॉन्ट्रॅक्ट EMO फॉर अपॉईटमेंट ऑफ कंस्नलटंन्स ऑर डिशबॅलिशमेंट ऑफ रिकव्हर रिव्हेन्यु लॉस्ट ऑफ पेमेंट टु धुळे म्युनिसिपल कार्पोरेशन बाय द टेलिकॉम LTT ज ॲन्ड ऑप्टिकल फायबर नेटवर्कस, तर आपण जळगांव महानगरपालिका म्हणुन आपण सुध्दा या सगळया पध्दतींचा विचार केला पाहीजे आणि या सगळया गोष्टींचा आता आपण जो ठराव करू. इन्फ्रास्टक्चर जे आपले वापरले जाणार आहे. त्यांच्या टॉवर वापरण्यासाठी जी जागा वापरली जाणार आहे. त्यासोबत जिथे जिथे अंडरग्राऊंड केंबलींग साठी किंवा वरून

केंबलिंग अशा वेगवेगळया याच्या होत आहेत त्या सगळयांचा सुध्दा रिव्हेन्यु गोळा झाला पाहीजे आणि त्याकामी सुध्दा आपण टेंडर पब्लिश केले पाहीजे आणि या सगळयांचे एक स्वतंत्र विभाग असला पाहीजे की किरकोळ वुसलीमध्ये ते अंतर्भुत करू नये अस माझ येथे म्हणणे आहे.

**मा.उपमहापौर** :- आता अस्तित्वात असलेले टॉवर आहेत आणि ते कायदेशीर आहे की बेकायदेशीर आहेत. म्हणजे महानगरपालिकेकडून त्यांनी परवानग्या घेतल्या आहेत. घेतलेल्या नाहीयेत किंवा कोणत्या विभागाकडे त्यांची काही नोंद आहे का ? किंवा त्यांची आपल्या वसुली खर्चामध्ये त्यांची नोंद आहे का ? किंवा आपल्या महानगरपालिकेकडून किती त्यांचे उत्पन्न घेतले जाते.

**श्री.गणेश चाटे, उपायुक्त (महसुल):-** २१२ आपल्याकडे जे टॉवर आहेत त्यापैकी एकच टॉवर अधिकृत आहे आणि जे २११ जे टॉवर आहेत ते अनधिकृत आहेत आणि अनधिकृत टॉवर असल्यामुळे आपण त्या सर्व टॉवरला जो टॅक्स लावलेला आहे आणि पॅनल्टीपण लावलेली आहे. परंतू संबंधित मोबाईल कंपन्या ज्या आहेत त्या सदरहू कोर्टामध्ये गेलेल्या आहेत आणि सरकारने या टॉवरची जी पॉलीसी आहे ती आता या १९ डिसेंबरला मंजुर केलेली आहे आणि या पॉलीसीनुसार जे अनधिकृत टॉवर आहेत त्यांना मुद्दा क्रं. २० या पॉलीसीनुसार त्यांना रेग्युरलायझेशन करण्यासाठी ३१ मार्च पर्यंत मुदत दिलेली आहे. त्याच्यासाठी महासंच नावाचे एक ऑनलाईन पोर्टल आहे. हे ३१ मार्च पर्यंत हे जे पोर्टल आहे ते आपल्या शहरात असलेले अनधिकृत असलेले टॉवर आहेत ते अधिकृत करण्यात येईल त्याच्यासाठी जी पॅनल्टी आहे ती सरकारने त्यांना माफ करून दिलेली आहे आणि त्याची स्क्रुटिनी फी त्याचे नियम वगैरे सर्व या पॉलीसी मध्ये ठरविलेले आहेत. त्यांचे जे आवश्यक डॉक्युमेंट आहेत ते पण पॉलीसी मध्ये ठरवलेले आहेत आणि जसे जसे या पोर्टलवर अप्लिकेशन येतील तसे तसे आपण ते अधिकृत करू यासंदर्भात आपण तिन आठवड्यापुर्वी वृत्तपत्रामध्ये दिलेले होते की सदर मोबाईल टॉवर अधिकृत करण्यासाठी जाहीर आवाहन केलेले आहे आणि प्रत्येक मोबाईल कंपन्यांना आपण ई-मेलद्वारे कळविलेले पण आहे आणि सगळ्या मोबाईल टॉवर कंपन्यांना व्हॉटसअॅप ग्रुप करून त्यावर त्यांना सुध्दा आपण कळविलेले आहे आणि प्रत्येक कंपनीच्या प्रतिनिधींशी मी स्वत: सुध्दा चर्चा केलेली आहे. परंतू अजुनपावेतो ऑफलाईन किंवा ऑनलाईन कुणाचेच अर्ज आलेले नाहीयेत. आता याच्या संदर्भात टेलिकॉम पॉलीसी ठरविणारे आहेत त्यांच्याशी चर्चा केली तर त्यांनी लिंक तयार करून दिलेली आहे. ती लिंक आपल्याला दिलेली आहे आणि ती लिंक त्या पोर्टलवर टाकुन आणि मग पुढे कारवाई करण्यात येईल.

**मा.उपमहापौर** :- साहेब आता हे जे तुम्ही सांगीतले तरी याच्या संदर्भात जे काही टॉवर असतील किंवा जमीनी असतील किंवा मालक असतील किंवा जे पण असतील तर या सर्वांना तो क्रायटेरिया लागु होतो का? म्हणजे तुम्ही जी माहिती दिली ती मला अस वाटत की संदिग्ध आहे. म्हणुन मी स्पष्ट विचारतो आहे की, इतर शहरात अस्तित्वात असलेले टॉवर आता आपण असे सांगीतले की ते न्यायप्रविष्ट आहेत. तर ती बाब त्याच्यामध्ये आपण जळगांव शहरात अस्तित्वात असलेले टॉवरच्या बाबतीत पण आहे का ?

**श्री.गणेश चाटे, उपायुक्त (महसुल):-** हो हो

**मा.उपमहापौर** :- हे पण गेले आहे का कोर्टात कोण कोण गेले आहे.

**श्री.गणेश चाटे, उपायुक्त (महसुल):-** बरेच आहेत.

**मा.उपमहापौर** :- आपण त्यांना नोटीसा दिल्या आहे का?

**श्री.गणेश चाटे, उपायुक्त (महसुल):-** हो दिल्या आहेत. जे मोबाईल टॉवर अनधिकृत आहेत त्या सर्वांना

**मा.उपमहापौर** :- म्हणजे त्या २१२ पैकी २११ लोकांना आपण नोटीस दिलेल्या आहेत

**श्री.गणेश चाटे, उपायुक्त (महसुल):-** हो

**मा.उपमहापौर** :- आपण लिगल प्रोसिजरने त्यांना नोटीसी दिलेल्या आहेत.

**श्री.गणेश चाटे, उपायुक्त (महसुल):-** हो.

**मा.उपमहापौर** :- माझ्या माहितीनुसार मॅडम माझ्या माहितीनुसार याच्यामध्ये

**श्री.गणेश चाटे, उपायुक्त (महसुल):-** दरवर्षाला आपण पॅनल्टीचे सुध्दा बिल देतो आपण त्यांना आणि त्या बिलांचे रेकॉर्डही ठेवतो.

**मा.उपमहापौर** :- नाही नाही ते अनधिकृत असल्याच्या नोटीसा आपण दिलेल्या आहेत का ही मला माहिती घ्यायची होती.

**श्री.अश्विन सोनवणे :-** वसुली करता आहे का आपण

**श्री.गणेश चाटे, उपायुक्त (महसुल):-** हो तेच सांगतो आहे की आपण रेग्युलर वसुली करतोय पंरतू सगळ्यांचे जे बिल आहेत

**श्री.अश्विन सोनवणे :-** आता त्यांची काहीतरी १२ कोटींची वसुली बाकी आहे तर मग बारा-बारा कोटी होईपर्यंत तुम्ही करता काय?

**मा.उपमहापौर** :- मी माहीती घेतली की

**श्री.अश्विन सोनवणे :-** बारा-बारा कोटी होईपर्यंत तुम्ही करता काय?

**मा.उपमहापौर** :- मी माहीती घेतली की आपण अनधिकृत मोबाईल टॉवर वाल्यांना महानगरपालिकेकडून कुठलीच नोटीस किंवा पत्र दिलेले नाही आहे. फक्त आपण ते अनधिकृत आहेत म्हणुन त्यांच्यावर आपण दोनपटीची घरपट्टी असेल किंवा काही असेल महसुल उत्पन्न जमा करतो.

**श्री.गणेश चाटे, उपायुक्त (महसुल):-** दंडाचे बिले आहेत ते आपण प्रत्येक याला दिलेले आहे.

**मा.उपमहापौर** :- ठिक आहे दिलेले आहे. पण नोटीस नाही दिलेली आहे.

**श्री.गणेश चाटे, उपायुक्त (महसुल):-** हो नोटीसही दिलेली आहे.

**मा.उपमहापौर** :- काय नोटीस दिलेली आहे.

**श्री.गणेश चाटे, उपायुक्त (महसुल):-** आपले जे टॉवर अनधिकृत आहे ते अधिकृत करण्यात यावे अश्या पध्दतीची नोटीस.

**मा.उपमहापौर** :- ते अनधिकृत आहे हे आपल्याला माहिती आहे तरी पण आपण कारवाई करत नाहीये याचा अर्थ असा आहे.

**श्री.गणेश चाटे, उपायुक्त (महसुल):-** या पॉलीसीनुसार आपल्याला मोबाईल टॉवर सिल करता येत नाही. त्याचा दंड भरलेला आहेत

**श्री.अश्विन सोनवणे :-** लोक त्या टॉवरचे भाडे घेत आहेत पण हे वसुली करू शकत नाहीये.

**मा.उपमहापौर** :- जळगांव शहरामध्ये अनधिकृत टॉवर जे आहेत ते खाजगी प्रॉपर्टीवर उभे आहेत.

**श्री.गणेश चाटे, उपायुक्त (महसुल):-** हो.

**मा.उपमहापौर** :- मग खाजगी प्रॉपर्टीवर महानगरपालिकेने ज्यावेळी त्याचा टाऊनप्लॅनिंग कडुन त्यांचा प्लॅन सेंक्शन करून घेतला त्यावेळेस या कंपनीचे स्ट्रक्चर ऑडीट करून घेतलेले आहे का त्यावेळेस त्या बिल्डिंगचे स्ट्रक्चर तेवढे आहे का? उद्या उठुन टॉवर मुळे त्या बिल्डिंगचे स्ट्रक्चर ऑडीट नसल्यामुळे त्या बिल्डिंगचे काही झाले तर जिवितहानी जर काही त्याठिकाणी झाली किंवा वित्त हानी झाली तर त्याला जबाबदार कोण राहणार आहे.

**श्री.गणेश चाटे, उपायुक्त (महसुल):-** तेच सांगतो आहे ३१ मार्च पर्यंत त्यांनी अप्लिकेशन करायचे आहे. ३१ मार्चनंतर त्यांच्यावर कार्यवाही करू.

**मा.उपमहापौर** :- अहो साहेब मी ते नाही म्हणत आहे.

**मा.आयुक्त :-** एक मिनिंट , एक ॲप्लिकेशन आलेले होते आणि हा विषय मला बेसिक रित्या पासुन माहीती आहे. तेव्हा ते टॉवर सिल करायला जायच होत तेव्हा त्यावेळेला क्लियर धोरण आहे टेलिकॉम सर्विसेस या बेसिक सर्विसेस मध्ये येते म्हणुन आपण ते बंद करू शकत नाही किंवा सिल करू शकत नाही. सगळ्या मनपा टॅक्स लावतात त्याला पण तो वसुल होत नाही. म्हणुन ओव्हरऑल कंपन्यांसाठी शासनाने पोर्टल सुरू केले आहे आणि ऑनलाईन ॲप्लिकेशन येतील, ऑनलाईन परवानग्यांना येतील आणि आपण त्यांना मान्यता द्यायच्या आहेत. शासनाने धोरण ठरविलेले आहे. त्यानंतर अधिकृत होतील त्यामुळे आपल्याला अनधिकृतचा टॅक्स पण देणार नाही. फक्त आपल्याला परमिशन द्यावी लागेल पण जस विशालभाऊंनी सांगीतले की तिथल्या नागरीकांच्या NOC आहेत का? कुणाला धोका पोहोचतो का? हे आपल्याला पाहावे लागेल.

**मा.उपमहापौर** :- आजपर्यंत असलेली थकबाकी साठी कारवाई केली काय आहे.

**मा.आयुक्त :-** नाही

**श्री.गणेश चाटे, उपायुक्त (महसुल):-** ते आपण

**मा.उपमहापौर** :- शासनाचे धोरण आहे. पण यावर्षापासुन आहे का , चार पत्र दिलेले आहे मी याच्यामध्ये

**मा.आयुक्त :-** शासनाचेच धोरण आहे.

**मा.उपमहापौर** :- नाही ना मॅडम आता ठरविले आहे ना शासनाचे धोरण , वर्षभरापासुन ठरले असेल किंवा सहा महिन्यापुर्वी ठरले असेल.

**मा.आयुक्त :-** सगळ्यात राज्यामध्ये

**मा.उपमहापौर** :- मग याच्या अगोदर मोबाईल टॉवर वर कार्यवाही का नाही झाली?

**मा.आयुक्त :-** सर्व ओव्हरऑल राज्यामध्ये टॅक्स कोणाचाच भरलेला नाही आणि सिल करू नका हे धोरण होते त्यामुळे हा निर्णय त्यांना घ्यावा लागला.

**मा.उपमहापौर** :- मॅडम अशी कुठलीही कंपनी येईल आणि मोबाईल टॉवर उभारेल मग

**मा.आयुक्त :-** सर कंपनी नाही ना शासन म्हणते की बेसिक सर्विसेस मध्ये येते सर

**मा.उपमहापौर** :- मॅडम आपण सेवा देतो आहे आणि मग असे कोणीही महापालिकेवर अतिक्रमण करतील मग आता आपली दहा बारा कोटी रूपये थकबाकी आहे त्याच काय?

**श्री.अश्विन सोनवणे :-** त्याच काय बरोबर आहे. आतापर्यंत काय करत होते मग .

**मा.उपमहापौर** :- त्याच काय?

**मा.आयुक्त :-** शासन धोरण आहे सर ते

**मा.उपमहापौर** :- शासनाने आता ठरवले आहे धोरण त्याच्याआधी काय आहे.

**श्री.अश्विन सोनवणे :-** हे तर आताचे आहे याच्या पहिले काय केले आहे.

**मा.उपमहापौर** :- शासन धोरण ठरवते आणि हे त्यांनी ठरवलेले आहे मान्य आहे आम्हाला , वर्ष झाले असेल कधीचा आहे शासन निर्णय

**श्री.गणेश चाटे, उपायुक्त (महसुल):-** डिसेंबर २०२२

**मा.उपमहापौर** :- ठिक आहे ना मग हे कधीचे आहे. आता शहरात टॉवर आजपासुन नाहीये.

**श्री.अश्विन सोनवणे :-** बरोबर आहे.

**मा.आयुक्त :-** हे शासनाचेच धोरण आहे आणि

**मा.उपमहापौर** :- खाजगी मालमत्ता धारकांच्या बिल्डिंगवर हे टॉवर उभे आहे. म्हणजे त्यांचे जे प्रमिशनेबल बँड जे आहे स्ट्रक्चर वगैरे करून नाहीये. त्या ज्या बिल्डिंगवर जे टॉवर उभे आहेत त्या टॉवरचे साधारण वजन किती राहात असेल सांगा तुम्ही मला

**श्री.सुनिल महाजन, विरोधी पक्ष नेता:-** घरपट्टीमध्ये ॲड करा ना ते पैसे

**मा.उपमहापौर** :- बस माझा म्हणायचा अर्थ तोच आहे.

**श्री.गणेश चाटे, उपायुक्त (महसुल):-** आपण त्यांना घरपट्टी आणि दंडाचे बिल दिलेले आहे त्यांना

**मा.उपमहापौर** :- त्याची तुम्ही ज्या प्रॉपर्टीवर जिथे जिथे हे मोबाईल टॉवर उभे आहेत. ते मोबाईल टॉवर ज्या खाजगी मालमत्ता आहेत त्यांचे भाडे आकारता आहे की नाही. मग ते आपला टॅक्स का नाही भरत आहे. इतके वर्ष झाले आहे आणि थकबाकी म्हणतोय ते बुडीत राहतील का आपले पैसे, शासना कडून धोरण ठरले वर्षापुर्वी ठरले.

**श्री.गणेश चाटे, उपायुक्त (महसुल):-** आपला घरपट्टी टॅक्स ९० % क्लियर आहे आणि आपण अनधिकृत टॉवर पॅनल्टी आपण आकारतो आहे आणि ती पॅनल्टीकरीता शासनाने हे धोरण ठरवलेले आहे की पॅनल्टी घेवू नये.

**श्री.अश्विन सोनवणे :-** काय म्हंटले आहे की पॅनल्टी घेवु नये. पॅनल्टी नका पण थकबाकी तर वसुली करा ना.

**श्री.गणेश चाटे, उपायुक्त (महसुल):-** बाकीचे जे आहेत ते क्लियर आहेत ना.

**श्री.अश्विन सोनवणे :-** केली आहे का वसुली?

**श्री.गणेश चाटे, उपायुक्त (महसुल):-** बाकीचे जे आहेत ९० टक्के रेग्युलर टॅक्स जो आहे तो भरलेला आहे.

**श्री.अश्विन सोनवणे :-** पहिले आकडा सांगा किती आहे तर तो.

**श्री.गणेश चाटे, उपायुक्त (महसुल):-** आपला जो रेग्युलर टॅक्स आहे ते ९० टक्के क्लियर आहे.

**मा.उपमहापौर** :- नाही पण माझ म्हणण कस आहे

**श्री.गणेश चाटे, उपायुक्त (महसुल):-** पॅनल्टी जी आहे आपली त्याची रक्कम ती जास्त आहे.

**मा.उपमहापौर** :- हा झाला टॅक्सचा विषय , आता टाऊनप्लॅनिंग की बांधकाम विभाग कोण सांगु शकेल की त्याच वजन किती असेल त्या टॉवरच एक अंदाज

**मा.महापौर** :- लावतो का आपण त्यांना घरपट्टी काही वगैरे,

**मा.उपमहापौर** :- आपल्याला माहिती नसतांना आपले नगरसेवक,सन्मा.सदस्य त्याच्यामध्ये तक्रारी करत असतात. सभागृहात त्याचे विषय होत असतांना कुठल्याच अधिकाऱ्यांना या विषयाचे कुठेलच गांभीर्य नाहीये.

पण हे वर्षानुवर्ष चालु आहे आणि आता तुम्ही सांगत आहात की शासनाने हे धोरण ठरविलेले आहे. परंतू दरदिवशी तुम्ही याच्याबाबतीत काही काम केलेले नाहीयेत आणि काही केले नाही तर दोनशे चे चारशे होतील. आता सुध्दा या जळगांव शहरामध्ये ५ टॉवर उभारण्याचे काम चालु आहे माहिती आहे का तुम्हाला, मग ते महानगरपालिकेच्या किंवा त्याच्या मनमानी पध्दतीने अशा खाजगी मालमत्तांवर त्यांच्या पध्दतीने टॉवर उभारू द्यायचे का? हे कायद्याला धरून आहे का हे, शासनाला धरून आहे का ?

**श्री.गणेश चाटे, उपायुक्त (महसुल):-** नाही , खाजगी ज्या इमारती आहेत त्याच्यावर टॉवर उभारू नये याची आपण त्यांना १५ दिवसांची नोटीस देवू शकतो पण १५ दिवसांच्या नंतर त्यांनी जर आक्षेप घेतला तर आपण त्यांच्यावर कार्यवाही करू शकतो.

**मा.उपमहापौर** :- साहेब मला एक सांगा, सोनवणी साहेब होते त्यावेळेस मी त्यांना सांगीतले होते की, आपले सन्मा.सदस्य रियाजभाई बागवान आहेत तर त्यांच्या परिसरात एक कंपनी आहे तर त्यांनी जो सामान तेथे आणला होता. तर दुसऱ्या दिवशी त्यांनी तो तसाच सोडुन दिला होता.

**सौ.ज्योती चव्हाण** :- महापौरताई याच्यापुढे खाजगी टॉवर उभारायची असतील तर परवानगी देवू नये.

**श्री.अश्विन सोनवणे :-** कर्मशियल रेट लावा त्यांना घरपट्टीचा

**मा.उपमहापौर** :- परवानगी द्यायचा विषयच नाहीये ना, उद्या उठुन जर काही हानी झाली तर ही जबाबदारी कोणाची आहे खाजगी मालमत्ता धारक तर हात वर करून देईल.

**श्री.गणेश चाटे, उपायुक्त (महसुल):-** त्यांनी परवानगी जर घेतली तर त्याचा स्ट्रक्चर रिपोर्ट जो आहे तो कंम्पलसरी आहेच.

**मा.उपमहापौर** :- माहिती आहे साहेब पण जळगांव शहरातील ज्या पण बिल्डिंगवर टॉवर उभे आहेत त्यांच्यामध्ये आज एकही टॉवर चे स्ट्रक्चर ऑडीट दिसणार नाही. मला माहिती नाही पण आपल्याकडे जे लोक आहे टेक्निकल लोक त्यांनी सांगाव की त्याच अंदाजे वजन किती राहात असेल. तो घरमालक त्याच्याकडून ४०/४०- ५०/५० हजार रूपये महिना घेतो आहे. तर तो समोरच्याचा विचार नाही करत आहे ना कारण तो , समजा उद्या काही हानी झाली तर त्याला जबाबदार कोण? उद्या उठुन ज्याची हानी होणार आहे किंवा जिवीतहानी होणार आहे. तर जे काही होणार आहे दुर्दैवाने तर त्याची जबाबदारी कोणाची?

**श्री.नितीन लढ्ढा :-** सोनगिरे साहेब आपला हेतू काय आहे आपला स्ट्रक्चर ऑडीटचा

**मा.महापौर** :- बाकीचे नाही आहेत.

**मा.उपमहापौर** :- एकच टॉवर जे आहे ते अधिकृत आहे. २१९ पैकी फक्त गट नं. १७७ मधील ते अधिकृत आहे बाकी सगळे अनधिकृत आहेत.

**श्री.नितीन लढ्ढा :-** त्यांना परवानगी देत कोण?

**मा.उपमहापौर** :- परवानगी घ्यायला येतच नाही ना भाऊ ते

**श्री.गणेश चाटे, उपायुक्त (महसुल):-** परवानगी आपणच देतो पण हे अनधिकृत टॉवर वाले आपल्याकडे आलेच नाहीत.

**श्री.अनंत जोशी:-** महापौरसाहेबा , मला बोलू द्या. आता मगाशी सगळे या विषयावर बोलत आहेत कस काय करणार आहात.

**मा.उपमहापौर** :- मागे रिलायन्स कंपनीवाले केबल टाकत होते त्यांच्याही परवानग्या नाही आहे भाऊ

**श्री.अनंत जोशी:-** साहेब हे आज नाही हे वर्षानुवर्ष दोनशे मोबाईल टॉवर येथे उभारले जातात आणि तुमच हे म्हणणे आहे की हे अनधिकृत आहेत. अस कस म्हणु शकता.

**श्री.गणेश चाटे, उपायुक्त (महसुल):-** आहे ना भाऊ

**श्री.अनंत जोशी:-** एका दिवसाचा प्रश्न नाहीये ना वर्षानुवर्षांचा प्रश्न आहे. उभारले गेले आहे हे टॉवर याच्या मागच कारण मी सांगतो भाऊ हे आपण म्हणत आहेत. मी म्हणतोय की अश्विन भाऊंना बोलतांना पाहीले की याच्यात विषय असा आहे की , मागे जाण्याचा आपला काही हे नाहीये आणि तुम्हाला अस वाटत का की २११ टॉवर महापालिकेच्या अधिकाऱ्यांना माहिती असल्याशिवाय उभे राहू शकतात किंवा त्यांची माहिती राहील्याशिवाय होईल का ? हे आपल्याला सांगीतले जाते आहे की २११ टॉवर वर्षानुवर्षे पासुन अनधिकृत आहेत. पण अनधिकृत उभारण्याची त्यांची हिंमत होते कशी आणि त्या काही छोट्या - मोठ्या कंपन्या नाहीयेत ना. त्या काही इलिंगल काम करायला नाही होणार. त्याच काय होत त्याचे टॉवर कसे उभारले जातात हे किंवा त्यांचा कुणाशी संबंध येतो किंवा काय आणि गेल्या पंचवार्षिक मध्ये सुध्दा मी हा विषय मांडलेला आहे. अस

होवूच शकत नाही की २११ टॉवर एखाद्या शहरात उभारले जातात महानगरपालिकेच्या परवानगी शिवाय हे शक्यच नाहीये. परवानगी काय म्हणतो आपण त्याला

**मा.उपमहापौर** :- ऑफीशियली

**श्री.अनंत जोशी:-** ऑफीशियली जरी नसली तरी अनऑफीशियली काय काय चालत हे तुम्हाला आणि मला आणि सगळ्यांना माहिती आहे. त्याच्यामुळे आपण घसा कोरडा करून काही उपयोग नाहीये.

**श्री.गणेश चाटे, उपायुक्त (महसुल):-** जे मोबाईल अनधिकृत टॉवर आहेत ते ॲप्लिकेशन करणार आहेत ३१ मार्च पर्यंत करणार आहेत. त्यांनी नाही केले तर आपण त्यांना १५ दिवसांची नोटीस देणार नाही आणि त्यानंतरही नाही केली तर आपण टेलिकॉम विभागाकडेस कळविणार आणि मग आपण त्यांच्यावर पुढील कार्यवाही करू.

**मा.उपमहापौर** :- पुर्ण २१९

**श्री.गणेश चाटे, उपायुक्त (महसुल):-** २११ वर

**मा.उपमहापौर** :- ठिक आहे.

**श्री.अनंत जोशी:-** याच्यामध्ये काही लोकांच्या मनामध्ये काही शंका आहेत की त्याच्यामुळे काही साईड ईफेक्ट पण होतात. तर अनेक परिसरातील लोकांनी या संदर्भात तक्रारी केलेल्या आहेत. अप्लिकेशन दिलेल्या आहेत तरी सुध्दा काही कार्यवाही झालेली नाहीये. तुम्ही म्हणता ना आता की जसे मनपाच्या इमारतींवर आपण उभारू आणि त्यासंदर्भात शेजारी-पाजारी यांचे NOC घेवू तर अनेक लोकांनी तक्रारी केलेल्या आहेत. वर्षानुवर्षे तरी टॉवर उभे राहीले आहेत आणि आजही ते चालु आहेत. हे असच घडत का? इतके सोपे आहे का? अधिकाऱ्यांचे त्याच्यात काही असल्याशिवाय असे काही शक्य आहे का? त्याच्यामुळे काही घसा कोरडा करून उपयोग नाहीये हे चालणारच आहे. माझी अजुन एक विनंती आहे की

**(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी चर्चा करीत होते त्यामुळे सभागृहातील चर्चेचा स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)**

**मा.महापौर** :- विषय क्रं. २३ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे. पुढील विषय घेण्यात यावा.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. १०२९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्रं.२०२१/सी.आर.२४२/ यु.डी.२०/ दि.१९/१२/२०२२ नुसार महाराष्ट्र टेलीकॉम इन्फ्रास्ट्रक्चर मार्गदर्शक तत्व-२०२२ अन्वये मोबाईल टॉवर उभारणेकामी, परवानगी देण्याबाबत नियमावली प्रसिध्द केलेली आहे.

सदर महाराष्ट्र टेलीकॉम इन्फ्रास्ट्रक्चर मार्गदर्शक तत्व-२०२२ मध्ये मुद्दा क्रं.१४ मध्ये शासकिय व महानगरपालिकेच्या जागेवर मोबाईल टॉवर उभारणेकामी, अर्ज सादर करण्याची पध्दत, आवश्यक कागदपत्र/ दस्ताऐवज, व परवानगी देण्याची विहीत पध्दत याबाबत नमुद केलेले आहे. त्यानुसार महानगरपालिका मालकीच्या व्यापारी संकुलांच्या टेरेसवरील जागा, महानगरपालिकेच्या जागा, महानगरपालिकेच्या मालकीच्या खुल्या जागा मोबाईल टॉवर उभारण्याकरीता भाडेतत्वाने दिल्यास महानगरपालिकेस अनामत, भाडे व करांच्या स्वरुपात मोठया प्रमाणावर उत्पन्न मिळू शकते. त्यामुळे याबाबत धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक आहे.

यापूर्वी देखील महानगरपालिका मालकीच्या जुने बि.जे. व्यापारी संकुलातील टेरेसवरील (छतावरील) जागा महानगरपालिकेकडून सदर कंपनीस भाडेतत्वाने देण्यात आलेली आहे. त्यापासून महानगरपालिकेस वार्षिक भाडेपोटी रु.१,७०,२४७/- मात्र व मालमत्ता करापोटी रु.७९,०००/- मात्र शुल्क प्राप्त होते.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ७९ मालमत्तेचा विनयोग करण्यासंबंधी तरतूदीचे कलम (क) महानगरपालिकेच्या मालकीची कोणतीही स्थावर किंवा जंगम मालमत्ता महानगरपालिकेच्या मंजूरीने पट्टयाने देता येईल, विकता येईल, भाडयाने देता येईल किंवा अन्यथा अभिहस्तांतरीत करता येईल. असे नमूद आहे.

तसेच महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्रं.२०२१/सी.आर.२४२/ यु.डी.२०/ दि.१९/१२/२०२२ नुसार महाराष्ट्र टेलीकॉम इन्फ्रास्ट्रक्चर मार्गदर्शक तत्व-२०२२ मध्ये देखील मुद्दा क्रं.१४

मध्ये शासकिय व महानगरपालिकेच्या जागेवर मोबाईल टॉवर उभारणेकामी, अर्ज सादर करण्याची पध्दत, आवश्यक कागदपत्र/ दस्ताऐवज, व परवानगी देण्याची विहीत पध्दत याबाबत नियमावली दिलेली आहे.

महाराष्ट्र टेलीकॉम इन्फ्रास्ट्रक्चर मार्गदर्शक तत्व-२०२२ नुसार आयुक्त यांचे जा.क्रं./कि.व./२५१२/२०२३ दि.२४/०२/२०२३ अन्वये मोबाईल टॉवर उभारणेकरिता परवानगी देण्याकामी एक खिडकी सुविधा कक्षाची स्थापना करण्यात आलेली आहे.

औरंगाबाद महानगरपालिकेने व ठाणे महानगरपालिकेने देखील महापालिका क्षेत्रामधील महानगरपालिकेच्या मिळकतींवर मोबाईल टॉवर उभारणाऱ्या कंपनीनला मोबाईल टॉवीर, अँन्टीना, उपकरणे उभारणेकामी जागा भाडेपट्टयाने देणेकामी धोरण निश्चित केलेले आहे. त्याचप्रमाणे जळगांव महानगरपालिका क्षेत्रामध्ये महानगरपालिकेच्या मिळकतींवर, दस्ता, दुभाजकांमध्ये दुरसंचार जाळयांसाठी (Grid करीता) मोबाईल टॉवर, ॲन्टीना, उपकरणे, ङिजी.ओ.सेट, बुस्टर बॅटरी व जमिनीवरील बेस स्टेशन उभारणेसाठी महानगरपालिका मालकीच्या इमारती / जमीनी / जागा या अनामत घेवून भाडेपट्टयाने खालील अटी शर्ती नुसार देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

१. महाराष्ट्र टेलीकॉम इन्फ्रास्ट्रक्चर मार्गदर्शक तत्व-२०२२ तसेच मोबाईल टॉवर संबंधीचे कायदयातील तरतूदी, नियम, शासनाचे उपविधी यांचे काटेकोरपणे पालन करणे मोबाईल टॉवर कंपनीस बंधनकारक राहील.
२. महाराष्ट्र टेलीकॉम इन्फ्रास्ट्रक्चर मार्गदर्शक तत्व-२०२२ तसेच मोबाईल टॉवर संबंधीचे कायदयातील तरतूदी, नियम, शासनाचे उपविधी यामध्ये वेळोवेळी होणाऱ्या सुधारणा, बदल, सुचना यांचे पालन करणे देखील मोबाईल टॉवर कंपनीस बंधनकारक राहील.
३. शासनाने तसेच भारत संचार विभागाने मोबाईल टॉवर संबंधीत निश्चित केलेल्या मार्गदर्शक तत्वाची अंमलबजावणी करणे मोबाईल टॉवर कंपनीस बंधनकारक राहील.
४. मोबाईल टॉवर उभारण्यासंदर्भात आवश्यक असणाऱ्या शासकीय विभाग तसेच इतर विभागाचे ना-हरकत / परवानगी घेणे संबंधीत मोबाईल टॉवर कंपनीची जबाबदारी राहील.
५. मोबाईल टॉवर उभारण्याच्या जागेबाबत स्ट्रक्चरल सेप्टी सर्टीफिकेट घेणे व ते वेळोवेळी अदयावत करण्याची जबाबदारी मोबाईल टॉवर कंपनीची राहील.
६. मोबाईल टॉवर उभारणेकामी जळगांव महानगरपालिका क्षेत्रामध्ये महानगरपालिकेच्या मिळकती व जागांची निश्चिती करुन, सदर मिळकती / जागा मोबाईल टॉवर उभारणेकामी भाडेपट्टयाने देण्यासंदर्भात महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमानुसार जाहिर लिलावाची कार्यवाही करण्यात यावी. सदर मिळकत/ जागेबाबत, सहाय्यक संचालक नगररचना विभाग महानगरपालिका जळगांव यांच्यामार्फत वार्षिक भाडे रक्कम व ना-परतावा अनामत निश्चित करण्यात यावी.
७. महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियमातील तरतुदींच्या अनुषंगाने मोबाईल टॉवर उभारण्या संबंधीच्या इतर अटी व शर्ती नगररचना विभागाने निश्चित करुन दयाव्या.
८. महानगरपालिकेच्या विहीत अटी व शर्ती तसेच मोबाईल टॉवर उभारण्यासंबंधी नगररचना विभाग ठरवून देतील अश्या अटी व शर्तींचा नोंदणीकृत करारनामा करणे मोबाईल टॉवर कंपनीस बंधनकारक राहील.

जळगांव शहर महानगरपालिका मालकीच्या मिळकती / इमारती वरील टेरेसची जागा, खुल्या जागा, वाहतुक बेट, जागा इत्यादी मोबाईल टॉवर उभारणाऱ्या कंपनीस महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्रं.२०२१/सी.आर.२४२/ यु.डी.२०/ दि.१९/१२/२०२२ नुसार महाराष्ट्र टेलीकॉम इन्फ्रास्ट्रक्चर मार्गदर्शक तत्व-२०२२ मध्ये दिलेल्या नियमावली नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार व उक्त नमुद अटी व शर्ती नुसार भाडेपट्टयाने देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

सभागृहात झालेल्या चर्चेनूसार उक्त जागा भाडेपट्टयाने मिळणेकामी जे-जे प्रस्ताव येतील त्यांचे प्रस्ताव नाहरकतपत्र देण्याचे प्रस्ताव महासभेपूढे सादर करावेत. महासभेने मंजूरी दिल्यानंतरच प्रशासनाने पूढील नियमानूसार कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल -** **५५**

**सूचक** **:- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक** **:- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं. २४:-** जळगांव शहर महानगरपालिका, अतिक्रमण विभागास नविन १ जे.सी.बी. खरेदी करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर** :- माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर** :- विषय क्रं. २४ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे** :- २४ च्या संदर्भात मला बोलायचे आहे.

**(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी चर्चा करीत होते त्यामुळे सभागृहातील चर्चेचा स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)**

**मा.उपमहापौर** :- हो आपण विनंती केली आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे** :- मला बोलू द्या. आता नाला स्ट्रेचर संदर्भात ४ प्रभागांसाठी ४ पाहीजे होते. आतापर्यंत का घेतले नाही.

**श्री.जितेंद्र मराठे** :- जे आहेत ते कुठे आहेत.

**(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी चर्चा करीत होते त्यामुळे सभागृहातील चर्चेचा स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)**

**श्री.नवनाथ दारकुंडे** :- जे आहे ते पडले आहे भंगारमध्ये , आपण काय केली त्याच्यावर कार्यवाही वाहन विभागाने

**श्री.जितेंद्र मराठे** :- नवनाथभाऊ बंटीभाऊंनी सांगीतले ना की बोलून काही उपयोग नाहीये.

**श्री.नवनाथ दारकुंडे** :- काय होतय त्यांचा प्रस्ताव त्याचा तुमच्या ऑफीसला धुळ खात पडलाय.आतापर्यंत अनुदान आले नाही तुमचे , तो काय नाव आहे त्यांचे लासुरे

**श्री.जितेंद्र मराठे** :- महापौरताई, आयुक्त मॅडम छोटे-छोटे विषय आहेत. नाला साफसफाई वगैरे, सांगतापण येत नाही अडीच वर्षांपासुन चालु आहे हे विषय

**श्री.नवनाथ दारकुंडे** :- कोण देणार आहे. सांगा ना

**श्री.जितेंद्र मराठे** :- याच्यापुर्वी जे अधिकारी होते ना ते फक्त त्यांची रिटायर्डमेंट काढण्यापुरते होते. आता तुमच्याकडे पाहुन सगळ्यांना वाटतय की तुम्ही काहीतरी चांगले अधिकारी आहेत आपल्यासोबत तर काय सांगु मी ते करा आणि ते मागवा लवकर आणि ते किती वर्षांपासुन वस्तु येत नाहीये.

**मा.आयुक्त** :- यासंदर्भात नालेसफाईचा आतापर्यंतचा अनुभव असा आहे की नालेसफाई करीता जेसीबीला छोट्या तोडांचे काय आहे ते लावतो आपण आणि साफसफाई करतो. पोकलँड नाही.

**श्री.नवनाथ दारकुंडे** :- जेसीबी

**श्री.नितीन लढ्ढा** :- बकेट

**मा.आयुक्त** :- हो छोटे बकेट लावायचे असते ना.

**श्री.जितेंद्र मराठे** :- मॅडम बकेट चा विषय नाहीये. तुम्ही या साईडवर यांच्यासोबत जेसीबी घेवुन तुम्हाला लक्षात येईल.

**मा.आयुक्त** :- तोच प्रस्ताव करतोय ना आपण, पाहणी करतेय मी

**श्री.जितेंद्र मराठे** :- नाही नाही , जेसीबी घेवुन या तुम्हाला लक्षात येईल.

**सौ.उज्वला बेंडाळे** :- महापौरताई, आयुक्त मॅडम याला नालेसफाईसाठी

**मा.उपमहापौर** :- याला स्ट्रेकस लागत

**श्री.नवनाथ दारकुंडे** :- जेसीबीचा फावडा लहान करून फायदा नाहीये. कारण स्ट्रेकस जे आहे जागा वाढवत असते.

**मा.आयुक्त** :- हो ना मग वाढवणार आपण

**श्री.नवनाथ दारकुंडे** :- केव्हा वाढवणार आता याला अनेक वर्ष झाले ना मॅडम

**(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी चर्चा करीत होते त्यामुळे सभागृहातील चर्चेचा स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)**

**श्री.नवनाथ दारकुंडे** :- सांगु द्या ना मॅडमांना सांगु तर द्या. आता हा जेसीबीचा प्रस्ताव आणला आहे ना प्रशासनाने तर

**श्री.अनंत जोशी:-** आयुक्त मॅडम आता तुम्ही हा प्रस्ताव आणला जेसीबीचा तुम्ही सांगत आहेत पण काही ठिकाणी नाले जे आहेत ते सगळे सारखे नाहीयेत काही उपनाले पण आहेत ना तर त्याठिकाणी जेसीबी जावु शकत नाही.

**श्री.नवनाथ दारकुंडे** :- महासभेसमोर आता हा जेसीबीचा विषय आला आहे म्हणुन हा विषय निघाला नाहीतर अडीच वर्षापासुन काय करत आहात तुम्ही स्ट्रेकस च्या प्रस्तावाचे

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता :-** हा जेसीबीचा प्रस्ताव आहे.

**श्री.अनंत जोशी:-** अहो साहेब काही उपनाले पण आहेत ना शहरात, आणि प्रस्ताव धुळ खात पडले आहे.

**(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी चर्चा करीत होते त्यामुळे सभागृहातील चर्चेचा स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)**

**मा.आयुक्त** :- दोन घेवु आपण, दोन घेवु.

**(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी चर्चा करीत होते त्यामुळे सभागृहातील चर्चेचा स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)**

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. १०३० पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिका अंतर्गत अतिक्रमण विभागामार्फत शहरातील मुख्य रस्त्यांवरील वाहतुकीस अडथळा ठरणारे चौकामधील तसेच शहरातील नागरी वस्तीमधील मनपा नियमबाहय बांधकामे, मनपाच्या खुला भुखंडावरील अतिक्रमणे इत्यादी कामे अतिक्रमण विभागामार्फत हाताळली जात असतात. सदयस्थितीत शहराचा वाढता विस्तार होत असल्याने व शहरामध्ये रस्त्यावर अतिक्रमण मध्ये दैनंदिन वाढ होत असल्याबाबत सन्मा.सदस्य, शहरातील नागरीक इत्यादी तक्रारी अर्ज प्राप्त होत असतात परंतु अतिक्रमण विभागाकडे दैनंदिन कामकाजासाठी अल्प मनुष्यबळ व यंत्र सामुग्री उपलब्ध नसल्याने अतिक्रमण काढण्याची कार्यवाही करण्यास अडचण व विलंब होत असल्याने विभागाच्या कार्यप्रणालीवर नाराजी व्यक्त केली जाते.

सहाय्यक संचालक, नगररचना विभाग यांच्यामार्फत वेळोवेळी अनधिकृत बांधकामे निष्कसीत करणे कामी सकारण आदेश पारीत करण्यात येतो. अनधिकृत बांधकामे पाडण्याकरीता विभागाकडे अन्य मनुष्यबळ असल्याने मशिनरीची नितांत आवश्यकता भासते. करिता अतिक्रमण विभागास जे.सी.बी. मशिन उपलब्ध करुन दिल्यास पक्के अतिक्रमण तोडण्याचे काम सुकर होईल व मनुष्यबळ कमी लागेल. करिता अतिक्रमण विभागास जे.सी.बी. खरेदी करणे अत्यंत आवश्यक व गरजेचे आहे. शहरामध्ये जे.सी.बी. कंपनीचे अधिकृत डिलर देखील असून जे.सी.बी. कंपनीचे सर्व स्पेअर पार्टस शहरामध्ये उपलब्ध आहे. सदर जे.सी.बी. कंपनीचे उत्पादक डिलर यांच्याकडे प्रथमदर्शनी चौकशी केली असता JCBDX (CEV-IV) / STD/1.1/0.26/2WD/HD/LL / Loader with 74HP Excavator Bucket & 1.1 Cu.Mloader Bucket Fitted With Heavy Duty Rear Tyres 2WD with Live Link (Generally Conforming to attached leaflet) -१ नग खरेदी कामी अंदाजीत रक्कम रु.३७,५०,०००/- (सर्व) एवढा खर्च अपेक्षित आहे. सदर मशिनरी खरेदी करणेकामी अतिक्रमण विभागाकडे मंजुर लेखाशिर्ष नसल्याने महानगरपालिका वाहन व्यवस्था विभागाकडील मंजुर लेखाशिर्ष सन २०२२-२३ नविन वाहन व फायर / आरोग्य वाहन या लेखाशिर्षाखाली जे.सी.बी. मशिनची खरेदी करणे शक्य होईल.

शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीची सुधारित नियमपुस्तिका, शासन निर्णय, उदयोग, ऊर्जा व कामगार विभाग, क्रमांक- भांखस-२०१४/प्र.क्र.८२ भाग III / उदयोग-४ दि.०१/१२/२०१६ मधील ३.२.३ अंतर्गत पृष्ठ क्र.४५ वर नमूद केलेनुसार कोणत्याही वाहनाचे दरकरार DGS&D कडे उपलब्ध असतीलच असे नाही. त्यामुळे, मोटार वाहने (कार) खरेदी रु.१ कोटीपेक्षा जास्त असल्यास, ती ई-निविदा प्रक्रीयामार्फतच करण्यात यावी. त्याअनुषंगाने जे.सी.बी. कंपनीचे अधिकृत डिलर / वितरक यांच्या दरपत्रकामार्फत खरेदी करता येईल.

अतिक्रमण विभागास जे.सी.बी. मशिनची तात्काळ आवश्यकता असल्याने जे.सी.बी. मशिन - १ नग खरेदी कामी येणाऱ्या अंदाजीत रक्कम रु.३७,५०,०००/- मात्रचे खर्चास तसेच उदयोग उर्जा व कामगार विभागाकडील दि.०१/१२/२०१६ चे शासन निर्णयानुसार कार्यवाही करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ५५**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं. २५:-** जळगांव शहर महानगरपालिका, अतिक्रमण विभागास नविन जे.सी.बी. मशिनला Breaker खरेदी करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- त्या शौचालयांच्या बाबतीत जे आहे. की त्या शौचालयांची परिस्थिती काय आहे आणि ते आपण केव्हा घेतलेले होते , कुणी त्यासंदर्भातील

**(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी चर्चा करीत होते त्यामुळे सभागृहातील चर्चेचा स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)**

**श्री.जितेंद्र मराठे** :- भाऊ २५ नंबर विषय आहे आणि एकच आहे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- विषय क्रं.२५ मंजुर आहे.

**मा.उपमहापौर** :- माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर** :- विषय क्रं. २५ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. १०३१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, अतिक्रमण विभागासाठी जे.सी.बी. मशिन खरेदी करणे बाबत प्रस्तावित करण्यात आलेले असून सदर मशिनरीला Rock Breaker HM380 -१ नग खरेदी करणे आवश्यक व गरजेचे आहे. जळगांव शहरातील नागरी वस्तीमधील नगररचना विभागाकडून प्राप्त होणारे अनधिकृत बांधकाम संदर्भात कार्यवाही करावयाची असते. त्यावेळेस बकेट ऐवजी जे.सी.बी मशिनला Breaker लावून अनधिकृत बांधकाम तोडणे योग्य आहे. जे.सी.बी. मशिनला Breaker खरेदी केल्यास मशिनच्या हायड्रोलिक सिस्टीमवर लोड येणार नाही. व महानगरपालिकेच्या देखभाल दुरुस्तीच्या खर्चात देखील बचत होईल. करिता जे.सी.बी. कंपनीचे अधिकृत डिलर (वितरक) यांच्याकडे येणाऱ्या खर्चाचे कोटेशन मागविले असता, जे.सी.बी. कंपनीचे अधिकृत विक्रेते मे.सुयान इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. जळगांव यांच्याकडील कोटेशन नुसार रक्कम रु.९,२५,०००/- मात्रचा खर्च अपेक्षित आहे. प्रस्तावित खरेदीचा खर्च हा अतिक्रमण विभागाकडील मंजुर लेखाशिर्ष सन २०२२-२३ साहित्य खरेदी अंतर्गत करणेस तसेच महाराष्ट्र शासन उदयोग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र.भांखस २०२१/प्र.क्र.८/उदयोग-४ दि.०७ मे २०२१ नुसार दरपत्रकावर दर मागविणेस व त्यानुसार योग्य ती कार्यवाही करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ५५**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं. २६:-** GeM पोर्टलवरुन एकुण १०० सिट्ससाठी फिरते शौचालय (Mobile Toilet Van) खरेदी करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- विषय क्रं.२६ चा विषय आहे की शौचालयांचा काय विषय आहे त्याची माहिती द्यावी.

**मा.आयुक्त :-** उदय पाटील जुन्या मोबाईल टॉयलेटची माहिती द्या. परंतू आपण विषय आला म्हणुन आणि दुसरे असे की दुसरा मोबाईल टॉयलेट दोन घेतलेले होते आणि गरबड झाली कमीत कमी आपल्याला किमान चार तरी मोबाईल टॉयलेट पाहीजेत. हे शासनाने मंजुर करून दिलेले आहेत अजुन निधी दिलेला नाही. आमचे धोरण असे होते की जेव्हा निधी येईल तेव्हा आपण याचा निर्णय घेवु. तुर्त मंजुर करून दिलेले आहे म्हणुन आपण मान्यतेला ठेवले आहे. तर आपण निधी आल्यानंतर निर्णय घेवु. अजुन निधी आलेला नाही.

**श्री.जितेंद्र मराठे** :- आयुक्त मॅडम ते आम्ही ते टॉयलेट घेवुन गेले होते तर ते नेवुन इतका पश्चाताप झाला की, ते लावण्यासाठी जागा नव्हती नंतर ते लावल्यामुळे आणि सात दिवस इतकी परेशानी झाली की तिथे स्प्रे वगैरे मारावे लागले.

**श्री.सुनिल महाजन, विरोधी पक्ष नेता** :- त्याला वेगळे कारण होते जितुभाऊ , ते सिमाताई भोळेंच्या काळात घेतलेले होते आणि त्याच्यावर राजुमामांचा फोटो त्या बोर्डावर टाकलेला नव्हता म्हणुन ती घाण झालेली होती.

**ॲड. शुचिता हाडा**:- महापौरताई मोबाईल टॉयलेटच्या संदर्भात जस आता जितुभाऊंनी सांगीतले आहे तर त्यावर एक सजेशन सांगते की आता आपण घेतो आहे. आपल्याला १०० सिटस ची जी मंजुरी मिळालेली आहे. पण आपल्याला आता जसे आयुक्त मॅडम म्हणाल्या तर आपल्याला जितके आवश्यक आहे त्या आपण घेवुया. पण आपल्याला त्यामध्ये काय काय पाहीजे. तर मला अस वाटत की आता ज्या अत्याधुनिक स्वरूपाच्या आलेल्या आहेत. ती संपुर्ण त्याची संपुर्ण सुविधा असते. त्याचा मेंटेनन्स करणे ईझी होते अशा पध्दतीची घ्यावी. त्यानंतर प्रत्येकाच्यावर पाण्याच्या टाक्या असाव्यात. सेफ्टिक टँक असावे आणि नुसतेच मोबाईल टॉयलेट विचार न करता आपण त्याचा विचार न करता त्याठिकाणी स्नानगृह अशा पध्दतीच्या सुध्दा आता मोबाईल टॉयलेट आलेले आहेत. ज्यामध्ये आपल्याला सुविधा म्हणुनच द्यायचे आहे तर सुविधा उत्तम दर्जाचीच द्या. जास्त नका घेवु पण आपल्या या निधीमध्ये जेवढे बसु शकत आहे तेवढे घ्या. पण त्या स्टेनलेस स्टिलचे असावेत. त्याच्यावर पाण्याच्या टाक्या असाव्यात. प्लास्टिक, लोखंडी सिट घेवु नयेत. सेफ्टिक टँक असणे आवश्यक आहे, वॉश बेसिन असावे आणि स्नानगृह असावे.

**श्री.अनंत जोशी** :- ताई आता जस जितुभाऊ म्हणत आहेत की दुर्गंधी , घाण वेगैरे येते आणि म्हणजे कार्यक्रमाच्या ठिकाणी घेवुन जातात.

**ॲड.शुचिता हाडा**:- मी तेच म्हणते आहे बंटीभाऊ की पाण्याची सोय नसते. पाण्याची सोय नसते त्याच्यामुळे व सेफ्टिक टँकमुळे हे होते.

**श्री.अनंत जोशी** :- ताई आता नविन टेक्नॉलॉजी चे आलेले आहेत की त्याच्या जुने घेण्यापेक्षा नविन चांगले असतात.

**ॲड.शुचिता हाडा**:- मी तेच म्हणते आहे की चांगले घ्या लागेल तर कमी घ्या.

**श्री.अनंत जोशी** :- आता जितुभाऊ घेवुन गेले आणि असा पस्तावा नको व्हायला म्हणुन

**ॲड.शुचिता हाडा**:- अत्याधुनिक पध्दतीच्याच घ्या आणि त्याची उपयोगीता ही तपासुन घ्या.

**श्री. नितीन लढ्ढा** :- सदर विषय मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर** :- माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर** :- विषय क्रं. २६ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. १०३२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहरातील विविध सार्व.कार्यक्रम (शासकिय, अध्यात्मिक, सांस्कृतीक कार्यक्रम इ.) करीता सदर सुविधा म.न.पा.कडे फिरते शौचालय (Mobile Toilet Van) उपलब्ध नसल्याने GeM पोर्टलवर २ नग फिरते शौचालय (Mobile Toilet Van) रक्कम रु.११,३०,०००/- रुपये १४ व्या वित्त आयोगाच्या प्राप्त अनुदानातुन खरेदी करण्यात आलेले आहे.

गुगल मिट ॲपवर दि.०८/०३/२०२३ रोजी झालेल्या बैठकीत स्वच्छ महाराष्ट्र अभियान उपसंचालक श्री.रामनिवास झवर यांनी दिलेल्या सूचनेनुसार जळगांव शहर महानगरपालिकेसाठी एकूण

१०० सिट्ससाठी फिरते शौचालय (Mobile Toilet Van) करिता रक्कम रु.६५,३३,४००/- मात्र स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत अनुदान प्राप्त होणार आहे.

सदर प्राप्त होणाऱ्या अनुदानातुन १०० सिट्ससाठी फिरते शौचालय (Mobile Toilet Van) GeM पोर्टल व्दारे खरेदी करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने फिरते शौचालय (Mobile Toilet Van) हे गरजेनूसार अत्याधुनिक तसेच सर्व सुविधांचा विचार करुन दर्जेदार घेण्याची दक्षता घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल -** **५५**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं. २७:-** जळगांव शहर महानगरपालिकेतील सन्मा.सदस्य यांचेकडून मा.महापौर, मनपा,जळगांव यांचेकडेस विविध विकास कामे करून मिळणेबाबत प्रस्ताव प्राप्त झालेले असून सोबतचे यादीतील एकूण ०१ ते ११९ कामे विविध शासकीय योजनांच्या निधीमधुन करणेबाबत मा.महापौर ,मनपा,जळगांव यांचेकडून आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- मंजुर आहे.

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी चर्चा करीत होते त्यामुळे सभागृहातील चर्चेचा स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.किशोर बाविस्कर** :- विषय क्रं. २७ मध्ये जे आहे अ.क्रं. ८१ ,८२ व ८३ मध्ये जे काम आहेत ते मंजुर झालेले आहेत. तर त्याबदल्यात फक्त नांव चेंज करायचे आहे. तर त्याच्यामध्ये हरिओम नगर, पिंपळेश्वर मंदिर परिसरातील कामांना ७० लक्ष निधी हा विषयाला महासभेने मान्यता द्यावी.

**श्री.नवनाथ दारकुंडे** :- निधी ७० लक्षचाच आहे पण नांव चुकलेले आहे.

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी चर्चा करीत होते त्यामुळे सभागृहातील चर्चेचा स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

(सभागृहात व्यासपिठावर सन्मा.सदस्य. श्री.किशोर बाविस्कर व श्री.विशाल त्रिपाठी यांनी सदर विषयामध्ये दुरूस्ती करणेबाबतचे पत्र मा.महापौर सो यांचेकडेस सादर केले)

**श्री.विशाल त्रिपाठी** :- तशी दुरूस्ती करणेबाबत आपण गोराणेसाहेबांना सांगावे.

**नगरसचिव :-** बोला ना तुम्ही

**श्री.विशाल त्रिपाठी** :- बोललो ना आता

**नगरसचिव :-** नाही नाही बोलायला पाहीजे बोला तुम्ही

**श्री.विशाल त्रिपाठी** :- बोलतो ना मी लागल्यास रेकॉर्डवर घेण्यात यावे.

**नगरसचिव :-** बोला .

**श्री.चेतन सनकत**:- ऑलरेडी आपण याचा जो ठराव केलेला आहे. तर हे काम याच्यामधुन कॅन्सल करण्यात यावे. १५ नंबर मध्ये ते आहे. पत्रामध्ये ते आलेले आहे.

**(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी चर्चा करीत होते त्यामुळे सभागृहातील चर्चेचा स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)**

**श्री.विशाल त्रिपाठी** :- नाही नाही २३, २४ मध्ये आप्पा करून गेलेले आहे बदल, म्हणुन मी त्यांना सांगतो आहे.

**सौ.ज्योती चव्हाण** :- महापौरताई , अ.क्रं. ९० मध्ये बदल करण्यात यावे. मी तुम्हाला ते माझ्या लेटरहेड वर देते. ९० नंबरचे एक काम आहे. वॉर्ड क्रं. १३ मधील. आरटीओ ऑफीस ते महाजन यांच्या घरापर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे हे काम ४० लाखांचे आहे. त्याच्याऐवजी मी दुसरे एक काम आहे ते देत आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी** :- विषय क्रं. २७ मध्ये अ.क्रं. २३,२४ व २५ मध्ये बदल सुचविलेले आहेत त्याप्रमाणे त्याची नोंद ठरावात घेवुन घ्यावी.

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी चर्चा करीत होते त्यामुळे सभागृहातील चर्चेचा स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**मा.महापौर** :- सन्मा.सदस्या. सौ.ज्योतीताई चव्हाण आणि सन्मा.सदस्य. श्री. कैलासआप्पा सोनवणे यांनी सुचविलेल्या कामांमध्ये बदल करून ठराव क्रं. २७ हा सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. १०३३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिका सर्व सन्मा.नगरसेवकांनी विकास कामांचे प्रस्ताव सादर केलेले असुन ते विविध शासकीय योजनांतुन घेणे बाबत विनंती केलेली आहे. सदर विकास कामे जिल्हा नियोजन मंडळ तसेच राज्य शासनाच्या निधीतुन घेणेबाबत मा.महापौर कार्यालयाकडे प्रस्ताव सादर केलेले आहेत. जिल्हा नियोजन मंडळातील, नागरी दलितेत्तर, नगरोत्थान, दलितवस्ती सुधारणा योजना, ठक्कर बाप्पा आदिवासी योजना, नॅशनल क्लिन एअर प्रोग्राम निधी, नविन्यपुर्ण इत्यादी तसेच राज्य शासनाच्या नगरविकास विभागातुन ही मुलभुत सुखसुविधा, नगरोत्थान, विशेष निधी, नाविन्यपुर्ण तसेच वैशिष्ट्यपुर्ण योजना, शासनाच्या प्रादेशिक पर्यटन विकास योजना निधी, जळगांव मनपा निधीतुन कामे सुचविलेली असुन त्यास मान्यता मिळणे कामी प्रस्ताव सादर केलेले आहे. तरी या सोबत सादर केलेल्या यादीतील अ.क्र.०१ ते ११९ या विकास कामांमधील सभागृहात झालेल्या चर्चेनूसार व मा.पिठासिन अधिकारी यांना सभागृहात चर्चेच्यावेळी सन्मा.सदस्य,श्री.किशोर रमेश बाविस्कर यांनी दिलेल्या पत्राप्रमाणे यादीतील अ.नं.८१, ८२ व ८३ तिन कामे रद्द करुन यादीतील अ.नं.०१ ते ८० व अ.नं.८४ ते ११९ या विकास कामांना तसेच सन्मा.सदस्य,श्री.किशोर रमेश बाविस्कर यांनी पत्राव्दारे सूचविलेली यादीत शेवटी नमूद केलेल्या अ.नं.०१ ते ०५ कामांना मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

तसेच सभागृहात झालेल्या चर्चेनुसार व सन्मा.सदस्य, श्री.कैलास नारायण सोनवणे यांनी दिलेल्या पत्रानूसार सोबत सादर केलेल्या यादीतील अ.नं.२३ मध्ये नमूद केलेले प्रभाग क्रं.४ जोशीपेठ, बागवान मोहल्ला परीसरात रस्ते कॉंक्रीटींग करणे कामी एकुण रक्कम रुपये ६५,८३,७४२/- नमूद खर्चापैकी प्रभाग क्र.०४ जोशी पेठसाठी आमदार फंडातून रक्कल रु.१०/- लक्ष तसेच उर्वरीत रक्कम रु.५५,८३,७४२/- बागवान महोल्ला परिसरात रस्ते कॉक्रीटींग करणेसाठी मनपा फंडातुन खर्च करणेस तसेच अ.नं.२४ मध्ये केलेले प्रभाग क्र.०४ चौघुले प्लॉट, ओक नगर परिसरात रस्ते कॉक्रीटींग करणे कामी रक्कम रुपये ३८,४३,१५३/- मात्र मनपा फंडातून करणेस तसेच अ.नं.२५ मध्ये नमूद केलेले प्रभाग क्र.०४ दत्त मंदीर ते मिरजा चौक पर्यंत व अहिलेकार यांचे चौकापर्यंत रस्ता कॉक्रीटींग करणे कामी रक्कम रुपये २०/- लक्ष मात्र आमदार फंडातून खर्च करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

तसेच सन्मा.सदस्या,सौ.ज्योती बाळासाहेब चव्हाण यांनी सभागृहात केलेल्या सूचनेनूसार व दिलेल्या पत्रानूसार यादीतील अ.नं.९० मध्ये नमूद कामाचे नावात बदल करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ५५**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

## जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव.

**विषय क्र.२७ ची यादी**

**महासभा क्र.४७** **महासभा ठराव क्र.१०३३** **दि.२१/०३/२०२३**

| अ.क्र. | सन्मा.सदस्य/ सदस्या | प्र. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री. नवनाथ दारकुंडे | 2 | प्र.क्र.2 मधील प्रल्हाद पोळ यांचे घराच्या कंपाऊंड पासुन ते बगिच्या गेट व प्रकाश पोळ यांचे घरापर्यत रस्ता कॉक्रीटीकरण करणे | 3000000 |
| 2 | 1,80,00,000 | | प्र.क्र.2 मधील जाफर चौक जवळील झोपडपट्टी मधील ठिकठिकाणचे | 3000000 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | रस्ते कॉक्रीटीकरण करणे | |
| 3 | | | प्र.क्र.2 मधील मकरा अर्पाटमेंट पासुन ते राजवाडा व गोविंद ओझा यांचे यांचे दालफळ पर्यत रस्ता कॉक्रीटीकरण करणे | 3000000 |
| 4 | | | प्र.क्र.2 मधील कुळकर्णी यांचे घरापासुन ते राजवाड्या पर्यत बोळी मधील रस्ता कॉक्रीटीकरण करणे तसेच एका बाजुस असलेली गटार व स्लॅब कल्व्हट करणे | 3000000 |
| 5 | | | प्र.क्र.2 मधी झेंडे यांचे घरापासून ते बडगुजर यांचे घराजवळील बोळ तसेच बोहरा मस्जिद मेन रस्त्यापर्यत रस्ता कॉक्रीटीकरण करणे | 3000000 |
| 6 | | | प्र.क्र.2 मधील बारसे कॉलनी मधील ठिकठिकाणचे रस्ते कॉक्रीटीकरण करणे | 3000000 |
| 7 | श्री. किशोर बाविस्कर | 2 | प्रभाग क्र. 2 मधील हरिओम नगर परिसरात रस्ते कॉक्रीटीकरण करणे | 8000000 |
| 8 | 2,00,00,000 | | प्रभाग क्र. 2 मधील हरिओम नगर परिसरात आरसीसी गटारी करणे | 3500000 |
| 9 | | | प्रभाग क्र.2 मधील वाणी मंगल कार्यालय जवळील रतिलाल झेंडू व धनसिंग चक्कीवाले, स्वामी नारायण मंदीर, गायकवाड ताई, शिवशंकर नगर येथील रस्ते डांबरीकरण अथवा कॉक्रीटीकरण तसेच आरसीसी गटारी बांधणे | 8500000 |
| 10 | सौ. रंजना सपकाळे | 3 | प्र.क्र. 3 अंतर्गत मनियारवाडा परिसरात रस्ते कॉक्रीटीकरण करणे | 1500000 |
| 11 | 1,00,00,000 | | प्र.क्र. 3 अंतर्गत कुंभारवाडा परिसरात रस्ते कॉक्रीटीकरण करणे | 1000000 |
| 12 | | | प्र.क्र. 3 अंतर्गत चांभारवाडा परिसरात रस्ते कॉक्रीटीकरण करणे | 1000000 |
| 13 | | | प्र.क्र. 3 अंतर्गत जुने जळगांव डॉ.बाबासाहेब आंबेडकर नगर परिसरात रस्ते कॉक्रीटीकरण करणे | 1000000 |
| 14 | | | प्र.क्र. 3 अंतर्गत खेडी शिव नगर दक्षिणमुखी हनूमान मंदीर ते श्री.गणेश लोथळे सर यांचे घरापर्यत परिसरात रस्ते कॉक्रीटीकरण करणे | 1000000 |
| 15 | | | प्र.क्र. 3 अंतर्गत वडामया गुरुदत्त कॉलनी परिसरात रस्ते कॉक्रीटीकरण करणे | 1500000 |
| 16 | | | प्र.क्र. 3 अंतर्गत दिनकर नगर परिसरातील असोदा रोड ते जुना असोदा रोड यांना जोडणारा रस्ता कॉक्रीटीकरण करणे | 1000000 |
| 17 | | | प्र.क्र. 3 अंतर्गत खेडी इंद्रा नगर परिसरात रस्ते कॉक्रीटीकरण करणे | 1000000 |
| 18 | | | प्र.क्र. 3 अंतर्गत बालाजी मंदीरा मागील झोपडपट्टीतील गल्ल्यात कॉक्रीटीकरण करणे | 1000000 |
| 19 | श्री. प्रविण | 3 | प्र.क्र.3 अंतर्गत शंकरराव नगर गट नं. 92/4 आरसीसी गटार बांधणे | 3000000 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | कोल्हे | | | |
| 20 | 1,15,00,000 | | प्र.क्र. 3 अंतर्गत जळगांव शिवार गट नं. 95/3 तळेले कॉलनी व परिसरात आरसीसी गटार बांधणे | 5000000 |
| 21 | | | प्र.क्र.3 श्री. अरुण भोईटे यांचे घरापासुन ते म्हसोबा पर्यत तसेच परिसरात कॉक्रीटीकरण करणे | 2000000 |
| 22 | | | प्र.क्र.3 श्री. पांडुरंग धांडे यांचे घरापासून ते श्री.एकनाथबुआ नारखेडे यांचे घरापर्यत तसेच म्हशीगल्ली परिसरात कॉक्रीटीकरण करणे | 1500000 |
| 23 | श्री. कैलास सोनवणे | | प्रभाग क्र. 4 जोशीपेठ, बागवान मोहोला परिसरात रस्ते कॉक्रीटींग करणे | 6583742 |
| 24 | 3,69,16,591 | | प्रभाग क्र. 4 चौघुले प्लॉट, ओक नगर परिसरात रस्ते कॉक्रीटींग करणे | 3843153 |
| 25 | | | प्रभाग क्र. 4 दत्त मंदीर ते मिरजा चौक पर्यत व अहिलेकार यांच्या चौकापर्यत रस्ता कॉक्रीटींग करणे | 2000000 |
| 26 | | | प्रभाग क्र. 02 अंतर्गत हरीओम नगरकडेस जाणारा गोल बंगल्याशेजारील रस्त्याच्या दुतर्फा गटार बांधुन रस्त्याचे कॉक्रीटीकरण करणे | 1430319 |
| 27 | | | प्रभाग क्र. 03 अंतर्गत जळगांव स.नं. 103/1अ दिनकर नगर येथील खुल्या जागेस कुंपन भिंत बांधून तेथे सार्वजनिक शौचालय बांधणे | 4632172 |
| 28 | | | प्रभाग क्र. 03 अंतर्गत जळगांव स.नं. 103/3 येथील खुल्या जागेस कुंपन भिंत बांधून तेथे सार्वजनिक शौचालय बांधणे | 4043804 |
| 29 | | | प्रभाग क्र. 3 घरकुल चौकापासून ते मोहन चित्र मंदीर पर्यत रस्ता डांबरीकरण करणे | 14383401 |
| 30 | सौ.प्रतिभा पाटील | 8 | प्रभाग क्र. 8 अंतर्गत निमखेडी शिवार गट नं. 79/1 प्लॉ.नं. 01 ते 07 पर्यत रस्त्याचे डांबरीकरण करणे | 1421229 |
| | 14,21,229 | | | |
| 31 | डॉ.चंद्रशेखर पाटील | 8 | प्रभाग क्र ८ मानवसेवा शाळा ते स्टेट बँक ऑफ इंडिया पर्यंत (घनश्याम नगर) रस्ता डांबरीकरण करणे. | 4000000 |
| 32 | 2,70,00,000 | | प्रभाग क्र ८ लोकेश टेन्ट हाऊस ते एस पी. चव्हाण यांच्या घराकडून, इंजि. ज्ञानेश्वर पाटील यांच्या घरापर्यत रस्ता डांबरीकरण करणे | 2500000 |
| 33 | | | प्रभाग क्र. ८ हितवर्धिनी सोसायटी, कल्याणी नगर मध्ये रस्ता कॉँक्रिटीकरण करणे | 3000000 |
| 34 | | | प्रभाग क्र. ८ गट न. ७७ प्रज्ञा कॉलनी रस्ते डांबरीकरण करणे. | 3500000 |
| 35 | | | प्रभाग क्र. ८ मध्ये गट ९४ व परिसरात मध्ये रस्ता कॉँक्रिटीकरण करणे | 1500000 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 36 | | | प्रभाग क्र. ८ मध्येगट ९५ मध्ये व परिसरात रस्ता कॉंक्रिटीकरण करणे. | 1500000 |
| 37 | | | प्रभाग क्र. ८ मध्ये डी. आर. पाटील यांच्या घराच्या कॉर्नर पासून ते गजानन पार्क पर्यंत व परिसरात रस्ता कॉंक्रिटीकरण करणे. | 1500000 |
| 38 | | | प्रभाग क्र. ८ मध्ये गट. ९० पत्रकार दिलीप तिवारी यांच्या घरापासून ते बालविश्व शाळेपर्यंत रस्ता व परिसरात रस्ता कॉंक्रिटीकरण करणे. | 1500000 |
| 39 | | | प्रभाग क्र. ८ मध्ये गट. ९० बालविश्व शाळेपासून ते अग्रवाल प्रोव्हिजन पर्यंत रस्ता व परिसरात मध्ये रस्ता कॉंक्रिटीकरण करणे. | 1500000 |
| 40 | | | प्रभाग क्र. ८ मध्ये मयुरेश्वर कॉलनी मध्ये व परिसरात रस्ता कॉंक्रिटीकरण करणे. | 1500000 |
| 41 | | | प्रभाग क्र. ८ मध्ये गट नं ८६ श्री. नंदू चौधरी यांच्या घरापासून ते संतोष धनगर यांच्या घरापर्यंत रस्ता कॉंक्रिटीकरण करणे. | 1500000 |
| 42 | | | प्रभाग क्र. ८ हायवे दर्शन कॉलनी रस्ते डांबरीकरण करणे | 3500000 |
| 43 | सौ.प्रतिभा कापसे | 9 | प्र.क्र.9 शिवण्णा नगर राणेदादा यांच्या घराजवळील व परिसरातील रस्ते कॉक्रीटीकरण करणे | 1200000 |
| 44 | 1,20,00,000 | | प्र.क्र.9 शैलेश चव्हाण ते जगदिश बोरेले श्रीदत्त कॉलनी यांच्या घरापर्यत रस्ता कॉक्रीटीकरण करणे | 1800000 |
| 45 | | | प्र.क्र.9 विद्यापिठ बोरसे साहेब ते कुलकर्णी क्लासेस श्रीदत्त कॉलनी परिसरातील रस्ते कॉक्रीटीकरण करणे | 1600000 |
| 46 | | | प्र.क्र.9 देशमुख साहेब भोईराज भवन ते बाजार रोड पर्यतचा रस्ता कॉक्रीटीकरण करणे श्रीदत्त कॉलनी कॉक्रीटीकरण करणे | 2000000 |
| 47 | | | प्र.क्र.9 ओम शांती नगर श्री बहाळे यांच्या घरापासुन ते श्री उत्तम भिमसिंग पाटील यांच्या घरापर्यतचा रस्ता कॉक्रीटीकरण करणे | 2000000 |
| 48 | | | प्र.क्र.9 ओम शांती नगर श्री देविदास नांदेडकर ते परमार्थ निकेतन पर्यतचा रस्ता कॉक्रीटीकरण करणे | 3400000 |
| 49 | सौ.प्रतिभा देशमुख | 9 | प्रभाग क्रं. 9 मधील श्रीरत्न कॉलनी मधील रस्ते कॉक्रीटीकरण करणे | 3000000 |
| 50 | 3,45,00,000 | | प्रभाग क्रं. 9 मधील पिंप्राळा येथील पाटीलवाडा मधील रस्ता कॉक्रीटी करण करणे | 3000000 |
| 51 | | | प्रभाग क्रं. 9 मधील जे.डी.सी.सी.बँक कॉलनी मधील रस्ते कॉक्रीटीकरण करणे | 4000000 |
| 52 | | | प्रभाग क्रं. 9 मधील ओमशांती नगर मधील रस्ते कॉक्रीटीकरण करणे | 5000000 |
| 53 | | | प्रभाग क्रं. 9 मधील मानराज पार्क मधील रस्ते कॉक्रीटीकरण करणे | 3000000 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 54 | | | प्रभाग क्रं. 9 मधील बेडाळे नगर पिंप्राळा शिवार मधील होडांई शोरुम मागील रस्ते कॉक्रीटीकरण करणे | 3000000 |
| 55 | | | प्रभाग क्रं. 9 मधील पांढरी प्लॉट मधील रस्ते कॉक्रीटीकरण करणे | 4000000 |
| 56 | | | प्रभाग क्रं. 9 मधील गट नं. 36/1,36/2/40 द्रोपदी नगर मधील रस्ते कॉक्रीटीकरण करणे | 4000000 |
| 57 | | | प्रभाग क्रं. 9 मधील शिंदे नगर मधील रस्ते कॉक्रीटीकरण करणे | 4000000 |
| 58 | | | प्रभाग क्रं. 9 मधील प्रविण अकॅडमी समोरील रस्ता डांबरी करण करणे | 1500000 |
| 59 | श्री. विजय पाटील | 9 | प्र.क्र.9 पिंप्राळा शिवार गट नं. 11/2 ओपन स्पेस मध्ये पेव्हर ब्लॉक बसविणे व सुशोभिकरण करणे | 1000000 |
| 60 | 1,20,00,000 | | प्र.क्र.9 पिंप्राळा शिवार गट नं. 9/1 ओमशांती नगर ओपन स्पेस मध्ये पेव्हर ब्लॉक बसविणे व सुशोभिकरण करणे | 1000000 |
| 61 | | | प्र.क्र.9 पिंप्राळा शिवार गट नं. 9/2/1अ ओपन स्पेस मध्ये पेव्हर ब्लॉक बसविणे व सुशोभिकरण करणे | 1000000 |
| 62 | | | प्र.क्र.9 पिंप्राळा शिवार गट नं.02 अनुपम सोसायटी मधील श्री.साळुंखे साहेब यांच्य घराजवळील ओपन स्पेस मध्ये पेव्हर ब्लॉक बसविणे व सुशोभिकरण करणे | 1000000 |
| 63 | | | प्र.क्र.9 पिंप्राळा शिवार गट नं.5/1+2 अष्टभुजा मंदीर येथिल ओपन स्पेस मध्ये पेव्हर ब्लॉक बसविणे, संरक्षण भिंत बांधणे व सुशोभिकरण करणे | 1000000 |
| 64 | | | प्र.क्र.9 संत सेना महाराज मंदीर ओपन स्पेस मध्ये पेव्हर ब्लॉक बसविणे व सुशोभिकरण करणे | 1000000 |
| 65 | | | प्र.क्र.9 गट नं.344 येथिल ओपन स्पेस मध्ये पेव्हर ब्लॉक बसविणे, संरक्षण भिंत बांधणे व सुशोभिकरण करणे | 1000000 |
| 66 | | | प्र.क्र.9 शिंदे नगर येथिल गणपती मंदीर ओपन स्पेस मध्ये पेव्हर ब्लॉक बसविणे, संरक्षण भिंत बांधणे व सुशोभिकरण करणे | 1000000 |
| 67 | | | प्र.क्र.9 गट नं.348 जिल्हा बँक कॉलनी ओपन स्पेस मध्ये पेव्हर ब्लॉक बसविणे व सुशोभिकरण करणे | 1000000 |
| 68 | | | प्र.क्र.9 शोभताई भारंबे ते शेळके काका शिंदे नगर यांच्या घरापर्यत रस्ता कॉक्रीटीकरण करणे | 3000000 |
| 69 | श्री. मयुर कापसे | 9 | प्र.क्र.9 पिंप्राळा शिवार गट नं. 2/4 ओपन स्पेस मध्ये पेव्हर ब्लॉक बसविणे, चेनलिंक फेन्सिग करणे व सुशोभिकरण करणे | 1000000 |
| 70 | 1,13,00,000 | | प्र.क्र.9 पिंप्राळा शिवार गट नं. 23+22/1 पंचायतन मंदीर मध्ये पेव्हर ब्लॉक बसविणे व सुशोभिकरण करणे | 1000000 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 71 | | | प्र.क्र.9 पिंप्राळा शिवार गट नं. 27 मराठा सेवा संघ समोरील गल्लीमधील ओपन स्पेस मध्ये पेव्हर ब्लॉक बसविणे व सुशोभिकरण करणे | 1000000 |
| 72 | | | प्र.क्र.9 पिंप्राळा शिवार गट नं. 8 दत्त मंदीर येथील ओपन स्पेस मध्ये पेव्हर ब्लॉक बसविणे व सुशोभिकरण करणे | 1000000 |
| 73 | | | प्र.क्र.9 पिंप्राळा शिवार गट नं.9 मनुदेवी मंदिर येथील ओपन स्पेस मध्ये पेव्हर ब्लॉक बसविणे, चेनलिंक फेन्सिग करणे व सुशोभिकरण करणे | 1000000 |
| 74 | | | प्र.क्र.9 पिंप्राळा शिवार गट नं.7 शिक्षक कॉलनी येथे ओपन स्पेस मध्ये पेव्हर ब्लॉक बसविणे व सुशोभिकरण करणे | 1000000 |
| 75 | | | प्र.क्र.9 पिंप्राळा गट नं. 23+22/1 प्लॉ.क्र.27 हिरालाल महाजन ते प्लॉ.क्र.38 श्री.भागवत बोरसे पर्यतचा रस्ता कॉक्रीटीकरण करणे | 2500000 |
| 76 | | | प्र.क्र.9 पिंप्राळा गट नं. 23+22/1 प्लॉ.क्र.26 श्री. जोशी ते प्लॉ.क्र.12 श्री.भागवत सत्योजी पर्यतचा रस्ता व परिसरातील रस्ते कॉक्रीटीकरण करणे व पंचायतन मंदिर परिसरातील रस्ते कॉक्रीटीकरण करणे | 2800000 |
| 77 | हसीना बी शरीफ शेख | 10 | प्रभाग क्र. 10 मधील पिंप्राळा हुडको बिल्डीग नं. 1 ते 26 परिसरातील रस्ते डांबरीकरण करणे | 8840861 |
| 78 | 1,53,40,861 | | प्रभाग क्र. 10 मधील पिंप्राळा गट नं. 214/3, 214/4 व 216 मध्ये आरसीसी गटार बांधणे | 6500000 |
| 79 | श्री.ललित कोल्हे | 11 | प्र.क्र.1 मधील स.न. 329/1,325, 329/2अ मधील ओपन स्पेस विकसित करणे. | 4000000 |
| 80 | 6,86,81,216 | | प्र.क्र.2 मधील श्री मोटर्स ते राजवाडा पर्यत रस्ता कॉक्रीटीकरण करणे | 3000000 |
| 81 | | | **सभागृहातील चर्चेनूसार व सन्मा.सदस्य श्री.किशोर रमेश बाविस्कर यांचे सूचनेप्रमाणे व पत्रानूसार सदरचे काम रद्द** | - |
| 82 | | | **सभागृहातील चर्चेनूसार व सन्मा.सदस्य श्री.किशोर रमेश बाविस्कर यांचे सूचनेप्रमाणे व पत्रानूसार सदरचे काम रद्द** | - |
| 83 | | | **सभागृहातील चर्चेनूसार व सन्मा.सदस्य श्री.किशोर रमेश बाविस्कर यांचे सूचनेप्रमाणे व पत्रानूसार सदरचे काम रद्द** | - |
| 84 | | | प्र.क्र.3 तलाठी कार्यालय ते स.न. 44 पर्यंत रस्ते डांबरीकरण करणे. | 5500000 |
| 85 | | | प्र.क्र.3. स.न. 95 व 96 तळेले कॉलणी मध्ये रस्ते डांबरीकरण करणे. | 6000000 |
| 86 | | | प्र.क्र. 4 मधील गुरुनानक नगर लगत असलेली लेडी नाल्याला सरक्षण भिंत बांधणे व स्लॅब कल्व्हेट बांधणे | 2500000 |
| 87 | | | प्र.क्र.9 मधील पिप्राळा गट 32,33,34 मध्ये रस्ते डांबरीकरण करणे. | 4000000 |
| 88 | | | प्र.क्र.11 मधील गट क्र. 140 व 149 मध्ये रस्ते डांबरीकरण करणे. | 7000000 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 89 | | | प्र.क्र.11 मधील स. न. 142 मध्ये रस्ते डांबरीकरण करणे. | 3000000 |
| 90 | | | प्र.क्र. 13 मधील मधील ठिकठिकाणच्या बोळ गल्ली मध्ये काँक्रीट रस्ता करणे. | 4000000 |
| 91 | | | प्र.क्र.14 मधील रामेश्वर कॉलनीतिल व्हि. आय. पी. गल्ली व स्वामी समर्थ केंद्राची गल्ली कॉक्रीटिकरण करणे. | 7000000 |
| 92 | | | प्र.क्र.15 मध्ये कैय्युम देशमुखनगर पूलापासून नॅशनल हायवे पर्यंत नाल्याला सरक्षण भिंत बांधणे. | 5000000 |
| 93 | | | प्र.क्र. 16 मध्ये रणछोडदास नगर मध्ये डॉ. जावळेच्या घरापासून वेदान्त हाईट पर्यंत रस्ता क्रॉक्रीटिकरण करणे. | 2000000 |
| 94 | | | प्र.क्र.17 मधील बालाजी मंदिर परिसर नाल्यावर पूल बांधणे. | 3681216 |
| 95 | | | प्र.क्र.19 मधील सुप्रीम कॉलोनी श्रीकृष्ण नगर मध्ये रस्ते डांबरीकरण करणे. | 5000000 |
| 96 | श्री.सदाशिव ढेकळे | 14 | प्र.क्र.14 मधील स्लॅब कल्व्हेट करणे | 1074137 |
| 97 | 1,30,74,137 | | प्र.क्र.14 मधील गायत्री नगर मधील नाला बांधणे | 12000000 |
| 98 | श्री.राजेंद्र घुघे पाटील | 14 | प्र.क्र.14 गणपती नगर मधील हॉटेल क्रेझीहोम ते डिव्हायडर वरील छोटा गणपती मंदिरापर्यतचा जावेद हबीब समोरील रस्ता डांबरीकरण करणे | 7500000 |
| | 75,00,000 | | | |
| 99 | मा.सौ.जयश्री महाजन | 15 | प्र क्र 15 मेहरूण अंतर्गत फुकटपुरा येथे अमीन भाई ते सदोबा वेअर हाऊस,मदरसा गल्ली,पेंटर गल्ली मध्ये आर सी सी गटार व स्लॅब कल्व्हर्ट बांधणे. | 999000 |
| 100 | 5,19,56,396 | | प्रभाग क्रमांक 15 मेहरून अंतर्गत फुकटपुरा येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याच्या दोन्ही बाजुच्या तसेच सुलताना आप्पा गल्ली लताताई गल्ली मध्ये आरसीसी गटार व स्लॅपलवर बांधणे | 989000 |
| 101 | | | प्रभाग क्रमांक 15 मेहरून अंतर्गत फुकटपुरा येथे श्री इच्छा देवी मंदिरा मागील भागात आरसीसी गटर व स्लॅब कन्वर्ट बांधणे | 997000 |
| 102 | | | प्र.क्र. 5 जयकिसनवाडीमध्ये रस्ता कॉक्रीटीकरण करणे | 6855593 |
| 103 | | | प्र.क्र. 5 मनपा ऑफिस जवळील व.वा. मार्केट मागील फायर ऑफिस पासुन ते खाऊ गल्ली पर्यत रस्ता कॉक्रीटीकरण करणे | 5908692 |
| 104 | | | प्र.क्र. 5 शाहू नगर मधील श्री.मनोज भोई ते श्री.धर्मा कदम यांचे घरापर्यत आरसीसी गटार व स्लॅब कल्व्हेट बांधणे | 1407606 |
| 105 | | | प्र.क्र. 5 शाहू नगर मधील श्री.मनोज भोई ते श्री.धर्मा कदम यांचे घरापर्यत पर्यत रस्ता कॉक्रीटीकरण करणे | 999505 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 106 | | | प्र.क्र. 5 जयकिसनवाडी मधील रस्ते कॉक्रीटीकरण करणे | 7300000 |
| 107 | | | प्र.क्र. 5 मधील शाहू नगर हौसींग सोसायटी मधील रस्ते डांबरीकरण करणे | 18300000 |
| 108 | | | प्र.क्र. 5 शाहू नगर व इंदिरा नगर परिसरातील रस्ते कॉक्रीटीकरण करणे | 8200000 |
| 109 | सौ.रेश्मा काळे | 16 | प्र.क्र. 16 मध्ये सम्राट कॉलनी पासून कब्रस्तान नाल्यापर्यतचा आरसीसी नाला बांधणे | 7800000 |
| 110 | 1,99,00,000 | | प्र.क्र. 16 मध्ये मासुमवाडी मध्ये रस्ते कॉक्रीटींग करणे | 7200000 |
| 111 | | | प्र.क्र. 16 मध्ये श्री.नंदु काळे यांच्या घरापासुन श्रीकृष्ण कॉलनी परिसर रस्ता कॉक्रीटीकरण करणे | 2000000 |
| 112 | | | प्र.क्र. 16 मुकुंद नगर मधील रस्ते कॉक्रीटीकरण करणे | 2900000 |
| 113 | सईदा बी शेख युसुफ | 18 | प्रभाग क्रमांक 18 मधील मनपा मालकीच्या स.नं. 15/3ब/३ या खुल्या जागेला संरक्षण भिंत (चेनलिंक फेन्सींग) करणे, अबालवृध्दांसाठी जॉगींग ट्रॅक तयार करुन पेव्हर ब्लॉक बसविणे, मुलांसाठी खेळणी बसविणे, खुल्या जागेत ओपन जिम साहित्य पुरविणे व बसविणे, ज्येष्ठ नागरीकांसाठी सिमेंटची बाके बसविणे, हायमस्ट लॅम्प बसविणे तसेच खुल्या जागेवर असलेल्या विहीरीवर लोखंडी संरक्षक जाळी बसविणे व सुशोभिकरणे करणे. | 3000000 |
| | 30,00,000 | | | |
| 114 | श्री. गणेश सोनवणे | 19 | प्र.क्र. 19 अंतर्गत सुप्रिम कॉलनी सर्व्हे नं. 162/1 व 162/3 व 165/1अ+1ब या भागातील रोड खडीकरणासह डांबरीकरण करणे | 9000000 |
| 115 | 3,40,00,000 | | प्र.क्र. 19 अंतर्गत सुप्रिम कॉलनी सर्व्हे नं. 165/1ड+1ई व 184/1 व 184/2 व 184/3 या भागातील रोड खडीकरणासह डांबरीकरण करणे | 15000000 |
| 116 | | | प्र.क्र. 19 अंतर्गत सुप्रिम कॉलनी सर्व्हे नं. 169/2 व 181/1 या भागातील रोड खडीकरणासह डांबरीकरण करणे | 10000000 |
| 117 | सौ.जिजाबाई भापसे | 19 | प्र.क्र.19 स.नं. 163/1, 163/2, 163/3 व 188 मध्ये आरसीसी गटारी बांधणे | 8500000 |
| 118 | 2,30,00,000 | | प्र.क्र.19 स.नं. 184/1, 1842, 184/3 मध्ये आरसीसी गटारी बांधणे | 7000000 |
| 119 | | | प्र.क्र.19 स.नं. 169/2, 181/3/1, 182/1/1, 166/1/4व2/3 मध्ये आरसीसी गटारी बांधणे | 7500000 |
| | 42,40,90,430 | | | 42,40,90,430 |

सभागृहातील चर्चेनूसार व सन्मा.सदस्य श्री.किशोर रमेश बाविस्कर यांचे सूचनेप्रमाणे व पत्रानूसार तसेच म.पिठासिन अधिकारी यांनी सभागृहात केलेल्या घोषणेनूसार अ.क्रं.81 ते 83 हे कामे रद्द करुन त्याऐवजी खालील नमूद 05 कामे सदरचे यादीत समाविष्ठ करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | सन्मा.सदस्य/ सदस्या | प्र. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री. किशोर रमेश बाविस्कर | 2 | प्र.क्र.2 महेश सोनवणे (पोलीस) यांचे घरापासुन ते उल्हास पाटील यांचे घरापर्यंत रस्ता कॉक्रीटीकरण करणे | 70,00,000 |
| 2 | 70,00,000 | | प्र.क्र.2 वाशिंग सेंटर पासुन सदाभाऊ यांचे घरापर्यंत ते संतोष पहेलवान यांचे घरापर्यंत रस्ता कॉक्रीटीकरण करणे | |
| 3 | | | प्र.क्र.2 कृष्णा सपकाळे यांचे घरापासुन ते अनिल भाऊ मनपा कर्मचारी यांचे घरापर्यंत रस्ता कॉक्रीटीकरण करणे | |
| 4 | | | प्र.क्र.2 साईबाबा मंदीराच्या बाजुच्या गल्लीमधील कडुभाऊ सपकाळे यांचे पुर्ण गल्ली मधील रस्ता कॉक्रीटीकरण करणे | |
| 5 | | | प्र.क्र.2 वाशिंग सेंटर पासुन सदाभाऊ व कैलास मिस्तरी यांचे घरापर्यंत आर.सी.सी.गटार बांधणे. | |

**नगरसचिव :- विषय क्रं. २८:-** जळगांव शहरातील नविन बी.जे. मार्केटच्या ओट्यावर (बेंडाळे चौकाकडून जातांना) अत्याधुनिक स्वच्छतागृह सुप्रिम इंडस्ट्रिज फाऊंडेशन तर्फे उभारणेबाबत सन्मा.सदस्य श्री.नितीन बालमुकुंद लढ्ढा यांनी दिलेल्या पत्रावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- सदर प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर** :- माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर** :- विषय क्रं. २८ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. १०३४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहरातील नागरीकांना उत्तम सुविधा मिळाव्यात यासाठी आपण सगळे सदैव प्रयत्नशिल असतो. शहरातील नागरीकांसाठी अत्याधुनिक आणि स्वच्छ असे स्वच्छतागृह असावे या हेतूने आपण जळगांव मनपा आणि सुप्रिम इंडस्ट्रीज फाऊंडेशन तर्फे संयुक्तरित्या गेल्या पाच वर्षात शहरातील तिन ठिकाणी अत्याधुनिक स्वच्छतागृह उभारुन लोकांसाठी खुले देखिल केले आहेत.

या स्वच्छतागृहाची देखभाल देखील सुप्रिमतर्फेच करण्यात येते. याला अनुसरुन नविन बि.जे. मार्केटच्या ओटयावर (बेंडाळे चौकाकडून जाताना) सुप्रिम फाऊंडेशन आणखी एक स्वच्छतागृह उभारुन देण्यास तयार असल्याने सदरहू स्वच्छतागृह उभारणीस येणारा संपुर्ण खर्च सुप्रिम इंडस्ट्रीज फाऊंडेशन तर्फे करणेस आणि यास्वच्छतागृहाची देखभाल दुरुस्तीची जबाबदारी देखिल सुप्रिम इंडस्ट्रीज फाऊंडेशन यांनी करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

तसेच जळगांव मनपाने स्वच्छतागृहासाठी लागणारी जागा, विज पुरवठा, पाणी पुरवठा करावयाचा असून स्वच्छतागृहा संदर्भातील करारनामा जळगांव मनपा आणि सुप्रिम इंडस्ट्रीज फाऊंडेशन यांच्यात यापुर्वी झालेल्या करारनाम्यानुसार करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ५५**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं. २९:-** जळगांव शहरातील गोलाणी मार्केट फायर ऑफीसजवळ अत्याधुनिक स्वच्छतागृह सुप्रिम इंडस्ट्रिज फाऊंडेशन तर्फे उभारणेबाबत सन्मा.सदस्य श्री.नितीन बालमुकुंद लढ्ढा यांनी दिलेल्या पत्रावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- सदर प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर** :- माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर** :- विषय क्रं. २९ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. १०३५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहरातील नागरीकांना उत्तम सुविधा मिळाव्यात यासाठी आपण सगळे सदैव प्रयत्नशिल असतो. शहरातील नागरीकांसाठी अत्याधुनिक आणि स्वच्छ असे स्वच्छतागृह असावे या हेतूने आपण जळगांव मनपा आणि सुप्रिम इंडस्ट्रीज फाऊंडेशन तर्फे संयुक्तरित्या गेल्या पाच वर्षात शहरातील तिन ठिकाणी अत्याधुनिक स्वच्छतागृह उभारुन लोकांसाठी खुले देखिल केले आहेत.

या स्वच्छतागृहाची देखभाल देखील सुप्रिमतर्फेच करण्यात येते. याला अनुसरुन गोलाणी मार्केट फायर ऑफीसजवळ सुप्रिम फाऊंडेशन आणखी एक स्वच्छतागृह उभारुन देण्यास तयार असल्याने सदरहू स्वच्छतागृह उभारणीस येणारा संपुर्ण खर्च सुप्रिम इंडस्ट्रीज फाऊंडेशन तर्फे करणेस आणि यास्वच्छतागृहाची देखभाल दुरुस्तीची जबाबदारी देखिल सुप्रिम इंडस्ट्रीज फाऊंडेशन यांनी करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

तसेच जळगांव मनपाने स्वच्छतागृहासाठी लागणारी जागा, विज पुरवठा, पाणी पुरवठा करावयाचा असून स्वच्छतागृहा संदर्भातील करारनामा जळगांव मनपा आणि सुप्रिम इंडस्ट्रीज फाऊंडेशन यांच्यात यापुर्वी झालेल्या करारनाम्यानुसार करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ५५**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं. ३०:-** जळगांव मनपा हद्दीतील मेहरूण शिवारातील समता नगर स्थित गट.क्रं. ५६३/५ विकसित करणेबाबत सन्मा.गटनेता. श्री.अनंत हरिश्चंद्र जोशी यांनी दिलेल्या पत्रावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- सदर प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर** :- माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर** :- विषय क्रं. ३० सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. १०३६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव मनपा हद्दीतील मेहरूण शिवारातील समता नगर स्थित गट.क्रं. ५६३/५ मधील खुल्या जागेत स्थानिक विदयार्थ्यांसाठी अभ्यासिका तसेच कुस्ती सरावासाठी आखाडा तयार करणे संरक्षण भिंत आणि खुल्या जागेत प्लाटेशन करुन देणेकरीता प्रभाग क्र.१२ चे नगरसेवक या नात्याने सन्मा.नगरसेवक, श्री.नितिन बरडे आणि सन्मा.नगरसेवक, श्री.अनंत जोशी यांनी जैन इंटरनॅशनल ट्रेड ऑर्गनायजेशन (JITO) जळगांव चाप्टर या संघटनेला विनंती केली असून त्यांनी याबाबत सकारात्मक प्रतिसाद दिला असून या प्रकल्पासाठी येणारा खर्च जैन इंटरनॅशनल ट्रेड ऑर्गनायजेशन (JITO) जळगांव चाप्टर संघटना स्वत: करणार असल्याने जळगांव मनपा हद्दीतील मेहरूण शिवारातील समता नगर स्थित गट.क्रं. ५६३/५ विकसित करणे कामी जैन इंटरनॅशनल ट्रेड ऑर्गनायजेशन (JITO) जळगांव चाप्टर संघटना यांना मनपा अटी-शर्तीस बंधनकारक राहून देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

तसेच याकामी मनपाने विज आणि पाणी पुरवठा करावा व हा प्रकल्प पुर्ण झाल्यानंतर त्यास “जैन इंटरनॅशनल ट्रेड ऑर्गनायजेशन (JITO) ” असे नामकरण करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ५५**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं. ३१:-** मा.सभापती, स्थायी समिती, जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव तथा अपिल प्राधिकरण यांचा निर्णय महासभा ठराव क्रं. ८७९ दि.०८/०८/२०२२ ची अंमलबजावणी त्वरीत होणेबाबत श्री.अरविंद दिनकर भोसले यांचा मा.महापौर ,मनपा,जळगांव यांचे मार्फत आलेल्या अर्जावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- मा.आयुक्त महोदया, एखाद्या अधिकाऱ्याला झालेली शिक्षा आणि त्या शिक्षेच्या अनुषंगाने त्याने केलेले स्थायी समितीसमोरचे अपिल , कायद्यातील तरतूद अत्यंत स्पष्ट आहे की, त्याने केलेले अपिल आणि त्याबाबतीत स्थायीने घेतलेला निर्णय, त्या निर्णयाची अंमलबजावणी प्रशासनाने तात्काळ करणे आणि ती तात्काळ अंमलात येणे अपेक्षित आहे. मग अशा विषयांना विखंडनासाठी पाठविण्याचे औचित्य काय आहे आणि जर कधी अशा पध्दतीने तो ठराव विखंडनासाठी पाठवायचाच असेल आणि तो विखंडीत होत असेल. तर मग त्या स्थायी समितीच्या अधिकाराला अर्थच काय आहे. म्हणजे मग स्थायी समितीला काही अधिकारच नाहीये तो निर्णय घेण्याचा किंवा कायद्यामध्ये इतकी स्पष्ट तरतूद आहे की तात्काळ त्याची अंमलबजावणी अपेक्षित आहे. मग प्रशासन विखंडनाला पाठवत आणि प्रशासनाचा प्रस्ताव बऱ्याचशा गोष्टी शासन विखंडीत करते. मग ते धोरण कुठेतरी चुकीचे वाटत नाही का, कॉन्टेनेंटली नाहीये का?

**ॲड.शुचिता हाडा** :- महापौरताई काय आहे की स्थायी समितीने जो निर्णय दिलेला आहे. त्यांनतर त्यांनी वारंवार पत्रव्यवहार करूनही त्यांना कोणतेच उत्तर दिले जात नाही. त्यांना तोंडी असे समजते की विखंडनाला पाठवला आहे. प्रशासनाने सांगावे त्यांनी की विखंडनला पाठविला आहे का?

**मा.आयुक्त** :- स्टँडींग कमिटीने जो निर्णय घेतलेला होता आणि त्यांनी एक पत्र दिलेले होते आणि त्या पत्राच्या अनुषंगाने आपण विधी विभागाचा अभिप्राय घेवुन मग तो ठराव विखंडनाला पाठविलेला होता आणि संबंधिताला नंतर उत्तर देण्यात आलेले आहे आणि विखंडनाला प्रस्ताव गेलेला आहे म्हणुन त्यांनी हे सेकंड अपिल केलेले आहे. हा ठराव झाल्यानंतर विधी विभागाचा अभिप्राय घेण्यात येवुन निर्णय घेण्यात येईल.

**ॲड.शुचिता हाडा** :- टप्प्या टप्प्याने करून दिलेले आहे. यांच्या एकावरच ही अशी का कारवाई केली आहे. हा मुद्दा मागच्या वेळेला स्थायी समितीच्या सभेमध्ये मांडलेला होता आणि त्यांच अपिल मंजुर केलेल होत.

**मा.आयुक्त** :- आता संचिका नाहीये माझ्याकडे आणि त्यांनी ज्या काही चुका केलेल्या होत्या किंवा त्याच्या पुर्वीच्या होत्या ते बघुनच शिक्षा दिलेली आहे.

**ॲड.शुचिता हाडा** :- त्यांच्या अपिल मध्ये एक दिसत आहे.

**मा.आयुक्त** :- त्यात त्यांनी त्यांची बाजु मांडलेली आहे. त्यांच्या सगळ्या कोर्टाच्या केसेस , झालेल्या चौकश्यांचा अहवाल वगैरे वगैरे त्या नंतर सगळ्या बाबी बघुनच प्रशासनाने हा निर्णय घेतलेला होता. त्यानंतर त्यांनी स्टँडींगला अपिल केलेल होत आणि स्टँडींग मध्ये अपिल केले होते तेव्हा प्रशासनाचा रिपोर्ट तोच होता म्हणुन विखंडनाला पाठविण्यात आला आणि पुन्हा त्यांनी अर्ज दिल्यानंतर स्टँडींग मध्ये सेकंड अपिल होवू शकते म्हणुन त्यांनी हा अपिल केलेले आहे.

**ॲड.शुचिता हाडा** :- त्यांचा प्रस्ताव मंजुर करण्यात यावा.

**श्री.नितीन लढ्ढा** :- मा.आयुक्त महोदया, आता हा प्रस्ताव महासभेसमोर आलेला आहे आणि याला मान्यता दिल्यानंतर याची अंमलबजावणी होईल का? नाहीतर पुन्हा येरे माझ्या मागल्या, जसा तो स्थायी समितीचा ठराव विखंडनाला पाठवला तसा पुन्हा हा ठराव विखंडनाला पाठवला जाईल का?

**ॲड.शुचिता हाडा** :- नितीनभाऊ मॅडम तेच म्हणताहेत की ठराव आधी विधी विभागाकडे पाठवु आणि मग नंतर निर्णय घेवू.

**(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी चर्चा करीत होते त्यामुळे सभागृहातील चर्चेचा स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)**

**श्री.नितीन लढ्ढा** :- याच्यामध्ये

**मा.उपमहापौर** :- भाऊ या सहा लोकांमध्ये एकाची सेवा समाप्त होणार आहे. मला वाटत एकाची सेवा समाप्त झाली आहे का?

**मा.आयुक्त** :- हो झाली आहे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- कस आहे की एखादा अधिकारी २५/२५ वर्ष सेवा देतो कुठेतरी प्रशासनाच्या मोठ्या अधिकाऱ्याचा अहंकार कुठेतरी दुखावला गेला. तर त्याची शिक्षा इतकी कठोर नको पाहीजे की जेणेकरून त्याच जे काही करीअर असेल त्या करीअर मध्ये त्याला कुठेतरी डाग लागेल आणि त्याच्यानंतर त्याच्या वेतन आणि निवृत्तीवेतनावर कुठेतरी फरक पडेल. अशी एवढी कठोर कारवाई नको म्हणुन की तात्काळ प्रशासनाने सहानुभुतिपुर्वक या ठरावाची अंमलबजावणी करावी.

**मा.आयुक्त** :- सर याच्यात असे आहे की मागची जी शिक्षा दिलेली आहे. त्याच्या नंतर अपिल केले आणि जी शेवटची जी शिक्षा असेल त्याला त्यानंतर शिक्षा दिलेली नाही आणि मग त्याच्यानंतर मग त्याला आर्थिक शिक्षा द्यावी लागते. आपण जी शिक्षा आहे ती कमी करू पण मागील जी शिक्षा आहे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- जर स्थायी समितीला हा अधिकार असेल किंवा मग स्थायी समितीला अधिकार हे पुर्णत: माफी देण्याचे अधिकार आहेत आणि त्याच्यानंतर महासभेला सुध्दा तेच सेक्शन आहे की स्थायी समितीने जर कधी त्याला फेवर नाही केल  त्याची शिक्षा माफ नाही केली. तर तशा परिस्थितीत तो महासभेकडे येवू शकतो आणि समजा महासभेने त्याची संपुर्ण शिक्षा माफी करण्याच्या संदर्भातील धोरण स्विकारल. तर त्याची मला वाटते अंमलबजावणी आपण करायला हवी, म्हणजे त्याच्या आयुष्याचे नुकसान होणार नाही त्या अधिकाऱ्याचे , एवढेच आम्हाला अपेक्षित आहे आणि एवढीच आपल्याला विनंती आहे. सदर आलेल्या अपिलाच्या बाबतीत प्रशासनाने योग्य तो विचार करावा. त्याला दिलेली शिक्षा माफी किंवा माफ करण्याच्या दृष्टीकोनातुन सभागृहाने घेतलेला निर्णय आणि

**मा.उपमहापौर** :- महासभा ठराव क्रं. ८७९ आहे. माझे अनुमोदन आहे

**मा.महापौर** :- सन्मा.सदस्य नितीनभाऊंनी दिलेल्या सुचनांची प्रशासनाने नोंद घ्यावी. विषय क्रं. ३१ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. १०३७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, मा.सभापती, स्थायी समिती, जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव तथा अपिल प्राधिकरण यांचा महासभा ठराव क्रं. ८७९ दि.०८/०८/२०२२ च्या ठरावाची अंमलबजावणी त्वरीत करणेस व श्री.अरविंद दिनकर भोसले यांनी केलेले अपिल मान्य करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने श्री.अरविंद दिनकर भोसले यांचे उपरोक्त अपिल अर्जाचा सहानुभुतीपूर्वक विचार करुन नियमाप्रमाणे तात्काळ कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ५५**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं. ३२:-** गिरणा टाकी जवळील मेहरूण शिवार मधील गट.नं.४८३/२ या जागेत प्रभाग समिती क्रं. ०४ चे सुसज्ज कार्यालय बांधणेबाबत सन्मा.सदस्या. सौ.उज्वला मोहन बेंडाळे यांनी दिलेल्या पत्रावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- ताई याच्यामध्ये काय आहे की , प्रभाग समितीचे कार्यालय अद्यावत व्हावे त्याबद्दल काही वाद नाहीये. परंतू ही जागा कालच आपल्या मिटींगमध्ये चर्चा झाली की अशा काही व्यावसायिक जागा असतील की तीचा शोध घेवुन त्याच्यातुन आपल्याला कशा पध्दतीने उत्पन्न निर्माण करता येईल. तर ही जागा जी आहे ४८३/२ , तर हिचा सुध्दा आपल्याला व्यावसायिक उपभोग करता येवु शकतो. तर याच्या ऐवजी आता सद्यस्थितीमध्ये जिथे आपले आता ऑफीस आहे तिथेच आपले ऑफीस बांधण्याच्या संदर्भातील निर्णय घेण्यात यावा अशी विनंती आहे माझी

**सौ.उज्वला बेंडाळे** :- प्रभाग समितीकडुनच आपल्याला लेटर आलेले आहे त्याअनुषंगाने मी हे पत्र दिलेले आहे आणि भाऊ आपण म्हणत आहेत ते मला मान्य आहे. अशा ज्या जागा महापालिकेच्या आहेत. तर त्या आपल्याला माहिती सुध्दा नाही अशी पण परिस्थिती आहे आणि ही आताची नाहीये ही खुप वर्षापासुनची जागा पडलेली आहे.त्याच्यामुळे व्यावसायिक वापर करायचा आहे म्हणुन मला काही त्याच्यामध्ये ईन्टरेस्ट नाहीये किंवा दुसरा काही विषय नाहीये पण माझ एक म्हणण आहे की प्रभाग समिती कार्यालय हे मिनी महानगरपालिकेच कार्यालय असत. त्याची काय परिस्थिती आहे हे सुध्दा आपण मगे व्हिजीट केलेली आहे आणि पाहीलेली आहे. तिथे घरपट्टीची वसुली असते सर्व कार्यालय तिथे आहे. लाईट विभाग आहे, प्रभाग अधिकाऱ्यांच कार्यालय, प्रभाग अधिकाऱ्यांना बसायला कार्यालय नाहीये. पावसामध्ये ते पुर्ण गळते म्हणजे जर अशी स्थिती जर असेल. आपला भरणा तिथे असतो घरपट्टीची वसुली तिथे घेतली जाते आणि तशी जर परिस्थिती असेल तर काही ना काही नियोजन आपण करायला पाहीजे. हे वारंवार सांगण्यात आले आहे आणि हा प्रश्न याच्यासाठी सादर केलेला आहे की तिथे आपल्या पाण्याची गोष्ट आहे. तिथे आत्ता ज्या टाक्या आहेत. तर हा विषय बऱ्याचदा झालेला आहे. जर समजा कुण्या माथेफिरूचे डोक फिरल तर तिथे त्याने काही केले म्हणजे त्याने पाण्यात काही टाकले तर ते पाणी पुर्ण जळगांव शहराला भोगावे लागणार आहे. अशी परिस्थिती आहे तर पाणी तिथे असत तिथे एक सेप्रेट विभाग असायला पाहीजे. तिथे कोणीही येते कोणीही जाते आणि आपल्या पाण्याच्या टाक्या तिथेच राहणार आहे त्याच्यामध्ये काही बदल होणार नाहीये. त्याच्यामुळे सुरक्षा म्हणुन कोणीच नाहीये तिथे, कोणीही येते कुणी घरपट्टी भरायला येतात, लाईट विभागाच्या कामासाठी येतात, पाण्याचा प्रश्न असेल ते येता, तर सुरक्षेच्या दृष्टीने विचार करता. हि जागा सुचवलेली आहे तर त्याच्यावर सहानुभुतिपुर्वक विचार करावा एवढीच विनंती आहे आणि आत्ता घरपट्टी वसुली आपली सुरू झालेली आहे. तिथे दरवर्षी , तिन चार वर्ष झाले, घरपट्टी भरणाऱ्यांची संख्या ही जास्त जेष्ठ नागरीकांची असते. तिथे बसायला जागा नाहीये. उन्हाळ्याचे दिवस असतात पाणी नाहीये. दरवेळेला तिथे पाण्याचे जार मागवावे लागतात. आपण पैसे वसुली करतता आता तुम्ही म्हणता आहेत की पैसे वसुली जास्त व्हायला पाहीजे. पण त्याच्यासोबत सुविधा देणे हे आपल कर्तव्य आहे. तर त्याच्याकडे पण लक्ष द्याव हि विनंती आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी** :- तसेच आपले प्रभाग समिती क्रं. २ चे कार्यालय नानीबाई च्या मागच्या बाजुला घरपट्टी विभाग आपण केला होता पुर्वी असे काही तरी मार्ग काढुन आणि टि.बी हास्पीटलची पण तिच परिस्थिती आहे. तर या संदर्भात पण आपणच निर्णय घेतला पाहीजे. कारण नगरसेवक आहे , सभापती हे पुढे समिती कार्यालयामध्ये होणार आहे. तस मी हे वारंवार पुर्वीपासुन सांगतोय की प्रभाग समितीचे कार्यालये जे आहेत. त्याच्यामध्ये आपण बाकीचे डिपार्टमेंट सुध्दा वर्ग केले पाहीजे. जसे अतिक्रमण, लाईट असेल किंवा आपला पाणी पुरवठा विभाग असेल. तर एकाच छताखाली हे सगळे विभाग जे आहेत. ते जर विभाग सक्षमपणे जर सुरू झाले तर आपल्या सतरा मजली मध्ये येणाऱ्या माणसांची संख्या कमी होवून जाईल आणि तिथे आरोग्य असेल सगळ्या सुविधा जर त्याला एकाच छताखाली सुविधा मिळाल्या प्रभाग समिती , तर हा सुध्दा विषय तातडीने आपण याच्यावर ॲक्शन घेतली पाहीजे आणि हा विषय मार्गी लावला पाहीजे आणि ताईंची सुचना एकदम व्यवस्थित आहे. जर का हे होत असेल तर आपण बसुन किती जागा आहे काय प्लॅनिंग करू शकता आणि त्या अनुषंगाने बांधकाम आणि त्याच्या मागच्या बाजुला जर प्रभाग समिती कार्यालय होत असेल तर चांगली गोष्ट आहे. लोकांना सुविधा होईल. तर या गोष्टींकडे आपण लक्ष दिल पाहीजे.

**ॲड. शुचिता हाडा** :- महापौरताई , मी स्थायी समिती सभापती असतांना हि संकल्पना प्रस्तावित केली होती. पण अजुनही प्रशासनाकडुन याच्यावर काहीच वर्कींग झालेल नाहीये. तर आतातरी ते व्हाव अशी अपेक्षा आहे.

**मा.आयुक्त** :- आपण बजेटमध्ये पण तरतूद केली, जर त्या ऑफीसचे फर्निचर , टेबल खुर्च्या , पिण्याचे पाणी , टॉयलेट इत्यादी ज्या सुविधा असतील त्या पध्दतीने आपण नियोजन सुरू केलेले आहे. जसे साफ्टवेअर देवुन ज्या बेसिक सर्विसेस देतो आपण ते देण्याच आपल नियोजन आहे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- आयुक्त महोदया, याबाबत आवश्यक ते वर्कींग करून तशा पध्दतीने याच प्रभाग समितीच म्हणत नाहीये. जस शुचितातांईनी सांगीतले त्या पध्दतीने तिनही प्रभाग समिती बाबत तो अद्यावत करण्याच्या दृष्टीकोनातुन विचार करावा. हिच फक्त जागा जी आहे. हिचा आपण व्यावसायिक रित्या काहीतरी उपभोग करू शकु. या पध्दतीने आपल्या कालच्या मिटींगमध्ये विषय झाला की महानगरपालिकेच्या ज्या-ज्या काही मिळकती असतील. त्यांचा शोध घेवुन त्या मिळकतींमधुन आपल्याला कशा पध्दतीने उत्पन्न प्राप्त करून घेता येईल. त्या दृष्टीकोनातुन विचार करावा आणि प्रभाग समिती कार्यालये जी आहेत ती अस्तित्वातील जागेंवरच त्याच नियोजन करण्याच्या पध्दतीने हे करावा.

**सौ.उज्वला बेंडाळे** :- भाऊ पण ते तिथे पाण्याच्या टाक्या आहेत. टाईम सांगुन येत नाही, टाईम काही आपल्याला सांगुन येणार नाहीये. आपण गृहीत का धरता आहे तस जर आपल्याला व्यवस्था करायची आहे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- नाही, नाही ताई त्याच्यावर नियोजन करतांना काय की त्याच्यामध्ये जे आपले कार्यालय जे आहेत. ते एका विशिष्ट पध्दतीने बंदिस्त कसे करून घेता येईल.त्या पध्दतीनेच नियोजन करू ना

**सौ.उज्वला बेंडाळे** :- चालेल, पण हे यायला पाहीजे आणि जे प्रभाग समितीचे जे कार्यालय आहे त्याची सुरक्षा वेगळी असायला पाहीजे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- हो बरोबर आहे दोघांचे सबमिशन कस करता येईल ते पाहू.

**सौ.उज्वला बेंडाळे** :- हा विषय गोलगोल फिरून परत इथेच यायला पाहीजे तर अस नको व्हायला पाहीजे आणि सगळे लाईट असेल, आरोग्य असेल आणि घरपट्टी असेल तर तिथे त्यांचे वेगवेगळे विभाग असले पाहीजे. जेणेकरून एका व्यक्तिला तिथे गेल्यावर सर्व कामे त्याला अटेंन्ड करता आले पाहीजे आणि नागरीकांना पण सुविधा झाल्या पाहीजे.

**मा.उपमहापौर** :- सन्मा.नितीनभाऊंनी मांडलेल्या सुचनेला माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर** :- प्रभाग समिती क्रं. ४ मध्ये जे कार्यालय आहे ते सुसज्ज आणि सुस्थितीत ठेवण्याबाबत प्रशासनाने कार्यवाही करावी आणि विषय क्रं. ३२ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी चर्चा करीत होते त्यामुळे सभागृहातील चर्चेचा स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)**

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. १०३८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, प्रभाग समिती क्र.०४ चे कार्यालय सदयस्थितीत गिरणा टाकी परिसरात सुरु आहे. सभागृहात झालेल्या चर्चेनूसार मेहरुण शिवार मधील गट नं.४८३/२ या जागेत प्रभाग समिती क्रं.०४ चे कार्यालय न बांधता सदयास्थितीत असलेल्या ठिकाणीच प्रभाग समिती क्र.०४ चे कार्यालय सुसज्ज व अदयावत करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

तसेच प्रभाग समिती क्र.०१ ते ०३ चे कार्यालय सुध्दा सुसज्ज व अदयावत करणेत यावे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ५५**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं. ३३ :-** मनपा निधी अतर्गत प्रभाग क्र.०४ मधील जुनेगांव भागात आर.सी.सी.गटार बांधणे कामी येणाऱ्या रक्कम रु.३९,९९,९०९/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- सदर प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर** :- माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर** :- विषय क्रं. ३३ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. १०३९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत मनपा निधी अतर्गत प्रभाग क्र.०४ मधील जुनेगांव भागात आर.सी.सी.गटार बांधणे कामास महासभा ठराव क्र.९४४ दि.२१/१०/२०२२ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. त्यानुसार शहर अभियंता,म.न.पा. यांचे दि.२५/११/२०२२ च्या मान्यते अन्वये जाहीर ई-निविदा सुचना क्र.१७८ सन २०२२-२३ https://mahatenders.in वर प्रसिध्द करण्यात आली अशी ई-निविदा सुचना मनपा पत्र क्र.सा.बा./१३८९ दि.२८/११/२०२२ चे पत्रान्वये दै.लोकमत या वर्तमान पत्रात दि.२९/११/२०२२ रोजी प्रसिध्द केल्यानुसार दिलेल्या मुदतीत ०२ ई-निविदा सदर संकेतस्थळावर प्राप्त झालेल्या आहे. त्यानुसार आलेल्या कागदपत्रांची मनपा निविदा समिती यांनी छाननी केली असता त्यात आलेल्या निविदा दरांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| अ.क्रं. | निविदा धारकाचे नांव | निविदा रक्कम रु.३३,३०,३७४/- | अपेक्षीत खर्च |
|---|---|---|---|
| १ | श्री.बालाजी इन्फ्रास्ट्रक्चर | निविदा रक्कमेवर १४.५२०% जास्तीचे दराने | ३८,१३,९४४/- |
| २ | श्री.पंकज गजानन वाघ | निविदा रक्कमेवर १८.३२०% जास्तीचे दराने | ३९,४०,४९९/- |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता मक्तेदार श्री.बालाजी इन्फ्रास्ट्रक्चर यांचे दर इतर मक्तेदारापेक्षा निविदा रक्कमेवर १४.५२० जास्तचे दर आलेले आहे. त्यानुसार त्यांना वाटाघाटी करीता समक्ष बोलाविले असता त्यांनी त्यांचे पत्र सा.बा./आ.क्र./१६८३ दि.१६/०१/२०२३ चे पत्रानुसार अंदाजीत रक्कमेतच काम करण्याची तयारी दर्शविली त्यानुसार सदर कामी रक्कम रु.३३,३०,३७४/- मात्र इतका खर्च निविदा रक्कमेप्रमाणे आहे. परंतु निविदेत नमुद प्रमाणे आलेल्या दरानुसार जि.एस.टी., कामगार विमा, रॉयल्टी यांच्या रक्कमा खालील प्रमाणे समाविष्ठ करावयाच्या आहेत.

| अ.नं. | निविदा प्रमाणे अपेक्षीत खर्च रक्कम | ३३,३०,३७४/- |
|---|---|---|
| १ | कामगार विमा १% | ३३,३०४/- |
| २ | जि.एस.टी. १८% | ५,९९,४६७/- |
| ३ | रॉयल्टी | ३३,५२४/- |
| ४ | टेस्टींग चार्जेस | ३,२४०/- |
| | एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु. :- | ३९,९९,९०९/- |

वर नमुद प्रमाणे निविदेत आलेले दरानुसार व सर्व शासकीय कर समाविष्ठ करुन एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु.३९,९९,९०९/- मात्रला मान्यता प्रदान करण्यात येत आहे. तसेच सदरचा खर्च नविन गटार या लेखाशिर्षका खाली मंजुर झाले असल्याने सन २०२२-२३ या वित्तीय वर्षात खर्च करावयाचा आहे. त्यानुसार मक्तेदार श्री.बालाजी इन्फ्रास्ट्रक्चर यांचे वाटाघाटी अंती निविदा रक्कमेइतकेचेच दर स्विकारणेस व सदर दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ७ कलम ७३ (ड) नुसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ५५**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं. ३४ :-** जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत मनपा निधी अंतर्गत प्रभाग क्रं.०९ पिंप्राळा बाजार रोडला व परिसरात गटार बांधणे कामी मक्तेदार श्री.बालाजी इंन्फ्रास्ट्रक्चर यांचे वाटाघाटी अंती निविदा रक्कमेवर ८.५०% जास्तीचे दर स्विकृत करणेस व याकामी येणारा एकूण खर्च रक्कम रु.३४,१५,९६५/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- ३४ ही मान्य करण्यात यावा.

**श्री.मयुर कापसे** :- ३४ मध्ये मला बोलायचे आहे.

**मा.उपमहापौर** :- माझे अनुमोदन आहे.

**श्री.मयुर कापसे** :- आज या ठिकाणी थोडी खुशी थोडा गम अस या सभेमध्ये मंजुर होत आहे. खुशी या गोष्टीची आहे मॅडम की आज हा विषय मार्गी लागतोय आणि गम या गोष्टीचा की हा पिंप्राळा बाजार रोड जो आहे हा अत्यंत महत्वाचा आहे आणि दर बुधवारी त्या बाजारात हजारो महिला जळगांव शहरातुन त्या येत असतात. इतक्या महत्वाच्या रोडाचा विषय इतक्या लेट मार्गी लागतोय त्या विषयाचा गम या ठिकाणी आहे. त्याबद्दल मी प्रशासनाचे अभिनंदन करतो आणि हा विषय खर तर मागच्या महासभेलाच यायला पाहीजे होता आणि पण काही कारणास्तव येवू शकला नाही. ते आता देर आये दुरूस्त आये. असे आपण म्हणतो मॅडम विनंती फक्त एकच राहील की हा कार्यादेश जो आहे हा आज किंवा उद्यामध्ये तुम्ही ईश्यू करा. कारण की तिथे खुप अडचणींचा विषय आहे. पुर्ण बाजार रोड वर जेव्हा शेतकरी येतात ना.

**श्री.नितीन लढ्ढा** :- तुम्ही मक्तेदाराला काम सुरू करून द्यायला सांगुन द्या.

**मा.उपमहापौर** :- भाऊ याच्यामध्ये

**श्री.मयुर कापसे** :- यामध्ये तुम्हा सगळयांचे आभार मानतो.

**मा.उपमहापौर** :- भाऊ याच्यामध्ये ज्यावेळी पिंप्राळा येथे ग्रामपंचायत होती. तर तेव्हाचा जो ले-आऊट होता. तर आता जागेवर जो रस्ता आहे तो ९ मिटरचाच आहे. तर त्याच्यामध्ये जो वाईडिंग झालेला आहे तो १२ मिटर आहे तर त्याठिकाणी काही प्रायव्हेट प्रॉपर्टी ज्या आहेत त्यांना भुसंपादीत करणे आज रोजी काही शक्य नाहीये. परंतू तेवढ्या कारणासाठी न थांबता या कामाच्या संदर्भामध्ये कार्यादेश देवुन, संबंधित मक्तेदाराला कार्यादेश देवुन काम सुरू करणेबाबत आदेश होण्यात यावे. कारण पुढील सर्व टाऊनप्लॅनिंगच्या संदर्भातील अडचण ही प्रशासनाकडे राखीव राहील कारण तो १२ मिटरचा रोड बाईंडींग झालेला असल्याकारणाने आज रोजी तो अस्तित्वात १२ मिटर आहे. तर या गटार बनवायला अडचण यायला नको जेणेकरून मक्तेदाराला विचारावे की काही अडचण येत  असेल तर तसे आताचा हा ठराव मंजुर करत असतांना सांगावे. म्हणजे हा कार्यादेश दिल्यानंतर उद्या उठुन या कामांना अडचण नको. कारण या कामाची निकड लक्षात घेता. या रस्त्याची निकड लक्षात घेता.

**श्री.नितीन लढ्ढा** :- त्याठिकाणी जो रस्ता बाईंडींग दाखवलेला आहे. त्याचे भुसंपादन केलेले आहे की नाही.

**मा.उपमहापौर** :-  नाही भाऊ त्याचा हा जो ले-आऊट होता शंकरआप्पा नगरचा हा ले-आऊट हा ग्रामपंचायतच्या वेळेचा होता आणि तेव्हा त्याठिकाणी ९ मिटरचा रस्ता होता. आता तो १२ मिटरचा बाईंडींग झ ााल्यामुळे आणि आज जो अस्तित्वात जो आहे. त्याठिकाणी घर बांधले गेलेले आहे. तिथे प्रॉपर्टी आहेत तिथे तर तेथे त्यांच्या संरक्षण भिंती असतील त्या घरांच्या, वॉल कंपाऊड असतील, पोर्च असतील या आज आपण तोडु शकत नाहीये ना        , मग आहे त्याच ठिकाणी आहे त्या स्थितीत करावे लागणार आहे आपल्याला, कारण ती गटार बांधुन झाल्याशिवाय आपण त्या रस्त्याच काम हाती घेवु शकत नाहीये. त्यामुळे प्रशासनाने याबाबतीमध्ये प्रॉपर अभ्यास करून

**श्री.नितीन लढ्ढा** :- मी काय म्हणतोय की भाऊंच म्हणण आहे की.

**मा.उपमहापौर** :- भाऊ प्रॉपर्टीज आहेत ना रस्त्यावर

**(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी चर्चा करीत होते त्यामुळे सभागृहातील चर्चेचा स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)**

**मा.उपमहापौर** :- भाऊ कारण आपण खाजगी प्रॉपर्टीजचे जर भुसंपादन करायचे म्हंटले तर

**श्री.मयुर कापसे** :- भाऊ तिथली जी आजची परिस्थिती आहे ना ती टाऊन प्लॅनिंगवाले सांगु शकतात.

**मा.उपमहापौर** :- नाही पण मग ठिक आहे आज आपल्याला हे आजच्या स्थितीमध्ये तिथे गटार बनवतो आहे. मग तुम्ही आज ज्या नागरीकांना ज्या सुविधा आहेत. त्या कुठुन देणार आहे.

**मा.आयुक्त** :- सर ईस्टिमेट कुणी केले आहे.

**मा.उपमहापौर** :-  भाऊ परंतू काहीही करा या संदर्भातील कार्यवाही करून तात्काळ या संदर्भातील सुचना आपण मक्तेदाराला कराव्यात.

**(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी चर्चा करीत होते त्यामुळे सभागृहातील चर्चेचा स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)**

**मा.उपमहापौर** :- मक्तेदाराला शोधुन आणा. सदर विषयाला माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर** :- विषय क्रं. ३४ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. १०४० पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, मनपा निधी अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्रं.०९ पिंप्राळा बाजार रोडला व परिसरात गटार बांधणे कामास महासभा ठराव क्र.८९७ दि.०७/१०/२०२२ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. त्यानुसार शहर अभियंता,म.न.पा. यांचे दि.१७/१०/२०२२ च्या मान्यतेअन्वये जाहीर ई-निविदा सुचना क्र.१७१ सन २०२२-२३ https://mahatenders.in वर प्रसिध्द करण्यात आली अशी ई-निविदा सुचना मनपा पत्र क्र.सा.बा./११७९ दि.०१/११/२०२२ चे पत्रान्वये दै.सकाळ या वर्तमान पत्रात दि.०२/११/२०२२ रोजी प्रसिध्द केल्यानुसार दिलेल्या मुदतीत ०२ ई-निविदा सदर संकेतस्थळावर प्राप्त

झालेल्या आहे. त्यानुसार आलेल्या कागदपत्रांची मनपा निविदा समिती यांनी छाननी केली असता त्यात आलेल्या निविदा दरांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| अ.क्रं. | निविदा धारकाचे नांव | निविदा रक्कम रु.२७,६३,६४८/- | अपेक्षीत खर्च |
|---|---|---|---|
| १ | श्री.पंकज गजानन वाघ | निविदा रक्कमेवर २०% जास्तीचे दराने | ३३,१६,३७७/- |
| २ | श्री.बालाजी इन्फ्रास्ट्रक्चर | निविदा रक्कमेवर १५% जास्तीचे दराने | ३१,७८,१९५/- |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता मक्तेदार श्री.बालाजी इन्फ्रास्ट्रक्चर यांचे दर इतर मक्तेदारापेक्षा निविदा रक्कमेवर १५% जास्तचे दर सर्वात कमी आलेले आहे. त्यानुसार त्यांना वाटाघाटी करीता समक्ष बोलाविले असता यांनी निविदा रक्कमेवर ८.५०% जास्तीच्या दरात काम करण्यास लेखी संमती दर्शविली आहे. चालु दर सुचीच्या दराशी तुलना केली असता चालुदरसुची पेक्षा ०.२२% ने कमी येत आहे. तरी मक्तेदार यांनी वाटाघाटी अंती निविदा रक्कमेवर ८.५०% जास्तीचे दर स्विकारण्यास अंदाजित रक्कम रु.२७,६३,६४८/- X ८.५०% जादा असे एकुण रक्कम रु.२९,९८,५५८/- मात्र इतका खर्च येणार आहे. निविदेत नमुद प्रमाणे आलेल्या दरानुसार जि.एस.टी., कामगार विमा, टेस्टींग चार्जेस व रॉयल्टी यांच्या रक्कमा खालील प्रमाणे समाविष्ठ कराव्या लागतील.

| | | |
|---|---|---|
| १ | वाटाघाटी अंति निविदा प्रमाणे अपेक्षीत खर्च रक्कम | २९,९८,५५८/- |
| २ | जि.एस.टी १२% | ३,५९,८२७/- |
| ३ | कामगार विमा ०.५०% | १४,९९३/- |
| ४ | टेस्टींग चार्जेस | १०,४१०/- |
| ५ | रॉयल्टी | ३२,१७७/- |
| | एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु. :- | ३४,१५,९६५/- |

वर नमुद प्रमाणे निविदेत आलेले दरानुसार व सर्व शासकीय कर समाविष्ठ करुन एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु. ३४,१५,९६५/- मात्रला मान्यता प्रदान करण्यात येत आहे. तसेच सदर रक्कमेपैकी रक्कम रु. ३४,१५,९६५/- मात्र मनपा लेखाशिर्ष सन २०२२-२३ नविन गटारी या लेखाशिर्ष अंतर्गतच्या निधीतुन खर्च करावयाचा आहे. त्यानुसार मक्तेदार श्री.बालाजी इन्फ्रास्ट्रक्चर यांचे वाटाघाटी अंती निविदा रक्कमेवर ८.५०% जास्तीचे दर स्विकारणेस व सदर दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ७ कलम ७३ (ड) नुसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ५५**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं. ३५ :-** प्रभाग क्र.०५ अंतर्गत डॉ.किरण मुठे ते गटाणी चाळ पर्यंतचा पूर्व-पश्चिम रस्ता डांबरीकरण करणे कामी येणारा एकूण रक्कम रु.२८,१२,३००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.सुनिल महाजन** :- साहेब विषय क्रं. ३५, ३६ आणि ३७ सारखे आहेत.

**श्री.नितीन लढ्ढा** :- सदर प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर** :- विषय क्रं. ३५, ३६ आणि ३७ ला माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर** :- विषय क्रं. ३५, ३६ आणि ३७ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. १०४१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, प्रभाग क्र.०५ अंतर्गत डॉ.किरण मुठे ते गटाणी चाळ पर्यंतचा पूर्व-पश्चिम रस्ता डांबरीकरण करणे कामी मक्तेदार श्री.बालाजी इन्फ्रास्ट्रक्चर यांचे दर कामाचे निविदा

रक्कमेवर १५% जास्तीचे दर सर्वात कमी आलेले आहे. सदरचे दर जास्त वाटत असल्याने शहर अभियंता यांनी मक्तेदार यांना पत्र क्र.जा.क्र./जशमनपा/सा.बा./१७५४ दि.०२/०२/२०२३ रोजी दराबाबत वाटाघाटीसाठी बोलविले असता मक्तेदार यांनी निविदा रक्कमेइतकेचेच दरात काम करण्याचे दि.०३/०२/२०२३ चे लेखी पत्रान्वये लेखी संमती दर्शविली असता अंदाजीत रक्कम रु.२३,३८,४४१/- मात्र इतका खर्च येणार आहे. निविदेत नमुद प्रमाणे आलेल्या दरानुसार जि.एस.टी, कामगार विमा, टेस्टींग चार्जेस व रॉयल्टी यांच्या रक्कमा समाविष्ठ करुन रक्कम रु.२८,१२,३००/- मात्रचा खर्च अपेक्षीत असुन सदरचा खर्च हा सन २०२२-२३ चे लेखाशिर्ष नविन रस्ते या लेखाशिर्षाखाली करण्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ७ कलम ७३ (ड) नुसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल -** ५५
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं. ३६ :-** प्रभाग क्र.०५ अंतर्गत मॉर्डनगर्ल्स हायस्कुल ते श्री.शामभाऊ कोगटा यांचे घरापर्यंत रस्ते डांबरीकरण करणे कामी येणारा एकूण रक्कम रु.३३,२५,९७६/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- सदर प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर** :- माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर** :- विषय क्रं. ३६ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. १०४२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, प्रभाग क्र.०५ अंतर्गत मॉर्डनगर्ल्स हायस्कुल ते श्री.शामभाऊ कोगटा यांचे घरापर्यंत रस्ते डांबरीकरण करणेकामी मक्तेदार श्री.बालाजी इन्फ्रास्ट्रक्चर यांचे दर कामाचे निविदा रक्कमेवर १५% जास्तीचे दर सर्वात कमी आलेले आहे. सदरचे दर जास्त वाटत असल्याने शहर अभियंता यांनी मक्तेदार यांना पत्र क्र.जा.क्र./जशमनपा/सा.बा./१७५६ दि.०२/०२/२०२३ रोजी दराबाबत वाटाघाटीसाठी बोलविले असता मक्तेदार यांनी निविदा रक्कमेइतकेचेच दरात काम करण्याचे दि.०३/०२/२०२३ चे लेखी पत्रान्वये लेखी संमती दर्शविली असता अंदाजीत रक्कम रु.२७,७६,३८८/- मात्र इतका खर्च येणार आहे. निविदेत नमुद प्रमाणे आलेल्या दरानुसार जि.एस.टी, कामगार विमा, टेस्टींग चार्जेस व रॉयल्टी यांच्या रक्कमा समाविष्ठ करुन रक्कम रु.३३,२५,९७६/- मात्रचा खर्च अपेक्षीत असुन सदरचा खर्च हा सन २०२२-२३ चे लेखाशिर्ष नविन रस्ते या लेखाशिर्षाखाली करण्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ७ कलम ७३ (ड) नुसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल -** ५५
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं. ३७ :-** प्रभाग क्र.०५ अंतर्गत पारीकपार्क उदयान सभोवतालचे रस्ते डांबरीकरण करणे कामी येणारा एकूण रक्कम रु.३९,८९,९६१/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- सदर प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर** :- माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर** :- विषय क्रं. ३७ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. १०४३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, प्रभाग क्र.०५ अंतर्गत पारीकपार्क उदयान सभोवतालचे रस्ते डांबरीकरण करणे कामी मक्तेदार श्री.बालाजी इन्फ्रास्ट्रक्चर यांचे दर कामाचे निविदा रक्कमेवर १५% जास्तीचे दर सर्वात कमी आलेले आहे. सदरचे दर जास्त वाटत असल्याने शहर अभियंता यांनी मक्तेदार यांना पत्र क्र.जा.क्र./जशमनपा/सा.बा./१७५५ दि.०२/०२/२०२३ रोजी दराबाबत वाटाघाटीसाठी बोलविले असता मक्तेदार यांनी निविदा रक्कमेइतकेचेच दरात काम करण्याचे दि.०३/०२/२०२३ चे लेखी पत्रान्वये लेखी संमती दर्शविली असता अंदाजीत रक्कम रु.३३,५०,७१०/- मात्र इतका खर्च येणार आहे. निविदेत नमुद प्रमाणे आलेल्या दरानुसार जि.एस.टी, कामगार विमा, टेस्टींग चार्जेस व रॉयल्टी यांच्या रक्कमा समाविष्ठ करुन रक्कम रु.३९,८९,९६१/- मात्रचा खर्च अपेक्षीत असुन सदरचा खर्च हा सन २०२२-२३ चे लेखाशिर्ष नविन रस्ते या लेखाशिर्षाखाली करण्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ७ कलम ७३ (ड) नुसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ५५**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं. ३८ :-** महानगरपालिका विविध विभागात कार्यरत वाहनांसाठी किरकोळ दरात इंधन (डिझेल) १२००० लिटर खरेदी करणे कामी येणाऱ्या रक्कम रु.११,२९,३२०/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- मंजुर करण्यात यावा.

**मा.उपमहापौर** :- भाऊ हे दर महासभेचा विषय त्याचा प्रकार काय आहे. तेच समजत नाहीये कुठे जात आहे डिझेल काय आहे. आपल्या गाड्या किती आहे, फिरता किती आहे, लागत किती आहे , काय आहे ते तुम्ही मागच्या महासभेत पण काय आहे की हे असे जे विषय असता ना , मुद्दाम हे सर्वांत शेवटी टाकले जातात की, जो पर्यंत कोणी सदस्य राहात नाही, पदाधिकारी राहात नाही आणि सगळे कंटाळलेले राहातात आणि कोणी चर्चा करणार नाही म्हणजे काय पध्दत चालली आहे. हेच समजत नाही मला की दर सभा झाली की १२ हजार लिटर डिझेल, १२ हजार लिटर डिझेल घेतो. पण आपल्याकडे गाड्या आहे तरी किती ?

**श्री.सोनगीरे, शहर अभियंता :-** जी वाहने आहे आपल्याकडे, सर्व सिटी मधले ६२ वाहने आहे.

**मा.उपमहापौर :-** महापौर वापरत नाही, उपमहापौर वापरत नाही. विरोधीपक्ष नेते वापरत नाही. त्या वाहनांचा उपयोग होतो कुठे,

**श्री.सोनगीरे, शहर अभियंता :-** ही जी संख्या माझ्याकडे आहे. ती मी तुम्हाला वाचुन दाखवतो, आरोग्यविभागाकडे ११ वाहने आहे टोटल,

**मा.उपमहापौर :-** सगळे डिटेल सांगा साहेब, म.न.पा.चे जे.सी.बी., ट्रॅक्टर काय कोणते कोणते आहे.

**श्री.सोनगीरे, शहर अभियंता :-** डिझलच्या बाबतीत सांगेल, आपल्या महानगरपालिकेचा जो डिझल पंप होता, तेथे पुर्वी आपण मनमाड वरुन डिझल आणुन आपण त्याचा वापर करत होतो. ती जी जागा होती, एम.आय.डी.सी. फायर स्टेशनची जागा होती, ते मागे लागले होते जागा हॅण्डओवर करणेच्या संदर्भात त्या दरम्यान मग आपण प्रायव्हेट याच्या कडुन डिझल घेण्याचा प्रस्ताव तयार केला.तो आपल्याला त्यापेक्षा ही कमी दरात डिझल आज पडत आहे. सुरुवातीला जेव्हा मी प्रस्ताव दिला माझ्या हातुन तेव्हा ४ लाख रुपये आपले सेव्हींग होत होते. ४ लाख ते हळुहळु कमी होऊन ४०-५० हजाराचा डिफरंस राहिलेला आहे. म्हणजे ज्यावेळेला आपण मनमाड वरुन डिझेल मागवत होतो. तर ते आपल्याला ॲज कस्टमर म्हणुन देत नव्हते आणि डिलर म्हणुन कस्टमर असे देत होते.

**मा.उपमहापौर :-** डिझेल घेण्यासंदर्भात नाही म्हणत आहे मी , वापर कश्या पध्दतीने होतो ते विचारतो आहे मी

**श्री.सोनगीरे, शहर अभियंता :-** भाऊ आपले महापालिकेचे सगळेच वाहन त्या पंपावरून डिझेल घेतात.

**मा.उपमहापौर :-** याच काही रेकॉर्ड आहे का, किंवा हे वाहन कुठे फिरले याचे

**श्री.सोनगीरे, शहर अभियंता :-** मग भाऊ आहे ना

**श्री.दिलीप पोकळे :-** सोनगिरेसाहेब आता समजा आपण मागच्या महिन्यामध्ये आपण १० हजार लिटर डिझेल घेतलेले आहे.

**श्री.सोनगीरे, शहर अभियंता :-** १२ हजार लिटर घेतले आहे.

**श्री.दिलीप पोकळे :-** त्यावेळेस आपल्या गाडीचे रिडींग काय होते. किती फिरले वाहन आणि कोणते कोणते वाहन फिरले या महिनाभरामध्ये याची माहिती द्यावी.

**(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी चर्चा करीत होते त्यामुळे सभागृहातील चर्चेचा स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)**

**मा.उपमहापौर :-** आपल्या वाहनांना काही मिटर चालु नाहीयेत.

**श्री.सोनगीरे, शहर अभियंता :-** आता आपली जी वाहने आहेत. म्हणजे ज्यांना दिलेली आहेत तर त्यांनी त्याच्यावर कंट्रोल करायला पाहीजे. आता डिझेल किती टाकले आता समजा माझ्याकडे जे वाहन आहे आणि त्या वाहनात किती डिझेल टाकले याची मला काही आयडीया नाहीये कि त्याने किती टाकले आणि ते किती फिरले तर त्याचा अंदाज लावता येत नाही आणि मी त्याचा अंदाज लावतो आणि त्या हिशोबाने डिझेल मागवतो. आता समजा जेसीबी मशिन आहे आपले आणि त्याचे ज्याच्या अधिपत्याखाली काम चालत आणि त्याचे ते तासावर चालते आणि ते कंन्टिन्यु चालते आणि आपण ते काम किती चालते त्या हिशोबानेच त्याच काम होत. त्याच लॉगबुक मेंटेन होते आणि त्याच्या अधिकाऱ्याची सही त्याच्यावर असते. याच्यामध्ये आपण हे प्रायव्हेट याच्याकडून घेतोय. आपण मनमाड वरून मागवत नाहीये. बाहेर ड्रायव्हर लोक जर काही करत असतील तर त्याच्याबद्दल मला काही माहिती नाहीये.

**मा.उपमहापौर :-** हिच शंका आहे. जो विषय मी आता उपस्थित केला आहे की मागे जो झालेला प्रकार आहे. त्यावेळेस सदस्यांनी पुर्ण ट्रक्टरमधुन डिझेल काढुन विकतात तर असे काही प्रकार तर होत नाही ना म्हणुन हा विषय काय आहे की १२ हजार लिटर महिन्याला डिझेल जात कुठे, तर तसे प्रकार होणार नाही याची दक्षता घ्या आणि म्हणजे तुम्ही जे सांगत आहात की बाहेर जे होत असेल तर प्रशासन म्हणुन आपली जबाबदारी आहे ना.

**श्री.सोनगीरे, शहर अभियंता :-** हो ना आणि ज्याच्या अधिनस्त ते जे वाहन आहे त्यांची जबाबदारी आहे.

**मा.उपमहापौर :-** तशी फक्त खबरदारी घ्या की त्याचे असे प्रकार पुन्हा व्हायला नको.

**श्री.सोनगीरे, शहर अभियंता :-** ठिक आहे भाऊ

**मा.महापौर** :- विषय क्रं. ३८ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. १०४४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, मनपा वाहनांसाठी डिझेल पुरवठा (साठा) करणे बाबत पंप ऑपरेटर यांनी मागणी दिलेली असून दि.०७/०२/२०२३ रोजीचे अखेर डिझेल साठा शिल्लक ३८३० लिटर असुन सदर साठा ०३ ते ०४ दिवसांसाठी पुरेल इतका शिल्लक आहे.

जळगांव शहर महानगरपालिकेकडील कार्यरत असलेली विविध वाहनांसाठी मा.महासभा ठराव क्र.७४३ दि.१४/०२/२०२२ अन्वये इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि.आय.ओ.सी.पानेवाडी डेपो मनमाड यांचेमार्फत (ठोक/बल्क) स्वरुपात डिझेल खरेदी केली जाते. दि.०८/०२/२०२३ रोजी डिझेल (ठोक/बल्क) खरेदी आणि किरकोळ डिझेल खरेदी यांच्या दराचा (रेट) तफावत दर्शविणारा तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि.आय.ओ.सी.पानेवाडी डेपो मनमाड (ठोक/बल्क) डिझेल खरेदी दर | सर्वोदय सर्व्हिस स्टेशन जळगांव (किरकोळ) डिझेल खरेदी दर |
|---|---|---|
| १ | प्रती लिटर दर रु.१०६.७३६२०/- | प्रती लिटर दर रु.९४.११/- |
| २ | १२००० लिटरसाठी खर्च रक्कम रु.१२,८०,८३४.४५/- | १२००० लिटरसाठी खर्च रक्कम रु.११,२९,३२०/- |
| ३ | १२००० लिटर प्रमाणे तफावत रक्कम रु.१,५१,५१४.४५/- | १२००० लिटर प्रमाणे तफावत रक्कम निरंक |

नमुद तक्ता पाहता इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि.आय.ओ.सी.लि.पानेवाडी डेपो मनमाड यांचेमार्फत (ठोक/बल्क) डिझेल खरेदी एकत्रीत करतांना रक्कम रु.१,५१,५१४.४५/- मात्र अधिक खर्च १२००० लिटर डिझेल खरेदी करतांना होणार आहे. वाढीव खर्च टाळण्यासाठी एस.टी. महामंडळाने त्यांची वाहने खाजगी अधिकृत विक्रेत्या पंपावरुन डिझेल खरेदी करणे सुरु केलेले आहे. महानगरपालिकेला देखील आपल्या वाहनांसाठी डिझेलच्या वाढीव भावाला टाळण्याच्या दृष्टीने व आर्थिक बचत करण्याच्या दृष्टीने स्थानिक खाजगी मात्र अधिकृत विक्रेत्यांकडून डिझेल खरेदी करता येईल. त्यामुळे १२००० लिटरच्या मागे

सध्याच्या प्रचलीत दरानुसार रक्कम रु.१,५१,५१४.४५/- मात्र महानगरपालिकेची आर्थिक बचत होईल. तसेच वेळोवेळी डिझेलचे किरकोळ दर चढ-उतार (परिवर्तन) होण्याची शक्यता नाकारता येत नाही. ज्यावेळी डिझेल (ठोक/बल्क) खरेदीचे दर किरकोळ दरापेक्षा न्युनतम होतील त्यावेळी पुन्हा इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि.आय.ओ.सी.पानेवाडी डेपो मनमाड यांचे मार्फत (ठोक/बल्क) डिझेल खरेदी करता येईल.

महानगरपालिकेने यापुर्वी स्थायी समिती ठराव क्रं.११२२ दि.०८/०२/२०१३, स्थायी समिती ठराव क्रं.११८२ दि.२६/०४/२०१३, स्थायी समिती ठराव क्रं.९१ दि.१९/०७/२०१४ अन्वये पारीत ठरावाच्या अनुषंगाने इंडीयन ऑईल कॉर्पोरेशनचे अधिकृत विक्रेते सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांच्याकडून महानगरपालिकेस आवश्यक असलेले इंधन (डिझेल) स्थायी समितीच्या पारीत ठरावानुसार निविदा न मागविता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ संविदा कलम (२) (२) नुसार किरकोळ डिझेल खरेदी केलेली आहे.

किरकोळ डिझेल खरेदी दर (बाजारभाव) व बल्क दर यामध्ये जोपर्यंत तफावत राहील तोपर्यंत बाजारभावातुन किरकोळ इंधन खरेदी करणे महानगरपालिकेस फायदेशीर राहील.

| प्राप्त झालेल्या इंधन (डिझेल) दराचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | कामाचे नांव | Quantity | मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन, (आय.ओ.सी.डिलर) जळगांव |
| १ | महानगरपालिका कार्यरत विविध वाहनांसाठी किरकोळ दरात इंधन (डिझेल) खरेदी करणे बाबत. | १२००० लि. | प्रति लिटर दर रु.९४.११/- |
| | | | ११,२९,३२०/- |
| | | एकूण रक्कम रुपये - | ११,२९,३२०/- |

महासभा ठराव क्रं.८८६ दि.०८/०८/२०२२ अन्वये १२००० लिटर्स डिझेल, महासभा ठराव क्र.८८७ दि.०८/०८/२०२२ अन्वये १२००० लिटर्स डिझेल मा.महासभा ठराव क्रं.९२७ दि.०७/१०/२०२२ अन्वये १२००० लिटर्स डिझेल, मा.महासभा ठराव क्रं.९४१ दि.२१/१०/२०२२, मा.महासभा ठराव क्रं.९७७ दि.२३/१२/२०२२ अन्वये १२००० लिटर्स डिझेल मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांचेकडून किरकोळ दरात डिझेल खरेदी करणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ संविदा कलम (२) (२) नुसार किरकोळ डिझेल खरेदी करण्यास मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांना देण्यात आलेल्या पुरवठा आदेशानुसार त्यांनी महानगरपालिकेच्या विविध विभागाकडील वाहन चालक व विभागप्रमुखांच्या मागणी नुसार दि.०७/०२/२०२३ ते आजपावेतो किरकोळ स्वरुपात इंधन (डिझेल) चा पुरवठा केलेला आहे. त्यानुसार मनपा वाहनांसाठी डिझेल पुरवठा करण्याकामी मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव हा पंप एम.आय.डी.सी.रोडवर असल्याने सदर पंपावरुन डिझेल घेणे सोयीचे होईल.

तरी इंधन (डिझेल) खरेदी करणे कामी जाहिर निविदा मागविली असता मुदतीत ०३ निविदा प्राप्त झालेल्या आहेत. त्याचा तपशिल खालील प्रमाणे-

| अ.क्र. | निविदाधारकांचे नांव |
|---|---|
| १ | मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव |
| २ | मे.अमल ऑटो जळगांव |
| ३ | मे.अब्दुल पेट्रोलियम सर्वो,चिंचोली,जळगांव |

वर नमुद तीन्ही निविदाधारकांचे लिफाफा क्रं.१ (दस्ताऐवज) उघडण्यात आले असुन ०३ निविदाकारांपैकी अनुक्रमांक १,२ यांनी पुर्ण दस्ताऐवज सादर केलेले असल्यामुळे अ.क्र.१ व २ हे निविदाधारक पात्र आहे. परंतु अनुक्रमांक ३ निविदाधारकाचे दस्ताऐवज अपुर्ण असल्यामुळे अ.क्र.३ हे निविदाधारक अपात्र आहेत. त्यामुळे सबब इंधन (डिझेल) खरेदी कामी निविदा प्रक्रीया अंतिम होईपावेतो तात्पुरत्या स्वरुपात व तातडीने आवश्यक असलेले इंधन (डिझेल) किरकोळ स्वरुपात खरेदी करण्याकामी

मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांच्याकडील इन्व्हाइस नं.२०२२-२३/१८ दि.०७/०२/२०२३ अन्वये १२००० लिटर डिझेल खरेदी कामी रक्कम रु.११,२९,३२०/- मात्र खर्च अपेक्षित आहे. सदर खर्चास तसेच इंडियन ऑईल कॉर्पोरेशनचे अधिकृत विक्रेते मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांचेकडून निविदा न मागविता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ संविदा कलम (२) (२) नुसार किरकोळ डिझेल खरेदी करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल -** ५५

**सूचक** :- **लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक** :- **पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं. ३९ :-** सन २०२३-२४ करीता दैनिक बाजार शुल्क, आठवडे बाजार व कोंबडी बाजार शुल्क संकलनासाठी एक वर्षाकरीता देकार रक्कम निश्चित करणे व सदर निविदा प्रक्रिया पुर्ण होईपावेतो विद्यमान मक्तेदारास मुदतवाढ देणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- याच्यामध्ये काहीतरी १ कोटी ८० लक्ष रूपयांमध्ये द्यायचे आहे. तर आणि पुढील निविदा प्रक्रीया होईपावेतो जुन्या मक्तेदाराला मुदतवाढ देण्यात येत आहे.

**श्री.सचिन पाटील :-** भाऊ मला बोलायचे आहे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- आणि मला वाटत याच्यासंदर्भात आपण यापुर्वी हा देकार जो आहे ना पुर्वी तिन-तिन वर्षाचा करायचो. त्यानंतर दोन दोन वर्षाचा करायचो आणि आता जे एक-एक वर्षाचा करतो आहे ना तर तो दोन दोन वर्षाचा करावा कारण हा प्रत्येक वेळेला अशा पध्दतीने मुदतवाढीचा विषय येतो.

**श्री.नवनाथ दारकुंडे:-** भाऊ याच्यामध्ये त्यांनी ज्या अटी शर्ती टाकलेल्या आहेत. म्हणजे अनुभव दाखला म्हणजे मी काय प्लास्तर मारायचे का , म्हणजे जिएसटीचे काही होते मागच्या याच्यामध्ये त्या अटी शर्ती टाकुन घेतल्या आहेत का? का बरं कुणाला चानस नाही भेटणार का तिथे टेंडर भरायला.

**(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी चर्चा करीत होते त्यामुळे सभागृहातील चर्चेचा स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)**

**मा.उपमहापौर :-** नाही हे प्रशासनाने उत्तर द्यायचे आहे. असे विषय करतांना काही असे नॉर्मस, कंडीशन टाकतात की काहीच करता येत नाही. म्हणजे आता जो सन्मा.सदस्यांनी प्रश्न उपस्थित केला की अनुभवाचा दाखला असण अनिवार्य आहे. तर हे थोडस धरून आहे पण

**(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी चर्चा करीत होते त्यामुळे सभागृहातील चर्चेचा स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)**

**श्री.सचिन पाटील :-** महापौरमहोदया , माझ सरळ असे म्हणण आहे की हा ठेका ३१/०३ ला संपतोय. मग प्रशासनाने आत्ता या विस तारखेला, एकविस तारखेला हा विषय आणावा की तिन महिन्यांची मुदतवाढ देण्यात यावी. प्रशासन झोपल आहे का हे , १५ दिवसांपुर्वी आपली महासभा झालेली आहे. मग हा प्रस्ताव तेव्हा का नाही आला. म्हणजे आता याच्यानंतर तिन महिन्यानंतर आमचा कार्यकाळ संपुन जाईल. मग म्हणजे तुम्ही मोकळे प्रशासनापासुन, १ कोटी ६४ लक्षचा विषय आहे तर हे अशा बारीकसारीक अटी-शर्ती काहीही टाकुन देता म्हणजे हे काही बांधकाम करायचे आहे का? जे आहे की याच्यामागचा एकदम स्वार्थ दिसतोय की हा ठेका यालाच मिळाला पाहीजे आणि यालाच दिला पाहीजे अस चुकीच होता कामा नये आणि या अशा प्रकारे ३१/०३ ला जर ठेका संपतोय तर प्रशासनाने दिड महिन्यापुर्वी त्याची निविदा काढायला पाहीजे आणि आता ती निविदा मंजुर होवुन आपल्या समोर यायला पाहीजे होती की याला ठेका द्यायचा आहे असे. दोन कोटी, अडीच कोटी अशी अजुन वाढीव रक्कम मिळेल ना त्यातुन मनपा फंडातुन काम करता येतील आपल्याला आपल्या प्रभागामध्ये काहीतरी, रस्ते, गटारी किंवा काहीतरी नितीनभाऊ माझ तरी मत आहे की हा विषय रद्द करावा. जास्तीत जास्त १५ दिवस मुदत द्यावी संबंधिताला अजुन १० दिवस बाकी आहे टेंडर संपायला.

**श्री.सुनिल महाजन, विरोधी पक्षनेता:-** अहो भाऊ निविदा प्रक्रीया आहे ती लगेच होणार नाही.

**श्री.सचिन पाटील :-** निविदा प्रक्रीया शॉर्टमध्ये करतील ना भाऊ ते , जास्त ने ओपन झाली तर पैसा जास्त भेटेल महापालिकेला

**(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी चर्चा करीत होते त्यामुळे सभागृहातील चर्चेचा स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)**

**श्री.विशाल त्रिपाठी :-** यात कस आहे भाऊ की वेळ जाईल.

**श्री.सचिन पाटील :-** मग तिन महिन्यांची द्यायची का? यात दिले आहे ना त्यांनी तिन महिने

**श्री.नितीन लढ्ढा** :- सचिनभाऊ मी काय म्हणतोय की निविदा प्रक्रीया पुर्ण होई पावेतो मुदत द्यायची.

**श्री.सचिन पाटील :-** निविदा प्रक्रीयेकरीता भाऊ १५ दिवस किंवा पुढचे ७ दिवस २१ होता तरी १ महिना पकडुन घेवु आपण निविदा प्रक्रीयेला

**ॲड.शुचिता हाडा :-** आपण वेळोवेळी असेच गृहीत धरतो आणि असेच प्रस्ताव येतात मुदतवाढीला आता याची जबाबदारी प्रशासनावर फिक्स करा.

**श्री.सचिन पाटील :-** या सर्व याला महापालिका जबाबदार आहे.

**ॲड.शुचिता हाडा :-** मुदत संपण्यात येते तेव्हाच का असे प्रस्ताव येतात.

**श्री.सचिन पाटील :-** ज्या अटी-शर्ती टाकलेल्या आहेत तर ते काही का बांधकाम आहे का ते की अनुभव पाहीजे.

**ॲड.शुचिता हाडा :-** जबाबदारी फिक्स करा. जर प्रशासनाकडुन असे वेळेवर प्रस्ताव येतात याला जबाबदार कोण आहे. याला जबाबदार प्रशासन आहे. प्रशासनामधील जे कोणी अधिकारी, कर्मचारी आहेत याच्यामध्ये जबाबदार त्यांच्यावर आज या सभेत लायबिलीटी फिक्स झाली पाहीजे की

**श्री.सचिन पाटील :-** हो

**ॲड.शुचिता हाडा :-** त्याच्याशिवाय हे असे प्रस्ताव येणे थांबणार नाही.

**श्री.सचिन पाटील :-** हो बरोबर आहे ताई

**(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी चर्चा करीत होते त्यामुळे सभागृहातील चर्चेचा स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)**

**ॲड.शुचिता हाडा :-** का द्यायची मुदतवाढ, का द्यायची मुदतवाढ कोणाची जबाबदारी होती ही, लोकप्रतिनिधींनी घेवुन फिरायचे का प्रत्येक वेळेला की कोणत्या टेंडरची केव्हा मुदत संपतेय. काढा काढा की याचा ठेका काढा हे आम्ही फिरायच का घेवुन हि प्रशासनाची जबाबदारी आहे. आजच्या आज याच्यामध्ये कोण जबाबदार आहे त्याच्यावर कारवाई करा आणि त्याची काय पनिशमेंट आहे ते सभागृहाला सांगा.

**श्री.सचिन पाटील :-** ताई बरोबर आहे, आयुक्त महोदयांनी सविस्तर बोलाव आणि जबाबदारी फिक्स करावी.

**ॲड.शुचिता हाडा :-** आम्ही याची वाट बघणार नाही, का बघायची आम्ही वाट

**श्री.सचिन पाटील :-** आयुक्त महोदयांनी सविस्तर बोलाव आणि जबाबदारी फिक्स करावी आज कोणत्याही परिस्थितीत

**ॲड.शुचिता हाडा :-** प्रत्येक ठेक्यामध्ये होत आहे अस प्रत्येक याच्यामध्ये असे आहे की मार्च ऐंडला याची मुदत संपते आहे किंवा जी काही जेव्हा त्याची मुदत संपते आहे. चार महिन्याआधी तुम्हाला जाग येत नाही का प्रशासनाला, काय करत असत प्रशासन

**मा.उपमहापौर :-** सुरक्षा रक्षकांचा विषय पण सेमच आहे.

**ॲड.शुचिता हाडा :-** मग

**मा.उपमहापौर :-** त्यालाही मुदतवाढ वर मुदतवाढ देत राहतो आपण

**ॲड.शुचिता हाडा :-** आज समजा आपण याला मुदतवाढ देतो. आपण जसे सर्व लोकप्रतिनिधी वागतात की ठिक आहे आता मुदत संपते आहे. महत्वाचा विषय आहे प्रशासन मुदतवाढ मागतय. मला सगळयात पहिले दोन प्रश्नांची उत्तर द्या. नविन निविदा प्रक्रीया राबवायला आपल्याला किती कालावधी लागणार त्याची डेडलाईन सांगा. मुदतवाढ मागताहेत हि चुक आहे प्रशासनाची कोण-कोण जबाबदार आहेत त्यांच्यावर काय लायबिलीटी फिक्स करता. त्याचा येथे खुलासा करावा. मुदतवाढ द्यायची नाही.

**मा.उपमहापौर :-** त्यावेळी संविदेने घेतले.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** भाऊ याच्यामध्ये मागच्या ज्या आहेत जशाच्या तशाच

**मा.आयुक्त :-** टेंडरची माहिती द्या काय आहे काय नाही ती

**मा.उपमहापौर :-** जे जबाबदार आहेत त्यांच्यावर कार्यवाही झाली पाहीजे कारण त्याची ४ थी मुदतवाढ झाली आहे ही मागेपण सुरक्षा रक्षकांच्या याच्यामध्ये सुध्दा हाच प्रकार झाला आहे. नाही भाऊ महिनाभरापुर्वी पुर्व तयारी केली पाहीजे ना

**(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी चर्चा करीत होते त्यामुळे सभागृहातील चर्चेचा स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)**

**श्री.चंद्रकांत वानखेडे, उपायुक्त तथा मुलेअ :-** सन्मा.सदस्यांनी आता येथे जो मुद्दा उपस्थित केला आहे. तर निविदेच्या बाबतीमध्ये शासनाने १९७८ पासुन निविदा प्रक्रीया राबविण्यासाठी जे काही नॉर्म दिलेले आहेत. त्यामध्ये १९९६ चा शासनाचा जो जिआर होता त्यानंतर २०१५ आणि त्याच्यानंतर आता डिसेंबर २०१६ पासुन ज्या काही निविदा प्रक्रीयेसंबंधी गाईडलाईन दिलेल्या आहेत. प्रत्येक ठिकाणी अनुभव दाखला असला पाहीजे अस बंधनकारक नाहीये. ज्या निविदेच्या अटी असतात त्या अटी त्या अनिवार्य आणि ऐच्छिक तर अनुभव दाखला हा ऐच्छिकमध्ये येतो. याच्यामध्ये आपण जनरली आपण अस करतो की, समजा एखादे काम असेल तर आपण त्याच्यामध्ये म्हणतो की अनुभव दाखला हा असला पाहीजे की याने कुठेतरी काम केलेले आहे का आणि त्याला या कामाचा अनुभव असल्यामुळे हा आपल्याला चांगल्या पध्दतीने सेवा देईल. आता आपण हा मक्ता देतो आहे. पण माझ एखाद्या मक्त्यात किंवा संविदेत एखाद्या एजन्सीने जरी अनुभव दाखला दिलेला नसेल तरी निविदा समिती त्याच्यामध्ये निर्णय घेवू शकते की याला हि अट वगळायची की ठेवायची असे आहे. कारण ती सक्तीमध्ये ओढली जात नाही. पण त्याच्यामध्ये अस वाटत आहे की सगळे डॉक्युमेंट ओके आहेत तर कोणाला तरी संधी दिल्याशिवाय त्याला अनुभव प्राप्त होणार नाही. त्याच्यामुळे आपण जर म्हंटले की त्याला संधीच द्यायची नाही तर त्याला अनुभव येणारच नाही. म्हणुन याच्यामध्ये जरी कमेटी निर्णय घेत असेल आणि एखाद्याने अनुभव दाखला दिलेला नसेल तरी ती एजन्सी निविदा घेवु शकते आणि बाकीचे सगळे डॉक्युमेंट ओके आहे अनिवार्य असलेले तर समिती निर्णय घेवुन पुढे जावु शकते.त्याच्यामुळे अनुभव दाखला असलाच पाहीजे अस काही बंधनकारक नाहीये आणि आता इतर सन्मा.सदस्यांनी एक मुद्दा उपस्थित केला की याच्यामध्ये जेव्हा एखादे टेंडर संपत. सेवेच्या बाबतीमध्ये किंवा इतर काही पुरवायच्या बाबतीमध्ये जस आता एखादे काम करायचे असेल तर जनरली अंमलबजावणी ही संबंधित डिपार्टमेंटची आहे. टेंडर काढण्याची , टेंडर संपण्यापुर्वी तिन महिने पुर्व की आम्हाला हे पाहीजे आहे. म्हणजे टेंडर प्रोसेस , मला माहिती आहे समजा आता १ वर्षासाठी दिले आहे. त्याच्यामध्ये हे तपासले जाईल की पहीली मुदतवाढ दिली आहे का त्याला किंवा नव्याने जरी फ्रेश टेंडर काढायचा प्रसंग आला तरी पुरेसा वेळ हा मिळाला पाहीजे. परंतू टेंडर संपत आहे आठ-पंधरा दिवसाने आणि प्रक्रीया सुरू करणे हे नियमाला धरून नाही. तरी प्रशासनाने प्रत्येक डिपार्टमेंटली अंमलबजावणी करण्यासाठी डिपार्टमेंटने तिन महिने अगोदर कामाला लागले पाहीजे आणि आपण टाईमात जरी करू शकलो नाही. जस आपण आता याच्यामध्ये अट दिली आहे की मुदतवाढ देण्यात येत आहे किंवा नविन निविदा होत नाही तोपर्यंत म्हणजे हा पिरियेड जो निविदा प्रक्रीयेचा असेल  तर तो जो पिरियेड असेल तोपर्यंतच म्हणजे जोपर्यंत याच्यावर कार्यवाही होत नाही तोपर्यंतच राहील दिड महिन्याच्या आत राहील आणि आता आपण जे एक कोटीच्यावर सांगीतले की अबाऊ असेल तर शासनाने नविन निविदा काढण्याचा कालावधी दिलेला आहे बांधकामचा आणि जर आपण बांधकामचा जिआर जर येथे लावला तर आपण त्या जिआरच पालन करायचे आहे.

**श्री.सचिन पाटील :-** हो आमच म्हणण तेच आहे साहेब की तिन महिन्यापुर्वी जर हा विषय आला असता तर तर गोष्ट वेगळी आहे आता आम्हाला तुम्ही हे सांगा की याच्यामध्ये दोषी कोण आहे. दोषी अधिकारी कोण आहे. ताईंचे म्हणणे पण तेच होत. त्याच्यावर जबाबदारी निश्चित करा.

**ॲड.शुचिता हाडा :-** सचिनभाऊ सांगीतले मी, आता साहेब म्हणाले की अंमलबजावणी करणारे डिपार्टमेंट जबाबदार अहे. तर आता प्रशासनाकडुन आयुक्त म्हणुन आता माझा हा प्रश्न आहे.

**श्री.चंद्रकांत वानखेडे, उपायुक्त तथा मुलेअ :-** निश्चित हे आहे की याचे काम करणारे

**श्री.सचिन पाटील :-** तुम्ही हे सांगा ना की टेंडर का राबवत नाहीये याला कोण जबाबदार आहे. हे पुर्ण जळगांवला तर माहिती होवू द्या.

**श्री.चंद्रकांत वानखेडे, उपायुक्त तथा मुलेअ :-** याच्याबद्दल संबंधित डिपार्टमेंटला विचारावे लागेल.

**श्री.सचिन पाटील :-** कोण आहे अंमलबजावणी करणारे डिपार्टमेंट हे आम्हाला पण माहिती होवू द्या. नगरसेवकांना माहीत नाहीये की हा अधिकारी आहे का तो कर्मचारी आहे. मग माहिती व्हायला पाहीजे यावर सविस्तर माहिती द्यावी तुम्ही आज

**श्री.चंद्रकांत वानखेडे, उपायुक्त तथा मुलेअ :-** प्रशासकीय विषय आहे

**मा.उपमहापौर :-** साहेब आता तुम्ही म्हंटलेले आहे की ऐच्छिक आहे. ऐच्छिक आहे का असे त्यात म्हंटलेले आहे का?

**श्री.चंद्रकांत वानखेडे, उपायुक्त तथा मुलेअ :-** तसे म्हणाव लागत नाही हे अधिकार कमेटीला असतात. तर प्रत्येक गोष्ट ही कमेटीला ज्ञात आहे आणि हे त्यांना माहित आहे.

**मा.उपमहापौर :-** नाही पण तुम्ही कस काय म्हणता आहे की ऐच्छिक आहे म्हणुन त्याच्यामध्ये टाकायची आवश्यकता काय आहे मग

**श्री.चंद्रकांत वानखेडे, उपायुक्त तथा मुलेअ :-** निविदा धारकाला माहित करून घेण हाच त्याला पर्याय आहे.

**मा.उपमहापौर :-** नाही मग प्रिवेंडींग का होत नाही.

**श्री.चंद्रकांत वानखेडे, उपायुक्त तथा मुलेअ :-** प्रिवेडींग नॉर्मल केस मध्ये होत नाही.

**मा.उपमहापौर :-** साहेब १ कोटी रूपयांचे टेंडर आहे आणि तुम्ही म्हणत आहात की नॉर्मल प्रक्रीया आहे.

**श्री.चंद्रकांत वानखेडे, उपायुक्त तथा मुलेअ :-** याच्यामध्ये मला सांगा की टेंडर

**मा.उपमहापौर :-** निविदा समितीला असे अधिकार आहे का ते सांगा मला

**श्री.चंद्रकांत वानखेडे, उपायुक्त तथा मुलेअ :-** कसे

**मा.उपमहापौर :-** अशा पध्दतीने तुम्ही निविदा राबवत असतांना अशा विषयांना कायदेशीर नसुन कायदेशीर नुसार तुम्ही ऐच्छिक प्रमाणपत्र मागीतलेले आहे हे निविदा धारकाला कळविणे हे बंधनकारक आहे का ? किंवा मग निविदा समितीला ते अधिकार आहे का?

**श्री.चंद्रकांत वानखेडे, उपायुक्त तथा मुलेअ :-** याच्यामध्ये अस आहे की ऐच्छिक जो आहे.

**मा.उपमहापौर :-** नाही नाही हे ऐच्छिक आहे हे कस समजणार आहे. तुम्ही याच्यामध्ये तो दाखला मागीतलेला आहे. आता बांधकाम विभागाची आपण निविदा प्रक्रीया राबवतो तेव्हा आपण त्याच्यामध्ये म्हणतो की याच्यात डिस्टन्स सर्टीफिकेट असले तर मग ते डिस्टन्स आहे. तर ते पाहीजेच आहे हे तर निविदा होईल. तसाच हा आपला अनुभवाचा दाखला आहे हा ऐच्छिक आहे हे निविदा धारकाला समजेल कस? त्याची समजा ईच्छा असेल सहभागी व्हायची मग त्याला माहितीच नसेल की त्याच्यामध्ये तो दाखला नाहीये तरी हे देण्याचे अधिकार निविदा समितीला आहे का?

**(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी चर्चा करीत होते त्यामुळे सभागृहातील चर्चेचा स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)**

**श्री.सचिन पाटील :-** रद्द करण्यात यावा विषय हा

**मा.उपमहापौर :-** नाही रद्द करण्याचा कोणता पासआऊट आहे हा, पण निविदा समितीबाबत तुमच्याकडून अपेक्षित नाहीये साहेब हे , तुम्ही जे बोलले ना ते तुमच्याकडून अपेक्षित नाहीये.

**श्री.चंद्रकांत वानखेडे, उपायुक्त तथा मुलेअ :-** याच्यामध्ये मी ॲज अ निविदा मेंबर म्हणुन बोलतो आहे की जी नियमात तरतूद आहे ती ऐच्छिक मध्ये येते. मी पर्सनली काही सांगत नाहीये.

**मा.उपमहापौर :-** नाही साहेब हे ऐच्छिक आहे हे निविदा धारकाला कसे समजणार. त्याच्यामध्ये तुम्ही टाकायला पाहीजे होत हे आता सभागृहामध्ये समजत आहे.

**श्री.सचिन पाटील :-** या निविदा प्रक्रीयेच्या अटी शर्ती या नव्याने प्रसिध्द करायच्या आणि याच्यामध्ये जबाबदार कोण आहे हे त्याच्यापहिले सभागहाला समजल पाहीजे.

**(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी चर्चा करीत होते त्यामुळे सभागृहातील चर्चेचा स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)**

**श्री.चंद्रकांत वानखेडे, उपायुक्त तथा मुलेअ :-** याच्यामध्ये

**मा.उपमहापौर :-** साहेब आपल्याला हे टेंडरमध्ये क्लॉज, अटी-शर्ती , टर्मस ॲन्ड कंडीशन टाकतो. आपल्याला हे निविदा धारकाकडून पैसे घ्यायचे आहे. दोघ ठिकाणी अशी परिस्थिती आहे की हे संयुक्तिक आहे का? अस मला म्हणायच होत.

**श्री.चेतन सनकत :-** आता आपण हे टेंडर काढणार आहे. तर त्याच्यामध्ये एवढया अटी शर्ती का? रद्द करा ना त्याला, १ कोटीच्या वर जास्त जर निविदा आली तर महापालिकेला फायदा होणार आहे.

**मा.उपमहापौर :-** साहेब सर्व सदस्यांचा हा एकच प्रश्न आहे.

**श्री.चेतन सनकत :-** का कॉन्ट्रक्टरला वाचण्यासाठी अस करता आहे. असा संशय होतो आहे ना कारण की , मागे एका कॉन्ट्रक्ट मध्ये नांव घेवुन मी सांगत नाही हि अट शिथिल करून याच कॉन्ट्रक्टरला ते टेंडर भेटले गेलेले आहे. आता हि अट शिथिल करू नये या कॉन्ट्रक्टरसाठी म्हणजे दुटप्पी भुमिका दिसते आहे प्रशासनाची

**मा.उपमहापौर :-** साहेब तो मक्तेदार कोण आहे हे माहिती आहे.

**श्री.चेतन सनकत :-** भाऊ दोन मिनिंट, डॉक्युमेंटली आहे माझ्याकडे म्हणुन मी बोलतोय. डॉक्युमेंटली आहे रेकॉर्डवर आणि त्याठिकाणी अट शिथिल केल्यामुळे महापालिकेला उत्पन्न जास्त भेटलेले आहे. ईथेही शिथिल करा आणि महापालिकेला उत्पन्न जास्त भेटू द्या ना, चांगले आहे ना महापालिकेला उत्पन्न आले तर

**श्री.सचिन पाटील :-** ताईंनी सांगीतले त्यानुसार त्या अधिकाऱ्याचे नांव डिक्लियर करावे

**श्री.चेतन सनकत :-** महापालिकेचा फायदा आहे साहेब

**श्री.सचिन पाटील :-** कोण अधिकारी आहे.

**मा.उपमहापौर :-** सन्मा.सदस्यांनी मांडल्यानुसार आणि दुसरे असे की त्याच्यामध्ये तुम्ही अटी शिथिल करा असे कुठेही म्हंटलेले नाहीये. नियमाला अनुसरून आणि कायद्याला धरून जे आहे ते तुम्ही एखाद्या निविदा धारकाला बंधनकारक करू नका.

**श्री.चंद्रकांत वानखेडे, उपायुक्त तथा मुलेअ :-** कस आहे की निविदा प्रक्रीयेमधील कोणतीही निविदा प्रशासकीय मान्यतेला माझ्याकडून जात नाही. त्याच्या ज्या तरतूदी आहेत आणि मी त्या डिपार्टमेंटचा एक्सपर्ट आहे म्हणुन मी तुम्हाला हे सांगीतलेले आहे की ते ऐच्छिक नाही. ती वेव करायचा अधिकार निविदा समिती ठरवू शकते कारण की ते ऐच्छिक आहे. ती टाकायची किंवा नाही टाकायची, त्यांनी अंमलबजावणी अधिकाऱ्यांनी ठरवायच, जर नाही टाकली तर आपले मेंबर काही म्हणणार नाही की हे का टाकलेली नाही. पण ती ऐच्छिक आहे इतक मला माहित आहे.

**मा.उपमहापौर :-** अंमलबजावणी अधिकाऱ्यांनी उत्तर द्यावे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** कुलभुषणभाऊ, आता साहेबांनी त्यांची भुमिका मांडली की ते ऐच्छिक नाहीये. परंतू कस आहे. आज आपण आहात, उद्या जावुन निविदा समितीमध्ये दुसरे कॅफो असतील किंवा दुसरे अधिकारी असतील.जिथे डिस्टेंक्शनरी पॉवर येतात . डिस्टेंक्शनरी पॉवरचा हा मिसयुज होतो. जिथे तरतूदी या स्पष्ट दिसतात. त्या स्पष्ट तरतूदींचा अर्थ घटक कुणीही सामान्यपणे करू शकतो. परंतू डिस्टेंक्शनरी पॉवर आल्यानंतर काय होत की मला वाटल किंवा पार्टी याच्यामध्ये काही झाले तरच मी डिस्ट्रेक्शन देईल. अन्यथा मी काय म्हणेल की नाही नाही तुम्ही अनुभवाचा दाखला जोडलेला नाहीये. म्हणुन तुमची निविदा आम्ही अमान्य करतो आहोत. अशा पध्दतीने त्याचा दुरूपयोग होवू शकतो. म्हणुन सन्मा.सदस्य जे म्हणत आहेत की तशा पध्दतीने जर कधी ती ऐच्छिक नसेल तर त्या निविदेमध्ये अटी-शर्तीमध्ये टाकणे चुकीचेच आहे. ती का बर टाकतात मग, की जर कधी महानगरपालिकेला फायदा होत असेल तर तशा पध्दतीने निर्णय घ्या.

**श्री.मनोज चौधरी :-** काहीच फायदा नाहीये, गेल्या सात तासापासुन आपण बसलेलो आहे. मी सात तासापासुन कंन्टीन्यु बसला आहे. कोणाला काही झाले का या सात तासात, नितीनभाऊ बोलले, शुचितातांई बोलल्या, सचिनभाऊ आता बोलले, मी बोललो मॅडम आपण काहीच कार्यवाही करत नाहीये. कार्यवाही केली पाहीजे मॅडम आपण, नाहीतर आमचा ईथे येवुन काहीच अर्थ नाहीये अस वाटतय मला आता, काय म्हणण आहे तुम्ही सहमत आहे ना माझ्या मताशी सर्वज्ञण

**श्री.सचिन पाटील:-** या विषयावर बोलतोय आपण

**श्री.मनोज चौधरी :-** या विषयावर नाही सचिनभाऊ आपण जे ही विषय मांडतो आहेत. मी हे नासही म्हणत आहे. शुचितातांई असतील, नितीनभाऊ असतील , मी असेल, कोणीही असेल जनरल बोलतोय मी किंवा सगळे नगरसेवक आपल्या ज्या भावना महासभेमध्ये मांडतोय त्या मान्य काहीच होत नाहीये मॅडम मी बघतोय सात तासांपासुन, कोणावर कारवाई केली तुम्ही कोणावरच कारवाई केली नाही तुम्ही

**मा.उपमहापौर :-** कारवाई केलीच पाहीजे.

**श्री.मनोज चौधरी :-** कारवाई केलीच पाहीजे मॅडम

**ॲड.शुचिता हाडा :-** माझ अस म्हणण आहे की, आयुक्त महोदया की हा असा मुदतवाढ देण्याचा पायंडा पाडायचा नाही. त्याशिवाय हे असे प्रस्ताव येणे थांबणार नाही.

**(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी चर्चा करीत होते त्यामुळे सभागृहातील चर्चेचा स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)**

**मा.उपमहापौर :-** नाहीतर मग त्याच्यावर कार्यवाही केली पाहीजे.

**ॲड.शुचिता हाडा :-** नाहीतर मग सरसकटच सगळ्यांना मुदतवाढ देवुन टाकावी प्रशासनाने

**श्री.मनोज चौधरी :-** ताई ते म्हणणे नाहीये आपण जे विषय मांडतोय ते काही नाही. आपण जे सांगतो आहे आणि ते ऐकताहेत शांततेने

**मा.उपमहापौर :-** म्हणजे जसे अनंतभाऊंनी सांगीतले की, ईथे कितीही ओरडले तरी काही फरक होणार नाही.

**श्री.मनोज चौधरी :-** मग कुलभुषणभाऊ या प्रमाणे महासभा चालवुच नका ना, जर प्रशासन ऐकतच नसेल आपले तर कशाला

**मा.उपमहापौर :-** संबंधित विभागाप्रमुखांना समाधानकारक उत्तर द्यायला सांगा आणि विषय संपवा.

**श्री.मनोज चौधरी :-** भाऊ समाधानकारक उत्तरच नाहीये यांच्याकडे आपण दोन तासांपासुन कारवाई करण्याची मागणी करतोय. काय झाले आणि कोणत्या अधिकाऱ्यावर कारवाई झाली, हा विषय सोडून द्या हा एक विषय नाही म्हणत आहे मी, दोन महासभा झाल्या आणि दोन महासभेत आपण कारवाई करतो आणि सभा झ याल्यानंतर कोणत्या अधिकाऱ्यावर , कर्मचाऱ्यांवर कारवाई झाली आहे. म्हणजे आपण मुद्दाम करताहेत का? या महापालिकेत आम्ही फक्त नुसते ईथे येवुन बसतात, कोणत्या अधिकाऱ्यावर कारवाई झाली. अरे अस नाहीये ना आपल्याला एवढया लोकांनी निवडून दिले आहे आणि आपण महापालिकेत त्यांचे मत मांडायला येतोय ना, लोक काय म्हणता की तुम्ही नुसता चहा पाणी घेता तिथे, आणि आज आमच्या वॉर्डातील कालच्या क्लिपा आहे नगरसेवक पैसे घेतात, नगरसेवक निष्काळजी, म्हणजे आम्हालाही त्या गोष्टींचा फेस करावा लागतो. अधिकाऱ्यांना नाही आम्ही फेस करतो त्या गोष्टींना की हे टेंडर होत आणि हे मंजुर केले आहे आणि हे वर्कऑर्डर प्रोसिजर पर्यंत आले आहे किंवा या ५ लाखात आम्ही मनपा फंडात मंजुरीला मागीतले आहे. कोणती पध्दत आहे हि.

**श्री.सचिन पाटील:-** कारवाई निश्चित करा मॅडम

**श्री.मनोज चौधरी :-** अरे काय आहे चाललय, चाललय नुसतं

**मा.आयुक्त** :- या विषयाच्या अनुषंगाने सांगते की, जेव्हा हा विषय आलेला होता तेव्हाच आपण आदेश काढलेले आहेत की आपण मुदतवाढीच्या विषयाला आपल्याला जबाबदार धरण्यात येईल आणि त्या अनुषंगाने सदर विषयाची माहिती घेवुन संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून पुढील प्रशासकीय कारवाई करण्यात येईल.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** आत्ता कारवाई करा मॅडम

**श्री.सचिन पाटील:-** कारवाई आताच करा मॅडम

**मा.आयुक्त** :- जबाबदार कोण आहेत ते बघावच लागेल ना

**(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी चर्चा करीत होते त्यामुळे सभागृहातील चर्चेचा स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)**

**ॲड.शुचिता हाडा:-** ते कोण आहे हे प्रशासन बघेल. पण जबाबदारी कोणती निश्चित करणार आहे XYZ कोणीही कर्मचारी यामध्ये आहेत. तर काय जबाबदारी निश्चित करणार आहोत आपण

**मा.आयुक्त** :- नाही याच्यामध्ये

**श्री.सचिन पाटील:-** पुर्ण जळगांव शहराचा विषय आहे मॅडम, त्याच्यात असा कोण अधिकारी आहे आणि त्याच्या निष्काळजी पणामुळे अस होत आहे.

**ॲड.शुचिता हाडा:-** अशा आलेल्या प्रस्तावाला त्याच्यामुळे मुदतवाढीची मंजुरी द्यावी लागते आहे. त्याच्यावर याबाबत लायबिलीटीज फिक्स करा आणि कारवाई करा. कारण अशी कठोर शिक्षा झाल्याशिवाय पुढील प्रस्ताव थांबणारच नाहीत.

**(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी चर्चा करीत होते त्यामुळे सभागृहातील चर्चेचा स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)**

**मा.उपमहापौर** :- आपली जी चर्चा होते आहे त्याच्यातुन त्यांना बोलवा. कोणी प्रस्ताव तयार केला आहे. कोणी डॉकेट बनवले आहे. प्रस्तावाची नेमकी परिस्थिती काय आहे ते तर सांगा

**श्री.गणेश चाटे, उपायुक्त** :- ज्यावेळी माझ्याकडे हा प्रस्ताव आला. त्यावेळी मी या डॉक्युमेंटवर सही करून मॅडमांकडे पाठवला.

**श्री.मनोज चौधरी :-** साहेब आम्ही जे ऐकतो आहे ना ते पाच/सहा सातांपासुन कारण ऐकतो आहे.

**श्री.गणेश चाटे, उपायुक्त** :- आणि या संदर्भात मी वसुली विभागाला विचारले आणि यासंदर्भात सुचनाही केल्या की यासंदर्भात इतका उशिर का केला? तर त्याच एक कारण असे होत की, त्या अधिकाऱ्याकडे बऱ्याच विभागाचे चार्ज, बऱ्याच विभागाच्या कार्यवाह्या आणि त्यांची एकाच माणसाच्या ऑर्डर बऱ्याच विभागाकडे झ ाालेल्या आहेत. त्याच्यामुळे काम करायला अडचणी येता आहे. तरी सुध्दा याच्यासंदर्भात नोटीस काढुन उत्तर मागविले जाईल.

**श्री.सचिन पाटील:-** ताई साहेबांनी आत्ताच सांगीतले की, तिन महिन्यापहिले निविदा प्रक्रीया सुरवात करावी लागते हि, आणि ३१ मार्चला जर निविदा संपते आहे ही तर तिन महिने पहिलेच या निविदाची सुरवात व्हायला पाहीजे होती ना मग किती लोड आहे त्या कर्मचाऱ्याकडे ५० विभागांच्या जबाबदारी असतील. पण तिन महिनेपाहिले तर हा विषय आला असेल ना त्याच्या समोर की या निविदा काढायच्या म्हणुन.

**मा.उपमहापौर** :- काय आहे की कर्मचाऱ्यांवर कामाचा लोड आहे आणि कर्मचाऱ्यांवर अन्याय झाला पाहीजे असे पण आमचे काही हे नसत. परंतू आमच अस म्हणण आहे की या निविदा ज्या आहे आणि त्याचा तुम्ही जो पगार घेता आणि आपण शासनाकडुन नागरीकांना ज्या मुलभुत सुविधा पुरविण्यामध्ये अशा बेशिस्तपणा मुळे त्याच्यामध्ये वेळोवेळी जर विलंब करत राहू तर नागरीक तर लोकप्रतिनिधी जो आहे तो लोकांना सामोरे जात असतो. जस आता मनोजभाऊंनी सांगीतले की आम्हाला फेस कराव लागत. लोक काहीही बोलतात. सभागृहात एक काहीतरी बंधन आहे लोकप्रतिनिधीला त्याच्यामुळे सभागृहात बोलतांना त्याच्यामुळे तो बोलतांना तो मोजुन मापुन बोलतो. परंतु लोकप्रतिनिधींना बाहेर इतक्या खालच्या भाषेत बोलायला लागलेले आहेत. हे तुम्ही फेस नाही करत आहे हे लोकप्रतिनिधी फेस करता आहे.

**ॲड.शुचिता हाडा:-** याला जबाबदार कोण आहे तर याला जबाबदार प्रशासन आहे.

**मा.उपमहापौर** :- तेच सांगतो आहे ना मी हे फक्त कशामुळे होत आहे की तुमच्या प्रशासनाच्या अशा बेशिस्तपणाने विलंब करून काम करता आहे. आता याच्यात असे आहे की आपला बांधकाम विभागाचा विषय आहे तो आपला ट्रक्टरवर माणस पुरविण्याचा आणि डागडुजीचा त्यासंदर्भात आपण काय कारवाई करतोय. त्यासंदर्भातपण वारंवार महापौरांकडून विचारणा होते. आपण या यंत्रणा कार्यान्वित केलेल्या आहेत सदरील मक्तेदाराला आपण पैसे देतोय किंवा सदरील यंत्रणा कार्यान्वित असतांना आपण जो प्रशासनाच्या मार्फत चालविण्याकरीता जो विलंब होतोय. याच्यात सर्वांचा कुठेतरी ताळमेळ होत नाहीये आणि या सर्वांना तुम्ही विलंब करता आहे  कामांना म्हणजे आपण कुठलीही जबाबदारी नाहीये. सकाळी १० वाजता आल्यानंतर संध्याकाळी ६ वाजतील आणि मी घरी केव्हा जावु अश्या पध्दतीने कर्मचारी या ठिकाणी काम करता आहे आणि काम वेळेतर होत नाहीये आणि लोकप्रतिनिधी सुध्दा वापस जाता आहे. शासनाकडुन वितरीत झालेले निधि हे सुध्दा वापस जाता आहे. आठ आठ महिने, वर्ष-वर्षभर या निधिंच मॅनेजमेंट होत नाहीये मॅडम मग हि शोकांतिका नाहीये का? एकीकडे आपण म्हणतो की महानगरपालिका ही कर्जबाजारी आहे. कर्जबाजारी असल्यामुळे काम होवू शकत नाहीये आणि आपण शासन आपल्याला निधी वितरीत करतोय आणि आपण शासन आपल्याला निधी वितरीत करतोय आणि आपण ईम्पीलीमेंटच करत नाहीये. मग याचा रोष हा लोकांचा आणि लोकांना माहिती नसत हे की या महानगरपालिकेतील अधिकारी- कर्मचारी काय करता आहेत म्हणुन आम्हाला सांगाव लागत ना हे सगळ, आम्हाला फेस कराव लागत हे सगळे, आम्हाल कोणत्या अधिकाऱ्यावर कारवाई करावी हा आमचा उद्देश नाहीये आमचा मुळात उद्देश हा आहे की या सर्व प्रक्रीया या टाईमात झाल्या पाहीजे आणि या वेळेत    झाल्या पाहीजे.

**श्री.दिलीप पोकळे :-** मॅडम याला जे जबाबदार अधिकारी असतील किंवा कर्मचारी असतील तर त्यांनी कर्तव्यात कसुर केली आहे बरोबर आहे ना.

**मा.महापौर** :- हो

**श्री.दिलीप पोकळे :-** आणि तस जर म्हंटले तर त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करा दोषी असतील तर

**मा.आयुक्त** :- सर मी काय म्हणतेय

**श्री.दिलीप पोकळे :-** आम्ही तेच संगतोय केव्हाचे,

**मा.आयुक्त** :- सर मी

**श्री.दिलीप पोकळे :-** नाही नाही, मी का म्हणतोय की जबाबदारी काय निश्चित करणार तुम्ही ते सांगा. पण साधारण जबाबदारी निश्चित झाल्यानंतर की त्यांनी कसुर केलेली आहे अस जर समोर आल्यांनतर तर आपण त्यांच्यावर ॲक्शन घेवुन आपण कारवाई करणार का ? हे सभागृहाला सांगा.

**मा.आयुक्त** :- जबाबदारी निश्चित करून कारवाई करण्यासाठी आणि त्यासाठी जी प्रोसिजर आहे. आधी त्याला नोटीस द्यावी लागते आणि मग उत्तर दिल्यावर तर ती प्रोसेस फॉलो केली जाईल मी तेच सांगते आहे. जबाबदारी निश्चित करणे म्हणजे का, जबाबदारी निश्चित करून शिक्षा देण.

**(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी चर्चा करीत होते त्यामुळे सभागृहातील चर्चेचा स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)**

**ॲड.शुचिता हाडा** :- म्हणजे आज आम्ही या कामाला मुदतवाढ द्यायची कारण आमच अडलय हेच झाल ना तुम्ही तुमची प्रोसिजर नंतर राबवाल त्याला उत्तर काय आहे ते साहेबांनी आता सांगुन टाकले की मनपा कर्मचाऱ्यांवर अनेक याचा कार्यभार आहे त्याच्या लक्षात आले नाही आणि त्यामुळे होवू शकले नाही, करू शकला नाही आणि आपण त्याला आज मंजुरी देणार आहे.

**मा.उपमहापौर** :- आपण त्याला दिवस दिवसभर

**ॲड.शुचिता हाडा** :- आपल्याला हा पायंडा मोडायचाच आहे की मोडायचाच नाहीये. मोडायचा असेल तर कठोर कारवाई करावी लागेल

**श्री.विशाल त्रिपाठी** :- या सभागृहाला एक विनंती आहे किंवा प्रशासनाला की, जे डॉकेट तयार होत त्याच्यावर प्रस्तावाची पार्श्वभुमि असते. तो त्याच्या संबंधित अधिकारी लिहीतो आणि त्याची सही ज्या दिवशी त्या टिप्पणी वर झालली असते. त्याची तारीख ईथे आली पाहीजे. पुढचा अभिप्राय जेव्हा घेतला त्यादिवशी त्या अधिकाऱ्याची सही आली पाहीजे आणि मुख्यलेखाधिकारी यांच्याकडे गेल्यावर त्यांचा अभिप्राय असेल तर त्याचीही तारीख त्याच्यावर आली पाहीजे आणि जेव्हा आयुक्त फायनल करतील तेव्हा त्याची तारीख आली पाहीजे म्हणजे आपली ही इतक्या वेळ चर्चा झाली ना, एका मिनिंटा उलगडा झाला असता या विषयाचा

**(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी चर्चा करीत होते त्यामुळे सभागृहातील चर्चेचा स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)**

**श्री.विशाल त्रिपाठी** :- एका मिनिंटा उलगडा झाला असता हे मी २००३ ते ०८ च्या दरम्यान सुध्दा हा विषय मांडलेला आहे मी

**श्री.नवनाथ दारकुंडे** :- उपमहापौर साहेब

**(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी चर्चा करीत होते त्यामुळे सभागृहातील चर्चेचा स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)**

**श्री.नितीन लढ्ढा** :- नाही याच्यामध्ये आपण ही निविदा प्रक्रीया पर्यंत मुदतवाढ देतोय आणि हि निविदा प्रक्रीया दहा दिवसात राबवली आठ दिवसात राबवली तर

**(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी चर्चा करीत होते त्यामुळे सभागृहातील चर्चेचा स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)**

**मा.आयुक्त** :- १ कोटीच्या आतील नाहीये.

**मा.उपमहापौर** :- नाही याच कोटींग २१ दिवसांच ठेवावे लागेल ना तुम्हाला

**श्री.चेतन सनकत** :- तर भाऊ आताचे १० दिवस आणि पुढचे १५ दिवस

**(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी चर्चा करीत होते त्यामुळे सभागृहातील चर्चेचा स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)**

**मा.आयुक्त** :- याच्यामध्ये मी चेक करून

**श्री.चेतन सनकत** :- आणि याच्यामध्ये अटी-शर्तींचे पण जे काय असेल ते बघुन घ्याल.

**श्री.सचिन पाटील** :- नियमानुसार

**श्री.चेतन सनकत** :- नियमानुसार करावे.

**मा.उपमहापौर** :- नविन फेरनिविदा करावी लागेल, हे जे आपल्याला

**(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी चर्चा करीत होते त्यामुळे सभागृहातील चर्चेचा स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)**

**श्री.नितीन लढ्ढा** :- नाही नाही नविन मागवाव्या लागतील आपल्याला

**मा.उपमहापौर** :- हो ना मग

**मा.आयुक्त** :- पब्लिश केलय आपण ते

**मा.उपमहापौर** :- पब्लिश झालय ते, तेच सांगतोय मी टेंडर पब्लिश झालेले आहे तेच सांगतोय.

**श्री.गणेश चाटे, उपायुक्त** :- पब्लिश झालेले नाहीये आपण फक्त देकार निश्चित करतोय हि मुदतवाढ दिल्यानंतर आपण पब्लिश करू.

**श्री.नितीन लढ्ढा** :- मॅडम आपल देकार १ कोटी ८० लाख रूपयांचे आहे आणि हे निश्चित झाल्याशिवाय पब्लिश कशी काय होईल.

**मा.आयुक्त** :- याच्यात अटी-शर्तींचा विषय आहे ना

**श्री.गणेश चाटे, उपायुक्त** :- आपण रक्कम निश्चित केलेली नाहीये परंतू याच्या डॉकेटमध्ये मागीलप्रमाणे ज्या अटी-शर्ती आहेत त्याप्रमाणे सादर केलेले आहे.

**मा.उपमहापौर** :- डॉकेट मध्ये ते सर्व आहे आता समजा की मान्य आहेत तर मग काय करायचे.

**(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी चर्चा करीत होते त्यामुळे सभागृहातील चर्चेचा स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)**

**श्री.गणेश चाटे, उपायुक्त** :- आपल्या ज्या अटी-शर्ती असतील तर आणि जे नियमानुसार असेल ते

**श्री.चेतन सनकत** :- जास्तीत जास्त फायदा व्हायला पाहीजे महापालिकेला, जास्तीत जास्त उत्पन्न मिळायला पाहीजे. त्याहिशोबाने करा.

**श्री.नितीन लढ्ढा** :- सदर प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर** :- माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर** :- विषय क्रं. ३९ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी चर्चा करीत होते त्यामुळे सभागृहातील चर्चेचा स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)**

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. १०४५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिका हद्दितील दैनिक बाजार शुल्क, आठवडे बाजार व कोंबडी बाजार शुल्क वसुली संकलनासाठी सन २०२२-२३ करीता महासभा ठराव क्रमांक ७९४ दिनांक २४/०३/२०२२ नुसार व कार्यादेश जा.क्र./कि.व.वि./२७०८ दि.३१/०३/२०२२ अन्वये रक्कम रुपये १,६४,००,७८६/- इतक्या देकार रकमेवर श्री.किरण शंकरराव भालोदकर यांची दैनिक बाजार शुल्क, आठवडे बाजार व कोंबडी बाजार शुल्क वसुली संकलनासाठी दिनांक ०१/०४/२०२२ ते दिनांक ३१/०३/२०२३ या कालावधी करीता अभिकर्ता म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे.

सदर मक्त्याचा कालावधी दि.३१/०३/२०२३ रोजी संपुष्टात येत असल्याने, सदर मक्त्याकरीता नविन ई-निविदा/ ई-लिलाव करणे आवश्यक आहे. मागील मक्त्याची रक्कम रुपये १,६४,००,७८६/- अशी होती.

विदयमान अभिकर्ता श्री.किरण शंकरराव भालोदकर यांनी दिनांक ०९/०२/२०२३ रोजी अर्जाव्दारे " हाकर्सची संख्या ही मक्ता घेण्याचा कालावधीपेक्षा आजमीतीस खुप कमी झाली आहे. तसेच महानगरपालिकेकडून वेळोवेळी अतिक्रमण मोहीम राबविली जात असल्यामुळे रस्त्यावरील विक्रेत्यांचे प्रमाण देखील कमी झालेले आहे. त्यामुळे दैनिक बाजार शुल्क वसुली मक्त्याच्या मासिक भरणा रक्कम कमी करुन देणे बाबत विनंती केलेली आहे."

वरील प्रमाणे वस्तुस्थितीचा विचार करता मागील वर्षी निश्चित करण्यात आलेला देकार रक्कम रुपये १,६४,००,७८६/- यामध्ये १० टक्के वाढ करुन म्हणजेच एकूण रक्कम रुपये १,८०,४०,८६४/- मात्र दैनिक बाजार शुल्क, आठवडे बाजार व कोंबडी बाजार शुल्क संकलनासाठी एक वर्षाकरीता देकार रक्कम निश्चित करता येईल.

तसेच मक्ता कालावधीत भविष्यात जर कोविड-१९ संसर्गाचा प्रादुर्भाव वाढल्याने अथवा अन्य नैसर्गिक आपत्तीमुळे जिल्हाधिकारी यांनी हॉकर्स बाबत निर्बंध लागू केल्यास व त्यामुळे हॉकर्सच्या उपस्थितीवर परिणाम झाल्यास अभिकर्ता यांनी मागणी केल्यानुसार हॉकर्सची घट विचारात घेवून भरणा रकमेत सुट देणे बाबत स्थायी समितीच्या मान्यतेने आयुक्त यांना निर्णय घेण्याचा अधिकार राखीव राहील. मात्र नियमीत अतिक्रमण कार्यवाहीमुळे अभिकर्त्यास कोणतीही सुट देता येणार नाही. या सर्व सूचनेचा करारनाम्यात / निविदेत अटी शर्तीत समावेश करणे आवश्यक आहे.

विदयमान अभिकर्ता /मक्तेदार श्री.किरण शंकरराव भालोदकर यांनी संमती दर्शविल्यास, सदयाच्या परिस्थीतीत जळगांव महानगरपालिकेच्या ज्या अटी व शर्तीच्या अधिन राहून अभिकर्ता / मक्तेदार श्री.किरण शंकरराव भालोदकर हे आज रोजी दैनिक बाजार शुल्क, आठवडे बाजार व कोंबडी बाजार शुल्क संकलनाच्या मक्त्याची कार्यवाही करीत आहे. त्याच अटी व शर्तीप्रमाणे, नविन ई-निविदा / ई-लिलाव प्रक्रिया पूर्ण होईपावेतो विदयमान अभिकर्ता / मक्तेदार श्री.किरण शंकरराव भालोदकर यांना दैनिक बाजार शुल्क, आठवडे बाजार व कोंबडी बाजार शुल्क संकलनासाठी मुदतवाढ देण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

तसेच सन २०२३-२४ करीता दैनिक बाजार शुल्क, आठवडे बाजार व कोंबडी बाजार शुल्क संकलनासाठी १ वर्षाकरीता रक्कम रुपये -१,८०,४०,८६४/- मात्र देकार रक्कम ठरविणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

सभागृहात झालेल्या चर्चेनूसार प्रशासनाने दैनिक बाजार शुल्क, आठवडे बाजार व कोंबडी बाजार शुल्क संकलनासाठी लवकरात लवकर विहीत मुदतीत निविदा प्रक्रिया पूर्ण करावी. मक्तेदारास निविदा प्रक्रिया पूर्ण होईपावेतो मुदतवाढ देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल -** ५५

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं. ४० :-** जळगांव शहर महानगरपालिका हद्दित महानगरपालिका मालकीचे इमारती, दुभाजक, वाहतुक बेट, रस्त्याच्या लगतच्या जागेत मुख्य चौक इत्यादी ठिकाणी बॅनर होर्डिंग्ज करीता जागा निश्चित करुन, तेथे आवश्यक ते स्ट्रक्चर उभारुन त्या ठिकाणी व्यावसायीक स्वरुपात बॅनर, होर्डिंग्ज महानगरपालिकेच्या विहीत अटी व शर्तीनुसार प्रदर्शित करणेकामी एका वर्षाकरीता अभिकर्ता नियुक्ती करणेसाठी जाहिर ई-निविदा प्रसिध्द करणेबाबत व सदर निविदे करिता एका वर्षासाठी देकार रक्कम निश्चित करण्याबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- सदर प्रस्ताव मान्य करण्यात यावा आणि देकार निश्चित करून निविदा प्रक्रीया राबविण्यात यावी. पण याच्यासंदर्भात आपल्या जळगांव कोर्टात एक निवाडा चालु आहे तर नेमकी त्याची काही अडचण आपल्याला येईल. तो जाहिरात शुल्काच्या संदर्भात आहे.

**श्री.गणेश चाटे, उपायुक्त** :- आपल्या महानगरपालिकेच्या जागा मुख्य करून डिव्हायडर आहेत.

**श्री.नितीन लढ्ढा** :- हो पण आपण जाहिरात शुल्क घेणार आहेत का

**श्री.गणेश चाटे, उपायुक्त** :- आपण परवाना फि घेणार आहे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- परवाना फि घेणार आहेत का.

**श्री.गणेश चाटे, उपायुक्त** :- हो

**श्री.नितीन लढ्ढा** :- फक्त त्याच्यामध्ये अस म्हणायचे होते की म्हणजे परवाना शुल्क जे आहे ना त्याचे जे आहे ना त्याच्यामध्ये हायकोर्टाच्या जजमेंट मध्ये ऑब्जर्वेशन ज्या पध्दतीचे होते की तुम्ही फक्त हेड बदलुन की जाहिरात शुल्क जे आहे ते जि.एस.टी मध्ये वसुल केल जातय. जि.एस.टी मध्ये वसुल केल्याजात असल्याकारणाने किंवा तत्सम करणाने जाहिरात शुल्क दुसऱ्या नावाने वसुल करण्यात येवु नये. असा तो निर्णय झालेला आहे.

**श्री.गणेश चाटे, उपायुक्त** :- हो ही जी आहे आपली परवाना फि आहे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- हो ना मला माहिती आहे की आपण परवाना फि आकारणी करू शकतो. परंतू फक्त जो निकाल जो असेल त्या निकालानुसार हे घेण्यात याव आणि प्रशासनाचा हा प्रस्ताव मान्य करण्यात यावा. डिव्हायडरमध्ये लावण्याच्या संदर्भातील भुमिका जी आहे. ती अमान्य करण्यात येत आहे. म्हणजे बाकीच्या ज्या डिव्हायडर सोडून, म्हणजे डिव्हायडरच्या याला कुठलीच परवानगी द्यायची नाही का?

**(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी चर्चा करीत होते त्यामुळे सभागृहातील चर्चेचा स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)**

**श्री.विशाल त्रिपाठी** :- आपण मागे असेच केले होते आणि काहीतरी एकच पॅटर्न ठेवा काहीतरी, एकसारख आल पाहीजे पुर्ण शहरात आणि ते पॅटर्न बदलले नाही पाहीजे हि सुचना माझी यामध्ये राहील.

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता** :- याच्यामध्ये अस आहे की आपल्याला याच्या ऑफर मागवायच्या आहेत. त्याच्यामध्ये त्यांनी आपल्याला सांगायचे आहे की, काय लावयचे आहे आणि कशा प्रकारे ते लावायचे आहेत आणि त्याची निगा राखणे आणि त्याचे संरक्षण करणे, त्याची रंगरंगोटी करणे वगैरे करणे. हा सगळा हे करून आपल्याला ते आपल्याला काही देवू शकतात का, ते पण आपल्याला बघायचे आहे. त्याच्यामध्ये आपण त्यांनी जी काही बोर्ड किंवा जाहीरात करायची आहे. त्याच्यामध्ये पण त्यांनी त्यांच्या स्वत:च्या संस्थेची करायची आहे आणि त्याठिकाणी इतर संस्थेची जाहिरात करू नये अशा आपल्या अटी शर्ती तयार करण्याचे आपले काम चालु आहे आणि येत्या आठ दहा दिवसांमध्ये ते आपण प्रसिध्द करणार आहोत.

**(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी चर्चा करीत होते त्यामुळे सभागृहातील चर्चेचा स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)**

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता** :- ठराव पारीत झालेला आहे तो

**श्री.नितीन लढ्ढा** :- म्हणजे हा ठराव पारीत झालेला आहे आणि त्या संस्थांना द्यायच आहे तर ठिक आहे. डिव्हायडर हा पार्ट सोडून याला मान्यता देण्यात येत आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी**:- याच्यात अजून दोन सुचना आहेत. याचा जसा मागचा ठराव झाला होता आपला, त्याचे स्पॉट कोणते घेणार आहेत. ती यादी एकदा सभागृहापुढे आणली पाहीजे आणि दुसरे की अटी-शर्ती ठेवल्या पाहीजे की शहराचे विद्रुपीकरण होणार नाही. कारण काय होत की त्या एरियामध्ये विद्रुपीकरण होणार नाही आणि काही जे असतात की जे वाऱ्यावादळाने फाटलेले असतात. तर ते तिथेच तसा तो बॅनर अडकलेला असतो. तर या विषयामध्ये स्पॉट नुसार एक यादी फायनल केली पाहीजे.

**श्री.गणेश चाटे, उपायुक्त** :- आता जस सोनगिरे साहेबांनी सांगीतले आणि या संबंधित ज्या संस्था आहेत आणि ते ज्या ठिकाणी लावत आहेत परंतू ते मेंटेंन नाहीये ना आणि त्याच्यामुळे आपल उत्पन्न पण कमी होत. तर याचा जर आपण विचार केला तर आपला जास्त फायदा होईल तर याचा निर्णय घेण्यात यावा.

**श्री.नितीन लढ्ढा** :- साहेब आता तुम्ही म्हणत आहात की मेंटेंन करत नाहीत आणि जे मेंटेंन करत नसतील तर आणि ज्यांना दिले असतील आणि त्यांना नोटीस द्या आणि ते नियमानुसार ताब्यात घ्या. फक्त त्यात कोर्टाच्या निकालाचा अवमान होणार नाही हे पाहुन घ्या.

**श्री.नितीन लढ्ढा** :- सदर प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर** :- माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर** :- विषय क्रं. ४० सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी** :- महापौरताई

**मा.उपमहापौर** :- विशालभाऊ थांबा.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. १०४६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिकेचे आर्थिक उत्पन्न वाढी बाबत प्रस्ताव पुढील प्रमाणे, महासभा ठराव क्रमांक ७६६ दि.२४/०३/२०२२ अन्वये विहीत केलेले जमिन भाडे व परवानाफी चा भरणा करुन जळगांव शहर महानगरपालिका जळगांव हद्दीत महानगरपालिकेच्या जागा जसे इमारती, दुभाजक, वाहतूक बेट, रस्त्याच्या लगतच्या जागेत मुख्य चौक इत्यादी जागेवर जाहिरात बॅनर प्रदर्शित करणे कामी परवानगी देण्यात येते.

जळगांव शहर महानगरपालिका जळगांव हद्दीत खाजगी तसेच मनपा जागेत लावणात येणाऱ्या जाहिरात, बॅनर व फलक इत्यादींना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २४४, ३८६ (१) व (२) तसेच महाराष्ट्र महानगरपालिका आकाश चिन्हे (स्काय साईन) व जाहिरात प्रदर्शित करण्याचे नियम व नियंत्रण नियम-२०२२ यामध्ये दिलेल्या तरतूदी व नियमावली दिलेली आहे.

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्रमांक याचिका-३०१७/प्र.क्र.-१३०/नवि-२२ दि.१४/११/२०२२ नुसार महानगरपालिका हद्दित तात्पुरत्या स्वरुपात लावण्यात येणाऱ्या जाहिरातींकरीता जागा निश्चित करणे बाबत सूचीत केलेले आहे. त्यानुसार महानगरपालिका हद्दित तात्पुरत्या स्वरुपात लावण्यात येणाऱ्या जाहिरातींकरीता जागा निश्चित करणे आवश्यक आहे. तसेच अनधिकृत बॅनर/होडींगच्या संदर्भातील जनहित याचिका क्रं.१५५/२०११ च्या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाच्या नगरपरिषद संचालनालय यांनी अनधिकृत बॅनर / फलक यांच्या बाबतीत कारवाई करण्यासंदर्भात निर्देशीत केलेले आहे. परंतु मनुष्यबळा अभावी अनधिकृत बॅनर / फलक यांच्या बाबतीत नियमीत कारवाई करण्यासंदर्भात अडचणी येतात.

त्यामुळे जळगांव शहरात बॅनर,होर्डिंग्ज यांच्या अतिरेकामुळे होणारे विद्रुपीकरण कमी करण्याच्या उद्देशाने व महानगरपलिकेचे आर्थिक उत्पन्न वाढविणेच्या दृष्टीने जळगांव शहर महानगरपालिका हद्दित महानगरपालिका मालकीचे इमारती, दुभाजक, वाहतूक बेट, रस्त्याच्या लगतच्या जागेत मुख्य चौक इत्यादी ठिकाणी बॅनर होर्डिंग्ज करीता जागा निश्चित करुन आवश्यक ते स्ट्रक्चर उभारुन त्या ठिकाणी व्यावसायीक स्वरुपात बॅनर, होर्डिंग्ज प्रदर्शित करणेकामी जाहिर ई-निविदा प्रसिध्द करुन अभिकर्ता नेमणे उचित होईल. सदर प्रक्रियेमुळे एका आर्थिक वर्षात महानगरपालिकेस अंदाजीत रक्कम रु.१,००,००,०००/- (एक कोटी) उत्पन्न प्राप्त होवू शकते. त्यामुळे सदर कामी एका वर्षाकरिता अभिकर्ता नियुक्तीसाठी देकार रक्कम रुपये १,००,००,०००/- (एक कोटी) मात्र निश्चित करणे योग्य होईल.

उपरोक्त नुसार जळगांव शहर महानगरपालिका हद्दित महानगरपालिका मालकीचे इमारती, वाहतूक बेट, रस्त्याच्या लगतच्या जागेत मुख्य चौक इत्यादी ठिकाणी बॅनर होर्डिंग्ज करीता जागा निश्चित करुन, तेथे आवश्यक ते स्ट्रक्चर उभारुन त्या ठिकाणी व्यावसायीक स्वरुपात बॅनर, होर्डिंग्ज महानगरपालिकेच्या विहीत

अटी व शर्तीनुसार प्रदर्शित करणेकामी एका वर्षाकरिता अभिकर्ता नियुक्ती करणेसाठी जाहिर ई-निविदा प्रसिध्द करणेस तसेच सदर निविदेकरीता देकार रक्कम रुपये १,००,००,०००/- (एक कोटी) मात्र निश्चित करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

सभागृहात झालेल्या चर्चेनूसार प्रशासनास दुभाजकामध्ये बॅनर, होर्डिंग्ज लावणेबाबतची परवानगी नाकारण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ५५**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं. ४१ :-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३(ड) नुसार मा.आयुक्त यांनी केलेल्या संविदांची माहिती घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- संविदांची माहिती घेण्यात आली.

**मा.उपमहापौर** :- माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर** :- विषय क्रं. ४१ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी** :- महापौरताई सकाळी ११ वाजेपासुन म्हणजे आम्हीतर सकाळी १०.३० पासुन आलेले आहे. तर आजची ड्युटी पुर्ण झालेली आहे ६.३० पर्यंत तर माझी परत विनंती आहे सभागृहाला आयुक्त मॅडम

**(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी चर्चा करीत होते त्यामुळे सभागृहातील चर्चेचा स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)**

**श्री.विशाल त्रिपाठी** :- आयुक्त मॅडमशिवाय होणार नाही विषय हा , आपण कितीही बोलले तरी

**मा.उपमहापौर** :- बोला विशालभाऊ आपण काम कोणते करायचे आहे ते बोला

**(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी चर्चा करीत होते त्यामुळे सभागृहातील चर्चेचा स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)**

**श्री.विशाल त्रिपाठी** :- कर्मचाऱ्यांच्या पत्राचा विषय आहे मी परत एकदा विनंती करतो सभागृहाच्या वतीने की, कर्मचाऱ्यांचे जे पत्र द्यायचे आहे शासनाला कारण की उद्या परत सुटी आहे आणि परत २३ तारखेला बाविस्कर साहेब नाहीयेत. माझ्या माहितीप्रमाणे तर ते आज पत्र दिले तर जास्त आनंद होईल आणि महत्वाचा विषय आहे. तयार आहे आणि मुजुमदार साहेबांनी ड्रॉप्ट फायनल केलेला आहे. सगळी आकडेमोड तयार आहे पुर्ण दप्तर ईथे आणुन ठेवलेले आहे.

**मा.उपमहापौर** :- आणि याचीच आम्हाला चिंता होती म्हणुन ४ वाजेपासुन ६ वाजेपर्यंत सांगतो आहे की महासभा संपवा.

**श्री.विशाल त्रिपाठी** :- भाऊ मी काही जास्त बोललोच नाही.

**ॲड. शुचिता हाडा** :- आयुक्त महोदया, जस कर्मचाऱ्यांच्याबाबतीत एक पत्र देण्यात आलेले आहे तसच कर्मचाऱ्यांसाठी काय नियोजन केलेल आहे.

**मा.आयुक्त** :- कर्मचाऱ्यांचही नियोजन केलेले आहे सर्व HOD आणि कर्मचाऱ्यांना वेतन लागू करणेबाबत बजेटमध्ये तरतूद करण्यात आलेली आहे.

**श्री.अनंत जोशी**:- मॅडम तुम्ही बजेटमध्ये तरतूद केल्याचे कुठेच दिसुन येत नाहीये.

**नगरसचिव :-** सन्मा.सभागृहाला विनंती आहे की NULM विभागाकडून ३ मार्च ते २ एप्रिलपर्यंत सागर पार्क येथे खान्देश महोत्सवाचा कार्यक्रम आयोजित केलेला आहे तर सर्व सन्मा.सदस्य आणि परिवाराने उपस्थित राहावे हि विनंती आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. १०४७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३(ड) नुसार मा.आयुक्त यांनी केलेल्या संविदांची माहिती घेतली.

१. प्रशासकीय आदेश क्र./विदयुत/३२ दि.१०/०२/२०२३ अन्वये ममुराबाद रोड वरील हनुमान मंदिर (प्रजापत नगर) म्हाळसाई मंदिर बोर्ड पावेतो मुख्य रस्त्यावर पथदिव्यांकरीता नव्याने पोल, विदयुत संच मांडणी, स्ट्रिट लाईट वायर ओढून पथदिव्याची व्यवस्था करणे (महावितरण कंपनी मर्या.च्या १.३%

सुपर व्हिजन स्किम अंतर्गत) कामी मक्तेदार सत्यम इलेक्ट्रीकल ॲण्ड इंजिनिअर्स,भुसावळ यांचे अंदाजीत रक्कमेचे दरानुसार रक्कम रु.६,९७,८८६/- मात्र खर्चाची संविदा.

२. प्रशासकीय आदेश क्र./विदयुत/३३ दि.१०/०२/२०२३ अन्वये खंडेराव नगर मुख्य रस्त्यावरील रहदारीस अडथळा ठरणारे रोहित्र LT/HT पोल स्थलांतरीत करणे (महावितरण कंपनी मर्या.च्या १.३% सुपर व्हिजन स्किम अंतर्गत) कामी मक्तेदार महेश इलेक्ट्रीकल्स वर्क्स,जळगांव यांचे अंदाजीत रक्कमेचे दरानुसार रक्कम रु.८,६३,५५०/- मात्र खर्चाची संविदा.

३. प्रशासकीय आदेश क्र./विदयुत/३४ दि.१०/०२/२०२३ अन्वये विदयुत विभाग युनिट क्र.१ अंतर्गत येणाऱ्या डॉ.शामा प्रसाद मुखर्जी उदयान येथील नादुरुस्त विदयुत संच मांडणी अदयावत करून व नव्याने एलईडी लाईट बसवून प्रखर प्रकाश व्यवस्था करणे कामी मक्तेदार न्यु.आर.के.इलेक्ट्रीकल्स,जळगांव यांचे अंदाजीत रक्कमेचे दरानुसार रक्कम रु.५,७१,०८६/- मात्र खर्चाची संविदा.

४. प्रशासकीय आदेश क्र.लेखा/२५९० दि.२८/०२/२०२३ अन्वये दुहेरी नोंद लेखापध्दतीची अंमलबजावणी करणे कामी सनदी लेखापाल म्हणुन केतन के.काबरा ॲन्ड असोसीएट्स यांची नियुक्ती करणे कामी केतन के. काबरा ॲन्ड असोसिएट्स, जळगांव यांचे वाटाघाटी अंती दर सर्वात कमीचे स्विकृत करुन रक्कम रु.७,८०,०००/- मात्र खर्चाची संविदा.

५. प्रशासकीय आदेश क्र.सा.बा./१६४ दि.०१/०३/२०२३ अन्वये जळगांव शहरातील डांबरी रस्ते पॉटहोल मशिनच्या सहाय्याने दुरुस्ती करण्याकरीता इमल्शन डांबर पॅक डब्यात शासकीय दराने हिंदुस्थान कोलॅस प्रा.लि.मुंबई यांचे कडुन खरेदी करणे कामी येणाऱ्या एकुण रक्कम रु.१८,४०,४९८/- मात्र खर्चाची संविदा.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ५५**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**मा.महापौर :-** नगरसचिवांनी राष्ट्रगीताला सुरुवात करावी.
**नगरसचिव :-** सर्व सन्मा.सदस्यांनी राष्ट्रगीतासाठी उभे राहावे ही विनंती.

**सही/-**
**(महाजन जयश्री सुनिल)**
**महापौर**
**जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव**